
# वाल्मीकी रामायण

समग्र समालोचन

## प्रवचने



गुरुदेव डॉ. काटे स्वामीजी

१९८८

ॲकेडमी ऑफ कंपेरिटिव्ह
फिलॉसॉफी ॲंड रिलिजन
श्री गुरुदेव मंदिर, हिंदवाडी, बेळगांव.

# वाल्मीकि रामायण

## ( समग्र समालोचन )

## प्रवचने

गुरुदेव डॉ. काटे स्वामीजी

१९८८

अॅकेडमी ऑफ कंपेरिटिव्ह
फिलॉसॉफी अँड रिलिजन

श्री गुरुदेव मंदिर, हिंदवाडी, बेळगांव.

मुद्रक :
स्वस्तिक प्रिंटिंग प्रेस,
हंस टॉकीज रोड,
बेळगांव-२.

✵

प्रथम आवृत्ती १९८८

मुल्य २० रुपये

✵

प्रकाशक
ॲकेडमी ऑफ कंपेरिटीव्ह
फिलॉसॉफी ॲण्ड रिलिजन
गुरुदेव रानडे मंदीर
हिंदवाडी, बेळगांव-५९००११

# प्रकाशकाचे निवेदन

परमपूज्य डॉ. काटे महाराज यांचा मुक्काम १९८० साली बेळगांव येथे श्री गुरुदेव मंदिरांत कांही दिवस होता. त्यावेळी त्यानी संकलन केलेली वाल्मिकी रामायणावरील व्याख्याने अध्यात्मिक व पारमार्थिक जनतेकरीता छापून प्रसिद्ध करावी असे या संस्थेने ठरविले. त्याप्रमाणे त्यांचेकडून व्याख्यानांची हस्तलिखित प्रत मिळाली; परंतु ही प्रत बरीच अशुद्ध होती. ती शुद्ध करून परत आम्हाला पाठविणेबद्दल पूज्य श्री. काटे महाराजाना विनंति करणेत आली. शुद्ध प्रत मिळाल्यानंतर छपाईचे काम हाती घेणेत आले.

ही व्याख्याने किती सुरस व गोड आहेत याबद्दल डॉ. सौ. नंदा मूर्ती यांचे निवेदन पुढील पानावर छापले आहे. ही व्याख्याने वाचणाऱ्यास आत्मानंद मिळेल यात संदेह नाही.

येथील स्वस्तिक प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री राजाभाऊ देशपांडे यानी छपाईचे काम सुबक करून दिले याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहो.

— प्रकाशक

# प्रवेशद्वारी........

गुरुदेव डॉ. काटेस्वामीजींची ही रामायण-प्रवचने. गुरुदेव रानडे मंदिर ट्रस्ट बेळगांव, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, विदर्भ साहित्य संघ, नागपूर, या तीन संस्थातील प्रवचनांचे हे संकलन. काही भाग कराड नागरिक सभेतर्फे झालेल्या प्रवचन मालेतील आहे.

ही प्रवचने क्रमशः नाहीत. पुस्तकाच्या दृष्टीने कांडानुसार त्यांची मांडणी केली.

गुरुदेव डॉ. काटे स्वामीजी रामायणावर बोलतात तेव्हा श्रोते अक्षरशः अश्रू ढाळतात. त्यांच्या वाणीचे सामर्थ्य अद्भुत आहे. ज्यांना त्यांची वाणी ऐकायला मिळाली ते धन्य. ज्यांना ऐकता आलं नाही, त्यांनाही तिचा स्पर्श व्हावा या करताच हा प्रकाशनाचा खटाटोप.

प्रवचनांचे वाचन, श्रवण, चिंतन हमखास समाधीचा गंध देऊन जाईल.


गुरुदेव डॉ. रानडे मंदिर ट्रस्ट बेळगांवतर्फे ही प्रवचने प्रकाशित होत आहेत, हे देखील परमभाग्यच. गुरुदेव रानडे हे महान संत आहेत. त्यांचा अंतरात्मा ही 'रामायण वाणी' निश्चित तृप्त करील.

संकलन, मांडणी करायचा अवसर मला लाभला हे मी माझे परमभाग्य मानते.

भगवान सर्वांचे मंगल करो.

**-डॉ. सौ. नंदा मूर्ति,**

१९/ब, मिलन-को-ऑप. हाऊसिंग
सोसायटी, कोथरूड, पुणे.



गुरुदेव डॉ. काटे स्वामीजी

**Peep through the window of Shri Gurudev.**
**You will be in paradise itself.**

**गुरुदेवांच्या खिडकीतून पहा.**
**दिव्यत्वाची स्वर्गीय झलक तुम्हाला स्पर्शून जाईल.**

# गुरुदेव डॉ. काटे स्वामीजींचा अल्प परिचय

## गुरुदेवांविषयी–

महायोगी प. पू. गुरुदेव डॉ. काटेस्वामीजी यांनी हिमालयात दीर्घ तपस्येने परमात्म साक्षात्कार करून घेतला. त्यांचे घराणे योग्याचे ! वडील थोर योगी !

गुरुदेव विश्वात आले ते योगसंपदेसह. मानवी जीवनातील सर्व दुःखे आणि अनंत यातनातून जाऊन त्यांनी अध्यात्माचे शिखर गाठले आणि अखिल मानवांवर करुणा कृपाप्रसादाची बरसात करून त्यांना भयमुक्ततेची, स्वतंत्रतेची, अमृतत्वाची झलक देण्याकरताच गुरुदेव आत्मज्ञानाच्या, अद्वैताच्या शिखरी आरुढ झाले.

त्यांच्या सान्निध्यात थोडा वेळ का होईना येणाऱ्या मानवावर त्यांच्या अद्‌भुत, दिव्य व्यक्तिमत्वाचा असा काही ठसा उमटतो की, त्याच्यात क्रांती होते. पावित्र्याकडे, परमात्म्याकडे वळवण्याची त्यांची शक्ती अद्‌भुत आहे.

गुरुदेव हे पुणे विद्यापीठाचे डॉक्टरेट असून काही वर्षे ते प्राध्यापक होते. परंतु त्यांच्या जीवनाची पुष्कळ वर्षे हिमालयात तपस्या आणि योगसाधनेत गेलीत. तेथे त्यांनी परमात्मा प्राप्त करून घेतला. त्यानंतर ते महाबळेश्वरला काही वर्षे एकांतात होते.

## जीवनकार्य–

धर्मजागृतीकरता, जनकल्याणाकरता आता प. पू. गुरुदेव भारतभर भ्रमण करीत आहेत.

प. पू. गुरुदेव हे प्रचंड योग महाशक्तीचे भांडार ( Store-house ) आहेत. ही महाशक्ती ते भ्रू-मध्य स्पर्शाने,

शिष्यात संक्रमित करतात. शक्ती संक्रमित शिष्याला दिव्य अनुभूती येते. त्याच्यात क्रांती होते. गुरुदेवशक्ती शिष्यांचे रक्षण करते भयमुक्त बनवते. स्वतंत्र बनवते. भेडसावणाऱ्या समस्या अलगद सुटू लागतात.

दोन्ही भुवया एकत्र मिळतात; ते भ्रू-मध्य ! हेच आज्ञाचक्र ! इथेच रुद्रग्रंथी आहे. इथेच इडा, पिंगला आणि सुषुम्ना मिळतात. इथेच विचारवृत्ती मावळतात. इथेच दिव्यानुभूती येते. समाधीची झलक मिळते.

या आज्ञाचक्राला स्पर्श करूनच प. पू गुरुदेव शिष्यात शक्ती संक्रमित करतात. ही दीक्षाशक्ति व्यक्तिमत्व उमलून टाकते. विधायक मूल्यांचे जतन करते. मुक्तीच्या, समाधीच्या रोखाने शिष्याची वेगाने वाटचाल होते.

महायोग्याच्या वास्तव्याने पृथ्वी पावन होते. सृष्टी धारण करायची क्षमता तिला प्राप्त होते. गुरुदेवांच्या दर्शनाने, सहवासाने, मानव उन्नत होईल. त्याचा शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक स्तर उंचावेल, यात अनुमात्र शंकेचे कारण नको.

अखिल विश्व त्यांच्या अमृतत्वासमोर त्यांच्या परमशांती आणि परमानंदासमोर; परमसाम्यावस्थेसमोर नतमस्तक होईलच होईल !

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक | ... | १ |
| बालकाण्ड | ... | ८ |
| अयोध्याकाण्ड | ... | २५ |
| अरण्यकाण्ड | ... | ७७ |
| किष्किधाकाण्ड | ... | ९६ |
| सुंदरकाण्ड | ... | १०९ |
| युद्धकाण्ड | ... | १३१ |
| उत्तरकाण्ड | ... | १७४ |

# प्रास्ताविक

नमस्ते सुमित्रासुपुत्रा भिवन्ध ।
नमस्ते सदा कैकयोनिन्दने डय ।
नमस्ते सदा वानराधेरावन्ध ।
नमस्ते नमस्ते सदा रामचंद्र ।। १ ।।

विशुद्धं परं सच्चिदानंदरूपं ।
गुणाधीरमाधारहीनं वरेण्यम् ।
महान्तं विभान्तं गुहान्तं वरेण्यम् ।
सुखात्त स्वयं धीप रामं प्रपद्ये ।। २ ।।

मनुष्याने लिहिलेले विधातल सर्वश्रेष्ठ, चिरंतन शक्ती–सामर्थ्य प्रदान करणारे रामायण तेजस्वी महाकाव्य आहे. शतकानुशतके लाखो जिभा आणि लाखो लेखण्या आदिकवी वाल्मीकीच्या आप्रातिभ बुद्धी वैभवाने विनटलेल्या महाकाव्याचे माहात्म्य वर्णीले आहे आणि तरी ते तोकडेच ठरणार आहे.

राजा रामाच्या आधीच कितीतरी दिगंत कीर्तीचे थोर राजे होऊन गेले आणि नंतरही झाले पण भारतीयांना राजा रामच प्यारा आहे.

रामा इतका दुसरा कोणताही राजा आमचा आवडता नाही. राजा रामाने भारतीय लोकमानसात चिरंतन स्थान पटकावले आहे. भूलोकी सूर्यचंद्र असेतो रामचरित्र मानवाचे अंतःकरण उजळून टाकील.

राजा राम जसा आवडता, तसा तो पूज्यही आहे, तो मानव आहे आणि देवता आहे.

राम भलेही विष्णूचा अवतार असेल, पण तो मानवात मानव होऊन आला आहे. मानवासारखा जगला आहे. टप्पाटप्पाने त्याचं जीवन विकसित झालं आहे. तो पूर्ण पुरुषोत्तम बनला आहे. हिमालयापेक्षाही उत्तुंग आदर्श खडा करणारा राम महामानव झाला आहे.

भगवंताच्या अवताराची मीमांसाही अशीच आहे. अवताराचं प्रयोजन जनसमाजाचं पाप धुऊन टाकणे, त्यांचे कल्याण हेच आहे. हिमालयासारखा उत्तुंग भव्योदात्त गुणांचा आदर्श खडा करण्याकरताच भगवान भूलोकी येतात. आपली अनंतता, असीमता विसरून समाजात वावरतात. म्हणूनच ते आर्तांचे त्राण आहेत. पतितपावन आहेत. सृष्टीचे सर्जन करणारे पालक, संवर्धन करणारे भगवान विष्णूच मानवरूपाने. रामरूपाने भूलोकी आले. वानरात मिसळले. त्यांच्याशी जवळीक केली त्यांच्या करवी दुष्ट दुरीताचे निर्दालन केले.

" प्रभू तरूतर कपि ठार पर,
तेहि किय आप समान
तुलसी कहूँ न राम सम
साहन शील निधान् "

वानर वृक्षावर आणि रामप्रभू वृक्षतळी अशा उद्धट पिसाट, चंचल मर्कटांनाही श्रीरामाने आपलेसे केले.

गृध्रराज जटायूचे मस्तक मांडीवर घेऊन त्याला उत्कट प्रेमाने कुरवाळले. सुग्रीव वानराला भाऊ मानले. राक्षस विभीपणाशी सख्य केले, हनुमंताच्या ऋणात राहिले.

सुन सुन तो हि उनृपण पें नाही
प्रतिउपकार करों का तोरा ।
सन्मुख होई न सकत मन मोरा ।।

एकैकस्योपकारस्य, प्राणान् दास्यामि ते कपे ।
होव स्ये होप काराणां भवाम् ऋणिनो वयम् ।।

श्रीराम तुमच्या आमच्या सारखा जन्माला आला, वाढला. माता पित्यांच्या प्रेमळ छत्राखाली अतिविकट कौटुंबिक अडचणीतून धीरोदात्त रामाला वाट काढावी लागली. श्रीरामाला आचार्यांनीच देवशास्त्रे शिकवली. आचार्याजवळच तो धनुर्विद्येत, युद्धकलेत पारंगत झाला, राजनीतीचे पाठ घेतले. तप, यज्ञ, धर्म ज्ञानाची सर्व अंगे आत्मसात केली.

वाल्मीकीची अनन्यसाधारण प्रज्ञा नवनवोन्मेषशालिनी आहे. रामचरित्राचे जसं जसं अध्ययन करावें, चिंतन करावे तसे स्तिमित करणारे नवनवे पैलू उलगडतात.

युगानुयुगं आम्ही रामकथा गात आहोत, ऐकत आहोत, सांगत आहोत. रामायणाच्या प्रत्येक ओळीचे सूक्ष्म विश्लेषण झाले आहे. त्यावर समर्पक भाष्ये आहेत. नानाविध रंगछटा दिग्दर्शित करणाऱ्या शंका आहेत. सखोल विश्लेषणे आहेत. शब्दाशब्दाचे पापुद्रे उलगडून दाखवले आहेत. अशी शतशः नव्हे तर सहस्त्रशः सखोल उहापोह करणारी साधकबाधक मुद्यांचे विवरण करणारी विवेचने आहेत. सर्व भारतीय भाषांत आहेत.

सर्वस्वी मानवी जीवनमूल्यांचं आविष्करण करणारे, अत्यूद्‌भूत सामर्थ्य असलेले हिमालयासारखे त्यापेक्षाही उत्तुंग आदर्श खडा करणारे सर्वोत्तम नीतीच्या पातळीवर नेणारे वाल्मीकीच. असें अनन्य साधारण महाकाव्य झालं नाही, व्हायचं नाही.

मी रामायण वाचतो. कुठेही नेतो. केव्हांही कुठेही वाचतो. वाचतो त्यावेळी केवळ वाचतो. दुसरं काही करत नाही. त्यावरच माझं मन खिळतं, रमतं, रंगतं. माझं मन कोमल नाही, हळवं नाही. हृदय नरम नाही. चटकन भावनेला वळी न पडणाऱ्या माझ्या कठोर अंतःकरणाला रामायणाचं भावविश्व भावनोद्रेकाने खळाळून सोडते.

असा एकही सर्ग नाही. जो माझे नेत्र पाझरवत नाहीं. वाचता वाचता मी थांवतो.

कोमल जाणीवांचे सुभग चित्रण, भग्न हृदयाचा आविष्कार, भावाभावातील अत्युत्कट प्रीति, भावस्निग्ध कृतज्ञता, सारंच भारून टाकते. मंत्रमुग्ध करते. मनुष्य स्वतःला हरपतो.

कारुण्यादि रसाच्या भावनोद्रेकाने डोळे पाणावतात, मी थांबतो. अश्रूंनी डवडवलेले नेत्र आणि मन पुढं जाऊ शकत नाही. डोळे पुसतो. मगच पुढची वाटचाल चालू लागतो.

श्री रामासारखा दुसरा आदर्श पती नाही. पुत्र नाही. राजा नाही. मानव नाही. शत्रू नाही. झाला नाही, व्हायचा नाही.

पुरुषोत्तम श्रीरामाला जो पाहतो, त्याच्याशी बोलतो, त्याच्या सहवासात राहतो. त्याच्यावरोवर कसलंही, कुठलंही काम करतो तो त्याचाच होतो श्रीरामचं त्याच्या रोमरोमात संचारतात हीच प्रभूची असीम शक्ती.

संपूर्ण वाल्मीकी रामायणात श्रीरामाने कुठेच उपदेश केल्याचे आढळत नाही. तुलसी रामायणात देखील लक्ष्मणाशी बोलताना फार तर पान दीड पान उपदेश आढळतो. तोही अभावानेच.

श्रीकृष्णाने उपदेश केला. विश्वाला गीतेचं अमोल लेणं दिले.

महाकवी भवभूतीच्या अग्रगण्य मालती माधव नाटकातील माधवाचा जन्मोत्सव कुणीच साजरा करीत नाही.

रामप्रभूचा चैत्र शु. ९ चा जन्मोत्सव भारतातील घरटं न् घरटं, झोपडी न् झोपडी अतीव उत्साहाने, पावित्र्याने, पापताप धुवून टाकणारी रामनवमी अधः- पाताच्या गर्तेत रूतलेलं चाक वर खेचते. लोकजीवन उजळून टाकते.

रामचरित्र घडले आहे. रामायणातील महान विभूतींच्या पावन स्पर्शाने भारतभूचा कण न् कण पुनित झाला आहे भारतमाता धन्य झाली आहे. पवित्र झाली आहे.

उपदेशाचं अवाक्षरही न उच्चारणारा राम राजा राम आमच्या हृदयसिंहासनावर चिरंतर अधिष्ठीत आहे. सर्वांपेक्षा अधिक प्यारा आहे. त्याचं आचरण हाच उपदेश. त्याचं वळण गिरवण्याची कसोटी हेच आमचं कल्याण, सुख, मांगल्य, आदर्श, जीवनाच अंतिम साध्य, लक्ष्मणानेही तेच केलं. याकाळच्या सर्वांनी तेच केलं. युगानुयुगे सुशिक्षित, अक्षरशत्रू सुसंस्कृत असंस्कृत ।च करत आहेत.

आदिकवींच्या महाकाव्याचे तेच सामर्थ्य आहे.

रामकथा ही देवांची दिव्य कथा नाही. मानवात वावरणाऱ्या मानवाची कहाणी आहे. छाती फाडून टाकणाऱ्या कराल आपत्तीवर मानव रामाने मात केली. सर्वनाशाच्या गर्तेत ढकलणाऱ्या फत्तरालाही रडवणाऱ्या संकटाचा धुव्वा उडवला.

तो महापुरुष झाला.

रामचरित्र ऐतिहासिक असल्याबद्दलचा वादातीत पुरावा उपलब्ध आहे. त्यासंबंधात आता वाद उरले नाहीत.

रामायण का लिहिले ? केव्हां लिहिले ? वाल्मीकीनी स्वतःच यासंबंधात उल्लेख केलेले आहेत. रावणवधानंतर रामप्रभू राज्य शासनाची सूत्रे हाती घेतात, राजा रामाची कीर्ति दुदुंभी त्रैलोक्यात निनादते. त्यावेळी वाल्मीकांनी रामायण रचले.

उदारवृत्तार्थपदैर्मनोरमैस्तदास्यशमस्य चकारकीर्ति मान ।
समाक्षरे श्लोकशतैर्थ शब्दास्विनो यशस्करं काण्युमुदारदर्शना ।।

रामकथा ग्रंथाच्या निर्मितीची कहाणी वेधक आहे.

निषादाच्या बाणाने रक्तबंबाळ होऊन तडफडत प्राण सोडणारा क्रौंच पक्षी आणि फत्तरानेही रडावे असें आक्रंदन करणारी त्याची पक्षीण. वाल्मीकी कळवळले. शोकसंतापाने भडकलेल्या ऋषीश्रेष्ठांच्या मुखीच्या ज्वालामुखीतून तप्त लाव्हा रसाचे थेंब बाहेर पडले.

मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः

शोकाचा श्लोक झाला होता. तो श्लोक चरणबद्ध होता. छंदशास्त्राला अनुसरून ते सुंदर हृदयस्पर्शी भावगीत असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

आश्चर्यातिशयानें हतबुद्ध झालेल्या वाल्मीकीना ध्यान करीत असताना प्रजापती ब्रह्मदेवाचे दर्शन झाले.

" माझ्या संकल्पानुसार तुझ्या शोकाचा श्लोक झाला आहे. तू रामकथा लिही. रामसीताचरित्रातील सर्व व्यक्तींच्या क्रिया, मनातले विचार, सारे तुला स्पष्ट दिसेल. तू गायलेली रामकथा जनसमाजाचे पाप धुऊन टाकील. तुझ्या वाणीला असत्याचा दुरूनही वास यायचा नाही. जोवर भूलोकी पर्वत आहे. नद्या आहेत. तोवर रामकथा लोक ऐकतील, गातील. "

" न ते वागतृता काव्ये का चिदन भविष्यति ।
कुरू रामकथां पुण्यां श्लोकबद्धां मनोरमाम् ।।

यावत्तयादयन्ति गिरयः सरितरांच महीतले ।
तावद्रारामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ।।

ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार वाल्मीकीनी ग्रंथलेखनाचा शुभारंभ केला.

शोकाचा श्लोक झालेल्या वृत्तात त्यानी संपूर्ण रामायण ग्रंथ लिहिला चोवीस सहस्र श्लोक लिहिले. सात कांडे आणि पाचशे सर्गात ग्रंथाची मांडणी केली.

महाकाव्याची शास्त्रशुद्ध पायावर उभारणी केली. सस्वर, सुस्वर, गाता यावे अशी रचना केली. साभिनय प्रयोग करता यावा असं रचलं. महाकाव्याला गायना-बरोबर अभिनयाची जोड दिली. संपूर्ण रामायणाची रचना कांही सर्गाच्या अखेरच्या कांही श्लोकांचा अपवाद वगळला तर अनुष्टूप श्लोकवृत्तात आहे.

रामायण रचले, कोण गाऊन दाखवील ? कोण प्रयोग करील या महाकाव्याचा ? वाल्मीकीना चिंतेने घेरले.

कृत्वा तु तन्मदाप्राज्ञः सम विष्य सहोत्तरम् ।
चिन्तयामास कोन्वे तन्त्रमुग्जीधा दितिप्रभुः ।
१ः ४, ३

कोण रामायण प्रकाशीत करील ? कोण समर्थ आहे ?

कुशलवांनी आदिकवीच्या मानेवरची चिंतेची टांगती तलवार दूर सारली.

तस्य चिन्तयामानस्य महर्षेभा वितात्मः ।
अंगृहीता ततः पादौ मुनिर्वेषौ कुशीलवौ ।।

रामाच्या अश्वमेध महायज्ञात दोघा राजकुमारांनी वाल्मीकीच्या अनुज्ञेने राजा रामाला समग्र रामायण ऐकवले.

वाल्मीकी रामप्रभूचे समकालीन आहेत. मनूपासून ३६ वा राजा राम. त्रेता, द्वापार आणि कलियुगांतला कालखंड महाभारताचा.

राम–कृष्ण यांच्यात एकोणचाळीस पिढ्यांचे अंतर. हा कालखंड सरासरी ७८० वर्षे मानतात. भिन्न भिन्न मतप्रणालीनुसार महाभारतकाल इ. स. पूर्व ३०००, १४०० अथवा ११५० मानण्यात येतो. त्यापूर्वीचा सातशे, आठशे वर्षे हा काल रामायणाचा.

रामप्रभूच्या पदस्पर्शाने भारतभूमी पावन झाली आहे.

प्रातिभ बुद्धीवैभवाने विनटलेल्या वाल्मीकींच्या अमृतवाणीने भारताला विलक्षण वेड लावले. भारतीय भाषेत रामायणाची असंख्य रूपांतरे झाली आहेत, होत आहेत, होणार आहेत. तुलसीदास, कृत्तिवास, बलरामदास, एलवुद्धानं कंणन कदली आदी रामायण रचनाकार तर भारतीय भाषांची अमूल्य रत्ने आहेत.

तुलसीदासाच्या रामायणाला तोड नाही. वेदाइतकंच पवित्र मानल्या गेलेल्या तुलसीरामायणाने कट्टर नास्तीकांचा लोंढा परतवला. पडलेल्या जनसमाजाला खडे केले, चेतवले.

संस्कृत महाकवी कालिदास, भवभूती यांना देखील रामायणाने प्रेरणा दिली आहे.

पाश्चात्यांचा भारताशी संपर्क घडला. त्यांनाही वाल्मीकींच्या वाणीने मोहून टाकले. इ. स. १८०६ ते १९१० च्या दरम्यान विल्यम केरी, जोशुआ

मार्शमन यांचे इंग्रजी पद्य भाषांतर प्रसिद्ध झाले आहे. डॉ. हेलेगजचे २ कांडाचे लॅटिन भाषांतर प्रसिद्ध आहे. १९ व्या शतकाच्या प्रारंभातून पाश्चात्यांना रामायणाने वेड लावले आहे. इ. स. १८८० मध्ये टी. एच. ग्रिफीथ यांचे वाल्मीकी रामायणाचे भाषांतर अत्यंत उत्कृष्ट पद्यमय भाषांतर प्रसिद्ध झाले. रामायणाच्या अध्ययनाने ते अंतर्बाह्य बदलून गेले. या भारतीय महाकाव्याचे ते सर्वश्रेष्ठ आंग्ल भाषांतरकार आहेत. रशियन भाषेत देखील नुकतेच रामायणाचे भाषांतर प्रसिद्ध झाले आहे.

जगातल्या भाषात अजूनही वाल्मीकी रामायणाचे अनुवाद होत आहेत, होतील.

मराठी एकनाथांचे भावार्थ रामायण, मुक्तेश्वराचे रामायण, समर्थांचे रामायण, ( सुंदरकांड, बालकांड ) वेणाबाईचे रामायण, मोरोपंताची एकशे आठ रामायणे, श्रीधरांचा रामविजय वगैरे अनेक रामायणे आहेत.

वाल्मीकीनंतरच्या रामायणात राम ईश्वर आहे. दैवी अंशाला प्राधान्य आहे तर वाल्मीकींचा राम मानव आहे. दैवी अंश दुय्यम आहे.

रामायणाने भारतभूमीचा कण न् कण घडवला, रामचरित्राच चिंतन मानवी जीवन उन्नत करायला, समाजाचा कलंक साफ धुऊन टाकायला, अधःपाताच्या गर्तेतून वर खेचायला पूर्ण समर्थ आहे. राम–स्पर्शाने इथली माती पावन झाली आहे. तिनेच भारतीय चरित्र, चारित्र्य घडवलं आहे. विश्वाला अमोल लेणं बहाल केल आहे.

रामायण वाचल्याविना मरू नका. मूळातून वाचा, संस्कृत येत नसेल तर मराठी अनुवाद वाचा. वाचता येत नसेल तर ऐका. वाचायचं असेल, सुखाने जगायचे असेल तर रामायणाचे चिंतन मनन करा.

ज्याची जशी श्रद्धा असेल तसे मांगल्याचे माप त्याच्या पदरात पडेल. पसायदान आहे. पसा असेल तेवढं अमृत लाभेल. रामकथामृत रसपानाने धन्य व्हा.

# बालकाण्ड

न ते वागनृता काव्ये का चिदत्र भविष्यति ।
कुरु रामकथां पुण्यां श्लोकबद्धां मनोरमाम् ॥१॥

यावत्स्यात्यन्ति गिरयः सेरिताच महीतले ।
तावद्रामायणकथा लोकेषु प्रचरिष्यति ।

यावद्रामस्य च कथा त्वत्कृता प्रचरिष्यति ।
तावदूर्ध्वमश्चत्वं मल्लोकेषु निवत्सयति ॥

( बालकांड, सर्ग २ )

२: ३५:३६.

राम लक्ष्मण भरत आणि शत्रुघ्न एकाच वयाचे. त्यांचा जन्म दिवस एकच. श्रीरामापेक्षा त्याचे भाऊ काही तासांनी धाकटे. भावांपेक्षा राम बालपणांपासून वरचढ आहे. श्रेष्ठ आहे. त्याच्या अलौकिक व्यक्तीमहत्वा-समोर तिघेही वाकले आहेत.

चौघेही एकमेकावर जीवापाड प्रेम करतात. राजघराण्यातील राजकुमारात असतात तसे त्यांच्यात हेवेदावे नाहीत. मत्सर नाही. दुसऱ्याला खाली पाडण्याची वृत्ती नाही. दुसऱ्यावर मात करण्याची पुसटती कल्पनाही त्यांना शिवत नाही. उलट परस्परांकरता सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून देण्याची त्यांच्यात अहमहमिका आहे. इक्ष्वाकूंच्या राजघराण्याचे हे अनन्य-साधारण वैशिष्ठ्य आहे.

धीरोदात्त श्रीरामाच्या अतिउज्वल उत्तुंग तेजोमय व्यक्तित्वाने राजा दशरथ, महाराण्या, मंत्री, अमात्य सेवक पौरजन सारेच भारावले आहेत.

इक्ष्वाकूच्या कुळ वृद्धीकारिता ऋष्यशृंग मुनीश्रेष्ठींनी अश्वमेध महायज्ञाचा पुरवणी असलेल्या पुत्रकामेष्टी महायज्ञाची मुहूर्तमेढ रोवली. राजा दशरथाने यज्ञदीक्षा घेतली.

ऋषिणांनी धगधगणाऱ्या होमकुंडात आहुति दिल्या. यज्ञकुंडात तेजोमय पुरुष प्रगटला. त्याचा वर्ण काळा सावळा होता. वस्त्र तांबडे भडक होते. तोंड लाल होते. अंगावरचे आणि डोक्यावरचे केस सिंहासारखे होते. उफाळणाऱ्या अग्नीज्वालेसारख्या त्या दिव्य पुरुषाच्या हातात पुष्पपात्र होते.

तो देवदूत होता.

राजाला तो म्हणाला " देवांनी हे दिव्य पायस बनवले आहे. तुझ्या राण्यांना दे. इक्ष्वाकूचा वंश विस्तरेल. तुझी मनिषा पूर्ण होईल "

हर्षविभोर राजाने दिव्य पायस राण्यांना दिले.

कौसल्यायै तत्पति पायसार्ध ददौ तदा ।
अर्धादर्धं ददौ वा पिं सुमित्रायै नराधिपः ।।

कैकये चावशिष्टार्धं ददौ पुत्रार्थकारणात् ।
प्रददौ चावशिष्टार्ध पायसस्यामृतोपमम् ।।

अनुचिन्त्य सुमित्रायै पुनरेव महाप्रतिः ।
एवं तासां ददौ राजा भार्याणो पायसं पृथक् ।।

१६:२५, २६, २७

संपूर्ण पायसाचा अर्धा वाटा कौसल्येला; उरलेल्या पायसाचा अर्धा भाग सुमित्रेला दिला. उरलेल्याचा अर्धा कैकयीस दिला आणि अखेर उरलेले अर्धे पायस परत दुसऱ्यांदा सुमित्रेला दिले.

कौसल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ. तिला १/२ भाग दिव्य पायस मिळाले.

सुमित्रेला १/४ भाग आणि दुसऱ्यावेळी १/८ भाग पायस मिळाले.

धाकट्या कैकयीला १/८ भाग पायस मिळाले.

राजा दशरथाची आवडती रूपवती तरुण राणी कैकयी. सर्वात तिच्यावर त्याची प्रीती होती. पण ती लौकिक व्यवहारात. धर्मकृत्यात तिचा मान अखेरचाच. सुमित्रा आणि कौसल्या तिच्यापेक्षा श्रेष्ठ होत्या. संस्कृत टीकाकारांनी त्यावर शिक्का मोर्तब केले.

प्राप्य लब्ध्वा ॥२५॥ अद्‌भुतप्रस्व्यं अद्‌भुताकारं संवर्त्त–यित्वा समाप्या तत्कर्म पायसप्रदानरूपकर्म । तत्र अग्नौ ॥२६॥ हर्षरश्मिभि : अन्नपूरस्त्रिय । शारदस्य शरदिभवस्य अभिरामस्य निष्कलंक स्या अयंहर्ष: पायसप्रदानकृत: ॥२७ ।

**गोविंदराज ( भूषण )**

अनुचिन्त्य कैकय्यापेक्षया ज्येष्ठत्वं कौसल्यापेक्षया कनिष्ठत्वं सुमित्राया विचार्य पादोनांशार्धदानं तस्यै । कनिष्ठत्वाच्च कैकय्ये अष्टभागदानम् । एवंच भरत शत्रुपादस्यार्धमर्धमित्याहु: । अपरेतु रामभरतौ प्रत्येकं त्र्यंशौ कौसल्यायै दत्तार्धस्यार्धादर्ध चतुर्थांशरूप- सुमित्रायै दत्तवास कौसल्यवादा पित वा नित्यथ: । एवं कैकय्ये कौसल्या दत्तावशिष्टमर्धं ददौ ।

**तिलक.**

तदा पायस तिकाले । नरपति: : अमृतोपमंपायसार्धं पायसस्या र्धमंशम् । महाभागमिति वक्ष्यमाणरामविषेणात् ज्येष्ठपत्नीत्वाच्च कंचीदधि- कमंश पुत्रार्थ कारणात् कौसल्यायै ददौ ।

**रामशिरोमणि ।**

राम–लक्ष्मणांची परस्परावर अत्युत्कट प्रीती आहे. दोन शरीर पण मन एक होते. दोघेही एक आहेत.

भरत–शत्रुघ्न यांच्यात विलक्षण जवळीक आहे. थेट राम लक्ष्मणासारखीच असे का घडावे ?

याचे कारण–पायसांशानुसारत: ।

( अध्यात्मरामायण बालकांड सर्ग ३/४२ ) असं स्पष्ट लिहलं आहे. पद्मपुराणातही याचं कारण पायसांश हेच दिले आहे.

युगं बभूततुस्तत्र सुस्निग्धौ रामलक्ष्मणौ ।
यथा भरत शत्रुघ्नौ पायसांशवशा त्स्वत: ॥

( कौसल्येकडून ) सुमित्रेला पायसांग मिळाला. त्या दोघांचे कुमार राम लक्ष्मण त्यांची एकमेकांवर अत्युत्कट प्रीती.

(कैकयीकडून) सुमित्रेला पायसांग मिळाला. भरत शत्रुघ्न, त्यांच्या कुमारांना परस्पराबद्दल अत्युत्कट जिव्हाळा.

भावाभावांच्या दोन जोड्या झाल्या. दिव्य पायसापासून त्यांचे जन्म झाले आहेत. साक्षेपी टीकाकार गोविंदराजाने निःसंदिग्ध निर्वाळा दिला आहे.

रामादिमूर्तयश्च पायस परिणामाः ।
नतु शुक्रशोषितपरिणामाः ।

लक्ष्मण थोरला भाऊ श्रीरामाकरता सर्वस्वाचा होम करायला सिद्ध आहे तशीच रामाचीही लक्ष्मणावर अत्युत्कट प्रीति आहे.

लक्ष्मणाचे प्रेम एकतर्फी नाही.

नाल्यात्प्रभृति सुस्निग्धो लक्ष्मणो लक्ष्मिवर्धनः ।
रामस्य लोकरामस्य भ्रातुर्ज्येष्ठस्य नित्यशः ।।

१-२८-२८

भरत शत्रुघ्नाचेही असेच परस्परावर प्रेम आहे. शत्रुघ्नाची तशी भरताची एकमेकांवर प्रीति आहे. त्यात रतिमात्र अंतर नाही.

भरतस्यापि शत्रुघ्नौ लक्ष्मणावरजो हि सः ।
प्राणैः प्रियतरो नित्यं तस्य वासीत्तथा प्रियः ।।

१-१८-३२

तत्कालीन यज्ञप्रकीयेचं सर्ग १२, १० १४, ३१ मधे आलेलं वर्णन उद्बोधक आहे. राजा दशरथ अश्वमेध महायज्ञाचा संकल्प करतो. पावन शरयूच्या उत्तरतीरावर भव्य यज्ञमंडप उभारण्यात येतो. परिसरात निमंत्रित राजे महाराजे, मंत्रि, राजपरिवाराकरता प्रासाद, हवेल्या उभारण्यात येतात. सैनिकांकरता निवासस्थानं बांधली जातात. सामान्य जन समाजाकरिता घरे इमारती उभ्या होतात. हत्ती, घोडे घोड्याकरता निवाऱ्याच्या जागा असतात. शरयूच्या उत्तरतीरावर आलेशान शहरच उभे असते.

अगत्याने निमंत्रित केलेले सुहृद राजे महाराजे, मांडलीक, आघाडीवरचे श्रेष्ठी राजा दशरथाला अनमोल नजराणे देतात. राजाही त्यांचा अतीव आदराने सत्कार करतो.

यज्ञाची मुहूर्तमेढ रोवायला दोन वर्षांचा अवसर असताना राजपत्न्या यज्ञदीक्षा घेतात.

ततःस गत्वा ता पत्नीर्नरेन्द्रों हृदयंगमः उवाच दीक्षां विशत यक्ष्येत सुतकारणात्ः । उवाच दीक्षां विशत यक्ष्येऽहं सुतकारणात् ।

यज्ञाचा श्रीगणेशा होतो. सांगता होईतो राजा दशरथ, त्याच्या राण्या यज्ञमंडपात अखंड अर्हनिश असतात. राजा दशरथासह यज्ञकर्मांत राजपत्न्या प्रत्यक्ष भाग घेत होत्या.

' हयविशसन ' यज्ञीय कर्म स्वतः कौशल्येने केले आहे.

यज्ञात राजाने अपरंपार दान दिले. सर्वांना संतुष्ट केले. कुठलाही याचक हात हलवीत परत गेला नाही.

महायज्ञाकरता सर्व वर्गीयांना अगत्याने निमंत्रणे दिली होती.

यज्ञाचे प्रमुख सूत्रधार कुलगुरू वसिष्ठांचा निःसंदिग्ध आदेश होता.

निमन्त्रयस्व नृपतीन्पृथिव्यो ये च धार्मिकाः ।
ब्राह्मणान्क्षत्रियान्वैश्याज्शूद्रांश्चैव सहस्त्रशः ॥

१–१३–२०

यज्ञसंभारंभात सर्व वर्गाच्या जनसमाजाचा अगत्यपूर्व सत्कार करण्यात आला कुणाचीही उपेक्षा करण्यात आली नाही. झाली नाही, सर्वांचाच गौरव झाला.. बहुमान झाला. यज्ञकर्मणि ये व्यग्राः पुरूषा : शिल्पिनस्तर्थ ॥

तेषामपि विशेषणे पूजा कार्या यथाक्रमश ॥
ते च स्यु संभृता : सर्वे वसुभिर्भो जनेन च ।

१/१३–१४.

धीरोदात्त राजा दशरथ सर्व प्रजाजनास समान पातळीवर वागवी. त्यांच्यात आपपरभाव नसे.

ग्रामीण नगरवासीयात भेदभाव नव्हता. सर्वांना राजा सारखेच लेखी. ग्रामीण व नगरजनाशी समान वागणाऱ्या समचित्त पौरजानपद प्रिय (१:६–१) राजा दशरथाच्या राष्ट्रात सुख होते, समृध्दी होती. शांती होती,

प्रशान्त सर्व मेवासीद्राष्ट्रं पुरवर्चं च तत्

१/७:१५

जेमतेम पंधरा वर्षे पूर्ण होत नाहीत तोच राजकुमाराच्या विवाहाची वाटाघाट सुरू होते. पुरोहित, कुलगुरु, मंत्री अमात्यासह राजा चर्चा करतो. त्याच सुमारास वळवाच्या सरीसारखे अकस्मात् विश्वामित्राचे आगमन होते. नाकाशी सूत धरलेल्याला संजीवन मिळावे, अंधाला डोळे लाभावे, सुकलेल्या वैराण पिकावर जलधारांची बरसात व्हावी. रंकाला अवचित अकल्पीत राजलक्ष्मीने माळ घालावी तसा राजा विश्वामित्रांच्या दर्शनाने, हर्षोन्मादाने मोहोरला.

अतीव अगत्याने तो विश्वामित्रांचा सत्कार करतो. स्वागत करतो " भगवान आपल्या आकस्मीक चरणकमल दर्शनाने मी आज धन्य झालो आहे माझं भाग्य फळफळलं आहे. आपणच माझं दैवत आहात. निःशंक मनाने मला आज्ञा द्या. माझं सर्वस्व मी आपल्या चरणी वाहीन. "

दशरथाने आधीच वचन देऊन टाकले. विश्वामित्रांनी रोखठोक शब्दात मागणी केली " सुबाहू आणि मारीच राक्षसांनी मला जेरीस आणले आहे. यज्ञाची मुहूर्तमेढ रोवली नाही तोच यज्ञवेदीवर रक्तमांसाची वृष्टी करून पुण्यकार्याला मूठमाती दिली आहे. एकदा नव्हे तर अनेकदा. बेलगाम रावणाचे ते हस्तक आहेत. रामाला पाठव. तो दुष्टांचं निर्दालन करील. माझ्या यज्ञाचे रक्षण करील. "

रावणाचं नांव ऐकताच राजा चरकला लटपटला. दुराचारी रावणाची शक्ती अफाट आहे. विश्वामित्राचे तप तेजही अद्भुत आहे. यज्ञविध्वंस करायला रावण स्वतः धजत नाही. मारीच सुबाहूला पाठवतो. रावणाचे हस्तक त्याच्यापेक्षाही अधिक असल्याची शंका राम ममतेने व्याकुळलेल्या राजा दशरथाला अधिकच बेचैन करते. बेलगाम रावणाच्या अमर्याद शक्तीचं सुंदर वर्णन बालकांडात आहे.

उद्वेजयति लोकांस्त्रीनु च्छ्रितान् द्वेष्टिदु र्मतिः ।
शक्रं त्रिदशराजांन प्रधर्षयितुमिच्छति ।।
सर्पान् यक्षान् सगन्धर्वानसुरान् ब्राह्मणांस्तथा ।
अतिक्रोमति दुर्धर्षो वरदानेन मोहित :।।
नैनं सूर्य प्रतपाति पार्श्वे वाति न मारुतः ।
चलोऽर्मिमाही तं दृष्टवा समुद्रोऽपि न कम्पते ।।

१५-३-१०-२०

राजाने शब्द फिरवला.

" राम लहान आहे. कुमार आहे. अननुभवी आहे मी स्वत: येतो "

१ न रामं नेतुमर्हति ।
२ नैव दास्यामि पुत्रकम् ।

एकदा नव्हे तर अनेकदा तो म्हणतो. ज्वलज्जहाल विश्वामित्रांचा पारा चढला. ते आपल्या मागणीला मुरड घालायला तयार नाहीत. कुठलाही लवचिकपणा स्वीकारत नाहीत. क्रोधाविष्ट मुनी दाणदाण पाय आपटीत माघारी वळतात. वसिष्ठ मध्ये पडतात. राजाला सावध करतात. राजा विश्वामित्राची क्षमा मागतो. रुकार देतो. श्रीराम जातो आणि त्याच्या पाठोपाठ लक्ष्मणही. विश्वामित्रांनी केवळ रामाचीच मागणी केली आहे. राजा दोघानाहि पाठवतो रामाविना लक्ष्मण असूच शकत नाही, हे राजाला ठाऊक आहे.

सर्व प्रियकरस्तस्य रामस्यापि शरीरत ।
लक्ष्मणो लाक्ष्यसम्पन्नो बहि:प्राण द्वापर: ।

१८:२७-९

राम लक्ष्मण दोन नाहीत. एक आहेत. जिथे राम तिथे लक्ष्मण. मृगयेला जाणाऱ्या रामाची लक्ष्मण सावलीसारखी पाठराखणी करतो.

यदाहि ह्यमारूढसे मृगयां याति राघव: ।
तदैन पृष्ठतो ड म्येति सधनु:परिपालयन् ।

१८-३०

मानव राम आचार्यांच्याजवळ विद्या शिकला. विश्वामित्रांनी त्याचं जीवन घडवलं. कुमार रामाला कधीही न संपणारं अमोल विद्याधन दिले. धनुर्विद्या शिकवली, युद्धकलेत निष्णात केले. लोकरूढींचे बारकावे आणि सर्व वाटा दाखवल्या. तीर्थस्थाने, पावन नद्या पर्वत, देवस्थानाचे, महापुरुषांचे माहात्म्य कथन केले. त्यातलं रहस्य उलगडून दाखवलं. जप, यज्ञ, देवपूजन, धर्माचरणाच्या अर्थगर्भ प्रक्रिया स्पष्ट करून दाखविल्या. मानव रामाचा महामानव बनवला. रामलक्ष्मणाने विश्वामित्रासह निबिड घोर ताटकावनात प्रवेश केला. राजधर्माचं काटेकोर पालन करू इच्छिणाऱ्या धीरोदात्त राजासमोर विलक्षण पेचप्रसंग उभा राहिला. पहाडासारख्या उंचावलेल्या समस्येने राम भांबावला.

अयचित बैलगाय यज्ञविघ्नकरो १/२६ : १२

ताटका राक्षसीला ठार केल्याविना दुसरा उपाय नसतो. विश्वामित्र स्वच्छ सांगतात " मायावी, बेछूट, निर्घृण राक्षसीला ठार करा. सुजनांच्या चातुर्वर्ण्याच्या प्रजेच्या सभोवती संरक्षणाची तटबंदी उभी करताना धर्म-अधर्म सत्कृती-दुष्कृती चांगलं वाईट पाप-पुण्याचा दुरून देखील अंतःकरणाला वास येऊ नये. प्रजा रक्षण संवर्धन ह्याच राजाचा धर्म. स्त्रीला मारणे आवश्यक असेल तर तिला ठार केलं पाहिजे.

राज्यभारनियुक्तानामेष धर्मः सनातनः अधर्म्यां जहि काकुत्स्थ धर्मो ह्यस्या न विद्यते ।।

नृशंसमृशंस वा प्रजारक्षण कारणात् ।
पावनं वा सदोष वा । कर्तव्यं रक्षतासता ।। २५-१८-१९

विश्वामित्र धर्मतत्वाचा उहापोह करतात. सूक्ष्म रहस्य उलगडून दाखवतात. परोपरीचे दाखले देतात.'

'इंद्राने मंथरेला मारले. महाविष्णूंनी भृगुपत्नीचा वध केला. परशुरामाने मातेचा वध केला. पुरुष असो वा स्त्री असो अनुचित, बेलगाम, बेछूट पाप्याला ठार करणे हेच राजाचे कर्तव्यः तोच धर्म.

' श्रूयते हि पुरा शक्रो विरोचंन सुतां नृप ।
पृथिवीं हन्तुमिच्न्तीं मन्थरामभ्यसूक्ष्मत् ।
विष्णुना व पुरा राम भृगुपत्नी पतिव्रता ।
अनिद्रं लोकमिच्छन्ती काव्यमाता निपादिता ।।

२५-२०-२१

अनन्य-पितृभक्त रामाला पित्याचे शब्द आठवतात.

'आपली आज्ञा मी निःशंक मनाने पाळीन, कसलाही विचार न करता ताटकेचा वध करीन. पित्याप्रमाणे आपला शब्द पाळीन.

सो ऽ हं पितृवचः श्रुत्वा शासनाद् ब्रह्मवादिनः ।
करिष्यामि न संदेहस्ताटकावधमुतमम् ।।
ते ल्येनामुत्सहे हन्तुं स्त्री स्वभावेन रक्षिताम् ।
वीर्य चात्स्या गतिं चैव हन्यामिति हिमेमतिः ।।

अक्राळ विक्राळ ताटका राक्षसी प्रचंड गर्जना करीत राजकुमारांना भेडसावण्याचा प्रयत्न करते.

स्त्री – दिसताच रामातल्या सत्प्रवृत्ती उफाळून येतात, अबलेचा वध करायला तो कचरतो, स्त्रीहत्येचं महापातक करायला त्याचं मन घेत नाही.

विश्वामित्राची आज्ञा अवमानायची का स्त्रीहत्येचं पाप स्वीकारयचं तो म्हणतो, 'लक्ष्मणा:कुकर्मी दुष्ट असली तरी स्त्री आहे' तिचे हात तोडून टाकू, अवयव छेदून टाकू अशी दशा दशा उडवू की ती परत हत्याकांडात आचमन घ्यायची नाही.

एतापश्य दुराधर्षा मायाबलसमन्विताम् ।
विनिवत्तां करोम्यद्रय हृतकर्णाग्रनासिकाम् ।।

२६–११

विश्वामित्राच्या यज्ञाचं संरक्षण होईल आणि स्त्रीहत्येच्या पातकापासून दूर राहता येईल. श्री रामाने बाण सोडला. तिचे हात तोडले, लक्ष्मणाने कान तोडले. नाकाचा शेंडा उडविला. राक्षसीने प्रचंड भयानक रूप घेतले प्रचंड गर्जना केली अंतराळात अद्भुत राहून दगडाचा पाऊस पाडला.

राम–लक्ष्मण भेदरले. स्तिमित झाले. विश्वामित्रांनी श्रीरामाला चेतवले. "धर्मावर गदा उभवणाऱ्या कुकर्मी पापीर्णाचा वध करणे राजाचं कर्तव्य आहे. धर्माकडे पाठ फिरवू नकोस."

"रात्रीचा अंधकार डोकावला की राक्षसांचं बळ दहापटीने वाढते हा क्षण गेला की सारे संपलेच."

श्रीराम तत्क्षणीच राक्षसीला ठार करतो. ऋषीमुनी ब्राह्मण आणि पौरजनांना क्रूर ताटकेच्या हत्याकांडातून सोडवतो.

स्त्रीवधाने रामचरित्र कलंकित झाल्याचा आक्षेप अवास्तव आहे. एकांगी अस्थानी आहे. हत्याकांडाची आचमने घ्यायला सवकलेल्या समाजविघातक राक्षसींचा वध केल्याने रामाचे चरित्र, चारित्र्य अधिक उजळून निघाले आहे.

राजा जनकाचा महायज्ञ आणि अद्भुत शिवधनुष्य अवलोकन करण्याकरता श्रीराम विश्वामित्रासह लक्ष्मणासह मिथिलेला जातात. त्यांच्याबरोबर सिद्धाश्रमातील ऋषीमुनी असतात.

राजा जनकाने महायज्ञाची मुहूर्तमेढ रोवलेली असते. शुभारंभ झालेला असतो. राजा तिघा मित्रांच आणि ऋषींचं अगत्याने स्वागत करतो.

दशरथकुमारांची शिवधनुष्य अवलोकन करण्याची मनिषा विश्वामित्र राजा जनकांना सांगतात.

एतद्दर्शयभद्रं ते कृतकामौ नृपात्मजौ ।
दर्शनादस्य धनुषे यथेष्टं प्रतियास्यत : ।

राजकुमारांना धनुष्य बघायचं कुतूहल आहे. धनुष्य दाखवा"
ते पुढे म्हणतात.

एतद्दर्शय भद्रं ते कृतकामौ नृपात्मजौ ।
दर्शनादस्य धनुषो यथेष्टं प्रतियास्यतः ।।

१ : ६६ : ६

"धनुष्य बघून झाल्यावर राजकुमार परत जातील असेही त्यांनी निःसंदिग्ध. राजाला सांगितले.

विश्वामित्रांच्या सूचनेवरून राजा जनक अद्‌भुत अपूर्व शिवधनुष्य घेऊन येण्याची आज्ञा करतो.

एका प्रचंड गाड्यावर ठेवून शिवधनुष्य आणण्यात येते.

नृणां शतानि पञ्चाशद्व्यायतानां महात्मनाम् ।
मञ्जूशामष्टचक्रांतां समूहुस्ते कथंचन ।।

६७-४

विश्वामित्रांच्या अनुज्ञेने श्रीराम विनायास धनुष्य उचलतो. दोरी लावताच त्याचे तुकडे होतात. गडगडाट होतो. आसमंत शहारतो. भूमी थरारते. राजा जनक लक्ष्मण विश्वामित्राविना सर्वांची छाती दडपून जाते. ते मूर्च्छित होतात.

तस्य शब्दो महानासीन्निर्घातसमनिःस्वन :
भूमिकम्पश्च सुमहान्पर्वतस्येव दीर्यतः ।।
निपेतुश्च नराः सर्वे तेन शब्देन मोहिताः ।
वर्जयित्वा मुनिवरं राजानं तौ च राघवौ !!

६७-१८, १९.

राजा जनकाच्या हर्षाला उधाण येते. जानकीच्या विवाहाची टांगती तलवार दूर सरते. दीर्घकालाची मनिषा साकारते. विश्वामित्रांच्या अनुज्ञेने राजा जनक अयोध्येला दूत पाठवतो.

वाल्मीकी रामायणानंतरच्या रामायणात सीतेच्या स्वयंवरातच शिवधनुर्भंग घडल्याची घटना आहे.

रामाने शिवधनुष्याचे-तुकडे केले त्यावेळी अनेक राजे होते, रावणही होता. राक्षसराज रावणाच्या छातीवर धनुष्य पडून त्याची त्रेधा तिरपीट उडाली, वगैरे कथाभाग आहे.

वाल्मीकी रामायणात ही घटना नाही. वाल्मीकी नंतरच्या रामकथेत रामायणात रामकाव्यात सीता-स्वयंवराची कथा प्रकर्षाने आढळते. शिवधनुर्भंगाच्या वेळी अनेक राजे उपस्थित होते नव्हे तर प्रत्यक्ष रावणही होता. शिवधनुष्याला प्रत्यंच्या जोडण्याची खटपट करणाऱ्या रावणाच्या छातीवर ते प्रचंड धनुष्य पडले. त्याची छाती दडपली, डोळ्यासमोर काजवे चमकले, तो रक्त ओकू लागला. कुणीच शिवधनुष्याला स्पर्श करायला धजावलं नाही. अखेरीस राम सरसावला. त्याने शिवधनुर्भंग केला. पण जिंकला. सीता जिंकली. स्वयंवर झाले. वगैरे कथाभाग आहे.

वाल्मीकीच्या रामायणांत त्याला आधार नाही. महायज्ञात सीता स्वयंवराचा कसलाही मागमूस नाही.

शिवधनुर्भंगाचे वेळी कोणीही राजे नाहीत. सीता देखील उपस्थित असल्याचा उल्लेख नाही.

राजा जनक, विश्वामित्र, राम-लक्ष्मण, ऋषीमुनी शिवधनुष्य आणणारे सेवक आणि कांही बघे याविना कोणी नाही.

हर्षोत्फुल्ल राजा दशरथ कुलगुरु वसिष्ठ ऋषी, आणि सैन्यासह मिथिलेला येतो.

रामाने पण जिंकला. सीता रामाची झाली.

विदेह आणि रघूकुल एक झाले. तत्कालीन विवाह संस्काराची कल्पना देणारे चित्र आदिकवींनी स्पष्टपणे रेखाटले आहे.

कुलगुरु वसिष्ठ रघुकुलाच्या राजघराण्याची परंपरा सांगतात. वसिष्ठ म्हणतात.

विदितं ते महाराज इक्ष्वाकु कुलदैवतम् ।
वक्ता सर्वेषु कृत्येषु वसिष्ठो भगवानृषि : ।।
रक्ता सर्वेषु कृत्येषु वसिष्ठो भगवानृष
विश्वामित्राभ्यनुज्ञात:सह सर्वैर्महर्षिभि:
एष वक्ष्यति धर्मात्मा वसिष्ठो मे यथाक्रमम् ।

श्रीराम सीतेचा स्वीकार करील. लक्ष्मण उर्मिलेचे पाणिग्रहण करील कुलगुरु वसिष्ठांनी बधूंची मागणी केली. राजा जनकाने विदेहाची राजवंशावली सांगितली.

सीता उर्मिला राम–लक्ष्मणासह देण्याचे अभिवचन वसिष्ठांना दिले.

सदृशो धर्मसंबंधः सदृशी रूपसंपदा ।
रामलक्ष्मणयो राजन्सीता चोर्मिलया सह ।।

७२–३

विश्वामित्र पुढे सरसावले ते म्हणतात, " मानवी इतिहासात अघटत घडले आहे. राजा दशरथ आणि राजा जनक शतानंद आणि वसिष्ठ ईक्ष्वाकू आणि विदेह दोन नाहीत. एक झाले. "

राजकुमार भरत आणि शत्रुघ्ना करता मांडवी आणि श्रुतकीर्ति या दोघी राजा जनकाच्या भावाच्या मुलींची मागणी करतात.

भरतस्य कुमारस्य शत्रुघ्नस्य च धीमतः
वरयेमः सुते राजंस्तयोरर्थे महात्मनोः ।। ६ ।।

७२–६

वरपक्षाने मागणी केली आहे. कुलगुरु वसिष्ठ विश्वामित्रांनी मागणी केली. वरपित्याने केली नाही.

विवाह संस्काराचा शुभारंभ झाला. राजा जनकाने सीतेचा हात धरून तिला रामासमोर उभी केली.

इयं सीता मम सुता सहधर्मचरी तव ।
प्रतीच्छ चैनां भद्रं ते पाणिं गृह्णीश्व पाणिना ।
पतिव्रता महाभागा छायेवानुगता सदा ।
इत्युक्त्वा प्राक्षिपद्राजा मन्त्रपूतं जलं तदा ।।

७३–२७–२८

माझी कन्या सीतेचा अर्धांगी म्हणून स्वीकार कर-तिचा उजवा हात हातात. घे.–पतिवेगळं तिला मन जीवन नाही. सावलीसारखी अखंड अहर्निश तुझ्या पाठीशी राहील. भाग्यशाली तुझं भाग्य उजळून टाकील. "

लक्ष्मण भरत शत्रुघ्न या तिघा राजकुमारांचा असाच विवाह संस्कार झाला धोरोत्त पित्याचे स्वत्व पुत्रात विलीन झाले आहे. पित्याच्या शब्दाला तो प्राणार्पलिकडे जपतो. कुठल्याही मोठ्या, महत्वाच्या कार्याला हात घालण्यापूर्वी तो वडिलांची अनुमति घेतो. दशरथाच्या होकाराविना पाऊल उचलत नाही.

शिवधनुर्भंगाचं चाट अतर्क्य कर्म करणाऱ्या रामाने सीता जिंकली, पित्याची संमती मिळाल्याविना तो विवाहाला तयार नसतो. दशरथ चटकन रूकार देतो. आणि म्हणूनच जानकी त्याना अधिक प्रिय असते.

प्रिया तु सीता रामस्य दारा पितृकृता इति ।
गुणाद्रूपगुणाच्चापि प्रीतिर्भूयोऽभ्यवर्धत ॥

७७–२८,२९

श्रीराम सीतेच्या अत्युत्कट प्रीतीचं, कोमल जाणीवांचं अतीव मनोहर चित्रण वाल्मीकीच्या लोकोत्तर प्रतिभेनं चितारले आहे. "राम, सीता दोन नव्हते, एक होते. परस्परांचं काम नव्हते त्यांचे भावस्निग्ध डोळेही क्वचितच बोलायचे, अंत:करण अंत:करणाशी सुखसंवाद करायचे. त्यांची मने एक होती. एकाची मनिषा दुसऱ्याला आपोआप कळायची. कुणाचं कुणावर अधिक प्रेम होते सांगणे कठीण आहे."

राष्ट्रावरची आपत्ती हा राजाचा अपराध. राजाने राजधर्माकडे पाठ फिरविली की राज्याचे दैव फिरते. राजाचे पाप प्रजेला भोवते अशी त्याकाळची पक्की धारणा.

राजा कालस्य कारणम् । या वचनावर त्यांची नितांत श्रद्धा ।
त्रिकालज्ञानी तपोधन सनत् कुमारांनी स्वच्छ भविष्य वर्तवलं.

तस्य व्यतिक्रमाद्राज्ञो भविष्याति सुदारुणा ।
अनावृष्टिः सुघोरा वै सर्वभूतभयावहा ॥

१:८–९

आणि नेमके घडलेही तसेच.

लोमपाद राजाच्या राज्यात अवर्षणाने कहर उडतो. प्रजेची अन्न दशा होते. दोन वेळा हातातोंडाची गाठ पडत नाही. उपासमार होते. राजा गांगरतो.

ऋष्यशृंग मुनीला महत्प्रयासाने वळवतो. राजकन्या शांता समर्पण करतो. ऋष्यशृंगाने सीमारेषेत पाऊल ठेवले तेच पावसासह. हत्तीच्या सोंडसारख्या जलधारा बरसल्या राज्य मोहरले. धान्याचा महापूर लोटला. दुधदुभत्याची रेलचेल झाली.

रघुवंशाचे राजे आणि राजा दशरथ राजधर्माचं काटेकोर पालन करतात. धर्मरक्षण संवर्धनाकरता तन, मन धनाचा कण् न कण् आणि क्षण न क्षण वेचतात. अखंड सावध असतात. प्रजेला विश्वासात घेतात. राजधर्माच्या आड येणारा पोटचा मुलगा असला तरी देखील ते त्यांचा त्याग करतात. राजा सगराने प्रजेची बालके पाण्यात बुडवून मारणाऱ्या पापसमाचार सज्जन प्रतिबंधक असमंजसाला पुत्राला हद्दपार केले.

त्याकाळची नगरे, राजधान्या विलोभनीय आहेत. ऐश्वर्यशाली आहेत. अयोध्येचं सुंदर चित्र पाचव्या सर्गात चितारले आहे.

कोसल देशाची राजधानी अयोध्या अठ्ठेचाळीस कोस लांब आणि बारा कोस रुंद होती, नगराच्या सर्व बाजूला वेशी होत्या. भक्कम दरवाजे होते. दुर्भेद्य तटबंदी होती. दुर्गम खंदक होता, दरवाजे होते. उत्तुंग प्रासाद, वाडे, गोपुरे अंतराळातल्या मेघांशी हितगुज करीत होते. नगरात नानाविध आयुधे आणि यंत्रांची प्रचंड कोठारे होती.

विलोभनीय उपवने उद्याने होती. आंबराया होत्या. नृत्यशाला होत्या. नगररचना रेखीव मनोहर कौशल्यपूर्ण होती.

वेदविद्या पारंगत धगधगत्या अग्नीसारखे अनेक तपस्वी ब्राह्मण होते. धनुर्विद्येत निष्णात शस्त्रास्त्रात तरबेज रणधुरंधर निडर क्षत्रिय वीर होते एकापेक्षा एक कुशल कारागीर होते. भाट स्तुतीपाठक कवी गायक वादक नाना कलातले दर्दी मुरब्बी असंख्य कलाकार होते. जाणकार तंत्रज्ञ होते.

विमानमिव सिद्धानां तपसाधिगतं दिवि।
सुनिवेशितवेश्मान्तां नरोत्तमसमावृताम् ।।

५:१९

राज्यशासनाची धुरा सांभाळण्याकरता राजाला मातबर धुरीण मंत्री साहाय्य करीत असत. राजकारण धुरंधर नीतिमान लोकधुरीण मार्गदर्शक मंत्री राष्ट्राची अमोघ शक्ती होते. स्वदेश परदेशातील बित्तंबातमी त्यांना असे.

शत्रुमित्रांची अचूक पारख करीत. गुणवानाला जवळ करीत. न्यायनिष्ठुर मंत्री प्रसंगी मुलालाही कठोर शिक्षा करायला मागे पुढे पाहात नसत. ते नेहमी एक विचाराने वागत. प्रसंगानुरूप, संधीविग्रहाचा ते योग्य सल्ला देत. अखंड सावध असून अहर्निश राज्यात प्रजापालन संवर्धनात तत्परतेने साहाय्य करीत असत.

तस्यामात्या गुणैरासन्निक्ष्वाको स्तु महात्मनः ।
मन्त्रज्ञाश्चेगिङ्तज्ञाश्च नित्यं प्रियहिते रता ।।१।।

७:१

त्याकाळची नगरे आदर्श होती. शासन आदर्श होते. प्रजाजन आदर्श होते.

आजही हव्यास वाटावा. ते वळण गिरवण्याची लालसा निर्माण व्हावी. असे आदर्श होते.

धुरंधर मातब्बर आठ मंत्र्यांचे राजा दशरथाचे मंत्रीमंडळ

धृष्टिर्जयन्तो विजयः सुराष्ट्रो राष्ट्रवर्धनः ।
अकोपो धर्मपालश्च सुमंत्रश्चाष्टमोऽर्थवित् ।।

७–३

वृष्टी, जयंत विजय, सुराष्ट्र राष्ट्रवर्धन अकोपधर्मपालन सुमंत्र अशा अंतर्वर्तुळातील अष्टप्रधानांच्या सहाय्याने राजा दशरथ राष्ट्राची धुरा सांभाळीत होता.

वाल्मीकी रामायणानंतरच्या काव्य पुराणातील रामकथेत पुष्कळच फिरवा-फिरव झाली आहे. बहुतेक पुराणकार आणि नंतरचे रामायणकार अहिल्येला निष्कलंक ठरवतात. पापापासून ती दूर असल्याचा निर्वाळा देतात.

अहल्या दोषी असल्याचे वाल्मीकी स्वच्छ सांगतात. रतिपुतळी आहे. देवांनाही भुरळावे असं तिचं असामान्य साधारण लावण्य आहे. कोमलांगी चंद्रानना अहल्येच्या अपूर्व सौंदर्याने देवराज इंद्राला मोहीत केले. त्याचं मन चळलं लाज सुटली. सद्विवेकबुद्धी लोपली. स्नानाकरता नदीतीरावर गेलेल्या गौतम-ऋषींचे रूप घऊन देवराजाने आश्रमात पाऊल ठेवले. रूपसुंदरी अहल्या एकटीच

होती. तपस्विनी अहल्येने पतीवेश घेऊन आलेल्या इंद्राला ओळखले, वेषधारी इंद्राने तिची विनवणी केली.

संगमं त्वहमिच्छामि त्वया सह –

४८–१८

तो इंद्र असल्याची तिची पक्की खात्री आहे.

( सहस्त्राक्षं विज्ञाय –– ४८/१९ )

त्रैलोक्याच्या देवाला राजा इंद्रालाही आपली अभिलाषा वाटावी याचा तिला अभिमान वाटला. तिने विरोध केला नाही.

(मतिं चकार दुर्मेधा देवराजकुतुहलात् –– ४८–१९) आणि अखेरीस हर्षोत्फुल्ल अहल्या म्हणते, कृतार्थाऽस्मि ) ४८-२०

तपःशक्तिशाली पतीच्या क्रोधाच्या धगधगत्या वणव्यात दोघांचीही आहुती पडायला क्षणाचाही विलंब लागणार नव्हता.

अहल्या देवराजाला सुचविते.

कृतार्थास्मि सुरश्रेष्ठ गच्छ शीघ्रमितः प्रभो ।
आत्मानं मां च देवेश सर्वदा रक्ष गौतमात् ।

४८:२०

देवराज इंद्राच्या कारस्थानाला ती अजाणता बळी पडली नाही. कपटव्यूहात न कळत अडकली नाही.

इंद्र लगबगीने बाहेर पाऊल ठेवीत नाही तोच मुनीश्रेष्ठ गौतमांनी आश्रमात प्रवेश केला.

स्नान करून आलेल्या ऋषींच्या हातात दर्भ होते समिधा होत्या.

तपःशक्तीने धगधगणाऱ्या ज्वलज्जहाल गौतम मुनीच्या आसपास देवही फिरकायला धजत नव्हते. त्यांच्याशी विरोध म्हणजे पर्वतावर मुष्टीप्रहार करण्यासारखे होते. गौतम मुनीचा वेश घेतलेला पापी इंद्र लटपटला. त्याला दरदरून घाम फुटला. तो चळचळा कापू लागला.

तपोधन मुनिश्रेष्ठांची जळती नजर अर्धांगीवर खिळली.

थरथरणाऱ्या अहल्येचं इंद्राचं पाप तपःसामर्थ्यशाली गौतमांनी तात्काळ हेरलं. भडकलेल्या मुनिश्रेष्ठांनी इंद्राला शाप दिला.

मम रूपं समास्थाय कृतवानसि दुर्मते।
अकर्तव्यमिदं तस्माद्विफलस्त्वं भविष्यसि।

४८:२७

अहल्येला त्यांनी शापदग्ध केले.

इह वर्ष सहस्त्राणि बहूनि त्वं निवत्स्यसि।
वायुभक्षा, निराहारा तप्यन्ती भस्मशायिनी।
अदृश्या सर्वभूतानामाश्रमे ऽ स्मिन्निवत्स्यसि।

४८:२९, ३०

अनुतापाच्या धगधगणाऱ्या आगीत होरपळून निथळलेल्या अहिल्येने काकुळतीने प्रार्थना केली.

कनवाळू गौतम कळवळतात.

यदा चैतद्वनं घोरं रामो दशरथात्मजः।
आगमिष्यति दुर्धर्षस्तदा पूता भविष्यसि।
तस्या तिथ्येन दुर्वृत्ते लोभमोह विवर्जिता।
मत्सकाशे मुदा युक्ता स्व वपुर्धारयिष्यसि

४८ : ३१, ३२

राम दशरथाचा थोर पुत्र श्रीराम येईल त्याच्या पवित्र स्पर्शाने तुझी मुक्तता होईल. शुद्ध होशील. माझ्यासह परमसुखात राहशील.

* *

# अयोध्याकाण्ड

यश्च रामं न पश्येतु यं च रामो न पश्यति ।
निन्दितः सर्वलोकेषु स्वात्माप्येनं विगर्हते ।।
२–१७ : १५.

मानवी बुद्धीची पोहोच नाही असे अननुभूत दिव्य स्वर्गीय सौंदर्य, शब्द-जालाच्या पाशात पकडून श्रोत्यासमोर खडे करण्याचं सामर्थ्य वाल्मीकींचेच ।

बुद्धीवैभवाने विनटलेल्या अमृतरसाने रसरसलेल्या वाल्मीकी रामायणातील अयोध्याकांड अत्यंत सरस आहे. अभिजात गुणवत्तेचे, अतिश्रेष्ठ अव्वल दर्जाचे विलक्षण उद्‌बोधक आहे. विस्ताराच्या दृष्टीने या तेजस्वी महाकाव्याचे युद्धकांड ( सर्ग १२८ श्लोकसंख्या ५,७९५ ) सर्वात मोठे. त्यानंतरचे १२० सर्ग ४,३५५ श्लोकसंख्या असलेले अयोध्याकांड. वाल्मीकीचे अवतार मानल्या गेलेल्या लोकोत्तर संत महाकवी तुलसीदासाची लेखणी अयोध्याकांडात विलक्षण रंगली आहे. तुलसीरामायणाचे अग्रभागी तळपणारे अयोध्याकांड सर्वोत्कृष्ट अत्युत्कट सरस आहे. '

अयोध्याकांडात राजा दशरथाच्या कौटुंबीक संघर्षांचे अतीव सुंदर अतीव हृद्य वास्तववादी दर्शन घडवले आहे. महानिश्चयी मनाच्या विचाराच्या खंबीर रामभरताच्या विशुद्ध जीवनाचं अद्‌भूत त्यागाचे हिमालयासारखे भव्योदात्त चित्र चितारतांना वाल्मीकींची प्रतिभा विलक्षण मोहोरली आहे.

राजा दशरथ अनियंत्रित सत्ताधीश हुकुमशहा नाही. राजावर धर्माचे नियंत्रण आहे. पुरोहित अमात्याचा अंकुश आहे. मंत्रीमंडळाचा अटकाव आहे. लोकप्रतिनिधींची मर्यादा आहे.

अयोध्याधीशाच्या राज्यात प्रजास्वातंत्र्य आहे. विचारस्वातंत्र्य आहे. प्रजाजन प्रसंगी प्रत्यक्ष राजकारणात भाग घेतात.

वार्धक्याने राजा थकला होता. शरीराची खोळ जीर्ण होत होती. रामाला राज्याभिषेक करायची त्याची मनिषा. रामयौवराज्याभिषेका करता तो विलक्षण आतुरला होता.

राजाने मंत्री अमात्यांशी मसलत केली. त्यांचा रुकार मिळवला, निर्णय घेतला, देशोदेशींच्या राजांना निमंत्रणे पाठवली.

लोकसमाजाचे पुढारी, थोर तपस्वी ऋषी, मुनी, विद्वान पंडीत, अमात्य मंत्री, मांडलीक राजे सर्वांची परिषद भरवतो. राजा घोषणा करतो 'सभासद हो पूर्वजांच्या परंपरेला अनुसरून मी राष्ट्राची धुरा वाहिली. डोळ्यात तेल घालून प्रजेचे रक्षण केले. प्रजेच्या सुखासमाधानाकरता जिवाचा आटापीटा केला. अविश्रांत परिश्रमाने मी थकलो आहे. माझे हे शरीर खंगले आहे. या गलितगात्र देहाला विश्रांति द्यावी अशी माझी इच्छा आहे. ज्येष्ठ, श्रेष्ठ ऋषीमुनी आचार्य मंत्री अमात्य यांच्या संमतीने थोरल्या मुलाला रामाला यौवराज्याभिषेक करण्याचा मी निर्णय घेतला आहे.

रामराज्याभिषेकाला आपली अनुमती आहे ना ? आपली संमति नसेल तर राज्यकारभाराच्या जबाबदारीतून सुटण्याचा उपाय सुचवा. लोककल्याणाचा यापेक्षा सरस मार्ग असल्यास सांगा. सर्वांच्या विचाराने निर्णय घेण्यात येईल.

अनेन श्रेयता सद्यःसंयोक्ष्येऽहमिमां महीम् ।<br>
गतक्लेशो भविष्यामि सुते तस्मिन्निवेश्य वै ।।<br>
यदीदं मेऽनुरूपार्थं मया साधु सुमन्त्रितम् ।<br>
भवन्तो मेऽनुमन्यन्तां कथं वा करवाण्यहम् ।।

तरुण रामाने अद्भुत लोकप्रीति संपादन केलेली असते. राजा दशरथापेक्षाही तो प्रजेचा प्यारा असतो. राम राजा होणार असल्याचे समजताच जनसमाज हर्षोन्मादाने फुलून जातो.

राजा दशरथाचे मन आनंदाने काठोकाठ भरून जाते.

इति ब्रुवन्तं मुदिताः प्रत्यनन्दन्नृपा नृपम् ।<br>
वृष्टिमन्तं महामेघं नर्दन्त इव बर्हिणः ।।<br>
स्निग्धोऽनुनादीःसंजज्ञे तत्र हर्षसमीरितः ।<br>
जनौघोद्घुष्टसंनादो मेदिनीं कम्पयन्निव ।।

२–१७,१८

राजा दशरथाच्या घोषणेचे अत्युत्कट स्वागत होते. श्रीरामावर स्तुतीसुमनांची वृष्टी होते.

रामः सत्पुरुषो लोके सत्यधर्मपरायणः ।<br>
साक्षाद्रामाद्विनिर्वृत्तो धर्मश्चापि श्रियासह ।।

क्षान्तःसान्त्वयिता श्लक्ष्णःकृतज्ञो विजितेन्द्रियः ।।
इति नः पुरुषव्याघ्रः सदा रामोऽभिभाषते ।
व्यसनेषु मनुष्याणां भृशं भवति दुःखितः ।।
उत्सवेषु च सर्वेषु पितेव परितुष्यति ।
सत्यवादी महेष्वासो वृद्धसेवी जितेन्द्रियः ।।
२–२९, ३१, ४०, ४१

घनःश्याम श्रीराम रूपवान आहे, सौंदर्यशाली शोभिवंत महापुरुष आहे. मदनमूर्ती आहे.

राजा दशरथाने यौवराज्याभिषेकाचा संकल्प सोडला. वसिष्ठ, मंत्री अमात्य पौरजनांचा रूकार घेतला. रामाला आणण्याकरिता सुमंत्राला पाठवले. सुमंत्रासह रामाने पित्याच्या नेत्रदीपक प्रसादात पाऊल ठेवले. राजप्रसादाला खुलवणाऱ्या रामलावण्याचे वाल्मीकींनी सुंदर वर्णन केले आहे.

गन्धर्वराजप्रतिमं लोके विख्यात पौरुषम् ।।
दीर्घबाहुं महासत्वं मत्तमातङ्गगामिनम् ।।
चन्द्रकांताननं राममतीव प्रियदर्शनम् ।
रूपौदार्यगुणैः पुंसां दृष्टिचित्तापहारिणम् ।।
धर्माभितप्ताः पर्जन्यं ह्लादयन्तमिव प्रजाः ।
न ततर्प समायान्तं पश्यमानो नराधिपः ।।
३, २८:३०

आजानुबाहु मत्तगजासारखी चाल असणाऱ्या रामाच्या रेखीव अंग कांतिने आणि सौंदर्याने गंधर्वराजालाही लाजवले. पौर्णिमेच्या चंद्रासारखी कांति होती.

श्रीरामाची कैकयीवर मातेसारखी किंबहुना अधिक प्रीती. कैकयीच्या अंतःपुरात बसलेल्या पित्याचा निरोप समजताच रामाचा चेहेरा प्रसन्नतेने उजळतो-तो सीतेला म्हणतो.

" संचोदयति राजानं मदर्थंमदिरेक्षणे ।
सा प्रहृष्टा महाराजं हितकामानुवर्तिनी ।।
जननी चार्थकामा मे केकयाधिपतेःसुता ।
दिष्टया खलु महाराजो महिष्या प्रिया सह ।
सुमन्त्रंप्राहिणोद् दूतमर्थकामकरं मम ।।

यादृशी परिषत्तत्र तादृशो दूत आगतः ।
ध्रुवमद्यैव मां राजा यौवराज्ये ऽभिषेक्ष्यति ॥

१६–१६, १७, १८, १९

" देवी निर्मल मनाची पतीच्या हितासाठी जीवाचा आटापीटा करणारी माझी माता कैकयी आणि पिता दोघेजण माझ्या अभिषेकासंबंधी विचार करीत आहेत. माझ्या कल्याणासाठी तळमळणारी, मला हवे तेच नेमके करणारी माझ्यावर प्राणापलीकडे प्रेम करणारी माझी माता कैकयी माझ्यासंबंधीच पित्यास सांगत आहे. म्हणूनच यौवराज्याभिषेकाचे उद्दीष्ट सिद्धीस नेणाऱ्यास हा सुमंत दूत माझ्या मातापित्याने पाठवला आहे. मी मातापित्याच्या भेटीस जातो. "

ब्रह्मर्षी वसिष्ठांच्या आदेशानुसार व्रतस्थ असलेला राम, प्रसन्न अंतःकरणाने लगवगीने निघतो.

राम अश्वारूढ होतो. मेघासारखा गंभीर ध्वनी करणारा, रत्न सुवर्णांनी सजवलेला मेरू पर्वतासारखा दैदीप्यमान रथ तेजाने झळाळत होता. त्या रथाचे धिप्पाड मदोन्मत्त घोडे हत्तीच्या पीलासारखे दिसत होते. इंद्रासारख्या राज्यलक्ष्मीने सळसळणारा राम आकाशात गडगडाट करत जाणाऱ्या मेघाप्रमाणे भूमी निनादित करीत जात होता. ध्वजपताका, दीपवृक्षांनी नगरी शृंगारलेली असते उंची पोषाख केलेल्या बहुमोल अलंकार घातलेल्या प्रजाजनांची खेचाखेच झालेली असते. राजमार्गातून जाणाऱ्या रामदर्शनाने जनताजनार्दनाच्या आनंदाला उधाण येते. मंगल वाद्ये निनादतात. सैनिक सिंहनाद करतात. पौरजन श्रीरामावर पुष्पाची वृष्टी करतात.

हर्षोत्फुल्ल वृद्ध, तरुण बाल, स्त्रिया, व्यापारी, थोर ऋषी–मुनी तपस्वी पुरोहित श्रीरामाची गगनचुंबी प्रशंसा करतात.

' राम राजा होणार '
' धनधान्य सुखासमाधानाची रेलचेल होईल. '
' सर्व सुखे आमच्यासमोर हात जोडून उभी राहतील. '
' दुःखाचा लेशही राहणार नाही. '
' कोणाचेही कसलेही अप्रिय घडणार नाही. '
' स्त्रिया स्तुतीसुमनांचा वर्षाव करतात '
' राममाता कौसल्या धन्य आहे. '
रामपत्नी सीता श्रेष्ठ आहे '

'रामाचेही सीतेवर जोवापलीकडे प्रेम आहे'

'चंद्राची रोहिणी तशी रामाची सीता।'

'सीता पुण्यवान आहे'

'पूर्वजन्मी सीतेने कठोर तप केले असले पाहिजे म्हणून तिला श्रीराम पती लाभले.'

'ज्येष्ठ आणि ऋषीमुनी आणि ब्राह्मणांनी राजमार्गात श्रीरामाचे स्वागत केले. त्यास आशिर्वाद दिला.'

'श्रीरामा आज तू आमचा राजा होणार आहेस. धर्मनिष्ठ प्रजाहितदक्ष इक्ष्वाकू राजाप्रमाणे आमचा सांभाळ कर. रामराज्यात आम्ही अधिक सुखी होऊ. रामदर्शनाने आम्ही धन्य झालो. सारी स्वर्गीय सुखे ही तुच्छ आहेत. रामराज्याभिषेकापेक्षा भूलोकीच काय पण स्वर्गात देखील काहीही सरस नाही. श्रेष्ठ नाही.'

ज्येष्ठ श्रेष्ठांच्या सुयोग्यतेनुसार रामही त्यांचे स्वागत करतो.

अयोध्याकाडांतला अद्भुत आनंदाचा कळस गाठणारा हाच अखेरचा क्षण।

'यश्च रामं न पश्येतु यं च रामो न पश्यति।
निन्दितः सर्वलोकेषु स्वात्माप्येनं विगर्हते।
१७ : १५

रामप्रभूचं दर्शन न होणाऱ्या रघुनाथाच्या अमृतदृष्टीची वृष्टी झाली नाही अशा अभाग्याची लोकसमाजात विलक्षण निंदा होऊ लागली. मनाच्या असह्य टोचणीने तडफडाट होऊ लागला.

बृहस्पतीची बुद्धी, इंद्राचा पराक्रम, पृथ्वीची क्षमा असलेल्या सत्यवचनी निर्मत्सर, मधुभावी कृतज्ञ, जितेंद्रिय रामाच्या असीम लोकोत्तर गुणसंपदेने अयोध्येची उलटापालट करणारी कैकयी भारावली आहे.

कौसल्येइतकंच तिचं रामावर प्रेम आहे. भरतासारखंच किंबहुना कांहीशी अधिकच त्याच्यावर ममता आहे. पुण्यनक्षत्रावर रामराज्याभिषेक होणार असल्याची वार्ता सांगायला मंथरा येते. त्यावेळी कैकयी गाढ निजलेली असते. मंथरा तिला हलवून जागे करते.

"महाराणी उठा, कसली ही काळझोप!"

डोळे चोळीत कैकयी म्हणाली.

"काय झालं ग?"

" तुझं सर्वस्व जायची वेळ आली आहे. "

" स्पष्ट बोल गं !"

" तुला वाटत असेल तुझ्या पतीची तू सर्वांत लाडकी आहेस. "

" हो आहेच मुळी. "

" साफ खोटे. ग्रीष्म ऋतूंतील नदीच्या प्रवाहासारखं तुझ्यावरचं प्रेम कोरडं ठणठणीत पडलं आहे. "

" मंथरे स्वच्छ सांग. मला संशयात ठेऊ नको "

" पुष्प नक्षत्रावर रामाचा राज्याभिषेक होणार आहे. "

कैकयीच्या अंतःकरणात लक्षदीप उजळले. हर्षविभोर महाराणीने पलंगावरून उडी मारली. आपल्या गळ्यातली उंची भूषणे मंथरेच्या अंगावर भिरकावली. ती म्हणाली " मंथरे या अमृतवार्तेबद्दल काय गं देऊ तुला ?"

कैकयीच्या आनंदाला उकळ्या फुटल्या. हर्षोन्मादाने वेडावलेल्या महाराणीने मंथरेला गाढ आलिंगन दिले.

चतुर संभाषणकुशल मंथरेने कैकयीचा बुद्धीभेद करायला प्रारंभ केला.

" महाराणी ! भरताची आठवण आहे ना तुला ? "

" राम आणि भरत हे एकच आहेत "

" या काळझोपेतून केंव्हा जाग येईल ग तुला !"

" मंथरे रामराज्याभिषेकाची अमृतवाणी अधिक सरस आहे हवे ते माग तुझे मनोरथ पूर्ण करीन "

संतापाने जळफळणाऱ्या मंथरेने बहुमोल अलंकार दूर भिरकावून दिले. ती कडाडली "

" महाराणी जाग्या आहेत ना ? "

" खुळे ! मी पूर्ण जागी आहे "

" शुद्धीवर आहात ना ? "

" असं का म्हणतेस ? "

" या भीषण संकटात आपला आनंद ओसंडून वाहतो आहे "

" कसलं संकट ?"

" सवतीच्या मुलाचा उत्कर्ष हा मृत्युसारखा भयंकर असतो "

" मंथरे तुझ्या डोक्यात कसलं खूळ भरलं आहे "

" राम राजा झाल्यावर भरताची काय अवस्था होईल ठाऊक आहे ना ? '

" काय होईल ? "

' भरत रामाचा दास होईल '

' कांहीतरी बरळतेस झालं '

' कौसल्या राजमाता होणार आहे. हात जोडून तुला तिच्यासमोर नाचावे लागेल. तुझी सून तुझ्या नावाने खडे फोडील '

सद्‌गुणाची खाण असलेल्या श्रीरामावर कैकयीचा अढळ विश्वास होता. मंथरेचे मन वळवण्याची शिकस्त करताना ती म्हणते.

धर्मज्ञो गुरुभिर्दान्तः कृतज्ञः सत्यवाक् शुचिः ।
रामो राज्ञः सुतो ज्येष्ठो यौवराज्यमतोऽर्हति ।।
भ्रातृन भृत्यांश्च दीर्घायुः पितृवत् पालयिष्यति ।।
यथा मे भरतो मान्यस्तथा भूयोऽ पि राघवः ।।
कौसल्यातोऽतिरिक्तं च स तु शुश्रूषते हि माम् ।
राज्यं च यदि रामस्य भरतस्यापि तत्तदा ।।
मन्यते हि यथात्मानं तथा भ्रातृंश्च राघवः ।।

८. १४, १५, १८, १९,

' श्रीराम सर्वात थोरला आहे, कोमल विमल मनाचा आहे, संयमी कृतज्ञ आहे. पित्यासारखी तो भावाची काळजी घेईल, सेवकांचं संवर्धन करील. रामराज्याभिषेकाने तुझा संताप का व्हावा ? '

कैकयी वर मागते तो रामराज्याभिषेकाच्या पूर्वरात्री.

कैकयी विलक्षण जिद्दी आहे. हेकेखोर आहे. आपलेच खरं करणारी, महत्वाकांक्षी मानिनी आहे. आसुरी लालसेने पछाडलेली कैकयी राजा दशरथाच्या ओठाशी असलेला सुखामृताचा प्याला उधळते. राजाच्या जीवाची तगमग होते. ' रामाला वनात धाडू नकोस. राम सीमा पार करण्याच्या आधीच माझे प्राण कुडी सोडून जातील. तू विधवा होशील '

फत्तराच्या हृदयाची कैकयी स्तब्ध असते. पतीच्या मृत्यूची यत्किंचितही दिक्कत वाटत नाही. बेगुमानपणे ती आपलीच मागणी पुढे करते. नाना क्लृप्त्या योजून राजाला शब्द पूर्ण करायला भाग पाडते. चतुरधुरंधुर मंत्री सुमंत्र निःसंदिग्ध खडसावतो.

' मुलगी आईचे वळण गिरवते म्हणतात ते खरं आहे. खाण तशी माती ।'

सुमंत्र कहाणी सांगतो—

'राजा अधपती कैकयीचा पिता. त्याला प्राण्याची भाषा अवगत असते. एकदा दोन मुंगळयाचे भाषण ऐकून त्याला हसू येते. महाराणी कैकयीची माता शकाकुशंकानी व्याकुळते.

"का हसलात तर ?

"उगाच"

"खरं खरं सांगा।"

"मी सांगणार नाही"

"तुम्हाला सांगावेच लागेल"

"भलता हट्ट करू नको"

"मी प्राण देईन"

हे गुपीत आहे. सांगितलं तर निमिषार्धांत माझे प्राण कुडी सोडून जातील."

"मला त्याची पर्वा नाही. तुम्हाला सांगायलाच हवं. नाहीतर मी इथेच जीव देईन."

बांका पेचप्रसंग उद्‌भवला. नीरगाठ कशी सोडवायची ? राजा गुरूकडे जातो. समस्या मांडतो. गुरुजींनी निःसंदिग्ध सल्ला दिला.

"सांगू नको ! निर्घृण पाषाणहृदयी पत्नीला हद्दपार कर"

"राजा तसं करतो".

सुमंत्र खडसावतो.

पतीची पर्वा न करणाऱ्या बेगुमान राणीची तू कन्या आहेस. तसंच पतीला ठोकरत जातेस. त्याच्या जीवावर उठली आहेस. विचार कर पतीकरता, राजाकरता, राष्ट्राकरता उपराटी मागणी करू नकोस.

निर्घृण बेगुमान कैकयी तशीच अविचल होती. तिच्या चेहेऱ्यावर पुसटती छटाही उमटली नाही. जशी आधी होती तशीच ती फत्तरासारखी ठोकर उग्र होती.

एतावदुक्त्वा वचनं कैकयी विरराम ह।
विलपन्तं च राजानं न प्रतिव्याजहार सा ।
१२-५०

मातेच्या स्वभावाची भरताला पुरेपूर पारख आहे. राजा दशरथाचा मृत्यू होतो. वसिष्ठांच्या आदेशानुसार दूत भरताला आणायला कैकय देशात जातात. राम वनवास पित्याचा मृत्यू वगैरे प्रलयंकारी भीषण घटनांची त्याला पुसटतीही कल्पना नसते. अयोध्या आनंदी असल्याचे त्याला दूत कळवतात त्यावेळी तो म्हणतो,

आत्मकामा सदा चण्डो क्रोधना प्राज्ञ मानिनीं ।
अरोगा चापि मे माता कैकेयी किमुवाच ह ।

७०:१०

रूपसुंदरी धाकटी राणी कैकयी राजा दशरथाच्या अंतःकरणाची स्वामिनी आहे. तिच्याकरता सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात सहज झोकून देईल अशी राजाच्या अंतर्वर्तुळातील मंत्री अमात्याची पुरेपूर खात्री असते.

दयिता त्वं सदाभर्तुरत्र मे नास्ति संशयः ।
त्वत्कृते स महाराजो विशेदपि हुताशनम् ।।
न त्वां क्रोधयितुं शक्तो न क्रुद्धां प्रत्युदीक्षितुम् ।
तव प्रियार्थं राजा हि प्राणानपि परित्यजेत् ।।
न ह्यतिक्रमितुं शक्तस्तव वाक्यं महीपतिः ।
मन्दस्वभावे बुध्यस्व सौभाग्यबलमात्मनः ।।

९:२४,२५,२६

तू लाडकी आहेस, तुझ्या शब्दाकरता राजा स्वतःला आगीत झोकून देईल, तुझ्याकरता प्राणार्पण करील. तू फार फार भाग्यवान आहेस. संधीचा पुरेपूर फायदा करून घे. हा अवसर गेला की संपलेच.

क्रोधागारात दशरथ प्रवेश करतो. जमिनीवर कैकयी गडबडा लोळत असते तो व्याकुळतो. " काय झालं ? तुला काय हवं ? तुझा शब्द कधीतरी खाली पडू दिला आहे का ?"

" कः प्रियं लभतामद्य को वा सुमहदप्रियम् ।

१०:३२

कुणाला मी ठार करू ? कुणा दुष्ट वेफाट नरपशूला मानाचं स्थान देऊ ? का त्याला धनदौलत देऊ ?

कुणा सत्वशील धर्मनिष्ठाला धुळीला मिळवू ? तुझ्याकरता मी हवे ते दिव्य करीन.

"कः प्रियं लभतामद्य को वा सुमहद्‌प्रियम्‌ ।
मा रोदोर्मा च कार्षीस्त्वं देवि संपरिशोषणम्‌ ।।
१०:३२

"रडू नकोस, रागावू नकोस. देहदंडाचं शासन झालेल्या कुकर्मी अपराध्याला मुक्त करू का ? का कुणा निरपराध्याला सुळावर चढवू ? का श्रीमंत कुबेराला भिकारी बनवू ?"

अहं चैव मदीयाश्च सर्वे तव वशानुगाः ।
न ते कंचिदभिप्रायं व्याहन्तुमहमुत्सहे ।। १०:३४

मीच नव्हे तर माझे सेवक तुझ्या शब्दाबाहेर नाहीत. तुझ्या फडतूस इच्छा मला कायद्याप्रमाणे आहेत, मी त्यांची मर्यादा ओलांडणार नाही.

तू मला प्रिय आहेस पण राम तुझ्यापेक्षा सर्वांपेक्षा प्यारा आहे. त्याची शपथ घेतो.

तेनाजय्येन मुख्येन राघवेण महात्मना ।
शपे ते जीवनार्हेण ब्रूहि यन्मनसेप्सितम्‌ ।। ११:६

कराल काळाच्या जबड्यात तो स्वतःला आणि अयोध्येला लोटत असल्याची काय कल्पना !

यं मुहूर्तमपश्यंस्तु न जीवेयमहं ध्रुवम्‌ ।
तेन रामेण कैकेयि शपे ते वचनक्रियाम्‌ ।। ११:७

आपलं वचनच रामाच्या माथ्यावर वज्रप्रहार करणार असल्याची दुर्भाग्याला काय कल्पना ? भवितव्यतेचा ज्वालामुखी धुमसत होता. तप्त लाव्हारसाचा स्फोट व्हायला थोडा अवधी होता. नियतीच्या क्रूर चेष्टीताची पुसटती कल्पना आली असती तर--

तसं घडायचं नव्हतं !

'राम दिसला नाही तर क्षणही युगासारखा जातो त्या रामाची नव्हे तर त्याच्या सर्व भ्रात्यांची शपथ घेतो.

भद्रे हृदयमप्येतदनुमृश्योद्धरस्व मे ।
एतत्समीक्ष्य कैकेयि ब्रूहि यत्साधु मन्यसे ।।
बलमात्मनि पश्यन्ती न मां शङ्कितुमर्हसि ।
करिष्यामि तव प्रीतिं सुकृतेनापि ते शपे ।।

११:९–१०

'माझं सर्व पुण्य पणाला लावीन सांग तुझी मनिषा'

राजाने शब्द दिला. धूर्त कावेबाज कैकयीने त्याचा पुरेपूर फायदा घेतला.

यथा क्रमेण शपसि वरं मम ददासि च ।
तच्छृण्वन्तु त्रयस्त्रिंशद्देवाः साग्नि पुरोगमाः ।। ११:१३

'तेहतीस कोटी देवांनो राजाचे अभिवचन ऐका'

स्मर राजन्पुरा वृत्त तस्मिन्दैवासुरे रणे।
तत्र त्वच्यावयच्छत्रुस्तव जीवितमंतरा ।। ११:१८

"हे सर्व साक्षी आहेत"
आणि तरी राजाला ठणकावते

सत्यसन्धो महातेजा धर्मज्ञः सुसमाहितः ।
वरं मम ददात्येष सर्वे शृण्वन्तु देवताः ।।

११;१६

लक्षात ठेव या सर्वांनीही ऐकलं आहे. चराचरांनी ऐकलं आहे.'

सैतानाला बायबलाचा आधार. दुराचाराचं समर्थन करण्याकरता ती शास्त्र-वचन देते म्हणते. 'धर्माचं पालन कर. काय वाटेल ते झालं तरी धर्मवचन पाळणं हा धर्म आहे.

शैब्यः श्येनकपोतीये स्वमांसं पक्षिणे ददौ ।
अलर्कश्चक्षुषी दत्वा जगाम गतिमुत्तमाम् ।।

१२:४३

आणि ती शब्दाकरता स्वतःचे मांस देणाऱ्या शिबीची कथा सांगते अलर्कांची कथा सांगते.

याचकाची कसलीही मनिषा पुरवणाऱ्या राजा अलर्काकडे एकदा आंधळा ब्राह्मण येतो.

' काय हवे ? '

' आपले डोळे '

' माझे नेत्र हवेत ना ? '

' हं

राजा डोळे काढतो त्याला चटकन देतो.

सरितां तु प्रतिः स्वल्पां मर्यादां सत्यमन्वितः ।
सत्यानुरोधात्समये वेलां स्वां नातिवर्तते ॥

॥१४:६

वचनबद्ध सागर कधी सीमारेषा ओलांडतो का ?

सत्यं समनुवर्तस्व यदि धर्मे धृता मतिः ।
स वरः सफलो मेऽस्तु वरदो ह्यसि सत्तम ॥

१४:८

दुष्ट, निर्घृण कैकयी त्याला वचनाच्या दुर्भेद्य साखळदंडानी जखडून टाकते. राजा निषेध करतो, धिक्कारतो.

" चांडाळणी रामाने तुझे काय वाईट केले आहे ?

कौसल्येपेक्षाही राम तुझ्यावर अधिक ममता करतो ना ?

अपश्यतस्तु मे रामं नष्ट भवति चेतना ।
तिष्ठेल्लोको विना सूर्यं सस्यं वा सलिलं विना ॥

१२:१३

" दुष्टे ! राजलक्ष्मी कौसल्या सुमित्रा यांचा देखील मी त्याग करीन. पण रामाचा त्याग अशक्य आहे. सूर्याशिवाय हे जगही कदाचित राहील. पाण्या-

शिवाय पिके जगतील. पण राम नसला तर माझ्या देहात प्राण राहणार नाहीत ? "

'' नालं द्वितीयं वचनं पुत्रो मां प्रतिभाषितुम् ।
स वनं प्रव्रजयेत्युक्तो बाढमित्येव वक्ष्यति ।
प्रतिकूलं प्रियं मे स्यान्न तु वत्सः करिष्यति ।।
शुद्धभावो हि भावं मे न तु ज्ञास्यति राघवः।।

१२.८५–८८.

'एखाद्या पिशाच्चाने तुला झपाटले नाही ना ? तुझी मती कशी चळली ? नेहमी मला आवडणारे मधुर भाषण करणारी तुझी वाणी विखारी कशी बनली ? कैकयी नक्कीच तुला कोणीतरी झपाटले आहे.

माझं मरण पाहायला तू अधीर झाली नाहीस ना ? माझ्यावर दया कर. तुझ्या पाया पडतो पण हे भलते मागणे मागू नकोस. "

राजा आर्त आक्रंदन करतो, धमकावतो. प्राणत्यागाचे दिव्य करायला सिद्ध होतो. पण पालथ्या घड्यावर पाणी !

व्याकुळ राजा तडफडतो.

" तुझ्या आसुर मनिषेनुसार भरत राजा झाला तर त्याने माझी उत्तरक्रिया करू नये. "

प्रियं चेद्भरतस्यैतद्राम प्रव्राजनं भवेत् ।
मा स्म मे भरतः कार्षीत्प्रेतकृत्यं गतायुषः ।।
मृते मयि गते रामे वनं पुरुषपुंगवे ।
सेदानीं विधवा राज्यं सपुत्रा कारयिष्यसि ।।

१२:९२,९३

राजा रूपसुंदर कैकयीच्या, तिच्या वासनांचा गुलाम नाही. तिचं त्याला यत्किंचितही भय नाही. राजा सत्यवचनी आहे. ईक्ष्वाकूंची कीर्ति अधिक उजळावी. किमान तशीच धवल असावी. त्याकरता त्याची तडफड आहे. वचनभंगाच्या महापापाच्या आगीत ईक्ष्वाकूंच्या राजसिंहासनाच्या धवल कीर्तिची आहुती तो देऊ इच्छित नाही.

स्वप्राणांचीही कुरबानी करून धवल कीर्तिला पुसटता कलंक लागू न देण्याकरता तो तगमगत आहे.

बालो बतायमैक्ष्वाकश्चिरं राज्यमकारयत् ।
यदा तु बहवो वृद्धा गुणवन्तो बहुश्रुताः ।।
परिप्रक्ष्यंति काकुत्स्थं वक्ष्यामि किमहं तदा ।
कैकेय्या क्लिश्यमानेन पुत्रः प्रव्राजितो मया ।।

१२:६५,६६.

कुठं आहे राम ? काय सांगू प्रजाजनांना ? कैकयीने फसवून मला वचनाच्या साखळीत बांधून ठेवले ? कोण माझ्यावर विश्वास ठेवील ?

यदि सत्यं ब्रवीम्येतत्तदसत्यं भविष्यति ।
किं मां वक्ष्यति कौसल्या राघवे वनमास्थिते ।।
किं चेनां प्रतिवक्ष्यामि कृत्वा विप्रियमीदृशम् ।
यदा यदा च कौसल्या दासीवच्च सखीव च ।।

१२:६७,६८.

सारे मलाच खोटं ठरवतील. काय करू ? वचन आणि रामवनवासाची भीषण पेचप्रसंगाची निरगाठ कशी सोडवू ?

अगतिक राजा आर्त वाणीने राणीची याचना करतो.

"मी म्हातारा आहे. तू तरुण आहेस. धाकटी राणी आहेस तू. तरी देखील तुझ्या चरणावर मी माथा टेवतो. माझी विनंती धुडकावू नकोस. रामाला वनात धाडू नको.

न जीवितं मेऽस्ति कुतः पुनः सुखं विनात्मजेनात्मवतः कुतो रतिः ।
ममा हितं देवि न कर्तुमर्हसि स्पृशामि पादावपि ते प्रसीद मे ।।

१२:११२

सत्प्रवृत्ति कोळमलेल्या निढाविलेल्या कैकयीचे नेत्र अश्रूंनी थबथबल्याने व्याकुळ दशरथाला बरोबर दिसत नाहीत.

निगरगट्ट, निर्घृण, निर्ढावलेली कैकयी खुशाल, राजाला चरणावर लोळण घेऊ देते.

कैकयी अनन्वित दुष्टतेचा कळस गाठते.

धर्मस्यैवाभिकामार्थं मम चैवाभिचोदनात् ।
प्रव्राजय सुतं रामं त्रि: खलु त्वां ब्रवीम्यहम् ।

१४:९

वचनाच्या साखळदंडानी बांधलेला राजा अगतिक होतो.

धर्मबन्धेन बद्धोऽस्मि नष्टा च मम चेतना ।
ज्येष्ठं पुत्रं प्रियं रामं द्रष्टुमिच्छामि धार्मिकम् ।

१४:२४

कैकयी विनदिक्कत सरळ खोटे बोलते. तिला त्याचं काहीच वाटत नाही. दशरथाच्या माथ्यावर वज्राघात झालेला असतो. रात्रभर दुष्ट कैकयीने त्याला जर्जर करून सोडलेले असते. तगमगणारा राजा निश्चेष्ट बेसावध असतो.

दिशा उजळतात. चतुर मंत्रि सुमंत राजाकडे येतो. मूर्च्छित पडलेल्या शोकग्रस्त राजाच्या दर्शनाने भांबावतो.

अश्रुत्वा राजवचनं कथं गच्छामि भामिनि ।
तच्छ्रुत्वा मंत्रिणो वाक्यं राजा मंत्रिणमब्रवीत् ॥
सुमंत्र रामं द्रक्ष्यामि शीघ्रमानय सुन्दरम् ।
स मन्यमान: कल्याणम् हृदयेन नंदन: चा ॥

१४: ६२, ६३.

"महाराजांना काय झालं ?"

कैकयी चक्क थाप मारते.

हर्षोन्मादाने फुललेला राजा रामराज्याभिषेका करता रात्रभर बोलणे करीत होता.

थकल्याने आज पहाटे त्याचा किंचित डोळा लागला आहे. माझ्यावर विश्वास ठेव, शोक करू नको.

त्वरीत रामाला घेऊन ये.

राम येतो, शोक दुःखाने तडफडणारा पिता दिसताच तो व्याकुळतो. कैकयीला विचारतो.

" माझ्या वडिलांना काय झालं ? ते कांही बोलत का नाहीत ? माझा कांही अपराध ?

कावेबाज कैकयी चक्क खोटं सांगते.

न राजा कुपितो राम व्यसनं नास्य किंचन

राजाच्या मनात तुला कांही सांगायचं आहे. त्याला तुझं भय वाटत आहे. तुला आवडणार नाही: असं सांगायला राजा धजावत नाही.

प्रियं त्वामप्रियं वक्तुं वाणी नास्योपवर्तते ।

राजाने मला वचन दिलं आहे. तुला ते पाळावं लागेल.

तद्वश्यं त्वया कार्यं यद्नेनाश्रुतं मम ।।

१८:२१

पतीला वचनाच्या साखळदंडांनी बांधते तशी रामालाही वचनबद्ध करते.

धर्मभूलमिदं राम विदितं च सतामपि ।
तत्सत्यं न त्यजेद्राजा कुपितस्त्वत्कृते यथा ।।

।।१८:२४

चांगलं वाईट कसंही असलं तरी तुला रुचलं, अथवा न रुचलं तरी तुला तसं करावं लागेल. तसं वचन देशील तर मी तुला सांगीन "

सत्वशील धीरोदात्त रामाने वचन दिले ' माझ्याबद्दल तुला शंका का वाटते ? ' करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते १८:३०

राम दोनदा बोलत नाही. शब्द दिला की दिला. पित्याने सांगितले अथवा न सांगितले तरी कैकयी म्हणते—

धूर्त कैकयी म्हणते

यदि सत्यप्रतिज्ञं त्वं पितरं कर्तुमिच्छसि ।
आत्मानं च नरश्रेष्ठ मम वाक्यमिदं शृणु ।।

१८:३४

'तुझ्या पित्याप्रमाणे तू प्रतिज्ञा केली आहेस. मला वचन दिलं आहेस.'

कावेबाज आई कैकयी यत्किंचितही न कचरता रोख ठोक सांगते.

'भरत राजा होईल. तू चौदा वर्षं वनात जा !'

'शोकाने व्याकुळलेल्या राजाचे डोळे अश्रूंनी थबथबले आहेत. तू त्याला दिसत नाहीस.'

एतेन त्वां नरेन्द्रोऽयं कारुण्येन समाप्लुतः ।
शोकसंक्लिष्ट वदनो न शक्नोति निरीक्षितुम् ।

॥ १८:३९

एतत्कुरु नरेन्द्रस्य वचनं रघुनंदन ।
सत्येन महता राम तारयस्व नराधिपम् ॥

॥ १८:४०

पित्याच्या धवल कीर्तीला पुसटता कलंक लावू नकोस. वचनभंगाच्या पापाचा दुरून देखील वास येऊ देवू नकोस. पुण्यपावन राजाच्या स्वर्गलोकाच्या आड येऊ नकोस.

पित्याकरता हवं ते दिव्य करायला सिद्ध असलेल्या धर्मनिष्ठ रामाच्या स्वभावाची अचूक पारख असलेल्या कैकयीने त्याला जाळ्यात पकडले.

धूर्त धुरीण कैकयी एवढ्यावर थांबत नाही. आणखी एक पाऊल उचलते.

यावत्त्वं न वनं यातः पुरादस्मादभित्वरन् ।
पिता तावन्न ते राम स्नास्यते, भोक्ष्यते ऽपि वा ॥

॥ १९:१६

त्वरा कर. 'तू अयोध्येची सीमा ओलांडल्या विना मी तुझ्या पित्याला स्नान करू देणार नाही, जेवू देणार नाही.'

व्याकुळलेल्या राजा दशरथाच्या कानावर कैकयीचे क्रूर शब्द येतात. तो ओरडतो.—

धिक्कष्टमिति निःश्वस्य राजा शोक परिप्लुतः ।
मूर्च्छितो न्यपतत्तस्मिन् पर्यङ्के हेम भूषिते ॥

॥ १९: १७

' दुराचारिणी पापिणी किती खोटं बोलतेस. तुझा धिःकार असो. '

शोक दुःखाचा वज्राघात झालेला अंतःकरण चुरडून निघालेला राजा परत मूर्च्छित पडतो.

रूपसुंदरी कैकयीच्या सौंदर्यावर भुरळलेल्या मोहविवश राजाच्या सद्सद्विवेक बुद्धीने काळे केले नव्हते. वचनाने तो अगतिक झाला आहे. जग राजाला भुरळलेला मन चळलेला मोहविवश मानते. त्या काळचा लोकसमाजही तसेच समजत होता. राजाचे आप्तस्वकीयही तसेच मानत होते. क्रोधाविष्ट लक्ष्मण कडाडतो.

विपरीतश्च वृद्धश्च विषयैश्च प्रधर्षितः ।
नृपः किमिव न ब्रूयाच्चोद्यमान : समन्मथः ।।
।। २१ : ३

' लावण्यवती सुंदरी कैकयीच्या बोटावर नाचणारा राजा काय करणार नाही ?'

व्याकुळ कौसल्याही आक्रंदन करते.

अखिल विश्वच दशरथावर उलटते आहे. श्रीरामही राजाच्या अंतर्हेतू. विषयी शंकाकुशंकानी व्याकुळतो. विजनवासाच्या पहिल्या रात्री गंगातीरावर कुणी नसताना राम लक्ष्मणाजवळ अयोध्येतील थरारक घटनांचे विश्लेषण करतो त्यावेळी तो म्हणतो.

कृतकामा तु कैकेयी तुष्टा भवितुमर्हति ।। ५३ : ६

भरताच्या राज्याभिषेकाने कैकयी संतुष्ट होणार नाही. एवढ्यावर ती थांबायची नाही. आसुरी अभिलाषेने घेरलेली राणी वृद्ध राजाचा काटा काढील. वृद्ध राजाचा खून करतील आणि भरताचे राजसिंहासन अबाधित राखील.

' किं करिष्यति कामात्मा कैकेय्या वशमागतः ।
५३ : ८

रामदेखील पित्याला कामात्मा मानतो–

को ह्यविद्वानपि पुमान् प्रमदायाः कृते त्यजेत् ।
छन्दानुवर्तिनं पुत्रं तातो मामिव लक्ष्मण ।। ५३ : १०

पित्याच्या शब्दाकरता सर्वस्वाचा होम करणाऱ्या पितृभक्त पुत्रालाही राजाने केवळ कामिनीकरता वनात धाडावे ना ? मूर्ख अक्कलशून्य नष्ट मेंदूचा

पुरुषही असं करायचा नाही. आपले वडील थोर आहेत, बुद्धिमान आहेत, धर्मनिष्ठ आहेत आणि तरीदेखील त्यांनी असं विपरीत करावं ना ?

काय हा कामिनीचा विलक्षण मोह ?

अर्थधर्मौ परित्यज्य यः काममनुवर्तते ।
एवमापद्यते क्षिप्रं राजा दशरथो यथा ॥

५३:१३

धर्म–अर्थाची उपेक्षा करून कामाचं सेवन करणाऱ्याच्या विदारक दुःखाचं दिग्दर्शन करणाऱ्या पित्याने आपणाला सावध केलं आहे.

"भयंकर निर्घृण आपत्ती, फत्तराने रडावे अशी काळजावर कोरल्या जाणाऱ्या घटना घडवून आणण्याकरताच कैकयी इक्ष्वाकू कुळांत आली. तीच राजाची इतिश्री करील. मला वनात पाठवले आहेच, भरत राजा होईल.

मन्ये दशरथान्ताय मम प्रव्राजनाय च ।
कैकेयी सौम्य सम्प्राप्ता राज्याय भरतस्य च ॥

५३:१४

विजनवासास जाणाऱ्या रामसीतेच्या रथाकडे व्याकुळ राजा एकटक पाहत असतो. रथ दिसेनासा होतो. दुःखार्त राजा कोसळतो, पडतो. कौसल्या कैकयी धावतात. उजवा हात कौसल्या धरते. आणि डावा हात कैकयी. कैकयी दिसताच राजा संतापतो.

कैकेयि मा ममाङ्गानि स्प्राक्षीस्त्वं दुष्टचारिणी ।
न हि त्वां द्रष्टुमिच्छामि न भार्या न च बांधवी ॥

४२:६

'दुष्टे, मला शिवू नकोस. तुझ्याशी माझा कांही संबंध नाही. दुष्टाचारिणी मी तुझा त्याग करतो. तू माझी पत्नी नाहीस, कुणी नाहीस.

ये च त्वामनुजीवन्ति नाहं तेषां न ते मम ।

'तुझे माझे सर्व संबंध संपले,'

'केवलार्थपरां हि त्वां त्यक्तधर्मां त्यजाम्यहम् ॥

४२:७

'तू धर्म सोडलास, मी तुझा त्याग करतो.

अगृह्णां यच्च ते पाणिमग्निं पर्यणयं च यत् ।
अनुजानामि तत्सर्वमस्मिंल्लोके परत्र च ॥

४२:८

'आता तू माझी पत्नी नाहीस'

आणि तो एकाएकी कोसळतो. मंदिरात जातो. कैकयीच्या नाही. कैकयी परत तेथे बोलावत नाही. तिची परत भेट न घेताच राजा अखेरचा निरोप घेतो.

दुष्ट पाताळयंत्री रूपसुंदरी कैकयीच्या सौंदर्यावर भुरळलेला उफराटी करणी करीत नाही. केवळ धर्माकरता वचन पूर्तीकरता धर्म करता, त्याला दिव्य करणं भाग पडतं.

राजा दशरथाला साडेतीनशे राण्या होत्या. त्यातल्या मुख्य तीन राण्या कौसल्या, सुमित्रा, कैकयी. कौसल्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ, कैकयी धाकटी पण राजाची अत्यंत लाडकी. राजा कैकयीच्या तंत्राने वागे. त्यामुळे कौसल्या ज्येष्ठ असूनही कैकयीचा वरचष्मा असे.

सवतीसवतीत शत्रुत्व नसले तरी वागण्यात प्रेमळपणापेक्षा तुसडेपणा अधिक. त्यांचे वर्तन तुटक असे. कांहीसे तेढीचे संबंध होते.

कौसल्येच्या मिरासदारीचं जुलमी चित्र उभे करूनच मंथरा कैकयीला वळवते.

दर्पान्निराकृता पूर्वं त्वया सौभाग्यवत्तया ।
राममाता सपत्नी ते कथं वैरं न यातयेत् ।।

८:३७

सवती मत्सराच्या ठिणगीला फुंकर घालत कैकयी राजावर धडकते.

स त्वं धर्मं परित्यज्य रामं राज्येऽभिषिच्य च ।
सह कौसल्यया नित्यं रन्तुमिच्छसि दुर्मते ।।

१२:४५

वृद्धपणाने वाकला आहात. शरीर थकले आहे. माझ्यापासून तुमचं समाधान होत नाही. तुम्हाला कौसल्याच हवी ना ? वचनभंग करून धर्मावर शस्त्र उपसले. रामराज्याभिषेक करून तिच्यासह विलासात राहण्याची लालसा आहे ना ?

एकाहमपि पश्येयं यद्यहं राममातरम् ।
अञ्जलिं प्रतिगृह्णन्तीं श्रेयो ननु मृतिर्मम ।।

१२:४८

राममातेसमोर नतमस्तक झालेले पौरजन पाहण्यापेक्षा आधीच माझे प्राण कुडी तोडून निघून जातील.'

श्रीराम निरोप घ्यायला येतो त्यावेळी कौसल्येच्या अंतःकरणातलं सवतीचं शल्य वर उफाळून येते.

सा बहुन्यमनोज्ञानि वाक्यानि हृदयच्छिदाम् ।
अहं श्रोष्ये सपत्नीनामवराणां वरा सती ॥ ३९ ॥
अत्यन्तं निगृहीतास्मि भर्तुर्नित्यमतंत्रिता ।
परिवारेण कैकेय्यः समा वाप्यथवावरा ॥ ४२ ॥

२०:३९,४२

'धाकटी असूनही थोरलेपणाची मिजास मिरवणारी घमेंडी कैकयी माझ्याशी फटकून वागते. राजा मुठीत असल्यामुळे तिचे डोके जणू स्वर्गाला घासते आहे. अभिमानाने ताठरलेली कैकयी तिच्या दासीइतकी देखील किंमत देत नाही. माझा उपमर्द करण्याची संधी गवसताच तिच्या दृष्टीला उकळ्या फुटतात. तिच्या फडतूस दासी देखोल मला हसतात. मी नावाचीच थोरली राणी आहे.

तू वनात गेल्यावर क्रोधाविष्ट भडकलेल्या कैकयीच्या नेत्रातील अग्नीज्वाला मला होरपळून काढतील, तिच्याकडे पाहण्याचदेखील मला साहस करवणार नाही.

तिचे जहरी जळजळीत वाग्बाण कसे सहन करू ? '

कौसल्या फत्तराने रडावे असे आर्त आक्रंदन करते. रामाच्या पाठीशी असलेला लक्ष्मण चवताळतो, त्याच्या अंतरीचा क्रोध वर उफाळून येतो. कैकयीसह सर्व विरोधकांना साफ करून टाकण्याकरता तो अनुमती मागतो.

निर्मनुष्यामिमां सर्वामयोध्यां मनुजर्षभ ।
करिष्यामि शरैस्तीक्ष्णैर्यदि स्थास्यति विप्रिये ॥

२१:१०

हत्याकांडाच्या कल्पनेने कौसल्या गांगरते.

भ्रातुस्ते वदतः पुत्र लक्ष्मणस्य श्रुतं त्वया ।
यदत्रानन्तरं कार्यं कुरुष्व यदि रोचते ॥

२१-२१

वनात न जाता घरीच राहण्याची गळ घालते. " सिंहासन न मिळाले तरी चालेल पण अयोध्येतच रहा. कफल्लक दरिद्री जीवन कंठावं लागलं तरी देखील माझ्याकरता येथेच रहा. वनात जाऊ नकोस. "

यदि त्वं यास्यसि वनं त्यक्त्वा मां शोकलालसाम् ।
अहं प्रायमिहासिष्ये न च शक्ष्यामि जीवितुम् ॥ २१:२७

अन्नाचा कण वा पाण्याचा थेंबही पोटात न ढकलता उपवास करून प्राण-त्याग करण्याची प्रतिज्ञा करते.

श्रीराम शपथ घेतो.

" अनुमन्यस्व मां देवि गमिष्यन्तमितो वनम् ।
शापितासि मम प्राणैः कुरु स्वस्त्ययनानि मे ॥ २१-४६

कौसल्या अनावर शोक क्रोधाने पेटते.

मला सोडून जाता येणार नाही. मी माता आहे. माझी आज्ञा आहे. आईची आज्ञा तुडवता येणार नाही. माझी शपथ आहे. "

श्रीराम नियतीचा आधार घेतो,

न लक्ष्मणास्मिन् मम राज्यविघ्ने माता यवीयस्यति शङ्कनीया ।
दैवाभिपन्ना न पिता कथंचिज्जानासि दैवं हि तथा प्रभावम् ॥
२२:३०

नियतीचे क्रूर चेष्टीत रोकण्याचं सामर्थ्य कुणातच नाही. मी वनात जावं अशी नियतीच आहे. तिच्या माथ्यावर पाय रोवून कोण उभं राहू शकेल ?

रामाच्या पाठीशी उभा असलेला लक्ष्मण भडकतो.

विक्लवो वीर्यहीनो यः स दैवमनुवर्तते ।
वीराः संभावितात्मानो न दैवं पर्युपासते ॥ २३:१७

दैव ? कुणाचे दैव ? कुठले दैव ? वीराला दैवच नाही. तुला आणि मला नियती कसा अटकाव करील ? भेकड भ्याड दुबळ्यानी दैवाच्या आड दडावे.

आम्ही दैवाचे स्वामी आहोत. नियतीला वेसण घालणारे आहोत

न शोभार्थाविमौ बाहू न धनुर्भूषणाय मे ।
नासिराबन्धनार्थाय न शराः स्तंभहेतवः ॥ २३–३१

कुणाची चामडी लोळवू ? कुणाच्या चिंध्या उडवू ? मला आज्ञा दे. मी तुझा किंकर आहे. तुझ्या शब्दाचीच काय ती वाट आहे ?

ब्रवीहि कोऽद्यैव मया वियुज्यतां तवासुहृत्प्राणयशः सुहृज्जनैः ।
यथा तवेयं वसुधा वशे भवेत्तथैव मां शाधि तवास्मि किंकरः ॥
२३–४१

त्यांना राम प्यारा आहे. त्याच्यावरून तो स्वप्राणांची काय धर्माची कुरवंडी करायला तयार आहे. प्रसंग ओळखणारा धीरोदात्त श्रीराम चातुर्याने अनर्थ टाळतो.

विमृज्य बाष्पं परिसांत्व्य चासकृत्स लक्ष्मणं राघव वंशवर्धनः ।
उवाच पित्रोर्वचने व्यवस्थितं निबोध मामेष हि सौम्य सत्पथः ।। ४२

श्रीरामाला वळवण्याची ती पराकाष्ठा करते. सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून द्यायला सिद्ध होते, प्राण पणाला लावते. राम अविचल असतो. त्याचा संकल्प काळ्या फत्तरावरच्या रेघे सारखा असतो.

कौसल्येचा शोक क्षणाक्षणाने उफाळत असतो. श्रीराम पतिदेवातच स्वत्व विलन करून टाकणाऱ्या कर्तव्याचे पतिव्रता धर्माचे परोपरीचे दाखले देऊन आईची समजूत काढतो.

नन्दयिष्यसि मां पुत्र साम्ना वाक्येन चारुणा ।
गच्छेदानीं महाबाहो क्षेमेण पुनरागतः ।

कौसल्येचा निरुपाय होतो. नियतीच्या क्रूर चेष्टितासमोर तिला वाकावे लागते.

यज्ञकर्मात कौसल्या कुशल आहे ती हवन करते लोकपालादि देवतांना बळी देते. ब्राह्मण पुण्याह वाचन स्वास्तिवाचन करतात. पुत्राला आशिर्वाद देते. त्यांना विपुल दक्षिणा देते.

'वृत्रवधाच्या वेळी इंद्राचे मंगल झाले तसे तुझेच कल्याण होईल. अमृत आणण्याकरता निघालेल्या गरूडाचे विनतेने शुभचिंतन केले. तसे तुझे मंगल होवो. अमृतप्राप्तीकरता दैत्याचा घात करणाऱ्या चंद्राच्या आदितीने मंगल चिंतिले तसे तुझे मंगल होवो. तीन पावले टाकणाऱ्या अत्यंत तेजस्वी विष्णूचे मांगल्य तुला मिळो-शुभाचे ही शुभ तुला प्राप्त होवो.

यन्मंगलं सुपर्णस्य विनताकल्पयत्पुरा ।
अमृत प्रार्थयानस्य तत्ते भवतु मङ्गलम् ।
अमृतोत्पादने दैत्यान् घ्नतो वज्रधरस्य यत् ।
अदितिर्मङ्गलं प्रादात्तते भवतु मङ्गलम् ।।
त्रिविक्रमान्प्रक्रमतो विष्णोस्तुलते जसः ।
यदासीन्मंगलं राम तत्ते भवतु मङ्गलम् ।।

२५: ३३–३५

चार वेळा आवृत्ती झाली आहे. अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी आणि भारावलेल्या अंतकरणानं राममातेने राघवाच्या मस्तकावर अक्षता टाकल्या,

गंध लावले. विशल्यीकरण मंगल वनस्पती रामाच्या हातास बांधली. मंत्राने अभिमंत्रण केले.

श्रीरामास हृदयाशी धरले. त्याच्या मस्तकाचे अवघ्राण केले. अश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी राममातेने आशीर्वाद दिला.

श्रीरामाने मातेचा निरोप घेतला.

सुमित्रा, स्त्री–विशुद्धतेचा, स्त्रीगुणाचा परमचरण आहे. कौसल्येपेक्षा तिची योग्यता थोर आहे. दोष काढायला थोडी देखील जागा नाही.

आभाळ कोसळलं तरी दाद न देणाऱ्या सुमित्रेचा संयम कधीच सुटत नाही.

यच्चयावत् अंगनांनी मान तुकवावी अशी निर्लेप निष्कलंकिता आहे.

सुमित्रा मुलाला लक्ष्मणाला निरोप देते.

रामं दशरथं विद्धि मां विद्धि जनकात्मजाम् ।
अयोध्यामटवीं विद्धि गच्छ तात यथासुखम् ।।
४०:९

व्यसनी वासमृद्धो वा गतिरेष तवानघ ।
एष लोके सतां धर्मो यज्ज्येष्ठवशगो भवेत् ।
इदं हि वृत्तमुचितं कुलस्यास्य सनातनम् ।
दानं, दीक्षा च यज्ञेपु तनुत्यागो मृधेषु हि ।।
लक्ष्मणं त्वेव मुक्त्वा सा संसिध्दं प्रियराघवम् ।
सुमित्रा गच्छ गच्छेति पुनः पुनरुवाच तम् । ४०: ६–९

वाल्मीकींनी राम निर्मिला नाही. त्यांना तो आढळला. मानव राम गवसला. त्याच्या साक्षी रामायणात जागोजाग आहेत.

राज्याभिषेकाच्या मंगल पहाटे पिशाचाची उलटी पावले उमटली. अमृताचा पेला ओठाशी नेणाऱ्या रामाला त्यातल्या विषाने धक्का दिला. अकस्मात आपत्तीचं आभाळ कोसळलं.

राम डगमगला. तुमच्या आमच्यासारखाच गांगरला. पण त्याने दु:खाचा जबरदस्त आवेग आवरला. अंत:करणातील दारूण व्यथांचे कंठ दाबून धरण्याची पराकाष्ठा करतो.

निरोप घेताना कैकयीने त्याच्या माथ्यावर वज्रप्रहार केला.

तवैव वंशे सगरो ज्येष्ठं पुत्रमुपारुधत् !
असमञ्ज इति ख्यातं तथायं गन्तुमर्हति । ३६:१६

त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर विषादाची पुसटसी छटादेखील उमटली नाही.

नेहमीसारखाच तो प्रसन्न होता. जणू कांही घडलंच नव्हतं. वज्राघात झाल्याची मुद्रा, वाणी, कृतीवरून कुणाला अंधुकसं देखील आढळलं नाही. राज्याभिषेकाला निघताना जसा तो होता अगदी तसाच तो दृष्ट कराल आपत्तीतही होता.

आईचा निरोप घेताना मात्र त्याच्या मनाची विलक्षण चलबिचल झाली.

धारयन्मनसा दुःखमिन्द्रियाणि निगृह्य च ।
प्रविवेशात्मवान् वेश्म मातुरप्रियशंसिवान् ॥

१९:३५

विलक्षण चलबिचल झाली. अंतःकरणाचा उद्रेक न होऊ देण्याकरता त्याला विलक्षण झुंजावे लागले. परंतु लक्ष्मण व्याकुळतो. त्याच्या जीवाची विलक्षण तगमग होते. त्याचे नेत्र अश्रूंनी थबथबतात. अंतःकरणात शोकसंतापाचा डोंब उसळतो.

तं बाष्पपरिपूर्णाक्षः पृष्ठतोऽनुजगाम ह ।
लक्ष्मणः परमक्रुद्धः सुमित्रानंदवर्धनः ॥

१९:३०

राम लक्ष्मणाच्या मनोवृत्तीतील तफावत लक्ष वेधून घेते.

सीतेचा निरोप घेताना रामाची दारूण मनोव्यथा उफाळून येते. जड अंतःकरणाने मंद पावलांनी त्याने सीतेच्या मंदिरात प्रवेश केला.

प्रदष्टजनसंपूर्णम् ह्रिया किञ्चिदवाङ्मुखः ।

कसेबसे मनोव्यथांचे कठ दाबून ठेवण्याची त्याने पराकाष्ठा केली. पण प्रमुदित सीता दिसताच उद्रेक झालाच. मुद्रेवर विषादाची छटा स्पष्ट उमटली. त्याच्या नेत्रात अश्रू तरळले.

तो खाली मान घालून उभा होता. सीतेच्या दृष्टीला दृष्टी देण्याचे त्याला धैर्य होत नाही. कंठातून शब्द फुटत नव्हता.

सीतेला जाणवते. रामाची विपण्ण संचित मुद्रा तिच्या अंतःकरणाचे लचके तोडू लागली.

विवर्णवदनं दृष्टवा तं प्रस्विन्नममर्षणम् ।
आह दुःखाभिसंतप्ता किमिदानीमिदं प्रभो ।।

२६-८

'आपल्या जीवाची तगमग का होते आहे ? कसली दारुण यथा आपणास व्याकुळ करते आहे '

राम, लक्ष्मण आणि सीता राजाचा निरोप घ्यायला राजमंदीरात येतात.

त्यांना कैकयी वल्कले देते. राम-लक्ष्मण वल्कले नेसतात. सुख समृद्धीत वाढलेल्या जानकीसमोर बाका पेंचप्रसंग उभा रहातो.

मुनिवस्त्र कसे नेसायचे ? सीता गोंधळते. भांबावते. एक वल्कल कसे तरी खांद्यावर टाकते दुसरे तिच्या हातात असते. गांगरलेल्या सीतेच्या नेत्रातून अश्रूंचा पूर वाहत असतो. बावरलेल्या नजरेने श्रीरामाकडे पाहात ती विचारते.

कथं नु चीरं बध्नन्ति मुनयो वनवासिनः ।

वनातले मुनि कसं हो मुनिवस्त्र नेसतात ?

दुःखद, धक्का देणाऱ्या विद्युत्कंप निर्माण करणाऱ्या संतापजनक प्रकाराने राजस्त्रिया, दासदासी, सेवक हडबडले. हतबुद्ध झाले. स्त्रियांना तर शोकाचे विलक्षण उमाळे येऊ लागले. जीवनमुक्त स्थितप्रज्ञ महाज्ञानी ब्रह्मर्षी वसिष्ठांच्या नेत्रात ही अश्रू तरळले.

धीरोदात्त अविचल रामप्रभुने जानकीला रेशमी वस्त्रावरून वल्कल नेसवले.

श्रीराम सर्वांचा निरोप घेतो. वल्कले धारण केलेले राम, जानकी, लक्ष्मण रथातून जातात. अपार, असीम लोकप्रीति संपादन करणाऱ्या श्रीरामाच्या आकस्मिक वनवासामुळे, जनसंमर्दाच्या शोक, दुःखाला सीमा नसते. जनता-जनार्दनाच्या अपार शोकसागराचे अत्यंत अद्भुत हृदय हेलावणारे उत्कट चित्र वाल्मीकींच्या लेखणीने चितारले आहे. ( सर्ग ४०, ४१, ४५, ४७, ४८ )

सीतेचा निरोप घेताना राम तिच्यासमोर वनवासदुःखाचे, हालअपेष्टांचे भेसूर चित्र उभं करतो, अठरा लोकांत भीषण आपत्तीचेच चित्रण आहे.

लताकण्टकसंकीर्णाः कृकवाकूपनादिताः ।
निरपाश्च सुदुःखाश्च मार्गा दुःखमतो वनम् ।

सुप्यते पर्णशय्या सु स्वयं भग्नासु भूतले ।
रात्रिषु श्रमखिन्नेन–तस्माद्दुःखमतो वनम् ।

२८:११

अठरा वेळेला तो ‘तस्माद्दुःखमतोवनम् ।’ (॥ २८–११ ) अशी धोक्याची सूचना देतो. तिला कर्तव्याचा उपदेश करतो राजा, सासरा, सासु, भरत यांच्याशी वागणकीचे धडे देतो. भरतावरचा तिचा राग, मत्सर अगदी स्वाभाविक आहे. भरताशी वागताना तो दक्षता घ्यायला सांगतो.

सोऽहं त्वामागतो द्रष्टुं प्रस्थितो विजनं वनं ।
भरतस्य समीपे तु नाहं कथ्यः कदाचन ।
तस्मान्न तु गुणाःकथ्या भरतस्याग्रतो मम ।

२६–२४, २५

त्याला कधीही माझं वर्चस्व जाणवू देऊ नकोस ! भेटीत राम किती थोर आहे. राम असता तर अयोध्या आणि राष्ट्र सुखासमाधानात, ऐश्वर्यात असते. असं त्याला वाणीने कृतीने भासू देवू नकोस. सामान्य स्त्रिया करतात तसा भयंकर प्रमाद करू नकोस.

ऋद्धियुक्ता हि पुरुषा न सहन्ते परस्परम् ।
तस्मान्न ते गुणाः कथ्या भरतस्याग्रतो मम ।

२६:२५

भरतासमोर माझी कधीही स्तुतिगाथा गाऊ नकोस. सत्ताधीश भरताला ते सहन व्हायचं नाही. मानवाला जीवनात सुखी शहाणे बनवणारे अति व महत्वाचे रहस्य सांगतो.

रामाविना तिला रहायचे नसते. या उपदेशाकडे ती कशाला लक्ष पुरवील ?

ती म्हणते.

‘इहलोके च पितृभिर्या स्त्री यस्य महामते ।
अद्भिर्दत्ता स्वधर्मेण प्रेत्यभावेऽपि तस्य सा ॥

'एवमस्मात् स्वकां नारीं सुवृत्तां हि पतिव्रताम् ।
नाभिरोचयसे नेतुम् त्वं मां केनेह हेतुना ।।
भक्तां पतिव्रतां दीनां मां समां सुखदुःखयोः ।
नेतुमर्हसि काकुत्स्थ समान सुखदुःखिनीम् ।।
यदि मां दुःखितामेवं वनं नेतुं न चेच्छसि ।
विषमग्नि जलं वाहमास्थास्ये मृत्युकारणात् ।।

२९:१८-२१

धर्मपत्नी मरणानंतरही पतीची साथ करते. आपल्याला मला न्यावच लागेल. अरण्यात मी आपली शुश्रुषा करीन.

आपणच माझे सर्वस्व आहात. आपल्या सहवासात आपत्ती संपत्ती बनतील. दुःखी सुखी होतील. मी आपल्या सुखदुःखाची भागीदारीण आहे. माझ्या विमल आचरणात आपल्याला एवढा सुद्धा दोष दाखवता येणार नाही मला टाकून आपण कसे जाऊ शकाल ? मला वनात नेले नाहीतर मी जालीम विष खाईन. भडकलेल्या अग्नीत प्रवेश करीन. नदीत उडी घेईन. काय हवे ते करीन. पण प्राण ठेवणार नाही.

प्राणत्यागाचा तोडगाही रामावर परिणाम करू शकत नाही.

अखेरीस ती पतीला दूषणे देते. पौरूषावर कोरडे ओढते.

किं त्वामन्यत वैदेहः पिता मे मिथिलाधिपः ।
रामं जामातरं प्राप्य स्त्रियं पुरुषविग्रहम् ।
किं हि कृत्वा विषण्णस्त्वं कुतो वा भयमस्ति ते ।
यत्परित्यक्तु कामस्त्वं मामनन्यपरायणाम् ।।

३० : ३-५

पुरुषाच्या आकाराचा पण पौरूषात अब्रलेच्या तोडीचा जावई मिळाल्याचे माझ्या पित्याला मिथिलाधिपतीला कळले तर त्याला काय वाटेल ? मला आपलाच आधार आहे ना ? माझा त्याग करायला आपण कसे धजावला ?

मन वळवण्याची पराकाष्ठा करते. अर्जव करते. कर्तव्याची जाणीव देते. विवाहाच्या पावित्र्याची साक्ष उभी करते. अखेरीस दरडावते. सीता काय

सामान्य होती ? इक्ष्वाकूंच्या कुळातील सर्वांत श्रेष्ठ शक्तीशाली महापुरुषाची पत्नी काय दुबळी भ्याड असू शकेल ? अरण्यआपत्ती का तिला भिववू शकतील ?

रामाने तेच तेच रडगाणे चालू ठेवले, तोंड चुकवण्याची पराकाष्ठा केली. सीतेला कसं सहन होईल ? ती उसळली. तिने बिनतोड पवित्रा घेतला. तिचा तोडगा अचूक लागू पडतो.

श्रीराम रागावला नाही. मनातून तो नाखुषही नव्हता. धर्माचा मूर्तिमंत नंदादीप असलेल्या रामाला सीतेचे जालीम जळजळीत चावरे शब्द लागले असते तर रामाने चक्क नकार दिला असता.

त्याने रूकार दिला.

" सुखात वाढलेल्या तुझे वनात अपार हाल होतील म्हणून मी तुला नकार दिला. तुझ्या दुःखापुढे मला स्वर्गही तुच्छ आहे. अरण्यात तुझे रक्षण करणे मला जड आहे ? मला कसली भीती ? तू सामान्य नाहीस. क्षात्रतेजाने तळपणाऱ्या क्षत्रियाची वीरांगना आहेस. मूर्तिमंत धैर्य आहेस. तुला सोडून मी कसा जाईन ? "

" राग लोभ, दुःख वगैरे रिपु केव्हांच गिळून टाकणारा मनोविकारापासून मुक्त असलेला समदर्शी मनाचा नवनीतासारखा मृदु असतो. करुणा हा त्याचा स्वभाव असतो. त्याला जशी दया, तशी तू माझी आहेस. "

सर्वथां सदृशं सीते मम स्वस्य कुलस्य च ।
व्यवसायमनुक्रान्ता सीते त्वमतिशोभनम् ।

( अ. ३०-४१ )

आणि अखेरीस श्रीरामाने कबुली दिली. तुझ्यामुळे माझ्या घराण्याला प्रतिष्ठा लाभली आहे आणि तुझ्यादेखील दोन्ही कुळांचा लौकिक अधिकच उजळून निघाला आहे. दोन्ही वंशाच्या थोरपणाला अनुरूप असेच तू करते आहेस, मला करायला लावते आहेस. "

" वनवासाची तयारी कर. मंगल कृत्ये कर. ब्राह्मणांना रत्ने, अलंकार सुवर्ण दान दे. दासदासींना संतुष्ट कर. "

स्त्रीविशुद्धतेचा परमचरण असलेल्या सीतेचं राम हेच सर्वस्व होतं. पतीपुढे राज्य मातीमोल होते जिथं राम तिथं ती ! तेच नंदनवन ? तोच स्वर्ग !

राम नसला तर अयोध्याच काय स्वर्गही तिला खायला उठला असता.

ततः प्रहृष्टा परिपूर्णमानसा यशस्विनी भर्तुरवेक्ष्य भाषितम् ।
धनानि रत्नानि च दातुमङ्गना । प्रचक्रमे धर्मभृतां मनस्विनी ।

३०–४७

पतीसह का तिला नटून थटून दिमाखात मिरवायचं होतं ? रत्न अलंकार-भूषणाची चिंतेची तलवार का पतीच्या मानेवर टांगत ठेवायची होती. तिने सर्वस्व दान दिले. ती लगोलग पती पाठोपाठ निघाली.

अयोध्याकांडात निष्कलंक, निर्दोष आचाराच्या, भरताच्या विमल जीवनाची स्वच्छ रूपरेषा साकारली आहे. इतर कांडात नाममात्र उल्लेख आढळतात.

रामायणातील सर्व पात्रात भरत, विमल गगनचुंबी विशुद्ध चारित्र्याने अग्रभागी तळपतो. त्याच्या पावन ऋषितुल्य उत्तुंग जीवन चरित्रासमोर रामायणातल्या सार्‍या व्यक्ती ठेंगण्या आहेत. गुणवत्तेने अत्यंत थोर असलेल्या भरताचा राज्यत्याग रामप्रभूपेक्षा ही सरस आहे.

पित्याला वचनमुक्त करण्याकरता श्रीराम राज्यलक्ष्मीचा त्याग करतो, आणि भरत ? सार्वभौम राजाची पित्याची आज्ञा ब्रह्मर्षी वसिष्ठांची आज्ञा. मंत्री, अमात्य प्रजाजनांचा विलक्षण आग्रह सारे त्याच्या पाठीशी होते.

पुरोहित, आचार्य, विद्वान, पंडीत, मंत्री, अमात्य, प्रजाजनांच्या सभेत वसिष्ठांनी राजा होण्याची विनंती केली.

" पित्याने हे राज्य तुला दिले आहे. चंद्राला जशी चंद्रिका तसा राजाला धर्म ! धर्मज्ञ राम पित्याची आज्ञा कशी अवमानील ? हे निष्कलंक राज्य राजा दशरथ व तुझा ज्येष्ठ बंधू राम याने तुलाच दिले आहे ? तुला आजच राज्याभिषेक व्हावयाचा आहे. मंत्री अमात्य सेनाधिपती, प्रजाजन सारे आतुरले आहेत. देशोदेशीचे लोक तुझ्या स्वागताकरता उतावीळ झाले आहेत. तुझे कल्याण असो. "

भरत आतल्या आत विलक्षण तडफडत होता. त्याच्या नेत्रातून अश्रूंचा पूर लोटला. व्याकुळलेला भरत कडाडला " या राज्यलक्ष्मीचा अपहार मी

कसा करू ? राम जेष्ठ आहे ना ? त्याचेच हे राज्य आहे. माझाही तोच स्वामी आहे. आणि त्यांनी निःसंदिग्ध परखडवाणीने वसिष्ठांना सांगितले.

ज्येष्ठस्य राजता नित्यमुचिता हि कुलस्य नः ।
नैवं भवन्तो मां वक्तुमर्हन्ति कुशला जनाः ।।
रामः पूर्वो हि नो भ्राता भविष्यति महीपतिः ।
अहं त्वरण्ये वत्स्यामि वर्षाणि नव पञ्च च ।। ७९:७,८

मुनिश्रेष्ठ आपण मला अशी लोकविलक्षण आज्ञा करता ? धर्मावरच कशी गदा उगारता ? दिलीप, नहुषाच्या तोडीचा ज्येष्ठ राघवच राजा आहे. इक्ष्वाकू कुलाला मी कलंक कसा लावू ? आईच्या घोर पातकात मला वाटेकरी का करता ? येथून नमस्कार घालीत मी जाईन. आणि रामास घेऊन येईन. हे रामाचे राज्य आहे. "

श्रीरामावर अत्युत्कट प्रीति असलेला निष्कलंक, गंगाजलासारखा निर्मल जीवन असणारा भरत सहजगत्या विनाहेतू लाभलेली कुबेरालाही लाजविणारी धनसंपत्ती राज्यलक्ष्मीचा त्याग करतो.

कुळाला बट्टा लावणाऱ्या लाजेने मान खाली घालावयास लावणाऱ्या मातेच्या दुष्कृतीने भरताच्या रागाचा पारा विलक्षण चढतो. माथे भडकलेल्या भरताने मातेचा खूनच केला असता.

मंथरेचे नरडे आवळायला सरसावलेल्या शत्रुघ्नास तो म्हणतो.

हन्यामहमिमां पापां कैकेयीं दुष्टचारिणीम् ।
यदि मां धार्मिको रामो नासूयेन्मातृघातकम् ।।
इमामपि हतां कुब्जां यदि जानाति राघवः ।
त्वां च मां चैव धर्मात्मा नाभिभाषिष्यते ध्रुवम् ।। ७८:२२, २३.

" चांडाळणी कैकयीचा मी खूनच केला असता. पण मातृवध करणाऱ्याचा धर्मनिष्ठ राम धिःकार करील. या कुबडीला ठार केल्याचे त्यास कळले तर तो तुझ्याशी माझ्याशी भाषण देखील करणार नाही. स्त्रिया अवध्य आहेत. थोर मनाने तू त्यांना क्षमा कर. "

अकलंकित विशुद्ध जीवनाचे प्रतीक असलेला धर्मज्ञ राम मातृहत्या करणाऱ्याचे स्त्रीघातक्याचे तोंड देखील पाहणार नाही. या एकमेव जाणीवेने भरत

कैकयीचा वध करायला धजावत नाही. वर्तनात कोठेही बोट ठेवायला जागा नसणाऱ्या आतबाहेर नसलेल्या निकोप चित्तप्रकृतीच्या सोज्वल भरताचा कौसल्या धिक्कार करते.

अथवा स्वयमेवाहं सुमित्रानुचरा सुखम् ।
अग्निहोत्रं पुरस्कृत्य प्रस्थास्ये येन राघव : ।।
कामं वा स्वयमेवाद्य तत्र मां नेतुमर्हसि ।।
यत्रासौ पुरुष व्याघ्रस्तप्स्यते मे सुतस्ततः ।।

७५: १४, १५

निष्कलंक राज्यलक्ष्मी मिळावी म्हणून तुझ्या मातेने माझ्या रामाला गहन अरण्यास धाडले. अग्निहोत्र आणि पतीदेव घेऊन मी सुमित्रा देखील अरण्यात जाऊ. तू या निकष्कलंक वैभवसंपन्न राज्याचा सम्राट हो. मला आणि सुमित्रेला अरण्यात रामाकडे नेऊन सोड.

श्रीराम, पित्याची उत्तरक्रिया करील. गोविंदराज आणि तिलक ते दोघेही अग्रगण्य भाष्यकार लक्ष वेधतात.

'अग्निहोत्रामिति राजदेहस्याप्युपलक्षणम् ।

कौसल्या विशुद्ध अकलंकित भरताच्या चरित्र्यावर शितोडे उडवते.

कौसल्येचे शब्द भरताचे अंत:करण जाळतात. आकस्मिक विलक्षण धक्याने हतबुद्ध झालेला भरत जीव तोडून, तळमळून आपला निरपराधीपणा शाबीत करतो. एकामागून एक आणाशपथा वाहात सुटतो.

प्रेष्यं पापीयसां यातु सूर्यं च प्रति मेहतु ।
हन्तु पादेन गां सुप्तां यस्यार्योऽ नुमते गतः ।।

परिपालयमानस्य राज्ञो भूतानि पुत्रवत् ।
ततस्तु द्रह्यतां पापं यस्यार्योऽनुमते गतः ।

त्याच्या उत्कट शापवाणीचा संपूर्ण सर्ग ( सर्ग ७५ ) आहे.

प्रत्येक शपथेला अखेरीस,

यस्यार्यो ऽ नुमते गतः ।

अशी आवृत्ती आहे.

मानवी सद्‌गुणांचे कर्तव्याचे प्रसंगोचित समर्पक दर्शन वाल्मीकींनी घडवले आहे.

अधर्मो योऽस्य सोऽस्यास्तु यस्यार्योऽनुमते गतः ।।
कारयित्वा महत्कर्म भर्ता भृत्यमनर्थकम् ।

७५-२३

शब्दांची गुंफण सहज मनोहर आहे. दुःखातिशयाने तडफडणारा भरत राममातेच्या चरणी लोळण घेतो. मनानेही वाईट न चिंतिणाऱ्या सरळमार्गी सदाचारी भरतावर आरोप केल्याबद्दल कौसल्येला विलक्षण अनुताप होतो. तिच्या जीवाचे पाणी पाणी होते.

कुलगुरु वसिष्ठ, पुरोहित, मंत्री, अमात्य, राजमाता, आप्त, स्वकीय आणि सेनेसह भरत, रामाला आणायला जातो. इंहंगेवर पुरालगत पावनगंगा तीरावर तळ देतो.

गुहाला संशयपिशाच्च पछाडते. संशयपिशाच्चाने घेरलेला निषादराज गुह भरतावर दुटप्पीपणाचा कपट कारस्थानी कावेबाजपणाचा उघड उघड आरोप करतो.

श्री रामदर्शनाकरता बेचैन झालेला भरत भेटायला आलेल्या राजा गुहाला विचारतो. ' भरद्वाज मुनींच्या आश्रमाला जवळचा चांगला मार्ग कोणता ?

कच्चिन्न दुष्टो व्रजसि रामस्या क्लिष्टकर्मणः ।
इयं ते महती सेना शङ्कां जनयतीव मे ।।

८५:७

आतबाहेर नसलेला, निष्कलंक भरत अरण्यातच रामप्रभूला राज्याभिषेक करायचा आहे. त्याकरता सेना, कुलगुरु, पुरोहित आणि अभिषेकाची सामग्री.

गुह चमकतो. त्याच्या नेत्रात अश्रू तरळला. तो म्हणतो;

' क्षमा करा. मला भलताच संशय आला. वाटलं ! रामप्रभूच्या जीवाला धोका आहे. '

भरताच्या अंतःकरणातील विषण्णता चेहऱ्यावर स्वच्छ दिसू लागली. नेत्रातून अश्रूंचा पूर लोटला. तो म्हणाला.

'मित्रा स्वप्नात देखील असा दुष्ट विचार मनात आणणारा नरकात लोळेल.' भरताचा कंठ भरून आला. मुखातून शब्द उमटेना. गुहाचा चेहरा प्रसन्नतेने उजळला. तो म्हणाला, 'मित्रा, धन्य ! आंत आपसुक पायाशी लोळण घेणारी राज्यलक्ष्मी लाथाडून आपत्तीत पिचलेल्या राघवास परत आणणारा राजकुमार धन्य आहे.'

धन्यस्त्वं न त्वया तुल्यं पश्यामि जगतीतले ।
अयत्नादागतं राज्यं यस्त्वं त्यक्तुमिहेच्छसि ॥
शाश्वती खलु ते कीर्तिर्लोकाननु चरिष्यति ।
यस्त्वं कृच्छ्रगतं रामं प्रत्यानयितुमिच्छसि ॥

८५ : १२, १३

श्रीरामावर अत्युत्कट प्रीति असणाऱ्या भरताच्या लोकोत्तर अद्वितीय बंधुप्रेमाला तोड नाही. त्याच्यासारखा तोच. श्रीराम–लक्ष्मण–जानकीने विजनवासाची पहिली रात्र ज्या वृक्षाखाली काढली ती जागा गुहाने दाखवताच भरताच्या नेत्रातून शोकनद्या वाहू लागतात.

इयं शय्या मम भ्रातुरिदम् परिवर्तितम् ।
स्थंण्डिले कठिने सर्वं गात्रैर्विमृदितं तृणम् ॥१३॥
मन्ये साभरणा सुप्ता सीतास्मिञ्शयने शुभा ।
तत्र तत्र हि दृष्यते सक्ताः कनकंबिन्दवः ।
उत्तरीयमिहासक्तं सुव्यक्तं सीतया तदा ।
तथा ह्येते प्रकाशन्ते सक्ताः कौशेयतन्तवः ।

८८ : १३, १४, १५

त्याच्या अंतःकरणात आगीचा डोंब उसळतो. तृणाला चिकटलेले सीतेच्या अलंकाराचे सुवर्णकण, वस्त्राचे सूक्ष्म तंतु दृष्टीस पडताच भरताचा विलक्षण तडफडाट होतो. असह्य दारूण मनोव्यथेने त्याचे अंतःकरण सहस्त्रशः विदीर्ण होते

अद्यप्रभृति भूमौ तु शयिष्येऽहं तृणेषु वा ।
फलमूलाशनो नित्यं जटाचीराणि धारयन् ।।
तस्यार्थमुत्तरं कालं निवत्स्यामि सुखं वने ।
तम् प्रति श्रवमामुच्य नास्य मिथ्या भविष्यति ।।
वसन्तं भ्रातुरर्थाय शत्रुघ्नो मानुवत्स्यति ।
लक्ष्मणेन सह त्वार्यो ह्ययोध्यां पालयिष्यति ।।

८८-२६-२८

त्याचक्षणी तो आपला बहुमोल उंची पोषाख फेकून देतो. जटा बांधतो मुनिवस्त्र परिधान करतो.

मंचका ऐवजी जमिनीवर निजण्याचा संकल्प करतो. ऋषीमुनीसारखा फलमूलांचा आहार घेण्याची शपथ घेतो.

ब्रह्मर्षी भरद्वाजही गुहराजाप्रमाणे दुष्टपणाचा आरोप करतात.

किमिहागमने कार्यं तव राज्यं प्रशासतः ।
एतदाचक्ष्व मे सर्वं न हि मे शुध्यते मनः ।
कच्चिन्न तस्यापापस्य पापं कर्तुमिहेच्छसि ।
अकण्टकं भोक्तुमना राज्यं तस्यानुजस्य च ।।

९०-१०, १३.

गुह निषाद होता. जंगलाच्या जमातीचा राजा होता. उत्तुंग चारित्र्याच्या भरताच्या विमल, विशुद्ध अंतःकरणाची अथांगता आकलण्याइतकी त्याच्या बुद्धीची कुवत नव्हती. पण भरद्वाज महाज्ञानी, महातपस्वी, मुनिश्रेष्ठ होते. त्यांच्या आक्षेपाने भरताच्या माथ्यावर वज्राघात होणे स्वाभाविक होते. पुण्यपावन ऋषीश्रेष्ठाचे अक्षर नि अक्षर त्याचे हृदय सोलून काढते.

सामान्य मानवासारखे ज्ञानमहर्षी भरद्वाजांना विकाराने पछाडावे ना ?

परमपावन मुनिश्रेष्ठाना आपल्या विशुद्ध हृदयाची पारख न झाल्याने त्याचं अंतःकरण सहस्त्रशः विदीर्ण होते.

हतोऽस्मि यदि मामेवं भगवानपि मन्यते।
मत्तो न शङ्केदोषमाशङ्के नैवं मामशानुधि हि ॥१५॥

अहं तु तं नरव्याघ्रमुपयातः प्रसादकः।
प्रतिनेतुमयोध्यां च पादौ तस्याभिवन्दितुम् ॥१७॥

त्वय्येतत्पुरुषव्याघ्र युक्तं राघववंशजे।
गुरुवृत्तिर्दमश्चैव साधूनां चानुयायिता ॥२०॥

जाने चैतन्मनःस्थं ते दृढीकरणमस्त्विति।
अपृच्छं त्वां तथात्यर्थं कीर्ति समभिवर्धयन् ॥

९०:१५, १७, २०, २१.

श्रीरामाला परत आणण्याचा आणि त्याच्याकरता चौदा वर्षे विजनवास स्वीकारण्याचा आपला उग्र निश्चय तो हृदय पिळवटून सांगतो. जीव तोडून आपला विशुद्ध उद्देश सांगतो. भरताच्या विमल, सोज्वळ, निष्कलंक चारित्र्या-पुढे भरद्वाजही नम्र होतात. चरणाची धूळ मस्तकी लावण्यासारखे नम्र होतात. चरणाची धूळ मस्तकी लावण्यासारखं निर्मळ जीवन असणाऱ्या भरता-बद्दल त्यांना विलक्षण आदर वाटू लागतो.

पावन चित्रकूट दिसताच भरताच्या अंतःकरणात तांडव सुरु होते.

प्रचंड सेनेसह येणारा भरत नजरेस पडताच लक्ष्मण चवताळतो.

दुष्ट कैकयीचा भरत सुसज्ज सेना घेऊन आपणावर चाल करून येत आहे. आपला काटा सलतो आहे. रामाची इतिश्री झाली की त्याला निष्कंटक राज्याचा उपभोग घेता येईल ना ?

कैलासासारखा उत्तुंग शुभ्रधवल चारित्र्याचा श्रीराम उत्तरतो,

पितुःसत्यं प्रतिश्रुत्य हत्वा भरतमागतम्।
किं करिष्यामि राज्येन सापवादेन लक्ष्मण ॥

यद्द्रव्यं बांधवानां वा मित्राणां वा क्षये भवेत्।
नाहं तत्प्रतिगृह्णीयां भक्षान्विषकृतानिव ॥

धर्ममर्थं च कामं च पृथिवीं चापि लक्ष्मण।
इच्छामि भवतामर्थ एतत्प्रतिशृणोमि ते।
भ्रातृणां संग्रहार्थं च सुखार्थं चापि लक्ष्मण।
राज्यमप्यंहमिच्छामि सत्येनायुधमालभे ॥६॥

नेयं मम मही सौम्य दुर्लभा सागराम्बरा।
न हीच्छेयमधर्मेण शक्रत्वमपि लक्ष्मण ॥
यद्विना भरतं त्वां च शत्रुघ्नं वाऽपि मानद।
भवेन्मम सुखं किंचिद्भस्म तत्कुरुतां शिखी ॥
मन्येऽहमागतोऽयोध्यां भरतो भ्रातृवत्सलः।
मम प्राणैः प्रियतरः कुलधर्ममनुस्मरन् ॥ ९७: ३-९

"अरे, खुळ्या, धनुष्य सरसावून का भरताशी लढायचे? भावाला ठार करून राज्य मिळवायचे? प्रजाजनांच्या प्रखर निंदेला कसं तोंड देणार? तू, भरत, शत्रुघ्न यांच्या सुखाकरता धर्म, अर्थ, काम व पृथ्वी यांची पर्वा आहे. अधर्माने मिळणारे त्रैलोक्यही लाथाडीन. तुम्हा बांधवांच्या वियोगाने मिळणाऱ्या सुखाची अग्नीने राखरांगोळी करून टाकीन."

भव्योदात्त श्रीराम ज्वलज्जवान आहे. उत्तुंग भव्योदात्त तत्वाकरिता तो सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून द्यायला सदैव सज्ज असतो. थोर, पुण्यपावन ऋषीमुनींनीही मान तुकवावी असा पुरुषोत्तम असल्याची ग्वाही त्याच्या प्रत्येक कृतीतून ओसंडून वाहते. श्रीराम हाच भरताचे सर्वस्व आहे. तो हवे ते दिव्य करायला तयार आहे. गंगाजलासारख्या परमपावन भरताला चित्रकूटावरची रामपर्णकुटी दिसताच, शोकाचे अनावर उमाळे येतात. असह्य मनस्तापाने तो व्याकूळतो. स्वतःचा धिःकार करतो.

शत्रुघ्नाला तो म्हणतो.

सगरत्यांपुरुष व्याघ्र आस्ते वीरासने रतः।
जनेंद्रो निर्जनं प्राप्य धिङ्मे जन्म सजीवितम् ॥
मत्कृते व्यसनं प्राप्तो लोकनाथो महाद्युतिः।
सर्वान् कामान् परित्यज्य वने वसति राघवः ॥

इति लोकसमाकृष्टः पादेष्वद्य प्रसादयन् ।
रामस्य निपतिष्यामि सीताया लक्ष्मणस्य च ।।

अ. स. ९९ : १५, १६, १७

राजसिंहासनावर वीरासन घालून बसण्याची पात्रता असलेला नरव्याघ्र सम्राट् विजनवासांत दुर्दैवी जीवन व्यतीत करतो. तेजोमय महापुरुष लोकनाथ राम केवळ माझ्याकरताच दुःखाच्या अपेष्टा संकटाच्या वणव्यात होरपळून निघाला आहे. पौरजन माझ्यावर हत्यार धरतील, जननिंदेचे प्रखर प्रहार कसे सहन करू ? माझ्या दुष्कीर्तीस सीमा नाही. माझा धिःकार असो !

रामाच्या पायी लोळण घेईन, सीता आणि लक्ष्मणाच्या चरणांनाही मिठी घालीन. अश्रूंचा अभिषेक करीन; ते माझं पाप साफ धुवून टाकतील.

श्रीराम दिसताच वासराकडे गाय धावते तसा तो बेभान धांवत सुटतो. वाटेनच मूर्च्छित होऊन कोसळतो.

श्रीराम चरणांना मिठी घालतो. विलक्षण विलाप करतो.

यः संसदि प्रकृतिभिर्भवेदयुक्त उपासितुम् ।
वन्यैः मृगैरुपासीनः सोऽयमास्ते ममाग्रजः ।।

वासोभिर्बहुसाहस्त्रैर्यो महात्मा पुरोचितः ।
मृगाजिने सोऽयमिह प्रवस्ते धर्ममाचरन् ।।

अधारयद्यो विविधाश्चित्राः सुमनसः तदा ।
सोऽयं जटाभारमिमं सहते राघवः कथम् ।।

यस्य यज्ञैर्यथो द्दिष्टैर्युक्तो धर्मस्य संचयः ।
शरीर क्लेशसंभूतं स धर्मं परिमार्गते ।।

चन्दनेन महार्हेण यस्याङ्गमुपसेवितम्
मलेन तस्याङ्गमिदं कथमार्यस्य सेव्यते ।।

मन्निमित्तमिदं दुःखं प्राप्तो रामः सुखोचितः ।
धिग्जीवितं नृशंसस्य मम लोकविगर्हितम् ।

इत्येवं विलपन् दीनं प्रस्विन्नमुखपङ्कजः
पादावप्राप्य रामस्य पपात भरतो रुदन् ।
( अयोध्या ९९ : ३१–३७ )

पृथ्वीचा सम्राट होण्याची पात्रता असलेला सभोवती सामंतांची दाटी व्हावी असा माझा भाऊ वन्य पशूंच्या समूहात बसावा ना ? ऊंची वस्त्रे व बहुमोल अलंकार धारण करणारा राम वल्कले नेसून मृगाजिनावर बसला आहे. नानारंगाच्या सुवासिक सुरम्य पुष्पमाला धारण करणारा राम जटाधारी तपस्व्यासारखा दिसत आहे. चंदनाची सुगंधी उटी लावणाऱ्या राघवाच्या कांतिमान देहावर धूळ बसत आहे. धर्मपालनाकरता श्रीराम दारूण क्लेश सहन करीत आहे. माझ्यामुळेच श्रीरामाला अपरंपार यातना होत आहेत ना ? धिःकार असो !

अकलंकित भरताच्या विमल चारित्र्याला अद्भुत बुद्धिवैभवाची जोड आहे. श्रीरामास वळविण्याकरिता त्याने केलेला विनतोड युक्तिवाद त्याच्या व्यापक व सूक्ष्मग्राही सर्वोत्कृष्ट बुद्धिमत्तेचे द्योतक आहे.

" भरता राज्य तुझे आहे. पित्याने ते तुला दिले आहे. तूच अयोध्येचा राजा आहेस ! "

" पित्याने मुलास देण्याकरता कैकयीला राज्य दिले. तिने ते मला दिले. मी स्वीकारले. राज्य माझे आहे. आता ते मी तुला देतो. राज्याचा स्वीकार कर. सैनिक सेवकांनी अनुमोदन दिले. सर्व उपस्थितांनी दुजोरा दिला. भरताचे सांत्वन करताना रामाने नियतीच्या निर्घृण चक्राचा दारूण चिरंतन सत्याचा अतीव मनोहर आविष्कार केला.

सर्वे क्षयान्ता निचयाः पतनांताः समुच्छ्रयाः ।
संयोगा विप्रयोगान्ता मरणान्तं च जीवितम् ।
यथा फलानां पक्वानां नान्यत्र पतनाद्भयम् ।
एवं नरस्य जातस्य नान्यत्र मरणाद्भयम् ।
यथागारं दृढस्थूणं जीर्णं भूत्वोपसीदति ।
तथाऽवसीदन्ति नरा जरामृत्युवशं गताः ॥
अत्येति रजनी या तु सा न प्रतिनिवर्तते ।
यात्येव यमुना पूर्णासमुद्रमुदकार्णवम् ॥

अहोरात्राणि गच्छन्ति सर्वेषां प्राणिनामिह ।
आयूंषि क्षपयन्त्याशु ग्रीष्मे जलमिवांशवः ।
आत्मानमनुशोच त्वं किमन्यमनुशोचसि ।
आयुस्ते हीयते यस्य स्थितस्यच गतस्य च ।।
सहैव मृत्यूर्व्रजति सह मृत्युर्निवर्तते ।।
गात्रेषु वलयः प्राप्ताः श्वेताश्चैव शिरोरुहाः ।
जरया पुरुषो जीर्णः किं हि कृत्वा प्रभावयेत् ।।
नन्दन्त्युदित आदित्ये नन्दन्त्यस्तमिते ऽहनि ।
आत्मनो नावबुध्यन्ते मनुष्या जीवितक्षयम् ।।
हृष्यन्त्यृतुमुखं दृष्ट्वा नवं नवमिहागतम् ।।
ऋतूनां परिवर्तेन प्राणिनां प्राणसंक्षयः ।
यथा काष्ठं च काष्ठं च समेयातां महार्णवे ।
समेत्य तु व्यपेयातां कालमासाद्य कंचन ।।
एवं भार्याश्च पुत्राश्च ज्ञातयश्च वसूनि च ।
समेत्य व्यवधावन्ति ध्रुवो ह्येषां विनाभवः ।।

१०५ : १७–२७

काल हा कर्माप्रमाणे पुरुषास नाचवितो. माझ्या वनवासास कैकयी कारण नाही. राजाही नाही भरलेली वस्तू रिती होणारच, चढणारा खाली याव-याचाच संयोग. आहे तिथे वियोग आहे. जीवनाची अखेर मरणातच होणार आहे. पिकलेले फळ पडायचेच. भरता, राजाकरिता शोक करू नको."

"सागरास मिळालेल्या नदीचे पाणी कधी तरी मागे फिरते का ? गेलेली रात्र फिरून यावयाची नाही. मनुष्य चालला तर मृत्यू त्याच्या बरोबर वाटचाल करीत असतो. तो बसला तर मृत्यू त्याच्याजवळ असतो. मृत्यू कधीतरी त्याला सोडतो का ? दिवस उजाडला आणि मावळला तरी मनुष्यास आनंदच होतो पण यमसदनाच्या रोखाने पावले पडत असल्याचे त्याच्या लक्षात येत नाही. महा-सागरात लाकडाचा ओंडका दुसऱ्या ओंडक्याजवळ येतो. काही काळ ते एकत्र असतात काही काळाने ते दूर दूर जातात. तसे ह्या संसारात भार्या, आप्तेष्ट, मित्र, संपत्ती जवळ येतात दूर जातात. संयोगानंतर वियोग हा व्हायचाच.

भरत अविचल होता. महानिश्चयी भरत रेतभरही चळला नाही. तो म्हणतो मी नसताना कैकेयीने सर्व उलथापालथ केली. तिलाच उग्र शासन करायला हवे. मीच तिचे नरडे आवळले असते. पण धर्मावर शस्त्र कसे उपसू ? तुला ते कसे रुचेल ? माझं तोंड देखील तू पाहिलं नसतंस ना ?

प्रोषिते मयि यत्पापं मात्रा मत्कारणात्कृतम् ।
क्षुद्रया तदनिष्टं मे प्रसीदतु भवान् मम ॥
धर्मबन्धेन बद्धोऽस्मि तेनेमां नेह मातरम् ॥
हन्मि तीव्रेण दण्डेन दण्डार्हां पापकारिणीम् ।

१०६–८, ९, १०.

म्हातारपणी बुद्धि चळते ना ?

अन्तकाले हि भूतानि मुह्यन्तीति पुरा श्रुतिः ।
राज्ञैवं कुर्वता लोके प्रत्यक्षं सा श्रुतिः कृता ।
साध्वर्थ मभिसन्धाय क्रोधान्मोहाच्च साहसात् ।
तातस्य यदतिक्रान्तं प्रत्याहरतु तद्भवान् ॥
पितुर्हि समतिक्रान्तं पुत्रो यः साधु मन्यते ।
तदपत्यं मतं लोके विपरीतमतोऽन्यथा ॥
तदपत्यं भवानस्तु मा भवान्दुष्कृतं पितुः ।
अति यत्तत्कृतं कर्म लोके धीर विगर्हितम् ॥
कैकेयीं मांच तातं च सुहृदो बान्धवांश्चनः ।
पौरजानपदान् सर्वांस्त्रातु सर्वमिदं भवान् ॥

१०६: १३–१८

पित्याने प्रमाद केला. अन्याय केला. तूच त्याना सावरायला हवे. तोच मुलगा की जो वडिलांना अधर्मापासून अन्यायापासून वाचवितो. अधःपाताच्या गर्तेत कोसळणाऱ्या पित्यास न रोधता उलट साहाय्य करणाऱ्यास अपत्य कसे म्हणता येईल ? पित्याची अधर्मी अन्यायी आज्ञा पाळू नकोस. त्याचे दिव्य लोक हिरावून घेऊ नकोस.' भरतानं अपत्य शब्दाचा उपयोग केला. श्रीरामाने त्याचेच शब्द त्याच्यावर उलटवले.

श्रूयते हि पुरा तात श्रुतिर्गीता यशस्विना ।
गयेन यजमानेन गयेष्वेव पितृन्प्रति ।

१०७: ११

एवं राजर्षयः सर्वे प्रतीता राजनन्दन।
तस्मात् त्राहि नरश्रेष्ठ पितरं नरकात्प्रभो।

१०७ : १४

मी आज्ञा पाळायचो तशी तू देखील. मी अपत्य आहे. तू पुत्र आहेस ना ? पुत्रास नरकापासून पित्याला वाचविणाराच पुत्र !

उग्रनिश्चयी श्रीराम बिनतोड बाजू मांडतो –

तव राज्यं नरव्याघ्र मम प्रव्राजनं तथा ।
तच्च राजा तथा तस्यै नियुक्तः प्रददौ वरम् ।।
तेन पित्राहमप्यत्र नियुक्तः पुरुषर्षभ ।।
चतुर्दश वने वासं वर्षाणि वरदानिकम् ।।
सोऽहं वनमिदं प्राप्तो निर्जनं लक्ष्मणा न्वितः ।।
सीतया चाप्रतिद्वन्द्वः सत्यवादे स्थितः पितुः ।।
भवानपि तथेत्येव पितरं सत्यवादिनम् ।
कर्तुमर्हति राजेन्द्र क्षिप्रमेवा भिषित्रचनात् ।।
ऋणान्मोचय राजानं मत्कृते भरत प्रभुम् ।
पितरं त्राहि धर्मज्ञं मातरं चाभिनन्दय ।।

१०७ : ८-१०

पित्याच्या आज्ञेप्रमाणे मला चौदा वर्षे वनातच काढली पाहिजेत. राज्य तुला दिले आहे. राज्याचो धुरा वाहा. आईला, प्रजेला सुखी कर. पितरांकरता यज्ञयाग करून त्यांना पापातून मुक्त कर. पुत् नावाच्या नरकापासून त्यांचे रक्षण कर. तू अयोध्येचे राज्य कर. मी दण्डकारण्यात जंगलाचा राजा होईन. तुझ्या मस्तकावर राजछत्र असू दे. वनातील घनदाट वृक्षाची छाया मला सुखवील. धीरोदात्त शत्रुघ्न तुला सहाय्य करील. महापराक्रमी लक्ष्मण माझ्यासह राहील. आपण चौघे बंधू राजाचे वचन सत्य करूया.

त्वं राजा भरत भव स्वयं नराणां वन्यानामहमपि राजराण्मृगाणाम् ।
गच्छ त्वं पुरवरमद्य संप्रहृष्टः संहृष्टस्त्वहमपि दण्डकान् प्रवेक्ष्ये ।।
छायां ते दिनकरभाः प्रबाधमनं वर्षत्रं भरत करोतु मूर्ध्नि शीताम् ।।
एतेषामहमपि काननद्रुमाणां छायां तामतिशयिनीं सुखी श्रयिष्ये ।।

१८

शत्रुघ्नः कुशलमतिस्तु ते सहायः सौमित्रिर्मम विदितः प्रधानमित्रम् ।
चत्वारस्तनयवरा वयं नरेन्द्रं सत्यस्थं भरत चराम मा विषीद ।।

१९ ( सर्ग १०७ )

धैर्याच्या, निश्चयाच्या महामेरू रामास वळविणे अशक्य होते.

अखेरीस कुलगुरु वसिष्ठ सरसावतात.

ईश्वाकूंची परंपरा सांगतात.

ईश्वाकूणां हि सर्वेषां राजा भवति पूर्वजः ।
पूर्वजे नावरः पुत्रो ज्येष्ठो राज्येऽभिषिच्यते ।।

सर्ग ११० ।। ३५ ।।

तू दशरथाचा ज्येष्ठ मुलगा आहेस. ईश्वाकू वंशात थोरल्या मुलालाच राज्याभिषेक झाला आहे. कनिष्ठ राजा झाला नाही. कुलपरंपरेप्रमाण तुला राज्य स्वीकारावेच लागेल. राजा हो, अयोध्येचे पालन कर."

श्रीराम नकार देतो.

वसिष्ठ श्रीरामाच्या सत्वशीलतेला धर्मनिष्ठेलाच आवाहन करतात.

पुरुषस्येह जातस्य भवन्ति गुरवः सदा ।
आचार्यश्चैव काकुत्स्थ पिता माता च राघव ।।

स ते ऽहं पितुराचार्यस्तव चैव परंतप ।
मम त्वं वचनं कुर्वन्नातिवर्तेः सतां गतिम् ।। ४ ।।

१११:२-४

श्रीरामा ! गुरु, आचार्य, पिता आणि माता वंदनीय आहेत ना ? तुलाच नव्हे तर तुझ्या पित्याचाही मी आचार्य आहे, गुरु आहे. गुरुचा उपदेश डावलणे हा अधर्म आहे. "

व्रतनिश्चयी राम थोडा देखील चळला नाही. तो निःसंदिग्ध उत्तरतो.

यन्मातापितरौ वृत्तं तनये कुरुतः सदा ।
न सुप्रतिकरं तत्तु मात्रा पित्रा च यत्कृतम् ।। ९ ।।

स हि राजा जनयिता पिता दशरथो मम ।
आज्ञातं यन्मया तस्य न तन्मिथ्या भविष्यति ।। ११ ।।

सर्ग-१११

छे ! भलतंच काही तरी सांगू नका. मातापित्याच्या अमाप ऋणाचं मोजमाप करता यायचं नाही. परतफेड तर केवळ अशक्यच. जिवापलीकडे प्रेम करणाऱ्या माझ्या पित्याचा द्रोह करू ? वचनभंग करू ? श्रीरामावर सर्वच घसरले होते. मंत्री, अमात्य सैनिक, पौरजन सारे अयोध्येचे राज्य गळी उतरवीत होते. तो एकाएकाशी झुंजतो. धर्माचे प्रणेते आचार्य वसिष्ठ आपल्या मदतीस येतील असे त्याला वाटते. पण ते देखील उलटतात. एकाकी राम अविचल असतो.

श्रीरामाला वळविणे म्हणजे वाळूच्या दोरीने आकाश बांधण्यासारखे अशक्य असते. निर्वाणीचा तोडगा म्हणून भरत रामाच्या पर्णकुटीच्या दारांशी प्रायोपवेशन करण्याचा संकल्प करतो. दर्भ आणतो. रामकुटीसमोर पसरतो. त्यावर तो धरणे धरून बसतो

स तु राममवेक्षन्तं सुमन्त्रं प्रेक्ष्य दुर्मनाः ।
कुशोत्तरमुपन्थाप्य भूमावेवास्थितः स्वयम् ।।

१११ : १५

श्रीराम अयोध्येस आल्याविना मी काही खाणार नाही. पिणार नाही. निजणार नाही. '

श्रीराम हतबुद्ध होतो. तुझ्या विवेकबुद्धीने काळे का केले आहे ? असह्य आततायी उफराट्या कुकर्माने तू धर्मावरच शस्त्र उपसले आहेस. मी तुझा काय अपराध केला ?

ब्राह्मणो ह्येकपार्श्वेन नरान् रोध्दुमिहार्हति।
न तु मूर्धाभिषिक्तानां विधिः प्रत्युपवेशने ।।
सर्ग १११-१७

अशी अडवणयुक्त करणी हा क्षत्रियांचा धर्म नाही. आपण असं उफराटे कुकर्म करून रघुकुलाला कलंक का लावायचा? राज्याची धुरा सांभाळणारा तोच क्षात्रधर्म.

भरत उठत नाही. तो तसाच बसून राहातो. पौरजन मंत्री, अपार पुरोहितांना त्याने आवाहन केले.

" तुम्ही बोलत का नाही ? श्रीराम अयोध्येचा सम्राट आहे ना ? तुम्ही सारे आग्रह का धरीत नाही ? "

सर्वांचा निरूपाय होतो. त्यांना हात टेकावे लागतात.

तरीही भरत डगमगत नाही. तो काही सामान्य नाही. तो नवा पवित्रा घेतो. " नगरवासी जनहो, मला राज्य मिळावे अशी मी कधी राजाकडे मागणी केली नाही. आईसहि कधी तसे सुचविले नाही. रामवनवासाला अनुमति दिली नाही. "

न याचे पितरं राज्यं नानुशासामि मातरम् ।
एवं परमधर्मज्ञं नानुजानामि राघवम् ।। २५ ।।
यदि त्ववश्यं वक्तव्यं कर्तव्यं च पितुर्वचः ।
अहमेव निवत्स्यामि चतुर्दश समा वने ।। २६ ।।

सर्ग १११: २५, २६.

पित्याच्या आज्ञेनुसार एका मुलाने राज्य चालवावे. दुसऱ्याने वनवासी व्हावे असेच ना तुझे म्हणणे आहे ? तुला पितृवचन पाळावयाचं आहे ना ? तू अयोध्येस जा, मी चौदा वर्षे वनांत राहीन. मी तुझा वनवास अंगी धरीन. तू राज्य सांभाळ. आपण खांदेपालट करू ? तूच का वनांत राहावे ?

श्रीराम थक्क होतो. मंत्री, अमात्य, पुरोहित, पौरजनांना तो म्हणतो, " तुम्हा सर्वांना इथे आणणाऱ्या भरताचा खुळा हट्ट पाहिला ना ? चौदा वर्षे वनवासाची मला आज्ञा आहे ना ? माझा वनवास दुसऱ्यावर कसा सोपवता येईल ? वनवासाला प्रतिनिधी कसा धाडता येईल ?

विक्रीतमाहितं क्रीतं यत्पित्रा जीवता मम ।
न तल्लोपयितुं शक्यं मया वा भरतेन वा ।।
(सर्ग १११) २८

पित्याचे ठेवी–खरेदी–विक्री–व्यवहार मला किंवा भरतास रद्द कसे करता येतील ? पित्याच्या प्रत्येक व्यवहाराने आम्ही बांधले आहोत. ते तसेच आम्हाला पूर्ण करायला हवेत.

पित्याच्या आज्ञेप्रमाणे वागण्यातच कल्याण आहे. भरत सत्यवचनी आहे. पितृऋण फेडण्याचे कर्तव्य मी करीत आहे. भरतानेही त्याचे कर्तव्य करावे."

रामभरतात त्यागांची अहमहमिका लागली होती.

अत्युत्कट बंधुप्रेमाने सारेच भारावले. मंत्रमुग्ध झाले. आचार्य ऋषीमुनी मंत्री, पौरजनांनी रामाची प्रशंसा केली. निर्णय दिला.

" ग्राह्यं रामस्य वाक्यं ते पितरं यद्यवेक्षसे ।
सदानृणमिमं रामं वयमिच्छामहे पितुः ।
अनृणत्वाच्च कैकेय्याः स्वर्गं दशरथो गतः ।
११२: ५, ६.

धर्मनिष्ठ रामाने पित्याच्या ऋणात रहावे का ? रामवनवासाने राजाही ऋणातून मुक्त होत आहे. पित्याकरता भरताला अयोध्येला राज्य सांभाळावेच लागेल." आणि तरी देखील भरत खचला नाही, ढळला नाही. त्याच्या नेत्रातून अश्रूंचा पूर लोटला होता. श्रीरामचरणी त्याने लोळण घेतली.

श्रीरामा, वादात तू जिंकलास, मी हरलो. तुझ्यासारख्या धुरंधर महापुरुषाशी वादाची झुंज घेण्याची माझी कुवत नाही. मी खुळा आहे, वेडा आहे.

राम धर्ममिमं प्रेक्ष्य कुलधर्मानुसंततिम् ।
कर्तुमर्हसि काकुत्स्थ मम मातुश्च याचनाम् ।

रक्षितुं सुमहद्राज्यमहमेकस्तु नोत्सहे ।
पौरजानपदांश्चापि रक्तान् रञ्जयितुं तथा ।।

त्वामेव हि प्रतीक्षन्ते पर्जन्यमिव कर्षकाः ।
इदं राज्यं महाप्राज्ञ स्थापय प्रतिपद्य हि ।
शक्तिमानसि काकुत्स्थ लोकस्य परिपालने ।।

११२:१०-१२

"एवढया प्रचंड राज्याची धुरा वाहाण्याचे माझ्यात सामर्थ्य नाही रे, पावसाकरता तळमळणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणे आचार्य, मंत्री, अमात्य, पुरोहित, पौरजन सारे तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसले आहेत. तू राजा हो ! आमचा सांभाळ कर !

दृढनिश्चयी धीरोदात्त श्रीराम वाकला नाही. चेहेऱ्यावर तशी पुसटती लकेरही उमटली नाही.

व्याकुळ भरत रामचरणी मिठी घालतो. तू अयोध्येत येत नाहीस ना ? निदान हे राज्य स्वीकार. ते कुणा समर्थ महापुरुषाला देऊन टाक, तो तुझा प्रतिनिधी. तोच तुझ्या नावाने राज्य चालवील मी पंगु आहे, दुबळा आहे. मला हे प्रचंड ओझे पेलायचे नाही रे."

श्रीरामाचा चेहरा प्रसन्नतेने उजळतो.

"आगता त्वामियं बुद्धिः स्वजा वैनयिकी च या ।
भृशमुत्सहसे तात रक्षितुं पृथिवीमपि ।। १६

सर्ग ११२

देवांनाही अभिलाषा वाटावी, अशी आयसुख चालून आलेली राजलक्ष्मी लाथाडून चौदा वर्षे विजनवासाचे अपरपार कष्ट साहायला सिद्ध असलेला तुझ्या-सारखा महापुरुष अयोध्येचेच काय पण संपूर्ण पृथ्वीचे सम्राटपद भूषवू शकेल. तुझ्या असीम त्यागानेच तुझ्या महानतेची ग्वाही दिली आहे. निश्चयाचा महामेरू रामाने पुन्हा एकदा दृढ व्रताचा उद्घोष केला.

लक्ष्मीश्चन्द्रादपेयाद्वा हिमवान् वा हिमं त्यजेत् ।
अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ।।

११२-१८

" मी परत फिरेन असं का तुला वाटतं ? अंतःकरणात आशेचा एखादा चिवट तंतु असला तर तो काढून टाक. चंद्राची कांति निघून जाईल. हिमालयावरचे हिम नाहीसे होईल. सागर मर्यादाभंग करील. पण राम वचनभंग करायचा नाही." भरताचा निरुपाय होतो हिमालयासारखी उंचावलेली समस्या कशी सुटायची ? ब्रह्मर्षि वसिष्ठ तोड सुचवितात. भरत रत्नजडीत पादुका श्रीरामासमोर ठेवतो.

अधिरोहार्य पादाभ्यां पादुके हेमभूषिते ।
एते हि सर्वलोकस्य योगक्षेमं विधास्यतः ॥

(११२–२१)

या पादुकावर तुझे पावन चरणकमल ठव. या पवित्र पादुकाच विश्वाचे रक्षण करतील ! श्रीरामाने पूर्वेस तोंड केले. पादुकावर चरण ठेवले. श्रीरामचरणाने पुनित झालेल्या पादुकांना भरत वंदन करतो घनगंभीर प्रतिज्ञा करतो.

चतुर्दश हि वर्षाणि जटाचीरधरो ह्यहम् ।
फलमूलाशनो वीर भवेयं रघुनंदन ॥
तवागमनमाकांक्षन् वसन् वै नगरद्बहिः ।
तव पादुकयोर्न्यस्य राज्यतंत्र परंतप ॥
चतुर्दशे हि संपूर्णे वर्षेऽहनि रघूत्तम ।
न द्रक्ष्यामि यदि त्वां तु प्रवेक्ष्यामि हुताशनम् ॥

॥ ११२:२३–२५.

राजसिंहासनावर तुझ्या मंगल पादुका राहातील. मी नगराबाहेर चौदा वर्षे राहीन. तुझ्या नावाने तुझा सेवक म्हणून राज्य चालवीन."

आचार्य, ऋषीमुनी, मंत्री, अमात्य, नगरवाशी सारे गहिवरले. त्यांचे नेत्र अश्रूंनी थबथबले.

" वनवासाची चौदा वर्षे पूर्ण होताच त्याच दिवशी तुझं दर्शन झालं नाही ना ?" भरताला हुंदके अनावर होतात. तो आवंढा गिळतो.

श्रीराम, मी त्याचदिवशी अग्नीप्रवेश करीन भरताच्या उग्र प्रतिज्ञेने सर्व थरारतात. स्तिमित होतात.

रामभरतभेटीचा अद्भूत प्रसंग विलक्षण मनोवेधक आहे. अत्युत्कट प्रीतीचे अत्यंत सुभग, भावस्निग्ध चित्रण आदिकवीच्या अमर प्रभावी लेखणीने केले आहे. वाचक भारावून जातो. मंत्रमुग्ध होतो. स्वत:ला विसरतो.

राजसिंहासनावर भरत श्रीरामाच्या पादुकांची प्रतिष्ठापना करतो. राम पादुकांना अभिषेक करतो. त्या पादुकांवर भरत स्वतः श्वेतछत्र धरतो. रामाचा प्रतिनिधी या नात्याने केवळ कर्तव्यबुद्धीने, अयोध्येबाहेर नंदीग्रामी राहून राज्याची धुरा सांभाळतो.

तेजोमय श्रीरामाच्या कैलासाएवढ्या उत्तुंग विशुद्ध चारित्र्याचे भवतीभवती मदा मत्सराला मूठमाती दिली. श्रीरामाला आणायला, कैकयी देखील जाते.

तिघी महाराण्या एकाच रथातून जातात.

कैकेयी च सुमित्रा च कौसल्या च यशस्विनी ।
रामानयनसंहृष्टा ययुर्यानेन भास्वता ।।

८३:६

'रामानयनसंहृष्टा' तिघींचा उल्लेख असल्याने बहुवचन आहे. श्रीरामाला परत आणायला कैकेयी आतुर होती. हर्षाने मोहोरली होती. 'यानेन' एकवचनाकडे भाष्यकारांनी मुद्दाम लक्ष वेधले आहे. तिघी महाराण्या होत्या. तिघींचा दर्जा समान होता. तिघींचे वेगळे रथ होते. प्रत्येकीला स्वतंत्र वाहन होते. परंतु तिघीही सवती एकाच रथातून गेल्या. त्यांच्यात जवळीक निर्माण झाली होती. कैकेयी च सुमित्रा च कौसल्या च यशस्विनी। रामानयनसंहृष्टा ययुर्यानेन भास्वता ।। ८३:६

चित्रकूटावर असलेल्या वज्रनिश्चयी श्रीरामाचा निरोप घ्यायचा होता. तिघींची अंतःकरणे भरून आली. त्या गहिवरल्या. रामवियोगाची कल्पना त्यांना असह्य झाली. त्यांच्या जीवाची विलक्षण उलघाल होऊ लागली.

तं मातरो बाष्पगृहीतकण्ठ्यो दुःखेन नामन्त्रयितुं हि शेकुः।
स त्वेव मातॄरभिवाद्य सर्वा रुदन् कुटीं स्वां प्रविवेश रामः ।।

११२-३१

त्या तिघी मातांनी रामाचा निरोप घेतला. त्यांच्या नेत्रात अश्रू होते. त्यांचे भावस्निग्ध विवश नेत्र बोलत होते. मुखावाटे शब्द उमटू शकला नाही.

१०

श्रीरामही विलक्षण भारावला होता. त्याच्या नेत्रांतून अश्रूंचा महापूर वहात होता. तिघी मातांच्या चरणावर त्याने माथा ठेवला आणि आंत निघून गेला.

भाष्यकारानी 'सर्वामातृः' बहुवचनाचा उल्लेख केला आहे.

तं मातरो बाष्पगृहीतकण्ठचोदुःखेन नामन्त्रयितुं हि शेकुः ।
स त्वेव मातृरभिवादय सर्वा रुदन्कुटीं स्वां प्रविवेश रामः । ११२:३१

त्यांच्यात कैकयी होतीच.

अयोध्यपेक्षाही राम अरण्यात सुखी होता. वनवास त्याला रुचला. पसंत पडला. पतीसह वनवासात सीतेलाही अयोध्येस असल्यासारखे वाटले. प्रसन्न शांत उदात्त ऋषी मुनींच्या सहवासात त्यांना अयोध्येची आठवणही येईनाशी झाली.

श्रीरामाला वनात सोडून माघारा परतलेला सुमंत्र व्याकुळलेल्या कौसल्येला सांगतो.

"त्यज शोकं च मोहं च सम्भ्रमं दुःखजं तथा ।
व्यवधूय च संतापं वने वत्स्यति राघवः ।।
लक्ष्मणश्चापि रामस्य पादौ परिचरन् वने ।
आराधयति धर्मज्ञः परलोकं जितेन्द्रियः ।।
विजनेऽपि वने सीता वासं प्राप्य गृहेष्विव ।
विस्रम्भं लभतेऽभीता रामे विन्यस्तमानसा ।।
नास्या दैन्यं कृतं किंचित् सुसूक्ष्ममपि लक्ष्यते ।
उचितेव प्रवासानां वैदेही प्रतिभाति मे ।।
नगरोपवनं गत्वा यथा स्म रमते पुरा ।
तथैव रमते सीता निर्जनेषु वनेष्वपि ।।
बालेव रमते सीता बालचन्द्रनिभानना ।
रामा रामे ह्यधीनात्मा विजनेऽपि वने सती ।।
तद्गतं हृदयं ह्यस्यास्तदधीनं च जीवितम् ।
अयोध्यापि भवेत्तस्या रामहीना तथा वनम् ।।
न शोच्यास्ते न चात्मा ते शोच्यो नापि जनाधिपः ।
इदं हि चरितं लोके प्रतिष्ठास्यति शाश्वतम् ।।"

(सर्ग ६०) : ५-११-२१

"देवी, शोक आवर," जितेंद्रिय रामचरणाजवळ महापराक्रमी लक्ष्मण अखंड जागा आहे. जानकी वनाला माहेर मानून निर्भयपणे पतीसह राहात आहे. अयोध्येतील उपवनासारखी सीता अरण्यात रमली आहे. जणू तिला वनवासाचा सराव आहे असेच मला वाटते. राम असल्यामुळे अरण्य हीच तिची अयोध्या झाली आहे. विलोभनीय निसर्गदृश्याने तिचे मन ओढून घेतले आहे. वृक्ष, लता, पुष्पे, फळे, पशूपक्षी यांची माहिती जिज्ञासेने ती पतीस विचारते.

"वाट चालताना ती दमली नाही. उन्हाने तिची अंगकांति कोमेजली नाही. पूर्णचंद्रासारखी ती नेहमी प्रसन्न असते. आंब्याच्या रसासारखी तांबडी सुकुमार पावले तशीच कोमल आहेत. नूपुरे घातलेली जानकी हंसगतीलाही लाजवीत वनात विहार करीत आहे. अलंकाराची विलक्षण आवड असलेल्या जानकीने पतिप्रेम वाढविणाऱ्या भूषणांचा त्याग केला नाही. श्रीरामजवळ असताना हिंस्र श्वापदांचे तिला भय वाटत नाही. ऋषीसारखे राम, लक्ष्मण आणि जानकी प्रसन्न मनाने वनात राहत आहेत. इंद्रालाही थरकाप उडविणाऱ्या राम, लक्ष्मण आणि जानकीबद्दल तुला शोक करण्याचे काय कारण? देवी शोक आवर."

परमपावन चित्रकूटावर राम अतीव सुखात होता. जीवनातील सुखाचे भरलेले उसळते प्याले तिघेही हर्षोत्कटतेने प्राशन करतात.

गुहासमीरणो गन्धान्नाना पुष्पभवा न् वहन् ।
घ्राणतर्पणमभ्येत्य कं नरं न प्रहर्षयेत् ॥
यदीह शरदो ऽ नेकास्त्वया सार्धमनिन्दिते ।
लक्ष्मणेन च वत्स्यामि न मां शोकःप्रधक्ष्यति ॥
बहुपुष्पफले रम्ये नाना द्विज गणायुते ।
विचित्रशिखरे ह्यस्मिन् रतवानस्मि भामिनि ॥
इदमेवामृतं प्राहू राज्ञि राजर्षयः परे ।
वनवासं भवार्थाय प्रेत्य मे प्रपितामहाः ।

९४:१४-१६, १९.

श्रीराम जानकीला म्हणतो, "या पावन पर्वतावर आपण कित्येक [illegible]स काढले तरी कधीही कंटाळा यायचा नाही. पुष्पांचा सुगंध दरवळून टाकणारा प्रसन्न वायु कुणास सुखविणार नाही? येथे मधुर फळे विपुल आहेत. मधाची पोळी आहेत. फुले आहेत. नाना सुंदर वनस्पती आहेत. मयूर आहेत. [illegible]नना,

कांकोळ सारे पक्षी आहेत. पित्याची आज्ञा पाळणे आणि कैकयीची मनिषा पुरवणे या दोन्ही गोष्टी नितान्त रमणीय चित्रकूट सानिध्याने अनायासे साधल्या आहेत.

हर्षोत्फुल्ल श्रीरामाची अत्युत्कट सुखाची ग्वाही!

दर्शनं चित्रकूटस्य मन्दाकिन्याश्च शोभने ।
अधिकं पुरवासाच्च मन्ये तव च दर्शनात् ।।
विधूतकलुषैः सिद्धैस्तपोदमशमान्वितैः ।
नित्यविक्षोभितजलां विगाहस्व मया सह ।।
त्वं पौरजन वद्व्यालानयोध्यामिव पर्वतम् ।
मन्यस्व वनिते नित्यं सरयूवदिमां नदीम् ।।
लक्ष्मणाचैव धर्मात्मा मन्निदेशे व्यवस्थितः ।
त्वं चानुकूला वैदेहि प्रीतिं जनयतो मम ।।
उपस्पृशंस्त्रिषवणं मधुमूलफलाशनः ।
नायोध्यायै न राज्याय स्पृहयेऽद्य त्वया सह ।।

९५: १२, १३, १४, १५, १७.

उपस्पृशंस्त्रिषवणं मधुफूलफलाशनः ।
नायोध्यायै न राज्याय स्पृहयेऽद्य त्वया सह ।।

१७ ।। ( सर्ग ९५ )

" देवी विमल चित्रकूट, पावन मंदाकिनीचे देहभान हरपविणारे नयनरम्य दृश्य मला अयोध्येपेक्षाही अधिक सुखवित आहे. ही मंदाकिनी तुझी सखीच आहे. शमदम व तपःसंपन्न सिद्ध नित्य या पवित्र सरितेत स्नान करतात. आपणही मंदाकिनीत स्नान करूया."

चित्रकूट ही अयोध्या, मंदाकिनी ही शरयु आणि येथील अजगर हे नागरिक आहेत. नित्य स्नान मधुर, चविष्ट रसाळ फळांचा आस्वाद, अत्युत्कट प्रेम करणारा धर्मात्मा, लक्ष्मण आणि पती वेगळं जीवन, मन नसलेली वैदेही या स्वर्गीय पावन स्थळी सुखवित असताना अयोध्येचे राज्यही कवडीमोलाचे आहे.

* *

# अरण्यकांड

वृक्षे वृक्षे च पश्यामि चिरकृष्णाजिनाम्बरम् ।
गृहीतधनुषं रामं पाशहस्तमिवान्तकम् ।। १५ ।।
रकारादीनि नामानि रामत्रस्तस्य रावण ।
रत्नानि च रथाश्चैव वित्रासं जनयन्ति मे ।। १८ ।।
रामो विग्रहवान्धर्मः साधुः सत्यपराक्रमः ।
राजा सर्वस्य लोकस्य देवानामिव वासवः ।।

।।। ३७ : १३

अवघे ७६ सर्ग आणि २४७६ श्लोकांचे अरण्यकांड !

अमृतरसाने रसरसलेल्या अरण्यकांडात श्रीराम, लक्ष्मण, आणि जानकीच्या भव्योदात्त, उज्वल जीवनगाथेतील काही पैलूचे अत्युत्कट हृदयंगम चित्र आदिकवी वाल्मिकी मनःचक्षूपुढे उभे करतात.

नानाविध उदात्त दिव्य घटना रंगवणाऱ्या उत्तुंग प्रतिभा-संपन्न आदिकवींनी हिमालयासारखा भव्य आदर्शच जनसमाजासमोर उभा केला आहे.

रामचरित्र म्हणजे दारुण भयानक प्रलयंकारी आपत्तीशी झुंजणाऱ्या महापुरुषाचे जीवन आहे. अमृतोपम अरण्यकांडात श्रीरामाच्या अनन्यसाधारण धैर्य शौर्य पराक्रमाचे अनंत साक्षीदार आहेत. श्रीरामावर एका पेक्षा एक भीषण आपत्ती कोसळल्या आहेत. फत्तरानेही रडावे अशी संकटे आली आहेत. माथ्यावर वज्राघात झाला आहे.

प्रत्येक नव्या प्रलयंकारी संकटसमयी न खचणाऱ्या धीरोदात्त नीडर, श्रीरामाची जबर हिम्मत आणि साहस वाढतच गेले आहे. प्रत्येक नव्या अरिष्टाच्या वेळी श्रीरामात जोम संचारतो, नवचैतन्य संचारते आणि श्रीराम दुर्दम्य उत्साहाने, आवेशाने नव्या आपत्तीच्या माथ्यावर पाय रोवून उभा राहतो.

भीमकाय, भयंकर विराध सीतेला पकडतो नंतर सोडतो. राम लक्ष्मणाला घेऊन जातो. सीता एकाकी एकटीच असते. स्वतःच्या प्राणावर बेतली

असताही तिला पतीची चिंता वाटते. स्वतःचा विचारही तिला शिवत नाही. राम-लक्ष्मणांना वाचवण्याकरता आर्त टाहो फोडते. विराधाला विनवते.

ह्रियमाणौ तु काकुत्स्थौ दृष्टवा सीता उच्चैःस्वरेण
चुक्रोश प्रगृह्य सुभहाभुजौ ॥
एष दाशरथी रामः सत्यवाञ्छीलवाञ्शुचिः ।
रक्षसा रौद्ररूपेण ह्रियते सहलक्ष्मणः ।
मां वृका भक्षयिष्यन्ति शार्दूलाद्वीपिनस्तथा ॥
मां हरोत्सृज्य काकुत्स्थौ नमस्ते राक्षसोत्तम ॥

४ : १-२-३

श्रीरामाची धर्मावर अत्युत्कट प्रीती आहे. धर्माकरिता तो सर्वस्वाचा होम करायला खडा राहातो. स्वतःच्या प्राणाचेच नव्हे तर प्राणापेक्षाही प्रिय जानकी आणि तिच्यापेक्षाही अधिक प्रीती असलेल्या लक्ष्मणाचेही बलिदान करायला सिद्ध होतो.

शरभंग आणि सुतीक्ष्ण मुनिश्रेष्ठांच्या पावन आश्रमात एकेक दिवस राहून राम, जानकी, लक्ष्मण पुढची वाटचाल करतात.

मार्ग आक्रमित असता श्रीराम – जानकीचे संभाषण सुरु होते. सीता मृदु मधुर वाणीने म्हणाली, " नाथ, अरण्यातील निरपराध मृगांचा आपण वध करतो हा अधर्म नाही का ? कामापासून मनुष्यावर विलक्षण आपत्ती येतात. वासनेचा पगडा बसलेला मनुष्य मोहवश होतो. भारला जातो. असत्य भाषण, परस्त्रीगमन व अकारण क्रूरता ही घोर पातके करायला प्रवृत्त होतो. "

" खरं आहे. "

आपण कधीही खोटं बोलला नाही, बोलणार नाही. परस्त्रीचा अभिलाप आपल्याला स्वप्नातही वाटायचा नाही. आपण जितेंद्रिय आहात, सत्य प्रतिज्ञ आहात मूर्तिमंत धर्म आहात. पण तितके पातक -

" हिंसाच ना " ?

" होय, निरपराध प्राण्यांची हिंसा करणे, शत्रुत्व नसताना अकारण एखाद्यास ठार मारणे म्हणजे धर्मावर गदा उगारणे नाही का ? "." वैरा शिवाय असुखच ही अकारण होणारी हिंसा हेच महापातक असं तुला म्हणायचे आहे ना ? "

संभाषण कुशल चतुर जानकी म्हणाली, " मी आपली अर्धांगी आहे. ध्यानीमनी आपणच असता. आपल्याशिवाय अन्य विचार माझ्या मनाला स्पर्श करीत नाही. आपल्या ऐहिक पारलौकीक सुखाचेच मी चिंतन करते. असुरांचे शिरकाण केल्याशिवाय आपण स्वस्थ बसणार नाही. आपण शस्त्र धारी आहात, धनुर्धारी आहात. घृताने अग्नि प्रज्वलित होतो. शस्त्र क्षत्रियांचे तेज वाढवते.

अधर्मस्तु सुसूक्ष्मेण विधिना प्राप्यते महान् ।
निवृत्तेन च शक्योऽयं व्यसनात्कामजादिह ।।
त्रीण्येव व्यसनान्यत्र कामजानि भवन्त्युत ।
मिथ्या वाक्यं तु परमं तस्माद्गुरु तरावुभौ ।।
परदाराभिगमनं विना वैरं च रौद्रता ।
मिथ्या वाक्यं न ते भूतं न भविष्यान्ति राघव ।।
कुतोऽभिलषणं स्त्रीणां परेषां धर्मनाशनम् ।
तव नास्ति मनुष्येन्द्र न चाभूत्ते कदाचन ।।
मनसापि तथा राम चैतद्विद्यते क्वचित् ।
स्वदारनिरतश्चैव नित्यमेव नृपात्मज ।।
तृतीयं यदिदं रौद्रं परप्राणाभिहिंसनम् ।
निर्वैरं क्रियते मोहात्तच्च ते समुपस्थितम् ।।
प्रतिज्ञातस्त्वया वीर दण्डकारण्यवासिनाम्
ऋषीणां रक्षणार्थाय वधःसंयति रक्षसाम् ।।१०।।
त्वं हि बाणधनुष्पाणिर्भ्रात्रा सह वनं गतः ।
दृष्ट्वा वनचरान्सर्वान्कच्चित्कुर्याः शरव्ययम् ।।१४।।
क्षत्रियाणामिह धनुर्हुताशस्येन्धनानि च ।
समीपतः स्थितं तेजो बलमुच्छ्रयते भृशम् ।।१५।।

—२, ३, ४, ५, ६, ९, १०, १४, १५

सांभाळायला सांगितलेले शस्त्र जवळ ठेवल्याने तपोधन शांतदांत मुनी अधःपाताच्या गर्तेत कोसळल्याची करुण कहाणी सीता सांगते. ती म्हणते,

नित्यं शस्त्रं परिवहन् क्रमेण सतपोधनः ।
चकार रौद्रीं स्वां बुद्धिं त्यक्त्वा तपसि निश्चयम् ।।

तत् : रौद्राभिरत: प्रमत्तोऽधर्मकर्षित: ।।
तस्य शस्त्रस्य संवासाज्जगाम नरकं मुनि: ।।

मुनिकथा सांगितल्यावर चतुर सीता म्हणते,

स्नेहाच्च बहुमानाच्च स्मारये त्वां न शिक्षये ।
न कथंचन सा कार्या गृहीत धनुषा त्वया ।।२९।।

भाषणाची अखेर सुंदर पद्य करते...

स्त्रीचापलादेतदुदादृतं मे धर्मं च वक्तुं तव क: समर्थ: ।
विचार्य बुध्या तु सहानुजेन यद्रोचते तत्कुरु मा चिरेण ।।

धीरोदात्त श्रीराम रागवत नाही.

किं तु वक्ष्याम्यहं देवि त्वयैवोक्त मिदं वच: ।
क्षत्रियैर्धार्यते चापो नार्तशब्दो भवेदिति ।। १० : ३

श्रीराम नि:संदिग्ध सांगतो.

" देवी, माझ्यावरील उत्कट प्रीतीनेच तुझ्या अंत:करणातील अस्वस्थता तू व्यक्त केलीस. क्षत्रियाने क्षात्र धर्माचे उल्लंघन का करायचे ? धर्मावर गदा का उगारायची ? भयानक संकटांनी ग्रासलेल्या आर्त जनांचे संरक्षण करण्याकरताच क्षत्रियाने शस्त्र धारण करावयाचे ना ? व्रतस्थ मुनी असुरांच्या बेलगाम स्वैर अत्याचाराने गांजले आहेत. पर्वकाली हवनसमयी हे दुराचारी नीच नेमके त्यांच्या व्रतनियमात अडथळे आणतात. स्थंडिलावर आश्रमात रक्त-मांसाची वृष्टी करतात. त्यांना भक्षण करतात. त्या आर्त भयभीत गांगरलेल्या ऋषीमुनींचे संरक्षण नको का करायला ? त्यांच्या दुराचाराला पायबंद घातलाच पाहिजे. दंश करावयाच्या आतच या दुष्ट सर्पांना ठेचले पाहिजे. आर्त ऋषीनीच स्वसंरक्षणाकरता माझी प्रार्थना केली ना ?

" होय संकटग्रस्त मुनींनीच आपणास कळवळून विनवले. त्यांच्या हालअपेष्टा ऐकून माझ्या जिवाचे पाणी पाणी झाले. वास्तविक मीच त्यांच्याकडे जायला हवे. "

त्यांच्या संरक्षणाकरता माझे सारे सामर्थ्य त्यांच्या पाठीशी उभे करायला हवे, ऋषींनी ब्राह्मणांनी आर्त अंत:करणाने माझी विनवणी करणे मला कमी-पणाचे आहे. लौकिकाला काळीमा फासणारे आहे. " ब्राह्मणांचे रक्षण हा क्षात्र धर्मच आहे.

"देवी, आर्त ऋषींच्या संरक्षणाची मी प्रतिज्ञा केली आहे. मुनींना वचन दिले आहे. ब्राह्मणांच्या साक्षीने मी वचनबद्ध झालो आहे. कालत्रयीही माझा शब्द फिरणार नाही. प्रतिज्ञा भंग होणार नाही. तुझा आणि लक्ष्मणांचा त्याग करण्याचा प्रसंग आला, स्वप्राणांची आहुती देण्याची वेळ आली तरी माझ्या वचनापासून रेसभरही ढळणार नाही."

अप्यहं जीवितं जह्यां त्वां वा सीतेसलक्ष्मणाम् ।
न तु प्रतिज्ञा संश्रुत्य ब्राह्मणेभ्यो विशेषतः ।। १९ ।।

भाषणाची अखेर करताना श्रीरामाने बहार केली. सर्वंत मनाची पकड घेणारी निष्कपट वाणी आहे श्रीरामाची.

मम स्नेहाच्च सौहार्दादिदमुक्तं त्वया वचः ।
परितुष्टोऽस्म्यहं सीते न ह्यनिष्टो अनुशाखतेप
सदृशं चानुरूपं च कुलस्य तव शोभने ।
सधर्मचारिणी मे त्वं प्राणेभ्योपि गरीयसी ।।

१० : २१ : २२

तू माझी सहधर्मचारिणी आहेस. तुझी पतिनिष्ठा असीम आहे. माझ्या हिताकरताच तुझ्या देहमनाची तगमग होते. पतीला रेसभरही चळू न देता त्याला सावध करावयाचा तुझा अधिकारच आहे.

श्रीरामाच्या लक्ष्मणावरील अत्युत्कट प्रीतीला तोड नाही. पंचवटीला गोदातटाकी लक्ष्मणाने अतीव सुंदर पर्णकुटी उभी केली. श्रीरामाच्या हर्षाला उधाण आले. हर्षविभोर रामाने त्याला छातीशी कवटाळले.

सुसंहृष्टः परिष्वज्य बाहुभ्यां लक्ष्मणं तदा ।
अतिस्निग्धं चं गाढं च वचनं चेदमब्रवीत् ।।
प्रीतोऽस्मि ते महत्कर्म त्वया कृतमिदं प्रभो ।
प्रदेयो यन्निमित्तं ते परिष्वङ्गो मया कृतः ।।
भावज्ञेन कृतज्ञेन धर्मज्ञेन च लक्ष्मण ।
त्वया पुत्रेण धर्मात्मा न संवृत्तः पिता मम ।।

–१५:२७:२८:२९ ।।

दशरथाने स्वर्गलोकी जाताना तुझ्यात प्रतिमा ठेवली आहे. तू माझा पिताच आहेस. पिता मृत झाला नाही. जिवंत आहे, तू आहेस ना ?

राक्षसांचे अधिनायक अतिबलाढ्य अक्राळ विक्राळ खर, दूषण, त्रिशिरा कुकर्माला सरावलेले आहेत. त्यांच्या सत्प्रवृत्ती कोळपलेल्या आहेत. अनन्वित राक्षसी कुकर्मात असीम आनंद मानणारे निधड्या छातीचे भोगलोलुप वेडर राक्षसांचे अधिपती श्रीरामावर अतिक्रमण करतात. आणीबाणीची वेळ आहे. जिवावरचा प्रसंग आहे. अतिबलाढ्य महापराक्रमी अतिक्रूर मानवी रक्ताची चटक लागलेले खर, दूषण, त्रिशिरा आणि त्यांचे चौदा सहस्त्र सहकारी यांना तोंड देणे म्हणजे प्रत्यक्ष काळपुरुषाच्या जबड्यात शिरण्यासारखे होते. परंतु धैर्याचा बिनघोर मेरु श्रीराम या उन्मत्त वेताल असुरांचे शिरकाण करावयाला सिद्ध झाला त्यावेळी तो लक्ष्मणाला म्हणतो,

रक्षसां नर्दतां घोषः श्रूयतेऽयं महाध्वनिः ।
आहतानां च भेरीणां राक्षसैः कूटकर्मभिः ॥१०॥

तस्माद्गृहीत्वा वैदेहीं शरपाणिर्धनुर्धरः ।
गुहामाश्रय शैलस्य दुर्गां पादपसंकुलाम् ॥१२॥

२४:१०:१२

लक्ष्मणा, कुणाचीही नजर पोचणार नाही अशा शिरकाव होण्याला अत्यंत दुरापास्त असलेल्या दुर्गम गुहेत सीतेला घेऊन जा. डोळ्यात तेल घालून तिचे रक्षण कर. मी एकटाच या सर्वच्या सर्व रक्तपिपासू दुराचाऱ्यांना यमसदनास पाठवितो. मला कुणाचीही मदत नको. माझी प्रतिज्ञा आहे. सीतेचे रक्षण कर.

तस्माद्गृहीत्वा वैदेहीं शरपाणिर्धनुर्धरः ।
गुहामाश्रय शैलस्य दुर्गां पादपसंकुलाम् ॥
१३, १४ प्रतिकूलि तुमिच्छामि न हि वाक्यमिदं त्वया ।
शापितो मम पादाभ्यां गम्यतां वत्स मा चिरम् ॥

२४:१२:१३

सौमित्रा, माझी आज्ञा आहे. मी सांगितले तसे कर. माझा आदेश आहे. तुला माझी आज्ञा पाळली पाहिजे. माझ्या चरणांची शपथ. त्वरा कर.

अतिबलाढच उन्मत्त, बेताल, अनन्वित कृष्णकृत्ये करण्यास सरावलेल्या स्वैराचारी खर, दूषण, त्रिशिरा आणि सर्वच्या सर्व चौदा सहस्त्र राक्षसांना त्याने एकटघाने यमसदनास पोहोचवले. खर दूषणादि चौदा सहस्त्र राक्षसांचे शिरकाण करणाऱ्या श्रीरामाच्या अनन्यसाधारण पराक्रमाचा अकंपन साक्षीदार आहे. एका पक्षाला एकाकी श्रीराम आणि दुसऱ्या बाजूला खर, दूषण, आणि त्याचे चौदा सहस्त्र सहकारी. अकंपन हे भयानक युद्ध पाहतो. श्रीरामाच्या अद्भूत पराक्रमाने थरारतो. तुफान वेगाने रावणाकडे धाव घेतो. श्रीरामाच्या बिनतोड पौरुषाची चित्तथरारक कथा रावणाला सांगताना तो म्हणतो

रामो नाम महातेजा: श्रेष्ठ: सर्व धनुष्मताम् ।
दिव्यास्त्रगुणसंपन्न: परं धर्मं गतो युधि ॥१५॥
तस्यानुरूपो बलवान् रक्ताक्षो दुन्दुभिस्वन: ॥
कनीयाल्लँक्ष्मणो भ्राता राकाशशि निभानन: ॥१६॥
नैव देवा महात्मानो नात्र कार्या विचारणा ॥
शरा रामेण तूत्सृष्टा रुक्म पुङ्खा: पतालीण: ॥१८॥

३१:१५:१६:१८

श्रीरामाच्या पराक्रमाला त्रिभुवनांत तोड नाही. राम अजिक्य आहे. असामान्य महापराक्रमी रामाच्या वाऱ्याला देखील उभे राहायची कोणाची छाती नाही. समरांगणावर प्रत्यक्ष देवांचीही तो दाणादाण उडवील. त्याचा कणाच ठेचायचा असेल तर...

" तर काय ? "

" एकमेव बिनतोड उपाय आहे. "

" कोणता ? "

सीते भोवती त्याचे प्राण घुटमळतात. सीतेला कपट कारस्थानाने पळविले की श्रीराम संपलाच,

भार्या तस्योत्तमा लोके सीता नाम सुमध्यमा ॥
श्यामा समविभक्ताङ्गी स्त्रीरत्नं रत्नभूषिता ॥ २९ ॥
तस्यापहर भार्यां त्वं तं प्रमथ्यतु महावने ।
सीतया रहितो रामो न चैव भविष्यति ॥

३१ – २९: ३१

श्रीरामाचे मस्तक ठेचण्याकरिता रावण धुरीण चतुर मारीचाचे सहाय्य मागतो. श्रीरामाच्या उज्वल व्यक्तिमत्वाची व असाधारण पौरुषाची पुरेपूर कल्पना असणारा मारिच रावणाला परावृत्त करतो. रावण काढता पाय घेतो. खर–दूषणादि राक्षस आणि एकाकी श्रीराम यांमधील भीषण युद्धाची आणखी एक साक्षीदार शूर्पणखा ! नाक कान कापलेली शूर्पणखा हे युद्ध पहात असते. श्रीरामाच्या अद्‌भूत पराक्रमाने तिचा थरकाप उडतो. सोडलेल्या बाणाच्या वेगाने ती रावणाकडे धांव घेते. खर दूषणादि अतिप्रचंड सुसज्ज राक्षससेनेच्या भीषण संहाराची वार्ता सांगते. ती म्हणते,

शक्रचापनिभं चापं विकृष्य कनकाङ्गदम् ।
दीप्तन्क्षिपति नाराचान् सर्पानिव महाविषान् ।
नाददानं शरान्घोरान्विमुञ्चन्तं महाबलम्
न कार्मुकं विकर्षन्तं रामं पश्यामि संयुगे ।।
हन्यमानं तु तत्सैन्यं पश्यामि शरवृष्टिभिः ।
इन्द्रेणेवोत्तमं सस्यमाहतं त्वश्मवृष्टिभिः ।।

३४: ६, ७, ८

श्रीरामाच्या पराक्रमाला त्रिभुवनात तोड नाही. श्रीराम बाण घेतो केंव्हा आणि प्रत्येंचा ओढतो केंव्हा आणि बाण सोडतो केंव्हा काही कळत नाही. डोळयांचे पाते लवते न लवते तोच सहस्त्रावधी रामबाणांची वृष्टी होत असलेली काय ती दिसते. देवराज इंद्राने सरळ उभ्या पिकावर पाषाणांचा अविरत वर्षाव करून ते पीक मातीत मिळवावे त्या प्रमाणे रामबाणांची अखंड बरसात होत असून अगण्य राक्षसांचा संहार होत असल्याचे काय ते मला दिसत होते.

नाक कान कापल्याने व्याकुळलेली,उन्मत्त, उपमर्दाने होरपळलेली खरदूषणादि वीरांच्या शिरकाणाने दुखावलेली शूर्पणखा भोगलोलुप कामी रावणाला मोहविवश करण्याकरिता लावण्यसंपन्न शुभांगी सीतेच्या अदभूत सौंदर्याचे वर्णन करताना म्हणते

सा सुकेशी सुनासोरुः सुरूपा च यशस्विनी ।
देवतेव वनस्यास्य राजते श्रीरिवापरा ।।
तप्तकांचन वर्णाभा रक्ततुङ्नखी शुभा ।।
सीतानाम वरारोहा वैदेही तनुमध्यमा ।।

३४ : १५ : १६

" देवांनाही मोह घालील असे तिचे अनुपम लावण्य आहे. अशी मदनपुतळी कोमलांगी त्रिभुवन धुंडाळूनही आढळायची नाही." शूर्पणखा रावणाला भडकवते, चेतवते.

सा सुशीला वपु:श्लाघ्या रूपेणाप्रतिमा भुवि ।
तवानुरूपा भार्या सा त्वंच तस्याः पतिर्वरः ॥
३४ : १९

सौंदर्यवती सीता भार्या म्हणून हवी असेल तर श्रीरामाच्या माथ्यावर पाय रोवून उभे राहण्याकरिता जय प्राप्तीकरिता तुझे पाऊल पुढे टाक.

भोगलोलुप रावणाच्या अंत:करणात सीतेचा विचार ठाण मांडून बसतो. त्याच्या अंगातला आसुरीअंश बळावतो. अंत:करणाची तटबंदी ढासळते. मोहविवश रावणाला सौंदर्यवती सीतेची अनिवार लालसा स्वस्थ बसू देत नाही. तो परत मारीचाकडे येतो. अबलेवर हात टाकणाऱ्या श्रीरामाच्या दुराचरणाची कथा रंगवून सांगतो. निष्कलंक, सत्वशील, धर्मनिष्ठ श्रीरामाच्या उज्वल चारित्र्याची पुरेपूर कल्पना असलेला मारिच उत्तरतो.

न च धर्मगुणैर्हीनः कौसल्यानन्दवर्धनः ।
न तीक्ष्णो हि भूतानां सर्वभूतहिते रतः ॥ ९ ॥
न रामः कर्कशस्तात नाविद्वान्नाजितेन्द्रियः
अनृतं च श्रुतं चैव नैवं त्वं वक्तुमर्हसि ॥ १२ ॥
३७ । ९, १२

राजा, तुला चुकीची माहिती मिळालेली आहे. तुझा अपसमज झाला आहे. श्रीराम अभिजात सत्वगुणाचा अर्क आहे. सरळ पुनीत मार्गाने जाणारा श्रीराम निष्कलंक निर्मळ आहे.

'श्रीराम हा मानव रूपाने अवतरलेला प्रत्यक्ष देव धर्मच आहे.

तो पुढे सांगतो

रामो विग्रहवान् धर्म : साधु : सत्यपराक्रमः ।
राजा सर्वस्य लोकस्य देवानामिव वासवः ॥ १३ ॥
शरार्चिषमनाधृष्यं चापखड्गेन्धनं रणे ।
रामाग्निं सहसा दीप्तं न प्रवेष्टुं त्वमर्हसि ॥ १५ ॥

३७: १३: १५

नुकतीच कोवळी मिसरूड फुटलेल्या, कोवळच्या, केवळ १५ वर्षाच्या युवक श्रीरामाच्या अद्‌भूत अमोघ सामर्थ्याची कल्पना आहे. तो वज्रासारखा अभेद्य आहे. विश्वामित्राने प्रबल शक्तीशाली रामाला अमोघ दुर्भेद्य अस्त्रे शिकविली आहेत.

ब्रह्मर्षी विश्वामित्राच्या यज्ञप्रसंगी मारीचाने मृगरूपाने अतिक्रमण केले होते. त्यावेळच्या श्रीरामाच्या रौद्र रूपांचे स्मरण होताच त्याची गाळण उडाली. त्याच्या छातीत धडकी भरली. डोळ्यासमोर काजवे चमकले. अंगावर उभी राहणारी दारूण व्यथा रावणाला निवेदन करून तो म्हणतो ' रामबाणाच्या तावडीतून मी कसाबसा जीव घेऊन वाट सापडेल तिकडे घूम पळत सुटलो. त्या दिवसापासून मी पावन आश्रमात एकांतात राहत आहे. रामदर्शन झाल्यापासून मी सर्व दुष्टप्रवृतींचा पापकर्माचा त्याग केला आहे. निर्मल, निष्कलंक जीवन व्यतीत करीत शांत मनाने तप करीत आहे.

श्रीरामाच्या अद्‌भुत पराक्रमाची विलक्षण दहशत बसलेला मारीच पुढे म्हणतो.

वृक्षे वृक्षे च पश्यामि चीरकृष्णाजिनाम्वरम् ।
गृहीतधनुषं रामं पाशहस्तमिवान्तकम् ।।

अपि रामसहस्त्राणि भीतः पश्यामि रावण ।
रामभूतमिदं सर्वमरण्यं प्रतिभाति मे ।।

रकारादीनि नामानि रामत्रस्तस्य रावण ।
रत्नानि च रथाश्चैव वित्रासं जनयन्ति मे ।।

३९: १५: १६: १८

लंकापते, धनुष्यबाण घेतलेल्या श्रीरामाची मूर्ती पहा. पाश घेतलेल्या कराल मृत्यूप्रमाणे मला निरंतर दिसते. प्रत्येक वृक्षावर मला राम दिसतो. हे सर्वच्या सर्व अरण्य रामाने भरलेले दिसते. राम नसताना देखील सहस्त्रावधी राम दिसतात. स्वप्नांतही कधी कधी मला राम दिसतो. रामभयाने मला दरदरून घाम फुटतो. मी जागा होतो आणि भीतीने विलक्षण आक्रंदन करू लागतो. रत्ने रथ यासारखे 'र' ने प्रारंभ होणारे शब्द देखील माझा थरकांप उडवितात. अंगावर कांटा उभा राहतो."

आणि म्हणूनच रावण नावाचे त्याला भय वाटते. रावण हट्टी दुराग्रही आहे. आपले खरे करण्याकडे त्याचा कल आहे. तो चिडतो. संतापतो. मारीचाला ठणकावतो.

अभ्यागतं तु दौरात्म्यात् परुषं वदसीदृशम् ।
गुणदोषौ न पृच्छामि क्षमं चाऽऽत्मनि राक्षस ।।
४०: १५

तुला चांगले वाईट विचारीत नाही. मला तुझा सल्ला नको न विचारता कुठलाही शहाणा बुद्धिमान मंत्री आदेश करीत नाही. माझा आदेश आहे. मी तुला सांगतो आहे.

दुराग्रही रावणाला पापकृत्यापासून परावृत्त करण्या करिता मारीच जिवाचा आटापिटा करितो. यत्नांची शिकस्त करतो. पण त्याच्या पदरात यशाचे माप पडत नाही. त्याचे यत्न मातीत मिळतात. अखेरीस तो ठणकावतो. निर्भयपणे सार्वकालीक सत्याचा अविष्कार करतो.

"तलावातील विषारी नागांना मारणाऱ्या लोकाकडून निरपराध मासेही मारले जातात. दुष्ट सर्पाचा संपर्क त्यांचाही नाश करतो. त्याचप्रमाणे दुराचारी अधमाच्या संपर्काने सुविचारी सदाचारी सरळपुनीत मार्गाने जाणाऱ्या अनेकांची धुळदाण उडते. त्यांचा सर्वनाश होतो."

रावणाचे पित्त खवळते. रागाचा पारा चढविलेला रावण मारीचाला फटकारतो.

नो चेत्करोषि मारीच हन्मि त्वामहमद्य वै ।
एतत्कार्यमवश्यं मे बलादपि करिष्यसि ।।
४० : २६

तुला माझे कार्य केले पाहिजे. माझा आदेश आहे. सांगितल्याप्रमाणे तुला वागलेच पाहिजे. माझी आज्ञा पाळलीस तर तुला अर्धे राज्य बहाल करीन आणि माझा आदेश धुडकाविलास तर मी तुझे मस्तक छाटून टाकीन. मारीचाचा निरुपाय होतो. रावणाचे मन वळविण्याचे सारे प्रयत्न मातीस मिळतात. तो कोकरासारखा अगतिक बनतो. तो म्हणतो.

'एवीतेवी मला मरायचेच आहे तर रामबाणाने देह विसर्जन करणे योग्य आहे.'

श्रीरामाच्या असीम अमोघ सामर्थ्यावर सीतेचा अपार विश्वास आहे. अतिथि बनून आलेल्या रावणाला क्रोधाविष्ट सीता दरडावते. पेटलेल्या सीतेच्या ज्वालामुखीतून तप्त लाव्हा रस बाहेर पडतो.

क्षुधितस्य च सिंहस्य मृगशत्रोस्तरस्विनः ।
आशीविषस्य वदनाद्दंष्ट्रा पादातुमिच्छसि ।।
मन्दरं पर्वतश्रेष्ठं माणिना हर्तुमिच्छसि ।।
त्वं पुनर्जम्बुकः सिंहीं मामिच्छसि सुदुर्लभाम् ।। ३९ ।।
नाहं शक्या त्वया स्प्रष्टुमादित्यस्य प्रभा यथा ।
पादपान्काञ्चनान्नूनं वहून्पश्यसि मन्दभाक् ।
राघवस्य प्रियां भार्यां यस्त्वमिच्छसि राक्षस ।।
४७, ३६, ३७, ३८. ३९

भ्याडा, माझ्या पतीच्या नखाग्राचीही सर तुला यावयाची नाही. मेरु सारखा तो अविचल आहे. इंद्रासारखा तो अजेय आहे. प्रशांत महासागरासारखा गंभीर आहे. मानवरूपाने प्रत्यक्ष सिंह अवतरला आहे. रामच माझे जीवन आहे. मी रामाचे जीवन आहे. अरे फडतूस क्षुद्र कोल्ह्याने सिंहीणीची लालसा बाळगावी त्याप्रमाणे तू राम भार्येची अभिलाषा धरीत आहेस. भीषण भुकेने तडफडणाऱ्या कराल क्रोधाविष्ट सिंहाच्या मुखातील दाढ उपटण्याची तू इच्छा करीत आहेस.

सूर्याच्या प्रभेला त्याच्या पासून वेगळे करता येईल का. ?

श्रीरामाच्या–सहधर्म चारिणीला त्याच्यापासून दूर नेता येणे शक्य नाही.

श्रीराम तुमच्या आमच्या सारखा दुःखाने व्याकुळ होत असल्याच्या ग्वाही अरण्यकांडात आहेत.

मारीच वध करून माघारा फिरणाऱ्या श्रीरामांला आश्रमांत सीता आढळत नाही. रामाच्या अंतःकरणाला सहस्त्रशः इंगळया डसतात. शोकाग्नीत तो होरपळून निघतो. दारुण असह्य यातनानी त्याचा विलक्षण तडफडाट होतो. शोक संतापाचा उद्रेक त्याला स्वस्थ बसू देत नाही. क्रोधाविष्ट श्रीराम विश्वाची राख रांगोळी करायला सिद्ध होतो. यच्चयावत सर्वाविरुद्ध तो खवळतो.

युगान्ताग्नि रिव क्रुद्ध इदं वचनमब्रवीत् ।।
यथा जरा यथा मृत्युर्यथा कालो यथा विधिः ।
नित्यं न प्रतिहन्यन्ते सर्वभूतेषु लक्ष्मण ।
तथाऽहं क्रोधसंयुक्तो न निवार्योऽस्म्यसंशयम् ।
६४ : ७५

वृक्षांना तो सीतेची वार्ता विचारतो. नद्या, सरोवरे; जलाशय, पर्वत, पशू पक्षी वगैरे यच्चावत सर्वांना सीतेची वार्ता विचारतो. कोणीच उत्तर देत नाही. असह्य मनस्तापाला बळी पडलेला राम रुद्रावतार धारण करतो.

नैव देवा न दैतेया न पिशाचा न राक्षसाः ।
भविष्यन्ति मम क्रोधात् त्रैलोक्ये वि प्रणाशिते ।।
देवदानवयक्षाणां लोका ये रक्षसामपि ।
बहुधा निपतिष्यन्ति बाणौघैः शकलीकृताः ।।
निर्मर्यादानिमाँल्लोकान् करिष्याम्यद्य सायकैः ।
हृतां मृतां वा सौमित्रे न दास्यन्ति ममेश्वराः ।।
तथारूपां हि वैदेहीं न दास्यन्ति यदि प्रियाम् ।
नाशयामि जगत्सर्वं त्रैलोक्यं सचराचरम् ।
यावद्दर्शनमस्या वै तापयामि च सायकैः ।।
इत्युक्त्वा क्रोधताम्राक्षः स्फुरमाणोष्ठसंपुटः ।।

सीतेचा ठावठिकाणा त्रैलोक्यात कुणीही सांगणारा नसेल तर मी देव, गंधर्व, मनुष्य, सर्प, या सर्व विश्वाची राख रांगोळी करीन. क्रोधातिशयाने भडकलेला राम लक्ष्मणाच्या हातातून धनुष्य हिसकावून घेतो.

त्याच्या मनाचा तोल सुटल्याविना का तो अशी विलक्षण दाणादाण उडवायला खडा होईल ?

लक्ष्मण त्याला सावरतो.

राम, मृदु, सौम्य, धीरोदात्त तर लक्ष्मण भडकलेल्या माथ्याचा शीघ्रकोपी ! पण पारडे पालटते. बेफाम सुसाट रामाला लक्ष्मण पायबंद घालतो. लक्ष्मणाचे सांत्वन अतीव सुंदर आहे.

पुरा भूत्वा मृदुर्दान्तः सर्वभूतहिते रतः ।
न क्रोधवशमापन्नः प्रकृतिं हातुमर्हसि ।।
नैकस्य तु कृते लोकान् विनाशयितुमर्हसि ।
युक्तदण्डा हि मृदवः प्रशान्ता वसुधाधिपाः ।।

सदा त्वं सर्वभूतानां शरण्यः परमा गतिः ।
को नु दरिद्रनाशं ते साधु मन्येत राघव ।।

येन राजन् हृता सीता तमन्वेषितुमर्हसि ।
मद्द्वितीयो धनुष्पाणिः सहायैः परमर्षिभिः ।।

६५,४,१०,११,१३

यदि दुःखमिदं प्राप्तं काकुत्स्थ न सहिष्यसे ।
प्राकृतश्चाल्पसत्त्वश्च इतरः कः सहिष्यते ।।

सुमहान्त्यपि भूतानि देवाश्च पुरुषर्षभ ।
न दैवस्य प्रमुञ्चन्ति सर्वभूतानि देहिनः ।।

शक्रादिष्वपि देवेषु वर्तमानौ नयानयौ ।
श्रूयेते नरशार्दूल न त्वं व्यथितुमर्हसि ।।

६६,६,१२,१३

त्रैलोक्याची राखरांगोळी करावयाला सिद्ध झालेल्या क्रोधाविष्ट श्रीरामाला धीर देणारा लक्ष्मण कळवळून विनवितो. 'आपण थोर आहोत. एकाच्या अपराधाकरिता सर्वांचा का विनाश करावयाचा. आपणासारख्या अमोघ शक्ति-संपन्न, धर्मनिष्ठ, महापुरुषाला शोभणारे काय हे कर्म आहे ? ही दारुण आपत्ती तू सहन केली नाहीत तर कमी धैर्य असलेला कोणता सामान्य मानव संकटाशी झुंज घ्यावयाला समर्थ होईल. पुरुषश्रेष्ठा, धीर धर, हिम्मत सोडू नकोस. जगांत कोणावर संकटे कोसळत नाहीत ? कोणाला त्या धगधगत्या आगेची आंच सहन करावी लागत नाही ? धैर्याने तोंड दिले असताना काही क्षणांत ती नष्ट होत नाहीच काय ? ही नियतीच आहे. मनुष्य थोर असला अमोघ शक्ती बुद्धी संपन्न असला एवढेच काय परंतु देव जरी असला तरी कुणीही दैवाच्या बंधनातून सोडवणूक करून घ्यायला समर्थ नाही. मग सामान्य मानवाची काय कथा ? सर्व गोष्टीकडे लक्ष पुरविणारे निश्चित, अखंड सावध असलेले, कधीही खिन्न न होणारे महापुरुष भीषण संकटातही डगमगत नाहीत.'

श्रीराम जटायुची भेट होते. प्राणज्योत मालवू लागते. आसन्न मरण जटायु विदारक सत्य सांगतो. श्रीराम थरारतो. वृद्ध पक्षिराजाची मुलासारखी उत्तर-

क्रिया करतो. राम त्याला मुक्ती देतो. राम शोक करतो 'पत्तरानेही रडावे अशा दारुण आपत्ती माझ्यावर कोसळत आहेत. पक्षिराज गेला. आगीपेक्षा माझी आग भयंकर आहे. जटायूच्या मृत्यूची आपत्ति इतकी भयानक आहे की प्रत्यक्ष आगीलाही भस्म करील.

राज्यं भ्रष्टं वने वासः सीता नष्टा मृतो द्विजः ।
ईदृशीयं ममालक्ष्मीर्दहेदपि हि पावकम् ।।
संपूर्णमपि चेदद्य प्रतरेयं महोदधिम् ।
सोऽपि नूनं ममालक्ष्म्या विशुष्येत्सरितां पतिः ।।

६७,२४,२५

सीता स्त्रीविशुद्धतेचा परमचरण आहे. तिच्या उज्वल जीवनातील काही विशेष प्रकर्षाने अरण्यकांडात आढळतात. सीता श्रेष्ठ पतिव्रता आहे पतीतच तिचे सत्व लोप पावले आहे. अकलंकित पुण्यपावन सीता पतीकरिता स्वतःला सर्व त्यागाच्या, मृत्यूच्या धगधगत्या होमकुंडात झोकून द्यायला सिद्ध आहे.

सीतामाईच्या माथ्यावर दोषांचे वापर फोडण्यांत येते अशी वेळ अतीव महत्वाची घटना अरण्यकांडात आढळते. कांचनमृगाचा सावलीसारखा पिच्छा पुरविणारा एकाकी श्रीराम दूरवर जातो. मारीच रामाच्या आवाजात आर्त टाहो फोडतो. 'सीते लक्ष्मणा'. सीता मनस्वी भेदरते. तिच्या तोंडचे पाणी पळते; लक्ष्मणाला ती रामाच्या सहाय्याला जाण्याकरिता विनवते. अविचल विरोधात लक्ष्मण उत्तरतो, 'त्रैलोक्यांत महापराक्रमी रामासमोर उभे राहण्याची कोणाचीही प्राज्ञा नाही. भिऊ नकोस. शिवाय तुला एकाकी सोडून कसा जाऊ? रामाचीच आज्ञा आहे.'

शोकसंतापाने होरपळलेल्या व्याकुळलेल्या हळव्या मनाच्या सीतेचा तोल सुटतो. ती काय बोलते ते तिचे तिला समजत नाही. तिला फक्त आपत्तीच्या कात्रीत सापडलेला राम दिसतो. ती स्वतःचीही पर्वा करीत नाही, तिथे लक्ष्मणाची काय पर्वा करणार? शोक दुःखाने व्याकुळलेल्या, क्रोधाने पेटलेल्या वैदेहीच्या मुखातून कठोर वाग्बाण बाहेर पडतात, ज्वालामुखीचा स्फोट होतो.

सीतेच्या माथ्यावर वज्राघात झाला आहे. बेफाम संतप्त सीता तोलून मापून कसे बोलू शकेल? तिच्या मुखातून मृदु मधुर शब्द बाहेर पडावेत अशी

का अपेक्षा करावी ? आपत्तीचे आभाळ कोसळत असताना कोण शांत अविचल राहू शकेल ? पतीतच सत्व विलीन झालेल्या साध्वी सीतेकडून मात्र आम्ही ती अपेक्षा करतो.

बाका पेचप्रसंग ओढवला आहे. जवळपास लक्ष्मणाशिवाय दुसरे कोणीही नाही. सीता दुसऱ्या कोणाची मदत घेणार ? कोण होते तिथे ? करारी खंबीर लक्ष्मण जायला तयार नाही. रामाला दगाफटका करण्याची कुणाची प्राज्ञा नाही अशी लक्ष्मणाची बालंबाल खात्री आहे. सीता संतापाने बेफाम होते तिच्या नेत्रातून आगीचे लोळ बाहेर पडतात. त्वेष संचारतो. सीता लक्ष्मणाला नाही नाही ते बोलते. त्याचा उन्मत्त उपमर्द करते. त्याच्यावर जळजळीत कोरडे ओढते.

मम हेतोः प्रतिच्छन्नः प्रयुक्तो भरतेन वा ।
तन्न सिध्यति सौमित्रे तव वा भरतस्य वा ।।
गोदावर्तं प्रवेक्ष्यामि हीना रामेण लक्ष्मण ।
आवन्धिष्येऽथ वा त्यक्ष्ये विषमे देहमात्मनः ।।
पिबामि वा विषं तीक्ष्णं प्रवेक्ष्यामि हुताशनम् ।
न त्वहं राघवादन्यं पदापि पुरुषं स्पृशे ।।

४५:२४:२५:३८

'सौमित्रा ! तू जात नाहीस ना ? मी तुझा आणि भरतचा दुष्ट कावा सिद्धीला जाऊ देणार नाही. तुझे दांत तुझ्याच घशात घालीन. मी प्राणत्याग करीन. गोदावरीत उडी घेईन. गळफास लावून घेईन. कडेलोट करून घेईन. जालीम विष खाईन. अग्नि प्रवेश करीन. मला परपुरुषाचा विटाळ कदापि व्हावयाचा नाही.'

तन्न सिध्यति सौमित्रे तव वा भरतस्य वा ।
समक्षं तव सौमित्रे प्राणांस्त्यक्ष्ये न संशयः ।।

४५:२५:२६

गरीब बापडा लक्ष्मण काय करणार ? सीतेच्या हृदयद्रावक आक्रंदाने आणि भयानक धमकीने हादरतो. सीतेच्या मनाचा तोल सुटला होता. भडकलेली खंबीर महानिश्चयी सीता देहत्याग करायला देखील मागे पुढे पहाणार नाही हे त्याला स्वच्छ दिसत होते. तसे काही घडले तर ? नवी दारुण आपत्ती ओवढली असती. लक्ष्मणाचा निरुपाय होतो. तो केवळ अनिच्छेने, सक्तीने जातो.

रामाची प्रतिक्रिया वाचकाचे लक्ष लोहचुंबकासारखी खेचून धरते. सीता लक्ष्मणावर त्याची सारखीच प्रीति असते. तो म्हणतो.

" अनेन क्रोधवाक्येन मैथिल्या निर्गतो भवान् ।।
न हि ते परितुष्यति त्यक्त्वा यदसि मैथिलीम् ।
क्रुद्धायाः परुषं श्रुत्वा स्त्रियाश्च यत्त्वमिहागतः ।।

५९:२२:२३

सर्वच्या सर्व राक्षस एकवटले तरी देखील त्यांना वठणीवर आणावयाला मी एकटाच समर्थ आहे. फडतूस मारीच माझ्या वाऱ्याला तरी उभा राहू शकेल का ? माझ्या अनेक सामर्थ्याची तुला पुरेपूर जाणीव असताना तू निघून आलास ? केवळ सीता रागावली म्हणून तिला एकाकी टाकून आलास ? खंबीर धीरोदात्त श्रीराम पुढे म्हणतो.

सर्वथा त्वपनीतं ते सीतया याप्रचोदितः ।
क्रोधस्य वशमात्रम्य नाकरोः शासनं मम ।।

५९:२४

क्रोधाधीन सीता वेडयासारखी भ्रमिष्टा सारखी बोलली. तिच्या आक्षेपाकडे कानडोळा का केला नाहीस ? कर्तव्यापासून तू का चळलास ? माझ्या आज्ञेचे उल्लंघन का केलेस ? पतीवेगळे जीवन नसलेल्या, क्रोधाने भडकलेल्या शोकदुःखाने व्याकुळलेल्या सीतेचा तोल सुटल्यास नवल काय ? तिला दोष देता येणार नाही. क्रोधाधीन सीतेवर तू वेडयासारखा कसा काय रागावलास ?"

सीता रागावली होती. तिने लक्ष्मणाला दूषणे द्यावयाला नको होती असे राम म्हणत नाही. सीतेला दोष न देता लक्ष्मणाला तो अपराधी ठरवितो.

कथंचिद्सहने बहिरागत्यान्तर्हितो भूत्वा तत्परिपालनं कर्तव्यम् ।
केवलमात्रमनं तवापनीतिरेवेति भावः ।

गोविंदराज भाष्यकार म्हणतो, लक्ष्मणाने जावयास नको होते, चातुर्याने कुठेही सीतेच्या दृष्टोआड दूर दडून राहावयाचे, संकटातून तिची मुक्तता करावयाची. रामाला तसे सुचवावयाचे नव्हते ना ? रावण संन्यासी होऊन येतो त्यावेळी तो विचारतो. तू कोण ? सीता उत्तर देते.

तस्य भ्राता तु द्वैमात्रो लक्ष्मणो नाम वीर्यवान् ।
रामस्य पुरुषव्याघ्रः सहाय· समरेऽरिहा ।।
स भ्राता लक्ष्मणो नाम ब्रह्मचारी दृढव्रतः ।

४७:१८:१९

दृढव्रत धर्मचारी असा लक्ष्मणाचा उल्लेख करते. तिच्या मनात राग असता तर तिने त्याला लक्ष्मणाच्या सत्वशीलतेची ग्वाही दिलीच नसती. केवळ रामाच्या साहाय्याला त्याने जावे हा तिचा उद्देश स्पष्ट होतो.

रावणाचा दृष्ट कावा कळताच ती खवळते.

"अवश्यं विनशिष्यन्ति सर्वे रावण राक्षसाः
येषां त्वं कर्कशो राजा दुर्बुद्धिरजितेन्द्रियः ।।

४८:२२

दारुण संकटात, दुःखातही तिच्या मनाचा तोल जात नाही. ती सावध असते.

रावण तिला पळवून नेतो. तशाही अवस्थेत पंपा सरोवरावरून जात असताना ऋष्यमूक पर्वतावरचे पाच वानर तिचे लक्ष वेधून घेतात.

राम कदाचित या वाटेने गेलाच तर आपला ठाव ठिकाणा म्हणून ती उत्तरीय अलंकार टाकते.

ह्रियमाणा तु वैदेही कंचिन्नाथमपश्यती ।
ददर्श गिरिशृङ्गस्थान् पञ्च वानरपुङ्गवान् ।।
तेषां मध्ये विशालाक्षी कौशेयं कनकप्रभम् ।
उत्तरीयं वरारोहा शुभान्याभरणानि च ।।

५४:१:२

लक्ष्मणाच्या अत्युत्कट भक्तीलाही तोड नाही. सर्वस्व पणाला लावून तो राम जानकीची सेवा करतो. यमुना पार करण्याकरिता त्याने वृक्षाच्या फांद्यांचा तराफा बनविला. चित्रकूटावर पर्णशाळा बांधली. तोच फळे कंद मुळे, आणतो. होम कर्माची सिद्धता करतो.

शूर्पणखाही "रामस्य दक्षिणो बाहुः" असे लक्ष्मणाबद्दल उद्गार काढते. तत्कालीन समाजाचा फलज्योतिषावर विश्वास होता. शकुन, स्वप्न आणि उल्कापाताची अनेक उदाहरणे अरण्यकांडात आढळतात.

विंद मुहूर्तावर रावण सीतेचे अपहरण करतो. त्या मुहूर्तावर नष्ट झालेले धन त्वरित सांपडते. रावणाकडून अनवधानाने हा प्रमाद घडला होता. जटायु रामाला त्या मुहूर्ताची माहिती देतो.

वाल्मीकी रामायणानंतरच्या काव्य पुराणांतही रामकथेत पुष्कळ फिरवा-फिरव झालेली आढळते. लक्ष्मण हा शेषांचा अवतार नागाप्रमाणे वायु भक्षण करतो. चौदा वर्षांच्या अरण्यवासातील काळात त्याने आहार केला नाही, तो निजला नाही असे वाल्मिकीनंतरचे संत सांगतात. वाल्मिकी रामायणात त्याला आधार नाही.

ऋषीमुनींनी लक्ष्मणासह श्रीरामाला फळे, मुळे अर्पण केली. अगस्तीच्या आश्रमात तिघांनी बरोबर भोजन केल्याचा निःसंदिग्ध उल्लेख आहे.

अयोध्याकांडात भरद्वाज मुनीच्या आश्रमातून रामलक्ष्मण पुढे जातात यमुना तीरावरच्या अरण्यांत मुक्काम करतात. रामाने लक्ष्मणाला हाक मारून उठविले असा स्पष्ट उल्लेख आहे.

एतेन चतुर्दशवर्षपर्यन्तं लक्ष्मणः स्वापहीनः
अनाहारश्च इति लोकप्रवादः अपारतः ।

लक्ष्मणाने चौदा वर्षे निद्रा व आहार घेतला नाही असा लोकाअपवाद आहे, तो चुकीचा आहे.

रामाने शबरीची बोरे खाल्याचा उल्लेख वाल्मिकी नंतरच्या संत साहित्यात आढळतो. मूळ कथेत त्याला आधार नाही. शबरी तपस्विनी आहे. योगिनी आहे. तिने श्रीरामाचे पूजन केले आहे. उत्तमोत्तम फळे पुष्पे श्रीरामाला समर्पण केली आहेत. ती चाखलेली फळे नाहीत. बोराचे नावही आढळत नाही. श्रीराम दर्शनाकरिता तिने देह ठेवलेला असतो श्रीराम दर्शनानंतर ती तपस्विनी योग सामर्थ्याने अग्नीत देह विसर्जन करते.

श्रीरामाने उष्टी बोरे खाल्याचा उल्लेख पुराणांतही नाही. पद्म पुराणात केवळ बोराचा उल्लेख आहे. परंतु ती उष्टी नाहीत.

सहाव्या सर्गात तत्कालीन तप करणाऱ्या मुनींच्या तपाचरणाचा निर्देश आहे.

वैखानसः (नखे वाढविणारा)
वालारविव्य : (केसा वाढवणारे)
संप्रक्षाला : (विशेष स्नान घेणारे)

मरीचया : (सूर्य किरणांत बसणारे)
अन्नकुट्टा : (कुटलेले अन्न खाणारे)
पत्राहारा : (पाने खाऊन राहणारे)
दन्तोलुखलिन : (दांताने चावून खाणारे)
उन्नज्जका : (पाण्यांत बसून जप करणारे)
गात्रशय्या : (भूमीवर काही न अंथरता निजणारे)
अशय्या : (बिछान्यावर न निजणारे)
अवकाशिका : (एका पायावर उभे राहून तप करणारे)
सलिलाहारा : (पाणी पिऊन राहणारे)
वायुभक्षा : (वायु भक्षण करणारे)
आकाश निलया : (आकाशाखाली राहणारे, घर नसणारे)
स्थंडिल शायिन : (ओटयावर निजणारे)
उर्ध्ववासिन : (उंच स्थानावर राहणारे)
दान्ता : (इन्द्रियाना जिंकणारे)
आर्द्रपट वासस : (ओले वस्त्र नेसणारे)
सजपा : (सदा जप करीत राहणारे)
तपोनिष्ठा : (तप करण्यातं निमग्न)
पञ्चलाअग्नीता : (पंचाग्नी साधन करणारे)

(उन्हाळयात सूर्य व चारी बाजूला अग्नी पेटवून मध्ये बसणारे) अरण्यकांडांत लालित्यपूर्ण रुचिर शब्दमौक्तिकांची मुक्त हस्ताने उधळण आहे. चमकदार समर्पक उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्त आणि अनेक अर्थगर्भ काव्यालंकार, जडित स्थळांची रेलचेल आहे. विविध रसांचा उत्कृष्ट अविष्कार आहे. राम - लक्ष्मण - जानकीच्या जीवनचरित्रांतील काही छटा तर फारच बहारीने रंगविल्या आहेत. ब्रह्मर्षी वाल्मिकींच्या अत्युत्कट भावस्निग्ध रसाविष्काराला तोड नाही. मर्मग्राही, गुणज्ञ रसज्ञ, रसवेत्त्यांना रसपान करण्यास किती तरी स्थळे आहेत. अनेक स्थळांचा उल्लेख करण्याचा मोह आवरत नाही. परंतु पृष्ठांची मर्यादा ध्यानांत घेऊन तो मोह आवरला आहे.

या वैभवशाली जगाहून अधिक संपन्न विश्वाचे दर्शन घडविणाऱ्या माणसाचे पातक धुवून टाकणाऱ्या अध:पाताच्या गर्तेतून वर खेचण्याचे सामर्थ्य असणाऱ्या वाल्मिकि रामायणातील अरण्यकांडात आपणही अवगाहन करूया.

* *

# किष्किंधाकाण्ड

संस्कारक्रमसंपन्नामद्‌भुतामविलम्बिताम् ।
उच्चारयति कल्याणीं वाचं हृदयहारिणीम् ।।
४।३।३२

किष्किंधाकाण्ड अवघे ६७ सर्ग, २४८१ श्लोकांचे सर्वात लहान, परंतु, अनेकविध दृष्टींनी चिरस्मरणीय आहे. अमृतातेही पैजा जिंके अशी वाल्मीकींची प्रसन्न, सघन वाणी, साक्षात अमृतमय होऊन तुफान वेगाने किष्किंधाकाण्डात वाहते आहे.

किष्किंधाकाण्डात प्रथमच 'बुद्धिमतां वरिष्ठम्' हनुमंताचे दर्शन घडते. ऋष्यमूक पर्वतावरील पहिल्याच भेटीत त्याने श्रीरामप्रभूचे चित्त वेधून घेतले आहे. दोघांत रक्तापेक्षाही अधिक निकटचा जिव्हाळा निर्माण झाला आहे.

संस्कृत भाषेवरील असामान्य प्रभुत्व, सरस्वतीच्या निस्सीम भक्तालाही खाली पहावयास लावणारी शास्त्र पारंगतता, मातबर मुत्सद्यावर मात करणारी धुरीणता, सर्वंकष लोकोत्तर बुद्धिमता वगैरे अद्‌भुत गुणांचा रामप्रभूशी झालेल्या त्याच्या प्रसन्न, सहजमनोहर भाषणात अविष्कार झाला आहे.

अतुल बुद्धिमत्ता असलेला चरित्रधन रामप्रभूही हनुमंताच्या अर्थगर्भ, निष्कपट विचार व अभिव्यक्ती यांचा मेळ असलेल्या प्रांजळ वाणीने स्तिमित झाला आहे. गुणसमृद्ध हनुमंतावर स्तुतिसुमनांची बरसात करताना तो लक्ष्मणाला म्हणतो......

नानृग्वेदविनीतस्य नायजुर्वेदधारिणः
नासामवेदविदुषः शक्यमेवं प्रभाषितुम् ।।
नूनं व्याकरणं कृत्स्नमनेन वहुधा श्रुतम् ।
वहु व्यावहरतानेन न किंचिदपशब्दितम् ।।
न मुखे नेत्रयोश्चापि ललाटे च भ्रुवोस्तथा ।
अन्येष्वपि च सर्वेषु दोषः संविदितः क्वचित् ।।

अविस्तरमसंदिग्धमविलम्बितमव्यथम् ।
उरस्थं कण्ठगं वाक्यं वर्तते मध्यमस्वरम् ।।
संस्कारक्रमसंपन्नामद्भूतामविलम्बिताम् ।
उच्चारयति कल्याणीं वाचं-हृदयहर्षिणीम् ।।
अनया चित्रया वाचा त्रिस्थान व्यञ्जनस्थया ।
कस्य नाराध्यते चित्तमुद्यता सेररेरपि ।।
एवंविधो यस्य दूतो न भवेत्पार्थिवस्य तु ।
सिध्यन्ति हि कथं तस्य कार्याणां गतयोऽनघ ।।
एवंगुणगणैर्युक्ता यस्यस्यु: कार्यसाधका: ।
तस्य सिध्यन्ति सर्वार्था दूतवाक्यप्रचोदिता: ।।

वेदवेदांगे आणि सर्वंच्या सर्व शास्त्रांत सुस्नात झालेल्या विशुद्ध हनुमंताची अत्युत्कट जिव्हाळ्याची अमृतरसाने रसरसलेली ध्वन्यार्थवाही, भावस्निग्ध वाणी, धारदार खड्ग उपसून चाल करून येणाऱ्या वैऱ्यांचेही अंत:करण काबीज करील.

आभाळ कोसळले तरी न डगमगणारा वीरवर हनुमंत कुठल्याही दारुण आपत्तीला वाकवायला समर्थ आहे. राजा सुग्रीवाचा हनुमंतावर अनन्यसाधारण विश्वास आहे.

तार, जांबवान, नल, नील, अंगद वगैरे एकापेक्षा एक वरचढ शक्तीशाली वानरवीर सीतादेवीचा ठावठिकाणा हुडकायला गेले.

नेमक्या हनुमंताला राजा सुग्रीव म्हणतो, माझी आणि रामप्रभूची सारी मदार तुझ्यावरच आहे. दिवकालालाही तू आपल्या कार्याकरिता राबवशील. ( सर्ग ४४ )

हनुमंताच्या असीम कर्तृत्वशक्तीचा साक्षात्कार झालेल्या सुग्रीवाच्या नि:संदिग्ध भाषणाने रामप्रभूंचा त्याच्यावरचा विश्वास दुणावला आहे. हनुमंताला अंगठी देताना श्रीरामप्रभू म्हणतात,

अनेन त्वां हरिश्रेष्ठ, चिह्नेन जनकात्मजा ।
मत्सकाशादनुप्राप्तमनुद्विग्नाऽनुपश्यति ।।
व्यवसायश्च ते वीर सत्वयुक्तश्च विक्रम: ।
सुग्रीवस्य च संदेश: सिद्धिं कथयतीव मे ।।

४४.१३-१४

ही खुणेची अंगठी जानकीच्या नजरेस पडताच तिच्या मनातील संशय-पिशाच्च काढता पाय घेईल. राजा सुग्रीवाची तुझ्या असामान्य कर्तृत्वशक्तीवरील श्रद्धा, तुझे अतुल शौर्य, वीर्य, पराक्रम, चातुर्य, साहस आणि जबर आत्मविश्वास यामुळे तू हमखास विजयश्री खेचून आणशील अशी ग्वाही देत आहेत.

प्रभू रामचंद्राच्या हनुमंतावरील अनन्यसाधारण विश्वासांचे हे निदर्शन नाही का ? ( सर्ग ४४ )

राम मानव असल्याचे शोकदुःखाने चिडल्याच्या काही साक्षी किष्किंधाकाण्डात आहेत.

वालीवध होतो. सुग्रीव राजा होतो. किष्किंधेला त्याला राज्याभिषेक होतो. राम–लक्ष्मण प्रतिज्ञेप्रमाणे प्रस्त्रवण पर्वत गुहेत राहतात.

सुग्रीव रंगतो. विलासात मश्गुल होतो. कामिनी मद्यपानात धुंद होतो. राम बेचैन होतो. चार महिने कसे काढायचे ? तो व्याकुळतो. लक्ष्मण त्याचे सांत्वन करतो.

शोचन्तो ह्यवसीदन्ति सर्वार्था विदितं हि ते।
अलं वीर व्यथां गत्वा न त्वं शोचितुमर्हसि ॥

लक्ष्मण आवेगाने अखेरीस म्हणतो,

पृथिवीमपि काकुत्स्थस्य स सागरवना चलाम् ।
परिवर्तयितुं शक्तः किं पुनस्तं हि रावणम् ॥

वाल्मीकीचं भाषेवर प्रभुत्व, रुचित्व अलंकाराची विलक्षण आवड आहे वागीश्वरी हात जोडून त्यांच्यासमोर खडी आहे. मानवी स्वभावाच्या अतिसूक्ष्म छटा बहारीने रंगवण्यात त्यांचे कौशल्य बिनतोड आहे. सीता वियोगाग्नीने होरपळलेला प्रस्त्रवण पर्वत गुहेतील राम व्याकुळतो.

एषा धर्मपरिक्लिष्टा नववारिपरिप्लुता ।
सीतेव शोकसंतप्ता महीवाष्पं विमुञ्जीति ॥
मेघोदर विनिमुक्ता कर्पूरदलशीतला ।
शक्यमञ्जलिभिः पातुं वाता केतकगंधिनीः ।
एष फुल्लार्जुनः शैलः केतकैरभिवासितः ।
सुग्रीव इव शांतारिर्धाराभिरभिषिच्यते ।

निसर्ग पाहतानाही त्याला सीतेविना काही सुचत नाही. दिसत नाही.

नीलमेघाश्रिता विद्युत्स्फुरन्ती प्रतिभाति ये ।
स्फुरन्ती रावणस्याङ्के वैदेहीव तपस्विनी ।।

वर्षकाळाने सीमा गाठली असते. रामाला दु:ख असह्य होते.

इमा:स्फीतगुणा वर्षा: सुग्रीव: सुखमश्नुते ।
विजितारि: सदारश्च राज्ये महति च स्थित: ।।
अहं तु हृतदारश्च राज्याच्च महतश्च्युत: ।
नदी कूलमिव क्लिन्नमवसीदामि लक्ष्मण ।।

राज्य मिळाले. पत्नी मिळाली. सुग्रीव सुखावला,आणि मी...

अयात्रां चैव दृष्ट्वेमां मार्गांश्च भृशदुर्गमान् ।
प्रणते चैव सुग्रीवे न मया किंचिदीरितम् ।।
अविचातिपरिक्लिष्टं चिराद्दारै: समागतम् ।
आत्मकार्यगरीयस्त्वा द्रवतुं नेच्छामि वानरम् ।।
स्वयमेव हि विश्रम्य ज्ञात्वा कालमुपागतम् ।
उपकारं च सुग्रीवो वेत्स्यते नात्रसंशय: ।।

अत्युत्कट अद्भुतरम्य व्यक्तिदर्शनाने वाचकाच्या चित्तवृत्ती गंगाजलात सुस्नात झाल्याप्रमाणे प्रसन्न, शुचिर्भूत होतात.

वानरराज सुग्रीव प्रभू रामचंद्राला सीतादेवीची वस्त्रे आणि अलंकार दाखवतो. पायावर वज्राघात झालेला दु:खार्त राम टाहो फोडतो. लक्ष्मणा, जानकीची ही भूषणे पाहिलीस का? सीतेच्या अंगावर असल्यासारखे, अगदी जतेच्या तसे आहेत. तृणाच्या मखमलीवर पडले असावेत. बघ विशुद्धतेचा परम चरण असलेला धुतल्या तांदळासारखा अकलंकित लक्ष्मण उत्तरतो,

नाहं जानामि केयूरं, नाहं जानामि कुंडले ।
नूपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात् ।।

सीतादेवीच्या मुखाकडे त्याने कधीच नजर वळवली नाही. प्रतिदिनी जानकीला वंदन करताना तिचे चरणच काय ते त्याच्या दृष्टीस पडत. देवीची नुपुरेच फक्त तो ओळखतो. .........................

लक्ष्मणाच्या अद्‌भुतरम्य चारित्र्याच्या अविष्काराचा किष्किधाकाण्ड आणखी एक साक्षीदार आहे.

भोगविलासात रंगलेला सैराट मोहविवश सुग्रीव रामकार्याकडे पाठ फिरवतो. वर्षाऋतु संपतो. राम वाट पाहतो. सुग्रीव वळत नाही. लक्ष्मणाला कठोर आज्ञा देतो.

उपकारेण वीरस्तु प्रतिकारेण युज्यते ।
अकृतज्ञो प्रतिकृती हन्ति सत्ववतां मनः ।।

मी वालीला एकटचालाच ठार केले. पण सुग्रीवाला आप्तस्वकीयांसह लोळवीन. सुग्रीवाला ठार करून अंगदाला राज्याभिषेक करण्याचा तो संकल्प करतो. तो कडाडतो, मी सारेच संपवून येतो.

रामाच्या लक्षात येते. तो मृदुमधुर शब्दात सांगतो.

'लक्ष्मणा, तापलेल्या डोक्याची आततायी कृती करू नकोस. घिसाडघाईने कुकर्मी सुग्रीवाला ठार करू नकोस. सुग्रीवाच्या इतिश्रीने आपला कार्यभाग साधणार नाही. वानरराजास केवळ वचनाचे स्मरण करून दे. सुग्रीवाच्या मदतीनेच सीता शोधाचे कार्य शेवटास नेता नेईल. त्याला दुखवू नकोस,

लक्ष्मणाने रुकार दिला. पण त्याचे माथे विलक्षण भडकले होते. तो सारे विसरला. तो जातो.

शक्रबाणासनप्रख्यं धनुः कालान्तकोपयम् ।
प्रगृह्य शिरिशृङगाभं मन्दरः सानुमानिव ।।

इंद्रचापासारखे उग्र धनुष्य घेतलेल्या संतप्त लक्ष्मणाच्या नेत्रातून आगीचे लोट बाहेर पडत होते. जोमदार वेगवान पावलांनी पृथ्वीचा थरकाप उडाला होता. साल, ताल, अश्वकर्ण वगैरे प्रचंड वृक्ष उन्मळून पडत होते. संतापाने बेभान झालेल्या सुमित्रानंदनाने पर्वतशिखरे चुरडून टाकली. अजस्त्र अतिप्रचंड वृक्षांचे तुकडे केले. पायतळीच्या प्रचंड वृक्षशिळांचा चुराडा उडवला. तुफान वेगाने जाणाऱ्या लक्ष्मणाने काही क्षणातच नगरसीमाप्रवेश केला. अनावर संतापाने बेभान झालेला लक्ष्मण रंग बदलणाऱ्या, दगाबाज, कृतघ्न सुग्रीवाचे मस्तक छाटण्याच्या इराद्याने किष्किधेत पाऊल टाकतो.

स्त्री नजरेस पडताच अवघडल्यासारखे वाटणाऱ्या, ओशाळणाऱ्या लक्ष्मणाच्या व्यक्तित्वाचा हा पैलू सुग्रीवाने अचूक हेरलेला असतो. चाणाक्ष

वानरराज स्वत:च्या बचावाकरिता त्याचा बिनतोड उपयोग करून घेतो. तो तारेला लक्ष्मणाकडे पाठवतो. तारेला तो म्हणतो

अथवा स्वयमेवैनं द्रष्टुमर्हसि भामिनि ।
वचनैः सान्त्वयुक्तैश्च प्रसादयितुमर्हसि ।।
त्वद्दर्शनविशुद्धात्मा, न स कोपं करिष्यति ।
न हि स्त्रीषु महात्मानः क्वचित्कुर्वन्ति दारुणम् ।।
त्वया सान्त्वैरुपक्रांतं प्रसन्नेन्द्रियमानसम् ।
ततः कमलपत्राक्षं द्रक्षाम्यहमरिंदमम् ।।
३३–३५–३७

रेशमी आवाजात, मृदुमधुर वाणीने आर्जवी स्वरात खवळलेल्या क्रोधाविष्ट लक्ष्मणाला प्रसन्न कर. नंतरच मी त्याची भेट घेईन. सुग्रीवाच्या अंत:पुरात पाऊल ठेवणाऱ्या लक्ष्मणाच्या कानावर नृत्यांगनांच्या नुपुरांचे आणि रशनांचे निनाद येतात. तो विलक्षण ओशाळतो.

कूजितं नूपुराणां च काञ्चीनां निःस्वनं तथा ।
स निशम्य ततः श्रीमान्सौमित्रिर्लज्जितोऽभवत् ।।
३३–२५

आणि तारा येताच तो मान खाली घालतो. खालची नजर वर करीत नाही. चातुर्यालाही शहाणे करणारी तारा सुग्रीवाच्या चिंधोटया करायला आलेल्या लक्ष्मणाचे सांत्वन करताना गंभीर पणाने बजावते.

नैवं लक्ष्मण वक्तव्यो नायं परुषमर्हति ।
हरीणामीश्वरः श्रोतुं तव वक्त्राद्विशेषतः ।।
रामप्रसादात्कीर्तिं च कपिराज्यंच शाश्वतम् ।
प्राप्तवानिह सुग्रीवो रुमां मां च परंतप ।।
रुमां मामङ्गदं राज्यं धनधान्यपशूनि च ।
रामप्रियार्थं सुग्रीवस्त्यजेदिति मतिर्मम ।

"सुग्रीव माझे पति सामान्य नाहीत. वानरांचा अधिपति आहे, थोर राजा आहे. विसरू नकोस. सामान्य पोरकटापेक्षाही त्याला निम्नतर कनिष्ठ मानतोस. सुग्रीव कृतघ्न विश्वासघातकी नाही. त्याचे काळीज उफराटे नाही. श्रीरामाच्या असीम ऋणांची त्याला विस्मृती पडली नाही. कर्तव्याचो अखंड

अहर्निश आठवण आहे. त्याने केव्हाच शुभारंभ केला आहे. त्याच्या उज्वल स्वभावाची पारख झाली तर त्याची तू प्रशंसा करशील. श्रीरामाकरता तो सर्वस्वच वलीदान करील. प्राण समर्पिल."

लक्ष्मणाचा संतापाचा पारा उतरला होता. राजा सुग्रीवाने सैनिकांना केव्हाच आदेश दिला आहे. सर्व जय्यत तयारी आहे. पंधरा दिवसातच सर्व वानरसेना येईल. कोटी-कोटी वानरवीर किष्किंधेत दिसतील.

लक्ष्मण निवळला. आशु कोप: आशुतोष: लक्ष्मणाचे अंत:करण गगनासारखे असीम आहे. त्याचे माथे जसे चटकन भडकते, तसे जलद थंड होते. चूक उमगताच धुतल्या तांदळासारखा निर्मळ सरळमार्गी निष्कपटी लक्ष्मण अनुताप व्यक्त करतो.

गगनासारखे विशाल मन असलेला लक्ष्मण सुग्रीवाची क्षमा मागतो.

दोषज्ञ: प्रतिसामर्थ्ये कोऽन्यो भाषितुमर्हति ।
वर्जयित्वा मम ज्येष्ठं त्वां च वानरसत्तम ।।
सदृशश्चासि रामस्य विक्रमेण बलैन च ।
सहायो दैवतैर्दत्तश्चिराय हरिपुंगव ।।
किं तु शीघ्रमितो वीर निष्काम त्वं मया सह ।
सांत्वयस्व वयस्यं त्वं भार्याहरणदु:खितम् ।।
यच्च शोकाभिभूतस्य, श्रुत्वा रामस्य भाषितम् ।
मया त्वं परुषाण्युक्तस्तच्च क्षमस्व सखे मम ।।
३६-१७-२०

अपराध्याला शासन करण्याची कुवत असतानाही मला क्षमा करणारा तू महापुरुष आहेस. माझे थोरले बंधू सत्वशील रामप्रभू आणि तू या दोघा व्यतिरिक्त सागरासारखे असीम अंत:करण असणारा पुरुषोत्तम शोधून ही आढळायचा नाही. रामप्रभूच्या तोडीस तोड असे तुझे शौर्य, वीर्य, बल साहस आहे. तुझ्यासारखा असामान्य जीवाभावाचा सखा लाभल्याने आमचे भाग्य फळफळले आहे. वीरश्रेष्ठा, दु:खाचा वज्राघात झाल्यामुळे खचलेल्या रामप्रभूचे सांत्वन करण्याकरता आपण दोघे असेच जाऊ. निखाऱ्यासारख्या जळजळीत, तिखट, करड्या वाणीने मी तुझी मानखंडना केली. विलक्षण उपमर्द केला, मित्रा, मला क्षमा कर.

यदि किंचिदतिक्रान्तं विश्वासात् प्रणयेन वा।
प्रेष्यस्य क्षमितव्यं मे न कश्चिन्नापराध्यति।।

३६:११ रामायणात

प्रत्येकाने हृदयाशी बाळगावे, आचरणात आणावे असे भावगर्भ सुभाषित ! रामाने काढता पाय घेतला. विश्वात कोण असा आहे की जो चूक करीत नाही? ज्याच्याकडून प्रमाद घडत नाही. अमोघ शक्तिशाली, चारित्र्यधन लक्ष्मणाच्या उदात्त अंतःकरणाची अद्भूतरम्य विशालता अतुल आहे.

प्रभू रामचंद्राच्या विशुद्ध, परमपावन, निर्लेप, उज्वल, अभंग चारित्र्याच्या तटबंदीला वालीवधाचा तडा पडल्याचा ताशेरा शतकानुशतके झाडणेत आला आहे. समर्थक, विरोधकात अव्वल दर्जाच्या ललामभूत थोर विभूती आहेत.

वालीवधाच्या गाजलेल्या वादगाची थोडक्यात रूपरेषा अशी :–

दडून बसलेल्या रामप्रभूने नकळत वालीचा वध केला. वालीराज्यावर अतिक्रमण करून त्याला ठार करणे हाच मुळी त्याच्यावर अन्याय झाला. श्रीरामाने राजनीती पायदळी तुडविली.

त्रेता, द्वापारयुगातील कालखंडातल्या मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामाच्या आखीव, रेखीव, सूत्रबद्ध विचारसरणीवर अर्वाचीन युगातील राजनैतिक नीतिनियमांच्या झिलईच्या आवरणाखाली टीकास्त्र सोडता यावयाचे नाही.

अल्पसंतुष्टता हा तत्कालीन सत्वशील, शांतादांत ब्राह्मणाचा आदेश व क्षत्रियांचा दुर्गुण होता. कमकुवत क्षत्रियराजाचा तो दुबळेपणा मानला जाईल. राज्याची सीमा विस्तारण्याची अहर्निश पराकाष्ठा करणारा, भारतखंडावर सार्वभौम सत्ता प्रस्थापित करण्याची इर्ष्या बाळगणारा, परराष्ट्रातील जनसमाजाला आपल्या राज्याखाली आणणारा राजाच सर्वश्रेष्ठ मानाच्या पदाचा अधिकारी होतो. वंशपरंपरेने पदरात पडलेल्या राज्याची मर्यादा, कीर्ती वृद्धींगत करण्याचा खटाटोप न करणारा राजा राजपदास नालायक ठरत असे.

त्याकाळी सार्वभौम साम्राज्याकरता अश्वमेधासारखे भव्य महायज्ञ धूमधडाक्याने करण्यात येत असत.

वालीराज्यावर अतिक्रमण करण्यात श्रीरामप्रभूने याच तत्वाचा अंगीकार केला.

अयोध्येचा राजा भरत हा भारताचा सम्राट होता. किष्किंधेच्या दुराचरणी कुकर्मी राजाला शासन करणे भरताचे कर्तव्यच होते. त्याचा तो अधिकार भरताचा प्रतिनिधी श्रीरामाने सम्राट भरत तेथे नसल्यामुळे बजावला.

सहज दृष्टीस पडणार नाही अशा स्थळी दडून नकळत बाण मारण्याचे कारण सांगताना श्रीरामप्रभूने वालीला खणखणीत शब्दात बजावले.

' माझ्यासारख्या राजांनी, राजवंशीयांनी तुझ्यासारख्या वानराची शिकार करणे हा त्यांचा अधिकारच आहे. शिकारी पिंजरा जाळे बांधून लपूनच शिकार करतो ना? तोडीस तोड प्रतिस्पर्धी मानून आव्हान देऊन तुझ्याशी युद्ध करण्याला मी बांधलो नाही. ' ( अशी योग्य आहे )

थोर, श्रेष्ठ रामभक्त गोविंदराज आपल्या सुविख्यात टीकेत म्हणतात.

" प्रतिसातं च रामेण, तथा वालिवधं प्रतीति,
प्रतिज्ञा निर्वाहाय छद्मनाऽपि वालीवधः कृतः ।।

–४–१६–७३.३८

वालीचा वध केला नसता तर सुग्रीवाला दिलेल्या वचनाला मूठमाती मिळाली असती.

पुढे गोविंदराज म्हणतात :–

यदि रामो वालिनः पुरतः निष्ठेत् ।

श्रीराम वालीसमोर उभे ठाकले असते तर

तदा विदिततदीय प्रभावतया वाली प्रणहो भवेत् तदा तद्वधो न युक्तः प्रतिज्ञा च व्याहम्येत तदंद्वारा तन्मित्रे रावणोऽपि शरणं व्रजेत्, देवकार्यं च लुप्येत अतःप्रच्छनो कालिनमवधीन्ः

अमोघ शक्तिशाली रामप्रभूसमोर वालीने संपूर्ण शरणागती पत्करली असती आणि मग करुणासगर श्रीराम अभिवचन दिल्या विना कसा राहील ? रावण हा वालीचा सुहृद आहे. सलोख्याची त्याने शपथ घेतली आहे. तो देखील शरण आला आणि मग दुष्टनिर्दालनाच्या देवकार्याला तडा गेला असता.

वाली कुकर्मी आहे. सुग्रीवाची धनदौलत, त्याचे अधिकारी आणि त्याची धर्मपत्नी रूमा त्याने बळजबरीने बळकावली आहे. सुग्रीवाच्या मंत्र्यांना कारावासात डांबले आहे. श्रीराम प्रतिज्ञा करतो. (सर्ग ८)

अद्यैव तं हनिष्यामि तव भार्यापहारिणम् ।

आजच वाली स्वर्गाची वाटचाल करील, वाली पत्नी तारेला पुत्र अंगदाने सुग्रीवाची पाठराखणी करणाऱ्या श्रीरामप्रभूची वार्ता कथन केलेली असते. तारा पतीला खणखणीत शब्दात बजावते.

राम:परबलामर्दी, युगात्मा युगान्ताग्निरिवोत्थित: ।
निवासवृक्ष: साधू नामापन्नांनां परां गति : ।।

सुग्रीवाशी तुम्हांला झुंजायचे नाही. प्रलयाग्नी सारख्या ज्वलजहाल श्रीरामप्रभूशी लढायचे आहे.

धात्नामिव शैलेन्द्रो गुणानामाकरो महान् ।
तस्यमौ न विरोधस्ते सह तेन महात्मना ।।

जाऊ नका. श्रीरामाशी शत्रुत्व करू नका. नि:संदिग्ध, सडेतोड शब्दांत सल्ला देते.

सुग्रीवाशी सख्य करा. त्याला यौवराज्य द्या. अहंगंड वाली अर्धांगीच्या हिताच्या सल्याची उपेक्षा करतो. सुग्रीवाशी झुंजतो. त्याला चारी मुंड्या चीत करतो. मग रामप्रभू एकाच बाणाने त्याला स्वर्गाची वाट दाखवतात. वाली बलिष्ठ आहे. सर्वसत्ताधीश, अनियंत्रित हुकूमशहा आहे. त्याच्यावर कसलीही आपत्ती नाही. त्याला कुणी शक्तीशाली शत्रू नाही. रावणाशी त्याचा सलोखा आहे. सख्यत्वाची त्याने प्रतिज्ञा केली आहे.

रावणाला वाकवणाऱ्या वालीने प्रभू श्रीरामाला समरांगणात प्रखर प्रतिकार केला असता. सहजासहजी, विनासायास प्रतिज्ञेप्रमाणे केवळ आजच्या आज जिंकणे अवघड गेले असते. रावणाशी झालेल्या युद्धाप्रमाणे हे युद्धही सात–आठ दिवस कदाचित लांबले असते. सुग्रीव संशयाच्या भोवऱ्यात सापडला असता. संशयपिशाच्चाने घेरलेला सुग्रीव खचला असता. श्रीरामावरील त्याच्या विश्वासाला तडा गेला असता.

गोविंदराज आपल्या टीकेत नकळत बाण मारण्याचे आणखी एक कारण देतात.

एतत्कांचन मालाधारण काने यः पुरो युद्धायागच्छति ।
तस्य बलं सर्वं तवेव भविष्यातीति महेन्द्रेमा दत्तामित्यर्थः ।।

देवराज इंद्राने दिलेली सुवर्णमाला बलिष्ठवालीच्या गळ्यात असेतोपर्यंत समोरासमोर युद्ध करणाऱ्या शत्रूची सर्व शक्ती अद्भुत मालाप्रभावाने वालीला लाभत होती. वाली अधिक शक्तिशाली व्हायचा, आणि त्याचा विरोध कमजोर बनायचा. त्याकरिता दडून अप्रगटपणे श्रीरामाला बाण सोडावा लागला.

सीतादेवीची सोडवणूक करणंच हेच श्रीरामाचे उद्दीष्ट आहे. रावणाला वाकवणाऱ्या अमोघ शक्तिशाली वालीशी श्रीरामाने मित्रत्व स्थापित न करता करता वालीपेक्षाही कमी ताकतीच्या कमजोर सुग्रीवाशी सख्य का केले ?

श्रीरामाची, कबंधाची भेट होते. कबंध रामप्रभूला सुचवतो, " ऋष्यमूक पर्वतावरील सुग्रीव तुझा पाठपुरावा करील. तुझ्या हाकेला अंतर देणार नाही. सुग्रीवासारखा संपूर्ण भूलोकांचा जाणकार दुसरा शोधूनही आढळायचा नाही. रावणाच्या जबड्यातून सीतादेवीची मुक्तता करायला तो साहाय्य करील."

तो पुढे सांगतो, " वाकड्यात न शिरणारा सरळ मनाचा सुग्रीव आणि तू समःदुखी आहात. तुझ्याप्रमाणे त्याच्या जीवनसहचरीचा अपहार झाला आहे. तू त्याला सहाय्य कर. तो तुझा पाठपुरावा करील. तुमच्यात जिवाभावाची जवळीक निर्माण होईल. रक्तापेक्षाही अधिक जवळचे सुहृद व्हाल. दोघांच्या आपत्ती सारख्याच आहेत. "

राम सुग्रीवाला भेटायला ऋष्यमूक पर्वतावर जातो. समदुःखी राम-सुग्रीवाचा सलोखा होतो.

बलिष्ठ वाली एकमेव शास्ता असतो. सर्वसत्ताधीश असतो केवळ त्याच्या मर्जीवरच सारी सूत्रे हालतात. त्याला कुणीही जबरदस्त शत्रू नाही तो कसल्याही दारुण प्रसंगाच्या कात्रीत सापडलेला नसतो. अनियंत्रित, स्वच्छंद शक्तिशाली वाली, राज नसलेल्या अयोध्ये पासून दूर एकाकी, विजनवासात जीवन व्यतीत करणाऱ्या सुहृद रावणाने उन्मत्त उपमर्द केल्यामुळे अगतिक बनलेल्या पत्नी वियोगाग्नीत होरपळणाऱ्या अति, दुबळ्या रामाशी सख्य कसे करील ?

मृत्यूची झापड पडू लागलेल्या रणशय्येवरचा वाली श्रीरामाला म्हणतो. "मला का नाही सांगितलेस? रावण माझा सुहृद आहे. माझ्या शब्दाबाहेर नाही. त्याने तातडीने सीतादेवीला तुझ्याकडे सुखरूप आणून पोहचवले नसते का?"

रावण आणि वाली जिव्हाळ्याचे, जिवाभावाचे सुहृद आहेत. दोघात सख्यत्व प्रस्थापित झाले आहे. ते एकमेकांस कसे दुखवतील?

सीतादेवीची मुक्तता करण्याविषयी रावणाला वाली का सांगेल? कसे गुंतवील? त्याच्या सुखाचा अंत करणारी व्यथा का पोहोचवील? श्रीरामासारख्या अनोख्या मित्राकरता रावणाला दुष्ट करायला वाली तयार झाला नसता.

आता सारेच संपले होते. मृत्यु आ पसरून उभा राहिला असताना अखेरच्या घटकेला तसे म्हणायला काय जात होते?

वानरराज वालीचे और्ध्वदेहिक (सर्ग २५), सुग्रीवाचा नेत्रदीपक राज्याभिषेक तात्कालीक रीतिरिवाजाची कल्पना देतात.

किष्किंधाकांडाच्या पानापानावर अमृतरसाचा शिडकावा झाला आहे. विलोभनीय निसर्गदृष्याने विखरलेले व नटलेले अद्भुतरम्य चंपा सरोवर, कितीही पाहिले तरी पुरेसे न वाटणारी वर्षाऋतूतील देहभान हरपणारी रोमांचकारक निसर्गाची किमया (स्वर्ग २९), अंतरात्म्याला सुखसंवेदना पोहोचवणारे अद्भुतरम्य नेत्रदीपक शारदीय सृष्टिदर्शन (सर्ग ३०). पानापानागणीक उपमा उत्प्रेक्षांची रेलचेल, रसपान करणाऱ्या रसिकांच्या चित्तवृत्ती तृप्तावून सोडतील.

* *

# सुंदरकाण्ड

मनोभिरामं नयनाभिरामं श्रोत्राभिरामं वचसोऽभिरामम् ।
एवं सदा सर्वगतोभिरामं वंदे सदा दाशरथिं च रामम् ।।

सुंदरे सुंदरीं सीतामक्षतां मारुतेर्मुखात् ।
श्रुत्वा इष्टस्तथैवास्तु स रामः सततं हृदि ।।

सुंदरकांडात सुंदर लंका आहे. सुंदर कथा आहे. सुंदर सीतादेवीचे सुंदर शब्दचित्र आहे. सुंदरकांडात काय नाही ? जे सुंदर नाही ? केसाला सुद्धा धक्का न लागता सीतादेवी अक्षत जीवित असल्याचा सुंदरकांडातील मारुती मुखातून बाहेर पडलेल्या अमृतलहरी अंगावर तरारून सुखावलेले हर्षविभोर श्रीराम आमच्या हृदयात अखंड निवास करोत.

अमृतरसाने रसरसलेल्या, प्रातिभ बुद्धिवैभवाने विनटलेल्या तेजस्वी महाकाव्यातील सर्वोत्तम, बिनतोड सुंदरकांडात चिरंतन उत्साह, चैतन्य, स्फूर्ती आशा देण्याची अद्भुत महाशक्ती आहे.

हरवलेली धनदौलत अवचित पदरात पडावी तसे सुंदरकांड हर्षलहरींनी रोमांचित करते. अंत:करणात लक्षदीप उजळून टाकते.

सुंदरकांडात सीतादेवीचा अचूक ठावठिकाणा आहे. केसालाही धक्का न लागता, ओरखडा देखील न निघता, मंतरलेले दिव्य कवच असल्याप्रमाणे सीतादेवी सुरक्षित असल्याची हर्षोत्फुल्ल वार्ता हनुमंताने आणली आहे. सारेच हर्षोन्मादाने फुलून गेले आहेत. श्रीराम, लक्ष्मण, सुग्रीव, आणि यच्चयावत वानरवीर या सर्वांना हर्षाचे उधाण आले आहे. आनंदलहरींनी चित्तवृत्ती तरारून आल्या आहेत.

'निर्मल, मंगल, रसाळ, पावन अमृतवाणीने रसरसलेल्या सर्वश्रेष्ठ सुन्दरकांडावर भाविकांची विलक्षण श्रद्धा आहे.'

सुंदरकांडाचे अनुष्ठान करण्याची प्रथा आहे. बृहस्पतीसारखी बुद्धी असलेल्या रामदूत हनुमंताच्या दिव्य वाणीने असीम गुण समृद्ध रामप्रभूंचे अद्भुत

स्तवन केलेल्या सुंदरकांडाच्या सर्गात (सर्ग ३५) तारक मंत्राचा अर्थ उद्घोषित करणारा श्लोक असल्याचे मातब्बर मुरब्बी पंडितांचे मत आहे.

रामः कमलपात्राक्षः पूर्णचन्द्रनिभाननः ।
रूपदाक्षिण्य संपन्नः प्रसूतो जनकात्मजे ।
तेजसाऽऽदित्यसंकाशः क्षमया पृथिवीसमः ।
बृहस्पतिसमो बुद्धया, यशसा वासरोपमः ।।
रक्षिता जीवलोकस्य स्वजनस्य च रक्षिता ।
रक्षिता स्वस्य वृत्तस्य धर्मस्य च परंतपः ।।

हरवलेला ठेवा गवसावा, शत्रूच्या राज्यावर पाय रोवता यावा, विजयश्रीने माळ घालावी, ऐश्वर्य, सुखसमृद्धी हाती यावी उत्कट भक्ती, श्रद्धा लाभावी रामप्रभूचे सगुण दर्शन घडावे, रामदूत प्रभंजन हनुमंताची कृपा संपादन करावी, देवदेवतांचे शुभमंगल आशिर्वाद प्राप्त करून घ्यावे जशा नाना मनिषांच्या पूर्तीकरता सुन्दरकांडाचे पारायण करतात.

केवळ अविरत ब्रह्मचिंतन करणारे निराभिलाष वांछालीन संन्यासी देखील ध्येयमार्गावरील वाटचालीत येणारे अडथळे दूर होण्याकरिता सुंदरकांडाचा पाठ करतात.

रावण – अज्ञान, सीतादेवी, ब्रह्मविद्या, सीतादेवीचा ठावठिकाणा हुडकण्या-करिता अपार कष्ट उपसणाऱ्या, जीवाचं रान करणाऱ्या हनुमंताची संकटाशी झुंज, हीच ब्रह्मसाक्षात्कारकांना अनंताशी तादात्म्य होण्याकरिता साधकाची चाललेली अविश्रांत अविरत धडपड ! सीतादेवीचे दर्शन हाच तृप्त साक्षात्कार अदभुत आनंद स्वरूपाचे अखंड तेवत असणारे स्थान ! हेच जीवनाचे साफल्य ! साधनाचे फल.

प्रभंजन महारूद्र, रामदूत हनुमंताच्या ज्वलज्जह्वाल तेजोमय जीवनाचा भव्यदिव्य अत्युत्कट, हिमालयासारखा उत्तुंग आदर्श आदिकवी वाल्मीकींनी सुंदरकांडात खडा केला आहे. श्रीराम आणि हनुमान एक आहेत. दोन नाहीत. रामाविण मारुतीरायास मन नाही. जीवन नाही. त्याचे स्वत्व रामप्रभूतच विलीन झाले आहे. विष्णूचा अवतार असलेले रामप्रभू देव आहेत. त्यांच्या परिवारात केवळ हनुमंतासच देवत्व लाभले आहे. रूद्राचा अवतार असलेले महारूद्र हनुमान आहेत.

हनुमंता च्या भव्योदात्त थोरपणाला सीमा नाही. वीररसाचा आविष्कार असलेला वायुसुत क्षत्रियाचा मूर्तिमंत दर्प आहे. अत्युत्कृष्ट ज्ञान, बुद्धी, पौरुष तेज, सामर्थ्य, सारे पराक्रम, भक्ती रामदूतात एकवटलेले आहे.

ज्या करिता अद्भुत बुद्धी शक्तीची पराकाष्ठा हवी. असीम उत्तुंग इच्छाशक्ती हवी. असे विलक्षण गुंतागुंतीचे जटील महत्प्रयाससाध्य चमत्कारीक दुस्तर कार्य, हनुमंताच्या वाट्याला आले आहे. असीम कर्तत्वृशक्ती पणाला लावून वायुसुताने ते शेवटास नेले आहे. भूलोकीचा कोणताही महापुरुष असे भव्य दिव्य करू शकला नाही.

हनुमंत वीररसाचा मूर्तिमंत आविष्कार आहे. क्षत्रियाचा दर्प आहे. मुत्सद्देगिरी, राजनिपुणता, दक्षता, चातुर्य, गंगाजलासारखी पुण्यपावनता सारे अत्युत्कट, भव्योदात्त गुण हनुमंतात एकवटले आहेत. विशुद्ध चारित्र्याचा वायुसुत. धर्मसंस्कृतीचा तेजोभास्कर आहे.

श्रीराम आणि विरुद्ध अर्थाने रावण वगळला तर वाल्मीकींच्या महाकाव्यात हनुमंताचाच क्रमांक वर लागतो.

हनुमंताची शक्ती अद्भुत आहे. बलिष्ठ वालीपेक्षाही तो वरचढ आहे. कुंभकर्णाला सामर्थ्यात तो मागे सारतो.

हनुमंताच्या अचाट शक्तीचे साक्षीदार सुंदरकांडात जागोजागी, विखुरलेले आहेत. भूलोकी गरुड, वायू आणि हनुमंत असे तिघेच काय ते अपार सागर उल्लंघायला समर्थ आहेत. असा वाल्मीकी रामायणात पाच प्रसंगी निर्देश आहे,

१) सर्ग – ४, ६७/२३ २) सर्ग – ५, ३९/२६ ३) सर्ग – ५, ५६/९
४) सर्ग – ४, ६८/९ ५) सर्ग – ६, ६१/३१

हनुमंताचे ज्वलज्जहाल चारित्र्य, पावित्र्यालाही मांगल्य प्रदान करणारे आहे. पाण्यात टाकलेल्या लोण्याच्या गोळ्यात पाणी शिरत नाही, तसे निर्लेप आहे. अकलंकित अंजलीपासून शुचित्व, सोज्वळतेचे मूर्तिमंत प्रतीक आहे. पापापासून शंभर योजने दूर असलेल्या, सात्विक हनुमंताच्या अत्युत्कट, निर्भयतेचे, पावनतेचे कितीतरी साक्षीदार सुंदरकांडात विखुरले आहेत.

सीतादेवीचा ठावठिकाणा हुडकण्याकरिता गेलेल्या हनुमंताला रावणाच्या स्वर्गीय राजप्रासादात अप्सरेचे सौंदर्य घेऊन जन्मास आलेल्या अगणित सौंदर्यवती रतिपुतळ्या दिसल्या. अस्ताव्यस्त पहुडलेल्या असंख्य कोमलांगी रूपगर्विता त्याने अवलोकन केल्या. आणि तो एकाएकी चमकला थरारला.

निद्रिस्त परनारीवरून नजर फिरवण्याचे महापाप! दारुण असत्य मनोव्यथेने पछाडलेल्या हनुमंताच्या मतीला विलक्षण गती मिळाली.

माझ्या अंतःकरणात किल्मिष नाही. मनाला दुरून देखील पापाचा वास आला नाही. चित्त शुद्ध आहे. निर्मल पवित्र आहे आणि मी तरी काय करणार? सीतादेवीचा ठावठिकाणा तर शोधायचा आहे ना? स्त्री ही स्त्रियांतच आढळेल. हरणाच्या कळपात का मी तिला धुंडाळू?

'निर्लेप सात्विक अंत.करणाने मी राजप्रासादांतील रावणाच्या असंख्य ललना पाहिल्या. मी निष्कलंक आहे. शुची आहे. पवित्र आहे निर्मल आहे.'

परदारावरोधस्य प्रसुप्तस्य निरीक्षणम् ।
इदं खलु ममात्यर्थं धर्मलोपं करिष्यति ।। ३९ ।।
न हि मे परदाराणां दृष्टिर्विषयवर्तिनी ।
अयं चात्र मया दृष्टः परदारपरिग्रहः ।। ४० ।।
नान्यत्र ही मया शक्या वैदेहीं परिमार्गितुम् ।
स्त्रियो हि स्त्रीषु दृश्यन्ते सदा संपरिमार्गणे ।। ४४ ।।
तदिदं मार्गितं तावच्छुद्धेन मनसा मया ।
रावणान्तः पुरं सर्वं दृश्यते न च जानकी ।। ४६ ।।

सर्ग ११

प्रयत्नांची पराकष्ठा करून, जिवाचे रान करून देखील हनुमंताच्या पदरी अपयश पडले.

अपेशी काळे तोंड घेऊन का मी माघारी जाऊ? माझ्या सुहृदांना काय सांगू? त्यापेक्षा येथेच प्रायोपवेशन करून जीविताची अखेर करून टाकीन.

आणि दुसऱ्याच क्षणी थोर निराशेने काढता पाय घेतला.

यदि सीतामदृष्ट्वाऽहं वानरेन्द्र पुरीमितः ।। २० ।।
गमिष्यामि ततः को मे पुरुषार्थो भविष्यति ।। २१ ।।
ममेदं लङ्घनं व्यर्थं सागरस्य भविष्यति ।
किं मां वक्ष्यति सुग्रीवो हरयो वा समागताः ।। २२ ।।
किष्किधां समनुप्राप्तं तौ या दशरथात्मजौ ।। २३ ।।

एवं बहुविधं दुःखं मनसा धारयन्मुहुः ॥ ४८ ॥
नाध्यगच्छत्तदा पारं शोकस्य कपिकुञ्जरः ॥ ४९ ॥
ततो विक्रममासाद्य धैर्यवान्कपि कुञ्जरः ॥ ४९ ॥
रावणं वा वधिष्यामि दशग्रीवं महाबलम् ॥ ५० ॥

शोक उद्वेग निराशेने व्याकुळलो तर आतापर्यंतच्या परिश्रमाची माती होईल. धैर्यच डगमगले की सारेच संपले. धैर्याला परजून धार आणीन. प्रयत्नाची पराकाष्ठा करीन. रक्ताचं पाणी करीन. सीतादेवीचा थांगपत्ता मिळवीनच. काय वाटेल ते झाले तरी प्राणत्याग करणार नाही.

आणि हनुमंताने परत राजप्रासादाचा कानाकोपरा, तसु न तसु धुंडाळला.

अशोकवनातला शिशंपा वृक्ष हनुमंताची नजर खेचून घेतो. मूर्तिमंत पावित्र्याच्या आविष्कार असलेल्या, पुण्यपावन गंगाजलासारख्या विशुद्ध, अकलंकित, सत्वशील, शोकदुःखाने विलक्षण व्याकुळलेल्या शुभदर्शना सुरयुवती मदनपुतळी सीतादेवी दिसताच हनुमंत चरकला.

श्रीरामाचे हृदय फत्तराचे तर नाही ना? कुणाच्याने ही व्हायचे नाही असे अति दुष्कर जटिल कार्य तोच करू जाणे. पुण्यपावन गंगाजलासारखी निर्मळ, पवित्र, पतिव्रता सीता तिचा धगधगता वियोगाग्नी, त्याच्या प्राणाची राख कशी करत नाही. अजून देखील त्याचे प्राण कुडी सोडून कसे जात नाहीत? तलवारीच्या धारेसारखा कठोर आहे श्रीराम.

अस्या देव्या मनस्तस्मिंस्तस्य चास्यां प्रतिष्ठितम् ।
तेनेयं स च धर्मात्मा मुहूर्तमपि जीवति ॥
दुष्करं कृतवान् रामो हीनो यदनया प्रभुः ।
धारयत्यात्मनो देहं न शोकेनावसीदति ।
एवं सीतां तदा दृष्ट्वा हृष्टः पवनसंभवः ।
जगाम मनसा रामं प्रशशंस च तं प्रभुम् ॥

१५ : ५२, ५३, ५४

स्वर्गालाही पावनता प्रदान करणाऱ्या अकलंकित, सत्वशील पवित्र सीतादेवीकरिता सागर सुकवला अथवा पृथ्वी रसातळाला नेली तरी नवल

घडणार नाही. त्रैलोक्याच्या राजलक्ष्मी सीतादेवीच्या अनन्य साधारण अद्‌भूत व्यक्तिमत्वाच्या अति अल्प अंशाने देखील तुलायची नाही.

चातुर्यालाही शहाणे करणाऱ्या प्रज्ञावंत साक्षेपी हनुमंताच्या अद्‌भूत बुद्धिशक्तीचा पदर वाल्मीकींच्या अलौकिक प्रतिभेने अलगद उलगडून दाखवला आहे.

सीतादेवीचा ठावठिकाणा मिळवण्याचे हनुमंताचे कार्य पार पडले होते. त्याला परत जायला हरकत नव्हती. पण वायुसुत काय केवळ सांगकाम्या होता ? पुढचे आधीच हेरणाऱ्या धुरीण हनुमंताला, रावण आणि दुष्ट राक्षसांच्या भीषण छळाने जीव नकोसा झालेल्या, नव्हे गळफास लावून देहत्याग करण्यास सिद्ध असलेल्या, व्याकुळ, तडफडणाऱ्या. दयेलाही करुणा आणणाऱ्या सीतेचं दर्शन घडलं होतं. सीतादेवीची इतिश्री झाली असती तर सारेच आटोपले असते. विरहाने घेरलेल्या सीतेला खडे करायला हवे होते. अंतःकरणात उत्साह, चैतन्याचं संजीवन ओतल्याशिवाय परतण्याइतका हनुमान तारतम्य रहित, अविवेकी नव्हता. सीतादेवीला भेटायचं. तिच्याशी बोलायचं, तिचा विश्वास संपादन करायचा, तिच्या धैर्याला परजून धार आणायची. संजीवन द्यायचं. पण ते सारं कसं जमायचं ! कावेबाज कारस्थानी, मायावी, रावणाचा डाव असण्याच्या संशयाच्या भोवऱ्यात सापडलेल्या सीतादेवीला शंका येणे स्वाभाविक होते.

यदि ह्यहं सतीमेनां शोकापहृतचेतनाम् ।
अनाश्वास्य गमिष्यामि दोषवद्‌गमनं भवेत् ।।८।।

अनेन रात्रिशेषेण यदि नाश्वास्यते मया ।
सर्वथा नास्ति संदेहः परित्यक्षति जीवितम् ।।

रामस्तु यदि पृच्छेन्मां किं मां सीताऽब्रवीद्वचः ।
किमहं तं, प्रतिब्रूमया संभाष्य सुमध्यमाम् ।।

यदि वाचं प्रदास्यामि द्विजातिरिव संस्कृताम् ।
रावणं मन्यमाना मां सीता भीता भविष्यति ।।

मम रूपं च संप्रेक्ष्य वने विचरतो हत् ।
ततः कुर्युः समाह्वानं राक्षस्यो रक्षसामपि ।।२९।।

एष दोषो महान् हि स्यान्मम सीताभिभाषणे ।
प्राणात्यागश्च वैदेह्या भवेदनभिभाषणे । ३९ ।

कथं न खलु वाक्यं मे श्रुणुयान्नोद्विजेत वा ।।४०।।

३० : ८, १२, १३, १८, २६, ३६, ४०.

वैदेहीशी कसं बोलायचं? संस्कृतात–
संभाषण करावं का ?

वेदविद्या पारंगत संस्कृत पंडित रावण वानररूपाने आला असल्याचा तिचा संशय बळावेल. भयग्रस्त सीता आरडाओरडा करील. घडू नये ते घडेल. सारेच ओम् फस् होईल.

प्रसंगावधानी धुरीण हनुमंताने कोसल बोलीत बोलायचे ठरवले.

एकाएकी हनुमंत सीतादेवीसमोर प्रकट होत नाही. जानकीचं मन वेधून घेण्याकरिता त्याने श्रीरामाऐवजी अयोध्याधीश दशरथाचा रावणाला देखील ठाऊक नसलेल्या सम्राटाच्या गाथेचे गीत गायला प्रारंभ केला.

राजा दशरथो नाम रथकुज्जर वाजिमान् ।
पुण्यशीलो महाकीर्तिरिक्ष्वाकूणां महायशाः ।। (३१।२)

वळीवाच्या सरीसारख्या अवचित आलेल्या अमृतवाणीने सीता निश्चल होते. तरारून आलेल्या चित्तवृत्ती हनुमंताच्या कर्णमधुर वाणीवर केंद्रीत होतात. अक्षर न अक्षर ती पिऊन टाकते. सीतादेवीच्या चेहऱ्यावरच्या सूक्ष्म भावभावना तरल नजरेने निरखणाऱ्या हनुमंताला संशयाची छटा दिसते. संशयपिशाच्चाला घालवून देण्याकरिता तो शिंशपा वृक्षावरून खाली उतरतो. नम्र मृदु वाणीने विचारतो.

सुराणामसुराणां च नागगंधर्वरक्षसाम् ।
यक्षाणां किन्नराणां च का त्वं भवसि शोभने ।।५।

रोदनादतिनिः श्वासाद् भूमि संस्पर्शनादपि ।
न त्वां देवीमहं मन्ये राज्ञः संज्ञावधारणात् ।।१०।।

(सर्ग ३३ – ५ – १०)

"तू देवता नाहीस. कारण तुझ्या नेत्रात अश्रू आहेत. शोकदुःखाने उसासे सोडत आहेस. तुझे पाय भूमीला स्पर्श करीत आहेत. तू सीता देवीच असावीस. श्रीराम, श्रीराम म्हणताना मी ऐकले आहे. नक्कीच तू सीतादेवी आहेस "

सीतादेवी हनुमंताचा सुखसंवाद होतो. तिच्यात नवजीवन संचारते.

गृहीत्वा प्रेक्षमाणा सा भर्तुः करविभूषितम् ।
भर्तारमिव संप्राप्तं जानकी मुदिता भवत् ।। (३६-४)

'नियतिचे चक्र फिरेल. ऐश्वर्य सुखसमृद्धीचे दिवस निश्चित येतील. मला वाटलं की मी आता जगायची नाही. तू रामदूत आलास. मला संजीवन लाभलं. आशा मिळाली.'

हनुमंताने धैर्य दिले. हिम्मत दिली. तरी देखील असीम सागर उल्लंघून राम, लक्ष्मण, वानर सेना येऊन आपली मुक्तता होईल असा तिला शंभर टक्के विश्वास वाटत नाही. हनुमंताला त्यासंबंधी तिने प्रश्न विचारले.

हनुमन्दूरमध्वानं कथं मां वोढुमिच्छसि ।
तदेव खलु ते मन्ये कपित्वं हरियूथप ।। ३७:२९

या लोकी पतिदेवाला माझ्याइतके काहीही प्रिय नाही. माता, पिता, बंधु अथवा कुणापेक्षाही माझ्यावर अत्युत्कट प्रेम आहे. श्रीरामाची वार्ता कळेतो पावेतोच कुडीत प्राण राहतील.

इतीव देवी वचनं महार्थं तं वानरेन्द्रं मधुरार्थ मुक्त्वा ।
श्रोतुम् पुनस्तस्य वचोभिरामं रामार्थयुक्तं विरराम राम ।।

राम, शब्द चार वेळा एकाच ओळीत चातुर्याने योजण्यात वाल्मीकींची अद्‌भूत प्रतिभा व्यक्त झाली आहे.

देश कालप्रसंग ओळणारा चतुर हनुमंत अपरंपार मनोव्यथेने तडफडणाऱ्या रामप्रभूच्या शोकाकुल अवस्थेचे सुन्दर शब्दचित्र रेखाटतो. अतीव भक्तीने राम लक्ष्मणाचा नामोच्चार होताच प्रत्येक वेळी तो नतमस्तक होतो.

तवादर्शनेजनार्ये शोकेन परिपूरितः ।
न शर्म लभते रामः सिंहार्दितः इव द्विपः ।।

देव दंशान्न मशकान्न कीटान्न सरीसृपान् ।
राघवोऽ पनयेद् गात्रात् त्वद्गतेनान्तरात्मना ।।

नित्यं ध्यानपरो रामो नित्यं शोकपरायणः ।
नान्यच्चिन्तयते किंचित्सतु कामवशं गतः ।।
अनिद्रः सततं रामः सुप्तोऽपि च नरोत्तमः ।
सीतेति मधुरां वाणीं व्याहरन् प्रतिबुध्यते ।। ४४ ।।
३६ : ३७, ४२, ४३, ४४

क्रोधाविष्ट सिंहाने जेरीस आणलेल्या, पिच्छा पुरवलेल्या, जखमी केलेल्या. भयग्रस्त; गाळण उडवलेल्या हत्तीप्रमाणे तुझ्या वियोगाने श्रीराम शोकदुःखाने घेरला आहे. दारुण मनोव्यथेने व्याकुळला आहे.

अयोध्याकांडात कैकयी भरताची शपथ घेते. राजा दशरथ श्रीरामाची शपथ घेतो. हनुमान पर्वताची, चाखलेल्या फळाफुलांची शपथ घेऊन बोलतो.

मंदरेवच ते देवि शपे मूलफलेन च ।।
मलयेन व विन्ध्येन मेरुणा र्दुरेण च ।। ३८ ।।
(३६–३८)

अथवा मोचयिष्यामि त्वामद्यैव राक्षसात् ।
अस्माद् दुःखादुपारोह मम पृष्ठमनिन्दिते ।।१९।।
(३७–१९)

'देवी शुभ्रधवल ऐरावतावर आरूढ झालेल्या देवराज इंद्राप्रमाणे माझ्या पाठीवर बसलेल्या रामप्रभूचे दर्शन घडेल. कंदमुळे, फळे, हाच श्रीरामाचा आहार आहे. तो देखील एकदाच तिसऱ्या प्रहरी तो घेतो. तुझ्याविना कसलाही विचार त्याच्या मनात येत नाही. स्वतःचेही त्याला भान नसते. सुन्दर फल–फूल मनोवेधक निसर्ग दृष्य नजरेस पडताच तुझी आठवण होते. तू जवळ असल्याप्रमाणे ते बोलतात. केवळ तुझ्याकरताच त्यानी सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून दिले आहे. तुझ्या मुक्ततेकरताच तो अपरंपार कष्ट उपसीत आहे.

दुःखार्त, सीतादेवीच्या अंतःकरणात हर्षाचे चांदणे फुलले. चेहऱ्यावर प्रसन्नता थबथबली.

सारामसंकीर्तन वीतशोका रामस्य शोकेन समान शोका ।
शरन्मुखेसाम्बुदशेषचन्द्रा निशेव वैदेहसुता
बभूव ।। ४७ ।।

व्याकुळ अंतःकरण मोकळं करणारी सीतादेवी म्हणते, "श्रीरामप्रभू आणि लक्ष्मणाला धगधगत्या दारुण यमयातनांच्या खाईत मीच लोटले आहे. माझी अखेर झाली तर अनेकांच्या अपार अपेष्टांची, व्यथांची इतिश्री होईल. माझे पतिदेव हा असीम महासागर कसा पार करतील ? वानरसेना दुर्भेद्य लंकेत कसा शिरकाव करील ?

हनुमंताला सीतादेवीची विलक्षण तळमळ असह्य झाली.

अथवा मोचयिष्यामि त्वामद्यैव राक्षसात्
अस्माद् दुखाःदुपारोह मम पृष्ठमनिन्दिते ।।
त्वां तु पृष्ठगतां कृत्वा संतरिष्यामि सागरम् ।
शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सरावणाम् ।
३७, १९, २०

" देवी, या क्षणीच मी तुझ्या सर्वच्या सर्व आपत्तींची अखेर करून टाकतो. माझ्या खांद्यावरून तुला रामप्रभूकडे नेईन. आलो तसाच सुरक्षित जाईन. "

रामदूताच्या मांजराएवढ्या वानराच्या असंभाव्य आश्वासनाची सीतादेवीला गंमत वाटली. तिच्या चेहऱ्यावर स्मिताची लकेर उमटली. हनुमंत ओशाळतो. आयुष्यात अगदी प्रथमच बलवानांचा सम्राट ओशाळतो. मी दीन दुबळे दयनीय मांजर नाही. लंका ओलांडून नेण्याची शक्ती माझ्या बाहूत आहे. याची साक्ष जानकीदेवीला यायला हवी.

हनुमंताने देह वाढवला. पर्वताएवढा अजस्त्र, उत्तुंग बनला.

ततो वर्धितुमारेभे सीताप्रत्ययकारणात् ।
मेरुमंदरसंकाशा बभौ दीप्तानलप्रभः ।।
अग्रतो व्यवतस्थे च सीताया वानरर्षभः ।।

" देवी, मी मांजराएवढा आहे असं का वाटलं तुला ? रावण, आणि सर्वच्या सर्व राक्षसांसह ही लंका सागरापलिकडे घेऊन जाईन. "

मारुतीच्या असीम शक्तीची ग्वाही सीतादेवीला मिळाली. चतुर सीता म्हणते,

युद्धयमानस्य रक्षोभिस्तव तैः क्रूरकर्मभिः ।
प्रपतेयं हि ते पृष्ठाद्भयार्ता कपिसत्तम ।।

" मला नेलेस तर राक्षस तुझा पाठलाग करतील. तुला त्यांच्याशी झुंजावे लागेल. युद्धात जय पराजय अनिश्चित असतो. या गोंधळात मी सागरात कोसळले तर –"

हनुमंत सीतादेवीला धीर देतो.

सत्वशील सीता अखेरीस म्हणते, " तू मला सुरक्षित अगदी अभेद्य मंतरलेले कवच असल्याप्रमाणे देशीलही पण –"

" पण काय ? "

" परक्याला मी स्पर्श करायची नाही. रावणाने मला जबरीने पळविले. माझा निरुपाय होता शिवाय –"

" आणखी काय ? "

" दुराचारी रावणाच्या सर्वांच्या सर्व स्वकीयांसह मूठमाती देऊन माझी मुक्तता स्वत: रामप्रभूनी करायला हवी. रघुनाथाच्या उज्वल कीर्तीला अंधुकसा, अस्पष्ट कलंक देखील लागता कामा नये. रावणाने मला पळवून आणले तसे का तू मला परत नेऊ इच्छितोस ? "

हनुमंताच्या चित्तवृत्ती थरारल्या.

युक्तरूपं त्वया देवि भाषितं शुभदर्शने ।
सदृशं स्त्रीस्वभावस्य साध्वीनां विनयस्य च ।।
द्वितीयं कारणं यच्च ब्रवीषि विनयान्विते ।
रामादन्यस्य नार्हामि संस्पर्शमिति जानकि ।।
एतत्ते देवि सदृशं पत्न्यास्तस्य महात्मनः ।

३८, २, ४, ५

" रामप्रभूच्या जीवनसहचरीने वागावे असे तुझे आचरण आहे. सत्वशील, खंबीर, धीरोदात्त जबर हिमतीच्या अर्धांगीचा रामप्रभूला विलक्षण अभिमान वाटेल. देवी, श्रीराम तुझी मुक्तता करतील. सन्मानाने तुला घेऊन जातील. हास्य, आणि हर्षाची अंत:करणात लकेर उठवणारी, विनोदाची पखरण असलेली, सुंदरकांडातील सुंदर घटना मन वेधून घेते !

रामप्रभू, लक्ष्मण आणि वानरसेना असीम महासागर पार करू शकतील असा विश्वास सीतादेवीला वाटत नाही. संशयपिशाचाने ती घेरली आहे.

सुमहांस्त्वत्सहायेषु हर्यृक्षेषु हरीश्वर ।
कथं नु खलु दुष्पारं तरिष्यन्ति महोदधिम् ।।
इदं ब्रूयाश्च मे नाथं शूरं रामं पुनः पुनः ।
जीवितं धारयिष्यामि मासं दशरथात्मज ।।
उर्ध्वं मासान्न जीवेयं सत्येनाहं ब्रवीमि ते ।

३८:६४

हनुमान सीतादेवीचा निरोप घेतां त्यावेळी तिला म्हणतो.

" वायू गरुड हे सागर उल्लंघू शकतात. तू महासागर पार करू शकतोस चौथा कोणीही असले अचाट कर्म करायला समर्थ नाही.

श्रीराम वानरसेनेसह लंकाकिनारी कसे येतील ? सवड तर एक महिन्याचीच आहे. मला जीवनाची इतिश्रीच करावी लागेल.

मनीषांचा डोलारा कोसळलेल्या सीतादेवीला धीर द्यायला हवा होता. उत्साह चैतन्याने भारून टाकायला हवे होते. आशेचा अखेरचा तंतू तुटू नये म्हणून हनुमंताने खोटे सांगितले.

मद्विशिष्टाश्च तुल्याश्च सन्ति तत्र वनौकसः ।
मत्तः प्रत्यवरः कश्चिन्नास्ति सुग्रीवसन्निधौ ।।
अहं तावदिह प्राप्तः किं पुनस्ते महाबलाः ।
न हि प्रकृष्टाः प्रेष्यन्ते प्रेष्यन्ते हीतरे जनाः ।।
तदलं परितापेन देवि शोको व्यपैतु ते ।

देवी " पर्वतासारख्या अजस्त्र वानराच्या अफाट शक्तीची तुला कल्पना नाही. सुग्रीवाच्या सेनेतील कितीतरी वानरांनी पृथ्वीसभोवती प्रदक्षिणा केली आहे. आघाडीवरचे असंख्य वानर थोर आहेत. माझ्यापेक्षा वरचढ आहेत. सैन्यातला मी अगदीच सामान्य वानर आहे. प्रथम श्रेणीच्या अग्रगण्य सेवकाला का दूत म्हणून पाठवतील ? खालच्या श्रेणीतील एवढा तेवढा यःकश्चित सेवकच दूताचे कार्य करतो. मी देखील सागर पार करू शकतो वानरवीर एकाच झेपेत लंकाकिनारी पाऊल ठेवतील विनासायास सहजगत्या लंका रसातळाला नेतील."

हनुमंताने असंभाव्य अवास्तव सांगितले. अपरंपार शोक दुःखाने निराशेने घेरलेल्या, विलक्षण खचलेल्या, गळफास लावून जीवनाची इतिश्री करायला

सिद्ध झालेल्या सीतेला हिम्मत द्यावयाला, नवजीवन संचारायला, अतिरंजित असंभाव्य कथनाची आवश्यकता होती.

कुशाग्र बुद्धीच्या चतुर सीतादेवीने हनुमंताच्या विधानातील असंभाव्यता हेरली. चाणाक्ष सीता, त्यावेळी कांहीच बोलली नाही.

लंकेची होळी पेटवल्यावर वायुसुत परत निरोप घेण्याकरिता जानकी देवीकडे येतो, त्यावेळी सीता म्हणते:

त्रयाणामेव भूतानां सागरस्यातिलङ्घते ।
शक्तिः ? स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्व वा ।।
तदत्र कार्य निर्वन्धे समुत्पन्ने दुरासदे ।
किं पश्यसि समाधानं त्वं हि कार्य विशारदः ।।

६८:९:१०

हनुमंता, मला ठाऊक आहे, तुझे वडील वायुदेव, गरुड, आणि तू असे तिघेच काय ते सागर पार करू शकता.

हनुमंताच्या बुद्धीला अनंत पैलू आहेत. रावणासमोर उभा असलेला काळ वेळ, प्रसंग ओळखणारा, सर्वंकष हनुमान राजा सुग्रीवाचा संदेश सडे-तोडपणे सुनावतो.

अहं सुग्रीवसंदेशादिह प्राप्त स्तवान्तिके ।
राक्षसेश हरीशस्त्वां भ्राता कुशलमब्रवीत् ।
भ्रातुः श्रुणु समादेशं सुग्रीवस्य महात्मनः ।
धर्मार्थसहितं वाक्यमिह चा मुत्र च क्षमम् ।।

" वानरराज सुग्रीवाने आपले मंगल चिंतिले आहे क्षेम विचारले आहे. "

नंतर तो सरळ दमदाटी करतो, धमकावतो. वास्तविक सुग्रीवाने कसलाही संदेश सांगितलेला नसतो.

रावणाने हनुमंताचे पुच्छ पेटवले. लवलवणाऱ्या अग्नि ज्वाला भडकल्या. आगीचा डोंब उसळला. निर्भय साहसी, हनुमंताने धगधगत्या शेपटाचे राक्षसावर प्रहार केले. राक्षस चवताळले. खवळलेल्या राक्षसांनी हनुमंतास करकचून बांधले.

धुरीण हनुमंताच्या मतीला गती मिळाली. ते दोरखंड तोडून झेप घेऊ का? या सर्वच्या सर्व क्रूर, कुकर्मी राक्षसांना ठार करू का ?

रामकार्याकरता आम्ही आलो आहोत. या अविवेकी, पिसाट, राक्षसांची निंदानालस्ती, निरवंडना सारे सहन केले पाहिजे. रक्त पिपासू संतानाची टवाळी, शिव्याशाप, लाथाबुक्या, सारे निमुटपणे गिळले पाहिजे.

वेलगाम, मठ्ठड मेंदूचे राक्षस मला लंका नगरीतून फिरवणार आहेत का ? अगम्य राजनगरीतील मोक्याची जागा पाहण्याची विनासायास आलेली संधी का दवडावी ?

लंकेत प्रवेश केला त्यावेळी रात्र होती शिवाय सीतादेवीचा ठावठिकाणा हुडकण्याकडे सारे लक्ष केंद्रीत झाले होते. त्यामुळे लंका बारकाईने निरखता आली नाही. आता ही देवदुर्लभ संधी साधलीच पाहिजे.

उन्मत्त, वेलगाम राक्षसांनी हनुमंताला खेचले. राजरस्त्यावरून त्याची धिंड काढली.

भीषण भयानक, विद्रूप राक्षसांची झिम्मड उसळली होती. क्रूर गर्जना करीत, वायुसुताचा धिक्कार करीत, लाथाबुक्क्यांनी बडवीत त्यांची वाटचाल सुरू होती. नगारे, शंखध्वनीनी आसमन्त निनादला होता. सहस्त्रशः राक्षस स्त्रिया मुले, हनुमंताची धिंड पाहात होते. शिव्यांची लाखोली वाहात होते.

हनुमंताचे शेपूट पेटलेले भडकणारे धूड होते. जिभल्या चाटणाऱ्या ज्वाला उफाळल्या होत्या.

महारूद्र वायुसुताने अद्‌भुत वाडे, भव्य प्रासाद, घरे, चव्हाटे, चौक, चावड्या, दुर्गम किल्ले, बंदीशाळा सारे बारीक नजरेने न्याहाळले. बारकावे हेरले, मर्मस्थाने, गुप्त मोक्याच्या जागांची सावध, साक्षेपी हनुमंताच्या सताड उघडे असलेल्या जागरूक मनाने नोंद घेतली.

उद्वेग चिंता दुःखाने घेरलेल्या अशोकवनातील व्याकुळ सीतादेवीला क्रूर दुष्ट राक्षसांनी डिवचले.

" तुझा मित्र, कानगोष्टी करणारा तो वानर दुष्ट वानर "

" कुठे आहे तो ? "

" अशोक वन तोडून पाडून टाकणाऱ्या दुष्टाला पकडले "

" हो ? "

" दोरखंडानी बांधून त्याची नगरातून धिंड काढली आहे. लवकरच त्याची जळून राख होईल "

" कारण ?"

" त्याचे शेपूट पेटवले आहे. लवलवणाऱ्या ज्वाला भडकल्या आहेत."

फत्तराचे – हृदय असलेल्या रक्तपिपासू राक्षसी गडगडाटा सारख्या हसत होत्या.

पुण्यपावन जनकनंदिनीच्या अंत.करणात राक्षसांचे बोल भाल्यासारखे घुसले. छातीत धस्स झाले. तिचा थरकाप उडाला.

स्त्री विशुद्धतेचा परम चरण असलेल्या जानकीने अग्नी प्रज्वलीत केला. वैश्वानराचे आवाहन केले प्रदक्षिणा घातली. प्रार्थना केली.

"लोहिताक्षा, चित्सिंगला, मी पतिव्रता आहे. रामप्रभू वेगळे मला मन नाही. जीवन नाही. देवमनाचा कण न कण, क्षण न क्षण मी केवळ पती-करताच वेचला असेल. प्रभू रामचंद्राकरताच सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून दिलं असेल तर रामदूत वायुसुताला अग्नीची झळ देखील लागता कामा नये."

श्रुत्वा तद्वचनं कूरमात्मापहरणोपमम् ।
वैदेही शोकसंतप्ता हुताशन मुपागमत् ॥
मङगलाभिमुखी तस्य सा तदासीन्महाकपेः ।
यद्यस्ति पतिशुश्रूषा यद्यस्ति चरितं· तपः ।
यदि वा त्वेकपत्नत्वं शीतो यव हनुमंतः ।
ततस्तीक्ष्णार्चिरव्यग्रः प्रदक्षिणशिखोऽनलः ।
जज्वाल मृगंशावाक्ष्या शंसन्निव शुभं कपेः ।
हनुमज्जनकश्चैव पुच्छानलयुतोनिलः ।
ववौ. स्वास्थकरौ देव्या प्रालेयानिलशीतलः ।

'परममंगल पुण्यशील, अन्तर्बाह्य शुचौ पतिव्रता सीतादेवीला आश्वासन देणारा हुताशन सौम्य झाला. भडकलेल्या लवलवणाऱ्या ज्वाला एकाएकी मंद झाल्या.' सुखद झाल्या. थंडगार वायूची झुळुक सळसळली. वैश्वानराने रामदूताचे स्वस्तिक्षेम सुचविले.

चारही श्लोकांच्या अखेर – शीतो भव हनुमंतः॥ अशी करण्यात.

वाल्मीकीचे अलौकिक कसब उजळून निघाले आहे.

हनुमंताच्या ज्वलज्जहाल, उत्तुंग, भव्य दिव्य कर्तृत्वशक्तीला तोड नाही. त्याचं मोजमाप कोण करू शकेल? असीम भारावलेल्या श्रीरामप्रभूच्या वाणीलाही ते शक्य झालं नाही.

प्रभंजन हनुमान सीतादेवीचा ठावठिकाणा हुडकून, रावणाचा कणा ठेचून किष्किंधेला परततो.

श्रीरामाच्या अंतःकरणात भावभावनांचे तुफान उसळले आहे. "सीतेच्या शब्दाचं अमृतच मला संजीवन देईल. नवजीवन देईल. माझ्या अंतःकरणात चैतन्य ओतील. हनुमंता, परत सांग रे, ती काय म्हणाली ती ? तिला महिन्याची सवड आहे तोवर माझी वाट पाहणार आहे, ना ? इतके दिवस सीतेविना माझ्या कुडीत प्राण राहणार नाहीत. काय सांगीतले जानकीने ? अक्षर न् अक्षर सांग. कांही देखील वगळू नकोस. मृत्युची सावड पडू लागलेला अत्यवस्थ वैद्यावर विसंबून असतो, तसा मला केवळ तुझ्या शब्दाचाच आधार आहे."

सहजसुंदर भाषारमणीचे विलास, उपमा, उत्प्रेक्षांचा चमकदारपणा कलाकतेची उत्तुंग भरारी. प्रतिमेची सृजनशीलता, सहज मनोहर प्रसन्न शैली, ध्वन्यर्थवाही दुष्टता, विविध रसांचा अत्युत्कट सुंदर आविष्कार सुन्दरकांडात पानोपानी आढळतो.

ततः स मध्यं गतमंशुमन्तं ज्योस्नाविताानं मुहुरूद्वमन्तम् ।
ददर्श घीमान्भूवि भानुन्तं गोवठे वृषं मत्तमिव भ्रमन्तम् ।
लोकरच पापानि विनाशयन्तं महादधिं चापि समेधसन्तम् ।
भुतानि सर्वाणि विराजयन्तं ददर्श शीतांमघामियान्तम् ।
या भाति लक्ष्मीर्भुवि मन्दरस्था यथा प्रदोषेषु च सागरस्तथा ।
तथैव तोयेषु च पुष्करस्था रराज सा चारू निशाकरस्था ।
हंसो यथा राजतपज्जरस्थः सिंहो यथा मन्दरकन्दरस्थः ।
वीरो यथा गर्वित कुज्जरस्थः चन्द्रोऽपि भ्राज तथाम्वरस्थः ।।
स्थितः ककुद्दमानिव तीक्ष्णशृङ्गो महाचलः
श्वेतः इवोर्ध्व शृहः ।।
हस्तीव जाम्वूनदवद्धशृङ्गो विभाति चन्द्रः परिपूर्णशृङ्गः ।
विनष्टशीताम्वृतु गारपङ्को महाग्रहग्राहविनष्टपङ्कः ।।
प्रकाश लक्ष्म्या श्रयनिर्मलांको रराज चन्द्रो भगवान्शशांकः ।।
शिलातलं प्राप्य यया मृगेन्द्रो महारणं प्राप्य यथा गजेंद्रः ।
राज्यं सयासाध यया नरेंद्रस्तथा प्रकाशो विरराज चंद्रः ।।

लंका धुंडाळणारा हनुमंत अंतराळातला चंद्र पाहतो. सुरम्य मंदार पर्वत, भरगच्च रात्रीचा नयनरम्य प्रशांत सागर, सुन्दर पुष्करणीतील विलोभनीय कपळे, तसा होता, नेत्राल्हादकारी, नितान्त सुंदर चंद्र, शुभ्रधवल, पिंजऱ्या-

तील मोहक हंस, मंदार पर्वताच्या रमणीय गुहेतील दिमाखी, ऐटबाज सिंह. मदोन्मत्त गजावर आरूढ झालेले निडर, शूर वीर तसा अंतराळातला चंद्र प्रकाशत होता.

हेमंत संपला होता. दवाचे धुके नसलेल्या निरभ्र निर्मल गगनात मध्यभागी आलेला भगवान चन्द्र विलोभनीय दिसत होता. भास्कराच्या किरण संक्रमणाने चन्द्राने पृथ्वीवरचा अंधाराचा चिखल नाहिसा केला होता. प्रकाश लक्ष्मीमुळे त्यावरचे कृष्णचिन्ह स्पष्ट दिसत होते.

गुहेच्या दाराशी डौलात उभा असलेला ऐटबाज सिंह, अतिप्रचंड समर भूमीवरचा गजेंद्र, सिंहासनस्थ नरेंद्र तसा सूर्यप्रभा लाभलेला चंद्र विलसत होता. अद्भुत बुद्धी शक्तिशाली हनुमान सुहृदाना आश्वासन देतो...

रामप्रभूने सोडलेल्या बाणाच्या वेगाने मी जाईन. कडेकोट बंदोबस्तात असलेल्या रावणरक्षित लंकेत सीतादेवी नसली तर तसाच अद्भुत वेगाने स्वर्गात जाईन.

प्रयत्नांची पराकाष्ठा करूनही जानकी नच आढळली तर राक्षसराज रावणाला बांधून टाकीन. यशस्वी होऊन सीतादेवीसह माघारा फिरेन. अथवा रावणासह लंकाच उपटून घेऊन येईन.

वानरान्वानरजेष्ठ इदं वचनमब्रवीत् ।
यथा राघवनिर्मुस्त:शर: श्वसनविभ्रम्: ॥ १ ॥
गच्छोत्तद्वद्गमिल्यापि लन्कां रावणपालिताम् ।
न हि द्रक्ष्यामि यदि तां लङ्कायां जनकात्मजाम् ॥ २ ॥
अनेनैव हि वेगेन गमिष्यामि सुरालयम् ।
यदि वा त्रिदिवे सीतां न द्रक्ष्यापि कृतश्रम: ॥ ३ ॥
वद्धवा राक्षसराजानभा नयिष्यामि रावणम् ॥ २ ॥
सर्वथा कृतकार्यो हृमेस्यामि सह सीतया ॥ ४ ॥
आनयिप्यामि वा लन्कां समुत्पाट्य सरावणाम् ।
एवमुक्त्वा तु हनुमान्वानरो वानरोत्तम: ॥ ५ ॥
तस्याम्वरगती वाहू ददृशाते प्रसारितो ।
पर्वताग्राद्विनिष्क्रान्तो पञ्चास्याविव पन्नगों ॥
पिवन्नि वभों चापि सोर्मिजालं महार्णवम् ।
पिपासुरिव चाकाहां दयृशे स महाकपि: ॥६॥

तस्य विद्युत्प्रभाकोर वायुमार्गानुसारिणः ।
नयने विप्रकाशेते पर्वतस्थाविवानलौ ।। २० ।।
मुखं नासिकया तस्य ताम्रया ताम्रमाबभौ ।
सन्धय्या समधिस्पृष्टं यथा स्यात्सूर्यमण्डलम् ।। २२ ।।
लाङगूलचक्रेण हनुमान्शुक्तदंष्ट्रोऽ निलात्मजः।
व्यरोचत महाप्राज्ञः । परिवेषीत भास्करः ।। २४ ।।
तस्य वानरसिंहस्य प्लवमानस्य सागरम् ।
कक्षान्तरगतो वायु जीमूत इन गर्जति ।। २५ ।।
उपरिष्टाच्छरीरेण च्छायया चावगाढया ।
सागरे मारूताविष्टा नौरिवासीत्तदा कपिः ।। २६ ।।
शशुभे स मतातेजा महाकायो महाकपिः ।
वायुमार्गे निरमालभ्त्रो पक्षवानिव पर्वतः ।। ३९ ।।

सर्ग १

उड्डाण करणाऱ्या हनुमंताचा आविष्कार तर फारच बहारीने रंगवला आहे. जबर हिम्मत, आणि अलोट साहस असलेल्या हनुमंताने कसलाही विचार न करता अद्भूत वेगाने झेप घेतली.

" सागरावरून उड्डाण करणाऱ्या वायुसुताच्या हाताची पसरलेली बोटे पर्वतशिखरातून निघणाऱ्या पंचमुखी नागाप्रमाणे दिसत होती.

अंतराळातून उड्डाण करणाऱ्या महाकपीने खाली तोंड केले की उफाळणाऱ्या महासागराचाच घोट घेतो की काय असे वाटे. वर तोंड केले की आकाश गट्ट करतो आहे असे भासे. त्याचे विद्युल्लतेसारखे तेजोमय नेत्र पर्वतावर भडकलेल्या वणव्यासारखे दिसत होते.

संधिकालच्या रक्तवर्ण सूर्यमंडलाप्रमाणे तांबडया लाल नासिकेमुळे. हनुमंताचे मुख तांबडे दिसत होते.

शुभ्र धवल दाढा आणि तेजःपुंज पुच्छांमुळे प्रज्ञावंत वायुसुत हनुमान तेजस्वी प्रभा असलेल्या भास्करासारखा दिसू लागला.

महासागर उल्लंघणाऱ्या वानर सिंहाच्या काखेत सापडलेला हा वायुपुत्र मेघाच्या गडगडाटासारखा गर्जत होता.

अंतराळातून जाणाऱ्या हनुमंताची पडछाया सागरात पडल्यामुळे वादळाच्या तांडवात सापडलेल्या नौकेप्रमाणे वायुसुत दिसू लागला.

भलाभक्कम तेजोमय अजस्त्र महाकायी निर्मल निराधार आकाशातून जाताना पंख असलेल्या पर्वतासारखा भासत होता.

मारूतेः पुनरुड्डाणम्–सुं.
आप्लुत्य व महावेगः पक्षवानिव पर्वतः
भुजङ्ग, यक्षगन्धर्वप्रबुद्ध कमळोत्पलम् ।
स चन्द्रकुमुदं रम्यं सार्ककारण्डवं शुभम् ।
तिष्यश्रवण कादम्बमभ्र शैवलशाद्वलम् ॥
पुनर्वसुमहामीन लोहिताङ्ग महाग्रहम् ॥
ऐरावतमहाद्वीपं स्वातीहंसविलासितम् ॥
वातसंघातजालोर्भिचन्द्रांशुशिशिराम्बुमत् ।
हनुमान परिश्रान्तः पुप्लुवे गगनार्णवम् ॥
ग्रसयान इयाकाशं ताराधिपमिवोल्लिखत् ॥
हरन्निव सनक्षत्रं गगनं सार्कमण्डलम् ॥ ५ ॥

पंख असलेल्या अजस्त्र पर्वताप्रमाणे दिसणाऱ्या शक्तिशाली वायुसुताने परत उड्डाण केले. अंतराळाच्या सागरात तो स्वैर विहार करू लागला. भुजंग यक्ष, गंधर्व हे त्या आकाशसागरातील उत्कृष्ट कमळे होती. रमणीय चंद्रकमळ सुरम्य कारंडव पक्षी ह्याच सूर्य असलेला आकाशसागर विलक्षण विलोभनीय दिसत होता.

पुष्य आणि श्रवण नक्षत्रे ही त्या आकाश महासागरातील बदके होती. मेघाचे शेवाळ आणि हरिततृण होते. पुनर्वसू नक्षत्राचे तारे हे अतिप्रचंड मासे, मंगळ, अजस्त्र सुसर, ऐरावत हा मत्त हत्ती आणि नक्षत्र हेच हंस असलेला तो आकाशसागर विलोभनीय दिसत होता. सुसाट वायुचे तांडव, या त्या महासागरातील प्रचंड लाटा आणि चंद्र किरणाचे शीतल, सुखद जल असलेल्या आकाशसागरात हनुमान मनसोक्त विहार करत होता.

आकाशाचा घास घेणारा, तारकाधिपती चंद्राला ओरबाडणारा, सूर्यमंडल नक्षत्रासह आकाशाला खेचून धरणारा हनुमान महासागरावरून प्रचंड उड्डाण करीत होता.

## रावणाचा भव्य दिव्य प्रासाद

शब्द स्पर्श, रस, रूप, गंध या सर्वोत्कृष्ट, परम सुखद विषयांनी हनुमंताची पाचही इंद्रिये, रावणाचा कडेकोट बंदोबस्त असलेल्या नेत्रदीपक अंतःपुराने प्रत्यक्ष मातेप्रमाणे तृप्त केली.

कितीही पाहिले तरी समाधान न होणारे अंतःपुर पाहणाऱ्या हनुमंताला वाटले, हा स्वर्ग लोक का देवलोक आहे ? ही इंद्रनगरी तर नाही ? गंधर्वाची अद्‌भुत मायाच असली पाहिजे.

अद्‌भुत सुंदर अंतःपुरातील नयनरम्य सुवर्णदीप मुरलेल्या अट्टल जुगाऱ्यांनी नागवल्यामुळे चिंतेने घेरलेल्या जुगाऱ्याप्रमाणे अंजनीसुताला भासले.

दिव्याचा नेत्राल्हादकारी प्रकाश, रावणाची विलसणारी मनोहर कांती, अनमोल तेजस्वी भूषणांची प्रभा एकवटल्याने ते अतीव सुंदर अंतःपुर पेटल्या सारखे भासले.

इंन्द्रियाणीन्द्रियथिस्तु पञ्चपञ्चभिरूत्तमैः ।
तर्पयामास मातेव तदा रावणपातिता ।। ९ ।।

स्वर्गोऽयं देवलोकोयमिन्द्रस्यापि पुरी भवेत् ।
सिद्धीर्वेयं परा हि रचादित्यमन्यत मारूतिः ।। १० ।।

प्रध्यायत इवापश्यत्प्रदीपांस्तत्र काञ्चनान् ।
घुर्तानिव महाधुर्तेदेवनेन पराजितान् ।। ११ ।।

दीपानो च प्रकाशेन तेजसा रावणस्य च ।
अर्चिर्मिपणानां भूपा च प्रदीपेत्यम्यमन्यत ।। १२ ।।

उत्तुंग शिखराच्या नील रंगाच्या चित्रकूट पर्वतावरून धावणाऱ्या या नदीप्रवाहाला मार्गातील वृक्षाच्या फांद्यानी अटकाव केल्यामुळे तो कुठे कुठे वळल्याप्रमाणे दिसायचा. संतापून दूर निघालेल्या व नंतर प्रसन्न होवून पतीकडे धाव घेणाऱ्या पत्नीसारखी ती सुंदर नदी वायुसुताला भासली – सर्ग १४

ततोम्वुधर सकाशं प्रवृद्ध शिखरं गिरीम् ।
विचित्र कूटं कूरैश्च सर्वतः परिवारितम् ।।१।।

ददर्श । च नगात्तस्मान्नदीं निपतितांकपिः ।
अङ्कादिव समुत्पत्य प्रियस्य पतिहितां प्रियाम् ।। ३ ।।
पुनरावृत्ततोयां च ददर्श स महाकपिः ।
प्रसन्नामिव कान्तस्य कान्तां पुररुपस्थिताम् ।।

**अशोक वनात अद्भुत निसर्गक्रियेने हनुमंताचे चित्त वेधून घेतले.**

अतीव मनोहर 'अतिअद्भुत उपवन' देवाच्या स्वर्गीय नंदनवनाला लाजवणारे होते. पुष्पज्योतिर्गणाची झुंबड उसळलेल्या आकाशासारखे सहस्त्रशः पुष्परत्नांची विलक्षण खेचाखेच झालेले विशाल सागरासारखे ते सुरम्य उपवन मन मोहून टाकीत होते.

नीलाञ्जननिभाः केचित्तत्राशोकाः सहस्त्रशः ।
नन्दनं विबुधोद्यानं. चित्रं चैत्ररथं तथा ।।११।।

अतिवृत्तमिवार्चित्यं दिव्यं रम्याश्रिया युतम् ।
द्वितीयमिव चाकाहां पुष्पज्योतिर्गणायुतम् ।। १२ ।।

पुष्परत्नशतैश्चित्रं पञ्चमं सागरं यथा ।
सर्वर्तुपुष्पैर्निचितं पादपैर्मधुगन्धिभिः ।। १३ ।।

प्रगीतमिव विस्पष्टं नानाप्रस्त्रवणस्वनैः ।
देवदारूभिरूभ्दूतरूर्ध्वनाहुमिव स्थितम् ।। ५ ।।

प्रपातजलनिर्घोषैः प्राक्रुष्टमिव सर्वतः ।
वेपयानिव श्यामैः कम्पमानैः शरद्धनैः ।। ६ ।।

वेणूमिर्मारूतोद्धतैः कुजन्तमिव कीचकैः ।
निश्वसन्त मिवामर्षाद्धोरैराशीविषोत्तमैः ।। ७ ।।

जृम्भमाणमिवाकाशे शिरवरैरभ्रमालिभिः ।
कूटैश्च वहुधाकीर्णं शोभितं वहुकन्दरैः ।। ९ ।।

उत्तुंग अरिष्ट पर्वतावरील झुळझुळणाऱ्या अगण्य जलप्रवाहांच्या मधुर ध्वनीच्या कर्णमधुर सुरेल गायनाने हनुमंताच्या चित्तवृत्ती तृप्तावल्या गगनस्पर्शी

देवदारु तरुमुळे तो पर्वत उर्ध्वबाहु, तपस्वी ध्यानस्थ योग्याप्रमाणे भासला भरधाव उडया घेणाऱ्या प्रपाताच्या प्रचंड खळखळाटाप्रमाणे तो आक्रोश करीत असल्याचा हनुमंताला भास झाला.

कळकाच्या बेटातून वाहणाऱ्या वायूच्या निनादाने तो वेणुवादन करीत होता. मेघमालांची दाटी झालेल्या शिखरामुळे तो अरिष्ट पर्वत जणू जांभया देत होता.

प्रभंजन रामदूत हनुमंताच्या हिमालयासारख्या उत्तुंग, उज्वलज्जहाल, तेजोमय, धवलचरित्र; चारित्र्याचा आविष्कार असलेले अतीव मनोहर संपन्न सुंदरकान्ड धकाधकीचे जीवन समृद्ध, समर्थ, उन्नत, उत्साही बनवायला समर्थ आहे.

* *

# युद्धकाण्ड

सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते ।
अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद् व्रतं मम ।।
आनयैनं हरिश्रेष्ठ दत्तमस्याभयं मया ।
विभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणः स्वयम् ।।

वाल्मीकींच्या तेजस्वी महाकाव्याचे युद्धकांडसर्ग १२८ श्लोकसंख्या ५७९५ विस्ताराने सर्वात मोठे तसेच अभिजात गुणवत्तेने अतिश्रेष्ठ आणि सरस आहे. आदि कवींची रसवंती युद्धकांडात विलक्षण मोहोरली आहे.

रामकथा ब्रह्मांड भेदून पैलाड नेणाऱ्या श्रीसमर्थ रामदासांची युद्धकांडावर अतोनात प्रीती आहे. वीररस प्रधान असलेले त्यांचे रामायणाचे युद्धकांड अतीव सुंदर आहे. सीता वानराकरवी, अतिप्रचंड दुर्जन राक्षसांचा संहार झाला आहे. शिवरायाच्या गडागडावर, आणि किनाऱ्याकिनाऱ्यावर क्षत्रियांच्या दर्पाचा मूर्तिमंत आविष्कार असलेल्या रामदास रामायण, रसपानाने धुंद झालेले मराठे वीर वीरश्रीने उद्दीपित होत असत. त्यांच्यात विलक्षण आवेश संचारत असे.

युद्धकांडाच्या पानापानावर वीररससिंचन झाले आहे. पराक्रमाची नदी सुसाट वेगाने तीर फोडून वहाते आहे. रणचंडीचं भयानक तांडव अंग न अंग शहारून सोडते.

मसलती, डावपेच, व्यूह, आव्हान, प्रति आव्हान, शह-काटशह, अनेक युद्धप्रसंग, प्रत्येक वीरासमवेत घडलेले समरप्रसंग, द्वंद्वयुद्धे, सर्गासर्गातून वर्णीली आहेत. वानर-राक्षसांनी एकमेकांवर शस्त्रांचा पाऊस पाडायचा. जयापजयाचे पारडे कधी इकडे तर कधी तिकडे झुकायचे, अवचित शत्रूचे वर्म सापडून त्याची इतिश्री व्हायची, ही वर्णने पानोपानी आली आहेत. शोणीतांच्या महापुरात वाहाणारी फुगलेली घडे, कोथळे, पाद पाणी, वगैरे रणचंडीचे भेसूर वर्णन पराकोटीचे रौद्र आहे.

त्रैलोक्यास वाकविणाऱ्या महाप्रचंड राक्षसाधिपती रावणास अधिकच शक्ती-शाली करणारे देवांनाही काढता पाय घ्यावयास लावणारे, असीम बलाढ्य, दुर्जय

नरांतक, देवांतक, धुम्राक्ष, अतिकाय, महोदर, महापार्श्व, कुंभ, निकुंभ, कुंभकर्ण, इंद्रजितासारखे, एकापेक्षा एक, वात्रट, राक्षसगुणी, आणि, वीररसाचा मुर्तिमंत आविष्कार असलेले, मैंद, द्विविद, मुलण, नल, नील, जांबवान, अंगद, सुग्रीव, हनुमंत आदी आघाडीवरचे मान्यवर वानरश्रेष्ठ यांची लढत, झुंजी, द्वंद्वयुद्धे, समरप्रसंग, वाचकांची छाती दडपून टाकतात. रोम न रोम खडा करतात वाल्मीकीच्या लोकोत्तर प्रतिमेने, रामरावण द्वंद्वयुद्ध रंगविताना कळस गाठला आहे. न भूतो न भविष्यति अशी एकमेवाद्वितीय अतुल त्रिभुवनात विनतोड, राम रावण झुंज थरारून सोडते. वाचक विस्मयातिशयाने हतबुद्ध होतो.

धुरंधर, मान्यवर, वानर राक्षसाग्रणींच्या मसलती, खलवते परस्परांचे दुवे निखळून टाकताना टाकलेले डाव, फूट पाडण्याचे कौशल्य परिस्थितीचा अचूक अंदाज घेऊन पाऊल उचलल्याचे करून चातुर्य, मुत्सद्देगिरीचे नवनवोन्मेष, अंतरे राखण्याकरिता बाळगलेली सावधगिरी बुद्धीला पटवून धार चढविते.

वाल्मीकी रामायणात, अनियंत्रित सर्वसत्ताधीश, राक्षसराज रावणाचो, अखेरच्या बारा महिन्यांची कथा आहे.

त्रैलोक्याला वाकविणाऱ्या या अद्भुत शक्तिशाली रावणाने रामजन्मापूर्वीच उन्नतींचे अत्युच्च शिखर गाठले आहे. आणि अनन्वित आसुरी, कुकर्माची कमाल मर्यादा पण गाठली आहे.

रावणसामर्थ्य अफाट आहे. रचनाशक्तीच्या बाहेरचे आहे. रूद्राच्या तुल्यबळ असलेल्या राजा रावणाचे तेज सूर्यासारखं प्रखर आहे.

समर भूमिवरील रावणदर्शनाने श्रीराम स्तिमित झाले. त्यांच्या नेत्रात आश्चर्य थवथवले. बिभीषणाला तो म्हणतो,

अहो दीप्ती महातेजा रावणो राक्षसेश्वरः।
आदित्य इव दुष्प्रेक्षो रश्मिभिर्भाति रावणः।
सुव्यक्तं लक्षये ह्यस्य रूपं तेजस्समावृतम्।
देवदानव वीराणां वपुर्नैवंविधं भवेत्।
यादृशं राक्षसेन्द्रस्य वपुरेतत्प्रकाशते ॥

प्रखर सूर्याकडे पाहाता येत नाही. तशी ज्वलज्वहाल तेजोमय रावणावर नजर ठरत नाही. पापण्या मिटतात. काय तेज आहे. अद्भुत, महातेज, अग्रगण्य देवातही आढळायचं नाही.

श्रीराम आणि हनुमंतासारख्या, बिनतोड लोकोत्तर योध्यांनाही दृष्टीस पडताच थक्क करून सोडणाऱ्या, रावण सामर्थ्याचे, सामान्य मानव काय मोजमाप करू शकेल ?

रावणाच्या अफाट शक्तीचे आणि गुणसमृद्धतेचे गुणगान, त्याच्या वधानंतर बिभीषण करतो.

योऽयं विमर्देषु न भग्नपूर्वः सुरैः समेतैः सह वासवेन ।
भवन्तमासाद्य रणे विभग्नो वेलामिवासाद्य यथा समुद्रः ।।
अनेन दत्तानि सुपूजितानि भुक्ताश्च भोगा निभृताश्च भृत्याः ।
धनानि मित्रेषु समर्पितानि वैराण्य मित्रेषु च यापितानि ।
एषोहिताग्निश्च महातपाश्च वेदान्तगः कर्मसु चाग्र्य वीर्यः ।
एतस्य यत् प्रेतगतस्य कार्यं तत्कर्तु मिच्छामि
तव प्रसादात् ।। सर्ग ११२. २२. २४

रावणाच्या तोडीचा वीर आढळायचा नाही. जिथे राक्षसराज गेला ज्याच्याशी झुंजला, त्याला जिंकले. सागर तीरावरच थांबतो. श्रीरामानेच त्याला पायबंद घातला. रावण पडला. फार फार थोर होता माझा भाऊ. याचकांचा तो कल्पवृक्ष होता. त्रैलोक्यातील सर्वोत्कृष्ठ विलास उपभोगणाऱ्या राजाने, सेवकांचे संरक्षण केले. संवर्धन केले. थोर स्वामी होता तो. सुहृदय स्वकीयाना वगळून एकटयानेच पौरुषाने संपादिलेल्या वैभवाचा उपभोग कधीही घेतला नाही. मत्सर, क्रोध, परपीडा करणारी वृत्ती त्याने स्वकीयाविरूद्धच उभी केली. शत्रूस जखडून ठेवले. तो कृतज्ञ, निष्ठावान, आहिताग्नी होता. तपस्वी होता. धर्मनिष्ठ तत्वज्ञानी होता.

श्री समर्थ रामदासांची प्रतिभाशाली रसवंती रामायणातील युद्धकांडात या प्रसंगाचा सहजमनोहर प्रसन्न आविष्कार करते.

वीभीषण—हृदयद्रावक आक्रंदन करतो
मुखे श्वास सोडून पाणी चुरी तो
भुमिमस्तकू आपटीतो, पिटीतो
म्हणे वीर तो ! बोरवटा काळ आला
त्रिकुटाचळाचा अलंकार गेला — १

नव्हे रावणासारिखा संपत्तीचा
नष्टे रावणासारिखा व्युत्पत्तीचा
वहू सांगता वैत्रवालागि कांही
प्रतापी तयासारिखा वीर नाही — २

मनाचा उदारू घनाचा कुबेरू
वहूसा विचारू जनी दानशूरू
गळाला बहु थोर त्या राक्षसाचा
मही मंडळी धाक गेला सुराचा — ३

वहुतां जणांचे वाहू भाग्य मेले
गये सर्व ब्रह्मांड ते वोस झाले
जया कारणे देव लीलावतारी
तयाच्या गुणा तुळणा कोण सारी — ४

उदासीन वाटे जनी पाहवेना
मनी स्वस्थ नाही कदा राहवेना
गताच्या गुणे वीर तो भग्न झाला
तया लागि मारावया राम आला — ५

रावणाचा भाऊ विभीषणाचे प्रशंसोद्गार आहेत हे। अग्नीहोत्री रावणाच्या जीवनाचे अति उज्वल पैलू आहेत हे।

रावणाला अद्भुत स्वसामर्थ्याची विलक्षण घमेंड आहे. देवदेवतांनाही तो तृणासमान लेखतो. श्रीरामाला तर फडतुस मनुष्यापेक्षा अधिक किंमत देत नाही.

रावणाचा सासरा — माल्यवान, युद्धाविषयी खलबत सुरू असताना निःसंदिग्ध खडसावतो 'श्रीराम मानव नाही. देव आहे. माझ्या समजुतीप्रमाणे तो विष्णूच आहे. दुराचाराच्या निर्दालना करिता, सुजनांच्या रक्षणाकरता विष्णूच रामरूपाने आला आहे. सीतेला सन्मानाने परत पाठव. लंका वाचव.' रावणाची जिद्द अद्भुत आहे. हेकेखोर रावणाचा आपलेच खरे करण्याकडे कल आहे मोडेल पण वाकणार नाही असा त्याचा बाणा आहे.

रावण सासऱ्याला ठणकावतो;

मानुषं कृपणं राममेकं शाखामृगाश्रयम् ।
समर्थं मन्य

क्षुद्र रामाचा काय विचार करायचा ? एवढ्या तेवढ्या, अगण्य मानवाचे सहकारी प्रत्यक्ष बापानेच त्याला लाथ मारून राज्याबाहेर घालवले आहे. सीतेला मी कालत्रयी परत पाठवणार नाही. सीता प्रकरण धसास लावीन.

माझ्या देहाचे दोन तुकडे होतील पण रावण कुणापुढेही वाकणार नाही. दोष असेल तर तो माझ्यात पुरेपूर जन्मजात स्वभाव आहे. माझ्या नसेत जिद्द जन्मापासून सळसळते आहे. स्वभावाला औषध नाही. आपला उपदेश कुचकामी आहे. फोल आहे.

द्विधा भज्येयपप्येनं न नमेयं तु कस्याचित् ।
एष मे सहजो दोषः स्वभावो दुरतिक्रमः ।।

वस्तुस्थिती कटु आहे.

श्रीरामाच्या असीम सामर्थ्याची आणि अद्भुत रण कौशल्याची त्याला प्रचिती येते.

धुमाक्ष, वज्रदंष्ट्र, अकंपन, प्रहस्त, अशा अशा एकापेक्षा एक वरचढ शक्तिशाली, अजिक्य सेनापतींचा वध झाल्याने रावण चिडला चवताळलेला रावण स्वतः सरसावला. भरगच्च युद्ध सामुग्री, सर्व शस्त्रास्त्रांनी सुसज्य, रावण तेजोमय, दिव्य दुर्भेद्य रथातून समरभूमीवर आला. संत महाकवी तुलसीदासांची प्रतिभा, या प्रसंगाचं प्रत्यक्ष मनोहर चित्र रेखाटते.

श्रीरामावर तुटून पडायला रावण विलक्षण आसुसला होता. श्रीरामाजवळ रथ नव्हता. विरथ राम अजिक्य, दिव्य, दुर्भेद्य बलाढ्य रावणाशी कसा झुंजेल ? देवांचा थरकाप उडविणाऱ्या लंकापतीस कसा जिंकेल ? विभीषणास विचाराने घेरले. तो गांगरला.

रावणे रथी विरथ रघुवीरा। दावि विभीषण भयउ अधीरा
अधिक प्रीती मन भा संदेहो। वंदी चरन कह सहित सनेहा।
नाथ न रथ नहिं पद पदमाना। काही विधी जितन वीर वलयात्रा

श्रीराम उत्तर देतात–

सुनहु सखा कह कृपानिधाना।
नहि जय होइ सो स्यंदन आना।
सोरज धीरज तेहि रथ चाका
सत्य सील दृढ ध्वजा पताका।
बल विवेक दम परहित घोरे।
छपा कृपा समता रजु जोरे।
ईस भजन सारथी सुजाना।
विरती चर्म संतोष कृपाना।
दान परसु बुधी सक्ति प्रचंडा।
नर विन्नान कंठिन कोदंडा।
अमल अचल मन प्रोनमाना।
सम जम नियम सिली मुख नाना।
कवच अभेद विप्र–गुरू-पूजा।
एहि राम विजय उपाय न दुजा।
सखा धर्ममय अक्ष रथ जा के।
जीवन कहँ न कतहूँ रिपु ता के
महा अजय संसाररिपु जीतो सकइ सोनीर
ना के अस रथ होइ दृढ सुनहु राखां मा।।

मिया, विजयश्री मिळवून देणारा रथ, आगळाच आहे. या रथाची चाके शौर्य आणि धैर्य, अभेद्य ध्वजपताका, सत्य व शील चार घोडे, बल, विवेक, दम, परोपकार. अश्वाची दोरी, क्षमा, दया, ममता, सारथी, ईशभक्ती ढाल, वैराग्य खड्ग संतोष, परशु दान शक्ती प्रचंड बुद्धि, उग्र धनुष्य, श्रेष्ठ ज्ञान, भाता, निर्मल, पवित्र, निश्चल मन, संयम, आणि ममनियम, दुर्भेद्य कवच, विप्र, गुरुपूजा, अशी अद्‌भुत आयुधे आणि रथ असणाऱ्याला दुरून देखील पराजयाचा वास येत नाही. असा धर्मरथ असणारा अजिक्य आहे.

श्रीरामाशी लढत देताना रावण विलक्षण मार खातो. त्याचा रथ मोडतो, धनुष्य बाणाच्या ठिकऱ्या उडतात. निःशस्त्र वीर रावण जमीनीवर उभा राहतो.

अगतिक, हतबल, लंकाधीशाचा वध करणे अगदीच सहजसुलभ असते. धीरोदात्त सत्वशील श्रीराम लंकाधीशाला सोडून देतो.

कृतं त्वया कर्म महत्सुभीमं, हतप्रवीरश्च कृतस्त्वयाहम् ।
तस्मात् परिश्रांत इति व्यवस्यन्न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि ।।
गच्छानु जानामि रणार्दितस्त्वं प्रविश्य रात्रिचरराज लंकाम् ।
आश्वास्य निर्याहि रथी च ध्वनी तदा बलं द्रक्ष्यसि मे रथस्थः ।।

'राक्षसराज, मी तुला ठार करणार नाही. लंकेला सुखरूप माघारी जा. रात्री विश्रांती घे. उद्या ताज्या दमाने लढायला ये.'

अतुल पराक्रमी रावणाच्या जीवनातील होरपळून काढणारा पहिलाच प्रसंग! प्रथमच त्यास भयाने पछाडले.

स प्रविश्य पुरीं लंकां रामवाण भयार्दितः ।
भग्नदर्पस्तदा राजा वभुव व्यथितेन्द्रियः ।।
मातङ्ग, इव सिंहेन गरुडेनेव पन्नगः ।
अभिभूतोऽभवद्राजा, राघवेण महात्मना ।।
ब्रह्मदंड प्रकाशानां, विद्युत्सदृशवर्चसाम् ।।
स्मरन् राघववाणानां विव्यथे राक्षसेश्वरः ।।

सिंहाने जेरीस आणलेला, जखमी केलेला हत्ती, गरूडाने भेदरवून ताडलेला सर्प, तसा रावण तडफडू लागला. त्याच्या जीवाची तगमग होऊ लागली, त्याला झोप येईना. विद्युल्लतेसारखा लखलखणारा प्रखर रामबाण त्यास ब्रह्मदंडासारखा बोचत होता.

सर्वस्व विनाशाचं, पराजयाचे चित्र त्याच्या नेत्रासमोर तरळते.

राक्षस धूरीणांना तो सांगतो, सहस्त्रशः वर्षे मी तप केले. इंद्राचं सामर्थ्य संपादिले. आणि आज क्षुद्र, यःकश्चित मानवाने पराभूत करावे. मी अजिंक्य आहे. देव, दानव, गंधर्व, यक्ष वगैरे मला मारू शकत नाहीत. कारण देवाचा दुर्लभ वरप्रसाद मी मिळविला आहे.

देवदानवगंधर्वैर्यक्षराक्षसपन्नगैः ।
अवध्यत्वं मया प्राप्तं मानुषेभ्यो न याचितम् ।

आणि आज मी मानवाच्या कराल जवड्यात अडकलो आहे.

श्रीरामाच्या असीम सामर्थ्याचेच नव्हे तर, अखेरची घटका भरत आल्याचे त्याला स्पष्ट दिसते.

विदितं मानुषं मन्ये, रामं दशरथात्मजम् ।

अंतःकरणात खोल दडवून ठेवलेले पापकर्म, उफाळून वर येते. व्याकुळ करणारी अनारण्याची शापवाणी त्यास आठवते.

ईक्ष्वाकु, कुलनाथेन अनरण्येन यत्पुरा ।
उत्पस्यते हि मद्वंशे पुरुषो राक्षसाधम ।
निहनिष्यति संग्रामे, त्वां कुलाधम दुर्मते ।

"माझ्या ईक्ष्वाकुळांतला राम तुला ठार करील."

बलात्कार केलेल्या सत्वशील वेदवतीचा शाप स्मरताच तो विलक्षण व्याकुळतो. तीच सीता अवतरली असण्याची त्याची पक्की धारणा असते. तो तसे स्वच्छ सांगतो.

शप्तो हं वेदवत्या च यदासा धर्षिता पुरा ।।
सेयं सीता. महाभागा जाता जनकनन्दिती ।।

पशुलाही लाजविणाऱ्या अनंत अन्वनित कुकर्माची स्मृति त्याचे अंगांग होरपळून काढते.

उमा नंदीश्वरश्चापि रंभा वरुण कन्यका ।।
यथोक्तास्तन्मया प्राप्तं न मिथ्या ऋषिभाषितम् ।।
(सर्ग ६० – ११/१२)

भयग्रस्त लंकाधीशाच्या छातीचे ठोके घणाचे घाव बसावे तसे पडतात. तो व्याकुळतो. कुंभकर्णास जागवितो. तो थोरल्या भावास खणखणीतपणे खडसावतो. सीतेस माघारी पाठव. शरणागती पत्कर.

जिद्दी, रावण खवळतो. कुंभकर्णास कठोर दूषणे देतो.

कुंभकर्ण म्हणतो, तुला नरकातच जायचे असेल तर अटकाव करायला कोण समर्थ आहे. मला रुचले नाही तरी देखील मी तुझ्याकरिता झुंजेन. सर्वस्व समर्पिन. तुला यश मिळवून देईन."

धूर्त रावण, गळ्यातला वैडूर्यरत्नांचा दिव्य हार, स्वतःच्या हाताने कुंभकर्णास घालतो. कंकण, कुंडले वगैरे स्वर्गीय अलंकारांनी, त्यास विभूषित करतो.

अथासनात् समुत्पत्य स्रजं मणिकृतान्तराम् ।
आवबन्ध महातेजाः कुंभकर्णस्य रावणः ।।

(६५ – २५)

राजा रावणाने स्वतः अलंकृत केलेला अहंगंड, उन्मत्त, ताठर कुंभकर्ण अधिकच चेततो. तुपाची आहुती दिलेल्या अग्नीज्वालेसारखा उफाळतो. उधाणतो.

रामबाणानी जर्जर झालेल्या शक्तिशाली रावणाचं विदारक चित्र सर्ग १०६ मध्ये रेखाटलं आहे. रावण सपशेल पडला. समरभूमीवरून, रावणसारथी, मूर्छित झालेल्या लंकाधीशास दूर रामबाणांच्या टप्प्याच्या बाहेर नेतो. सावध झालेल्या रावणाच्या लक्षात येताच तो खवळतो.

त्वयाद्य हि ममानार्य चिरकालसमार्जितम् ।
यशोवीर्यंचतेजश्च प्रत्ययश्च विनाशितः ।।

(१०६ – ५)

दुर्दमनीय, अजिंक्य, सर्वश्रेष्ठ योद्धा असल्याची माझी शतशः वर्षीची उज्वल कीर्ती तू मातीत मिसळलीस. कान्त माझा रथ आणि सग मानव राम तुल्यबळ वीर असण्याची कबूली देतो.

शत्रोः प्रख्यातवीर्यस्य रञ्जनीयस्य विक्रमैः ।
पश्यतो युद्धलुब्धोऽहं कृतः कापुरुषः त्वया ।।

(१०६ – ६)

मूर्खा, रामाशी झुंजण्याकरिता मी धडपडतो आहे. आणि आज तू मला भ्याड. भेकड बनविलेस.

निष्ठावान सारथी त्यास कटू सत्य सांगतो. घडू नये ते घडण्याची संभाव्यता बोलून दाखवितो.

रावण चतुर आहे. धूर्त आहे. धूर्त रावण अमोल रत्नहार त्याच्या गळ्यात घालतो. अनन्य सारथी आवेशाने रथ समरभूमीवर दौडवितो.

रावण थोर स्वामी आहे. कुशल धुरीण सत्ताधीश आहे. सेवकांना त्याच्याविषयी विलक्षण जिव्हाळा आहे मंत्री, सेनाधिपतींची रावण निष्ठा बिनतोड आहे. राजाकरिता ते सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात सोडून देतात. बिभीषणाचा अपवाद सोडला तर, मृत्यु जबडा पसरून उभा आहे असे स्वच्छ दिसत असतानाही सर्वच्या सर्व, आघाडीवरच्या अग्रगण्य मातब्बर सेनापतींनी एका पाठोपाठ एक हर्षाने समर भूमीवर स्वप्राणांचे बलिदान केले आहे.

धुमाक्ष, वज्रदंष्ट्र, अकंपन, प्रहस्त्र, अनिकाय, कुंभ, निकुंभ, एकराक्ष, विरूपाक्ष, वगैरे प्रथम श्रेणीचे राक्षसाग्रणी समरभूमीवर कोसळले. श्रीरामाने कुंभकर्णाचे मस्तक उडवले. देवांना थरकाप उडविणारा रावणाचा प्राण असलेल्या अजिक्य इंद्रजिताला लक्ष्मण यमसदनी पोहोचवितो. आणि तरीही रावणाची 'विद्वजा भज्येयम्' जिद्द कायम असते. पीळ तसाच असतो लंका विनाशाचं भेसूर, भयानक, चित्र स्वच्छ दिसत असतानाही हेकेखोर रावण माघार घेत नाही. सेनाधिपती, महोदयास तो विश्वासात घेतो.

उवाच च समीपस्थं महोदरमरिंदमम् ।
अस्मिन्काले महाबाहो जयाशा त्वयि मे स्थिता ।
जहि शत्रुचमूं वीर दर्शयाद्य पराक्रमम् ।
भर्तृपिण्डस्य कालोऽयं निर्देष्टुं साधु युध्यताम् ।
(९८:४,५)

मित्रा या प्रलयंकारी आपत्तीत एकमात्र तूच माझा अखेरचा तंतू आहेस. तुझ्यावरच सारी भिस्त आहे. आतापर्यंतच्या पराभवाचा सूड उगव. तूच पराजयाचे पारडे उलटू शकशील. तुझ्या राज्यनिष्ठेच्या कसोटीचा हा अवसर आहे शत्रूला नेस्तनाबूत कर. लंका वाचव.

अखेरच्या घटकेला देखील अहंगंड ताठर रावण वाकत नाही. लंकाधीशाकडून बहुमान झालेला कसलेला योद्धा महोदर सरसावतो. सुग्रीव त्याला ठार करतो.

रावणाच्या कुकर्माने ओढवलेल्या सर्वविनाशाच्या आणिबाणीच्या प्राणसंकटात देखील त्याचे सर्व सेवक अनुयायी मंत्री सेनापती त्याच्याकरिता लढतात. उघडच्या डोळ्यांनी मृत्यूच्या कराल जबड्यात शिरतात. राजाला कधीच केव्हाही अंतर देत नाहीत.

काळी करणी करायला सवकलेल्या रावणाच्या मत्प्रवृत्ती कोळपल्या आहेत. नागमोडी वर्तनाचा, दुराचार, अनियंत्रित राक्षसराज, प्रसंगी, निर्दयपणाची कमाल मर्यादा गाठतो. बलात्कार, जबरी, त्याचाच खेळ आहे.

सीतेला जबरीने अंतःपुरात न खेचण्याचे कारण तो स्वतःच अंतर्वर्तुळातल्या मुत्सद्यांना उघड सांगतो.

पितामहस्य भवनं. गच्छन्तीं पुंजिकस्थलाम् ।
सा प्रसह्य मया भुक्ता कृता विवसना ततः ।।

ब्रह्मलोकी जाणाऱ्या पुंजिकस्थली अप्सरेवर मी बलात्कार केला. तिने पितामहाकडे तक्रार केली.

ब्रह्मदेवाने शाप दिला.

अद्यप्रभृति यामन्यां बलान्नारीं गमिष्यसि ।
तदा ते शतधा मूर्धा फलिष्यति न संशयः ।।
१३–११,१४

असलं अनन्वित काळी करणी करशील तर –

यापुढे करशील, तर त्याच क्षणी तुझ्या मस्तकाचे शतशः तुकडे उडतील.

त्या दिवसापासून मी कुणावरच बळजबरी केली नाही. सीतेस इच्छेविरुद्ध जबरीने अंतःपुरात खेचीत नाही.

श्रीरामाच्या पुण्यपावन, तेजोमय जीवनसहचरीवर शापग्रस्त रावणाला बलात्कार करणे शक्य नव्हते. सीतेला अनुकूल करून घेण्याकरिता तो नाना क्लुप्त्या योजतो. त्रैलोक्याचं ऐश्वर्य, तृणासमान लेखणारी विशुद्ध परमपावन पतिव्रता, कुठल्याही प्रलोभनास बळी पडत नाही. उलट ती रावणाचा उघड उघड धिक्कार करते. लंकाधिपतीस कोल्हया कुत्र्यापेक्षा अधिक किंमत देत नाही.

कावेबाज रावणाच्या मेंदूत नाना कपटकलुप्त्या शिजतात. श्रीरामाविना सीतेला जीवन नाही, मन नाही, तो तिचे सर्वस्व आहे, हे त्यास पुरतेपणी ठाऊक असते. रामवध झाला की सीतेची पतिनिष्ठा विनायास वळविता येईल असा त्यास विश्वास वाटतो.

मायावी विद्येत निष्णात विद्युज्जिव्ह राक्षसाकडून तो हुबेहूब कृत्रिम, राममस्तक बाण धनुष्य नेणार करवून घेतो. अशोक वनातील दु:खार्त सीतेसमोर ठेवतो.

स विद्युज्जव्हेन महैव तच्छिरो धनुष्य भूमौ विनिकार्यमाणः ।
विदेह राजस्य सुतां यशस्विनीं ततो ब्रवीत्तां भव ये वशानुगा।

जिवापाड प्रयत्न करूनही यशाचे माप त्याच्या पदरात पडत नाही.

जिद्दी, मोहविवश रावणाला हवा तसा अवसर लाभतो. इंद्रजिताच्या नागपाशात जखडलेल्या नागशरतल्पावरच्या मृतवत राम लक्ष्मणांचे दर्शन घडविण्याकरिता तो सीतेला समरभूमीवर नेण्याची आज्ञा देतो.

हतांविद्र जितख्यात वैदेह्या रामलक्ष्मणौ ।
पुष्पकं च समारोप्य, दर्शयध्वं हतौ रणे ॥
४७–७

रणभूमीवरची राम लक्ष्मणाची प्रेते सीतेला डोळ्यांनी पाहू द्या. त्यांची अखेर झाल्याची तिच्या मनाची खात्री होताच तिचे भय दूर होईल. संशय पिशाच्चाने घेरलेल्या तिचे अंत:करण स्वच्छ होईल. ती मला वश होईल. माझ्या अंत:पुरात तिला यावेच लागेल. त्याविना दुसरा मार्गच तिला उरणार नाही

सीतेला रणभूमीवर नेणारी सत्वशील त्रिजटा राक्षसीण गौप्यस्फोट करते. सीतेला रावणाचा कावा उमगतो. रावणाचा खटाटोप पाण्यात जातो.

रावण महादुष्ट पापी आहे, निर्दयपणाची कमाल मर्यादा गाठणारा भयंकर राक्षस आहे. पतिव्रतेचे मस्तक उडवायला देखील लाज कोळून प्यालेला, निर्लज्ज, अनन्वित, राक्षस मागेपुढे पाहत नाही. एका प्रसंगी चिडलेला संतप्त रावण सीतेवर शस्त्र उगारतो.

स पुत्रवध संतप्तः क्रूरः क्रोधवशं गतः।
सपीक्ष्य रावणो बुद्ध्या सीतां हन्तुं व्यवस्यत।
रावणः पुत्रशोकेन भृशमाकुलचेतनः।
संक्रुद्धः खड्गमादाय सहसा यत्र मैथिली।

इंद्रजीत वधाने रावणाच्या माथ्यावर वज्राघात झाला. अनावर शोक संतापाने तो कडाडला. बेभान बेफाम रावणाने खड्ग उपसले. तो सीतेवर धावला.

'माझी राणी होत नसेल, तर या दुष्ट सीतेचे तुकडे उडवा माझ्या न्याहारीस होतील अशीही धमकी सत्प्रवृत्त पापी रावणाने पूर्वीच दिली आहे.'

(सुंदरकांड सर्ग २२)

रावण महाधूर्त आहे, कावेबाज आहे. विलक्षण क्रोधी हेकेखोर आहे. धुरंधर मंत्री, सेनापतीशी तो खलबत करतो, त्यांचा सल्ला घेण्याचे ढोंग करतो. तो विचारतो, 'या पेचप्रसंगातून कशी सुटका करून घ्यायची ? सीतेला माघारी परत पाठविण्याचे मात्र बोलू नका. काय वाटेल ते झाले तरी सीतेला मी सोडणार नाही. राम लक्ष्मणाचा वध व्हायलाच हवा. दोन्ही गोष्टी विचारांत घेऊन, प्रसंगातून वाट कशी काढायची ते सांगा.'

अदेया च यथा सीता वध्यौ दशरथात्मजौ॥
भवद्भिर्मन्यतां मन्त्रः सुनीतिश्चाभिधीयताम्।
सर्ग १२/२५/२४

रावणाची ही कशी कठोर शर्त आहे.

श्रीरामाची, मसलत, या पार्श्वभूमीवर मन वेधून घेते. बिभीषण शरण आला आहे. त्यास आसरा द्यायचा का ? त्याच्याशी जवळीक करायची का ? श्रीराम धुरंधर वानराग्रणींचा सल्ला घेतो.

"मित्रहो मी काय करावे ?"

वास्तविक, बिभीषणाशी मित्रभाव प्रस्थापित करण्याचा त्याचा निश्चय झाला आहे. पण तो तसे सांगत नाही. कसलीही अट घालीत नाही. जे करावयाचे मनात असते, तेच चातुर्याने वानराग्रणी कडून वदवितो. त्यांचा रुकार घेतो.

चढाईच्या तयारीत असलेल्या, आवेशाने उधाणलेल्या वानरसेनेचा तळ लंकातीरावर पडला आहे. धूर्त, कावेबाज, रावण सुग्रीव – रामाचे एकजीव दुवे निखळून टाकण्याकरिता डाव टाकतो. वानराना फोडण्याकरिता चतुर हेर पाठवितो. नाना प्रलोभनांच्या जाळ्यात अडकविण्याची पराकाष्ठा करतो.

सुग्रीवाची रामप्रभूवर अनन्य निष्ठा आहे रक्तापेक्षाही राम–सुग्रीवता अधीक जवळीक आहे. संतप्त सुग्रीवाच्या मुखातून तप्त लाव्हारसाचे थेंब बाहेर पडतात. तो कडाडतो.

न मेऽसि मित्रं न तथानुकम्प्यो न चोपकर्तासि न मे प्रियोऽसि।
अरिश्च रामस्य सहानुवन्धस्ततोऽसि वालीव वधार्ह वध्यः।
निहन्म्यहं त्वां ससुतं सवन्धुं सज्ञातिवर्गं रजनी चरेश।
लंकां च सर्वां महता वलेन सर्वैः करिष्यामि समेत्य भस्म ॥
(२०, २३ – २४)

तू माझा सखा नाहीस, मित्र नाहीस. मी तुझा पाठपुरावा का करावा ? तू पापी कुकर्मी आहेस. दयेस तू पात्र नाहीस. रामाचा शत्रू तो माझाही वैरी, वालीप्रमाणे तुलाही ठार करावयास हवे.

मी तुझा संहार करीन वानरसेनेच्या सहाय्याने लंकेची पाळेमुळे खणून नगरीची राख करीन.

दुष्ट राज्याची नावनिशाणी उरू न देण्याकरिता तो विलक्षण आतुरला आहे. श्रीरामास तो चक्क सांगतो,

दृष्ट्वा तां हि पुरी लंकां त्रिकूटशिखरे स्थिताम्।
हतं च रावणं युद्धे दर्शनादवधारय ॥
(२. १०)

"त्रिकुटाचलावरची लंका माझ्या नजरेच्या टप्प्यात आली की रावण संपलाच."

आणि रावण दृष्टीस पडताच त्याच्यात विलक्षण त्वेष संचारतो. तो बेभान होतो. प्रचंड झेप घेतो. रावणावर घसरतो. दोघांची चकमक उडते.

भाग्याने तो सुखरूप परत येतो.

श्रीराम त्याच्या विपरीत साहसाचा निषेध करतात.

असंमन्त्य मया सार्धं तदिदं साहसं कृतम्।
एवं साहसयुक्तानि, न कुर्वन्ति जनेश्वराः॥
इदानीं या कृथा वीर एवंविधमचिन्तितम्।
त्वयि किंचित्समापन्ने किं, कार्यं सीतया मम॥

(सर्ग ४१/२,४)

" माझा विचार न घेताच तू एकाएकी भलतेच साहस केलेस. चितेने मी बेचैन झालो. राजाने असे अकस्मात जाणे बरे नव्हे. असे कांही करू नकोस. तुझ्या जीवाला अपाय होत असेल तर मला सीताही नको."

आवेशाने उधाणलेला अनन्यनिष्ठावान, सुग्रीव उत्तरतो.

' तव भार्यापहर्तारं दृष्ट्वा राघव रावणम्।
मर्षयामि कथं वीर जानन्विक्रममात्मनः॥९॥

(४१.९)

श्रीरामप्रभूच्या पुण्यपावन जीवनसहचरीचा भ्याडासारखा अपहार करणारा महापापी, राक्षसाधम, नजरेस पडल्यावर, माझं माथं भडकल्याशिवाय कसे राहील ? माझे रक्त सळसळले, भान संपलं, अनावर आवेश संचारला.

नीच रावणाची नरडी फोडल्याविना मला स्वस्थ कसे राहता येईल ? सहन कसं करवेल ?

राजा रावणाची शक्ती असामान्य आहे देवांनाही तो पराभूत करतो. लक्ष्मणासारख्या अजिंक्य योध्यासही, एकदा नव्हे तर दोनदा शक्ती मोडून. त्याने मृत्यूच्या उंबरठ्याशी पोहोचविले आहे. दोन्ही प्रसंगी, हनुमंताने आणलेल्या दिव्य औषधींनी त्याचे प्राण माघारी फिरविले. हनुमान आणि सुग्रीव दोघेही अग्रगण्य झुंजार वीर रावणावर तुटून पडतात. त्यांना रावण दाद देत नाही. दोघांनाही काढता पाय घ्यावा लागतो. एकमेव श्रीरामच काय ते त्याला तुल्यबळ आहेत. आणि रघुनंदनानाही रावणाचा वध करणं महत्प्रयाससाध्य झालं आहे.

राम रावणाची लढत विलक्षण भडकते. रणचंडीचे तांडव सुरू झाले. जयापराजयाचे पारडे कधी रामाकडे तर कधी रावणाकडे झुकत होते. विजयश्री कुणाला माळ घालील याचा बिनचूक अंदाज कुणालाच करता येत नव्हता. आणि प्राणघातक संकटात अगस्त्य पुढे सरसावले. त्यांनी आदित्य हृदय स्तोत्र मंत्रानुग्रह केला. इंद्रसारथी मातली, देवराजाचा दिव्य रथ, आयुध, धनुष्यबाण शक्ती, घेऊन येतो. श्रीरामाचे सारथ्य करतो. विसर्वशक्ती, सामर्थ्यं बुद्धी पणास लावून धनुर्धारी राम रावणवध करतो.

राम-रावण युद्ध अतुल होते. बिनतोड होते एकमेकाद्वितीय, त्याच्या सारखे तेच, त्यास दुसरी उपमाच नाही.

वाल्मीकींची अद्‌भुत प्रतिभा, राम रावण द्वन्द्वयुद्धाचे रोमांचकारी वर्णन करताना विलक्षण पालवली आहे.

गदानां मुसलानां च परिघाणां च निःस्वनैः।
शराणां पुङ्खपातैश्च क्षुभिताः सप्त सागराः ।।
क्षुब्धानां सागराणां च पातालतलवासिनः।
व्यथिताः पन्नगास्सर्वे दानवाश्च सहस्त्रशः।
चकम्पे मेदिनी कृत्स्ना सशैलवनकानना।
भास्करो निष्प्रभश्चासीन्न ववौ चापि मारुतः।
ततो देवाः सगंधर्वाः सिद्धाश्च परमर्षयः ।
चिन्तामापेदिरे सर्वे सकिन्नर महोरगाः ।।
स्वस्ति गोब्राह्मणेभ्योऽस्तु लोकास्तिष्ठन्तु शाश्वताः।
जयतां राघवः संख्ये रावणं राक्षसेश्वरम्।
एवं जपन्तोऽपश्यंस्ते देवास्सर्षिगणास्तदा।
रामरावणयोर्युद्धं सुघोरं रोमहर्षणम्।
गंधर्वाप्सरसां संघा दृष्ट्वा युद्धमनूपमम्।
गगनं गगनाकारं सागरः सागरोपमः ।।
रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव ।।

सर्ग ११० – १७ ते २४

रामरावण युद्धाचं तांडव असं भयानक होतं की सप्त सागर उफाळले. संपूर्ण पृथ्वी थरारली. सूर्य ढगात दडला. रावण विजयी व्हावा असं कुणासच

वाटेना. ते मनोमन प्रार्थना करू लागले. रामाचा जय होवो. रावणाचा पराभव होवो! रावणवध होवो! श्रीराम; रावणाच्या तोडीस तोड होता आणि रावण, रामाच्या! तिसरा नाहीच.

मारीची निहती यैस्तु खरो यैस्तु सदूपण: ॥
क्रौंचारण्ये विराधस्तु कवंधो दंडकावने ।
यैः साला गिरयो, भग्ना वालीच क्षुधितोऽम्वुधि: ।
त इमे सायका: सर्वे युद्धे प्रात्यायिका मम ।
किं तू तत्कारर्ण येन रावणे मन्दतेजमः ॥

(२२०-३१-३३)

विस्मयातिशयाने हतबुद्ध झालेला श्रीराम म्हणतो, माझे दुर्धर, तीक्ष्ण, धीर बाणही बोथट का व्हावेत ?

आणि अखेरीस मातलीच्या सांगण्यानुसार तो ब्रह्मास्त्र सोडतो रावण वध होतो.

राम आणि मारुती एक आहेत. दोन नाहीत. त्यांच्यात भेद नाही. रामाला जसे दैवत लाभले तसे हनुमंतासही !

अघटीत घडवणाऱ्या हनुमंताच्या लोकोत्तर बुद्धीमत्तेची आणि अद्भुत पौरूशाची अत्युत्कट साक्ष युद्धकांडात मिळते. श्रीराम स्वतःच हनुमंतावर स्तुति-सुमने उधळतात.

कृतेन् हनुमंता कार्यं सुमद्भुवि दुष्करम् ।
मनसापि यदन्येन न शक्यं धरणीतले ॥

(१-२)

कुणाला कल्पना देखील करता यायची नाही. असं अति दुराराध्य महत्प्रयाससाध्य कर्म अंजनीसुताने केवळ माझ्या करताच तडीस नेले आहे.

हनुमंता तुला मी काय देऊ? वैभवशाली अयोध्यापतीचा थोरला पुत्र रामराजा। कुठोराघरची दौलत असावी अशी संपत्ति। वामनासारख्या अमीम मनाचा गुणसमृद्ध दाता राम, हवं ते चटकन देवून टाकणारा निस्पृहांचा मुकुटमणी, सुग्रीवांचा अतिथी आहे. कुठल्याही संपत्तीवर त्याची सत्ता नाही.

इदं तु मम दीनस्य मनो भूयः प्रकर्षति ।
यदिहास्य प्रियाख्यातुर्न कुर्मि सदृशं प्रियम् ॥

एषा सर्वस्वभुतस्तु परिष्वङ्गो हनुमतः
मया कालमित्रं प्राप्य दत्तश्चास्तु महात्मनः ॥
(१ – १३, १४)

सीतेची स्वर्गीय अमृतवाणी आणणाऱ्या मारुतीला काय देवू ?

वायुसुताच्या दुष्कर कर्मांचे मोजमाप व्हायचे नाही. या देहावर माझी सत्ता आहे. मी स्वत.लाच देतो.

अंजनीसुता, मी तुला आलिंगन देतो. आणि हनुमंताला तरी आणखी काय हवे ? राम–हृदयाचा स्पर्श होताक्षणी हनुमंत मुक्त झाला आहे. सर्व मिळाले. प्राप्तव्य प्राप्त झाले.

वानर–राक्षस युद्ध भडकले. स्वतः रावण आघाडीवर झुंजत होता. शक्तिशाली सेनाधिपति प्रहस्ताचा मुडदा पाडणाऱ्या नीलावर तो तुटून पडला. रावणरथावर उडी घेतली. वज्रासारखी प्रखर मुठ उगारली. चवताळलेल्या राक्षस राजाने हनुमंताच्या छातीवर मुष्ठीचा तडाखा दिला. हनुमान कोलमडला. निमिषात तो उठला. त्याने रावणाच्या छातीवर प्रतिमुष्ठीप्रहार केला.

अद्‌भुत शक्तीशाली रावणाने तो कसावसा सहन केला. त्याच्या डोळ्या-समोर काजवे चमकले. तो म्हणाला, मला माझ्या तोडीचा शत्रू मिळाला.

हनुमंत आवेशाने उत्तरला, माझ्या प्रहारानंतरही तू जिवंत आहेस. धिःकार असो माझ्या पौरुषाला. आणखी एका तडाख्यात मी तुला यमसदनास पाठवतो.

धिगस्तुमम् वीर्यस्य यत्वं जीवसि रावण ।
सकृन्तु प्रहरेदानीं दुर्बुद्धे किं विकत्थसे ।
ततस्त्वां मामको मुष्टिर्नयिष्यति यमक्षयम् ।

खवळलेल्या रावणाने डोळ्याचे पाते लवण्याच्या आतच हनुमानाला एक तडाखा हाणला. वायुसुत कोलमडला. रावणाने नीलावर चढाई केली. हनुमान सावध झाला. नील–रावण लढाई भडकली होती. हनुमंताला हवा तसा अवसर मिळाला होता. पण नीतीनें हनुमान चाल करून गेला नाही. या नीलाबरोबरच्या चकमकीतून मुक्त होईपर्यंत वाट पाहतो, मगच तुझ्याशी झुंजेन.

विप्रेक्षमाणो युद्धेप्सुः सरोषमिदमब्रवीत् ।
नीलेन सह संयुक्त रावणं राक्षसेश्वरम् ।
अन्येन युद्ध मानस्य न युक्तमअविधावनम् ।

इंद्रजिताच्या ब्रह्मास्त्राने राम-लक्ष्मण वानर मूर्च्छित झाले.

आणिबाणीच्या पेचप्रसंगातून शक्ती बुद्धीशाली वायुसुताने वाट काढली. हिमालयावरचा दिव्य औषधाचा पर्वत त्याने उपटून आणला. आणि वानरवीर राम-लक्ष्मण संजीवन दिले. पर्वत परत नेऊन ठेवला.

रावणाच्या शक्ती प्रहाराने लक्ष्मण मुर्च्छित झाला. दुसऱ्यावेळी हनुमंताने तोच दिव्यौषधीचा पर्वत आणला. लक्ष्मणाला नवजीवन दिले. लक्ष्मणाच्या आवेशाला, उत्साहाला उधाण आले. फणा उभारून तो उभा राहिला.

हनुमंताने अघटित घडवले आहे. चमत्कार केला आहे. अंजनीसुताच्या अद्भुत कर्माला तोड नाही.

समर्थ रामदासांनी या घटनेचे अतीव मनोहर वर्णन केले आहे.

वहुपंथ चाले रवी भार नेना ।।
बहु भार वाहे फणी तो उडेना ।
गरूडासी तो आचळू हालवेना
दुजी साम्यता ब्रह्मगोळी दिसेना ।

हनुमान निकुंभ समरप्रसंगाचे नामर्दालाही मर्द बनवणारे क्षत्रियांच्या दर्पाचे अत्युत्कट चित्रण रंगवलेला (सर्ग ५) सारस्वताला लाभलेलं अनमोल लेणं आहे.

श्रीरामाचा राज्याभिषेक झाला. सोहळा पार पडला. वानरवीर सुग्रीव बिभीषण, त्यांचे सचीव या सर्वांचा रत्नेभुषणे, वनसंपत्ती, वस्त्रे देऊन श्रीरामाने बहुमान केला. त्याना निरोप दिला. फक्त हनुमंतालाच कांहीही दिलं नाही.

पतिव्रता सीतेला अमोलस्वर्गीय रत्नमाला दिली. सीतेने ती गळ्यातून काढली. सभोवार असलेल्या वानरावरून तिची नजर फिरत होती. तिची नजर अधीर झाली होती. तिची नजर श्रीरामाकडे वळत होती. श्रीरामाने तिचे हृद्गत हेरले.

प्रदेही सुभेग हारं यस्य तुष्टासि भामिनि।

ज्यावर प्रसन्न असशील त्याला दे !

तेजो घृतियंशी दाक्ष्यं सामर्थ्यं विनयेनयः।
पौरुषं विक्रमी वुद्धिर्यस्त्रिन्नेतानि, नित्यदा ॥

(१८१-१८२)

वरील सर्व गुणांचे माहेरघर असलेल्या हनुमंताला सीतेने अमोल रत्नहार दिला. 'बुद्धिमत्ता वरिष्ठम्' हनुमंताच्या अदभुत चातुर्याची अत्युत्कट साक्ष सुग्रीव कुंभकर्ण समरप्रसंगी मिळते.

कुंभकर्णाशी अटीतटीने लढणारा सुग्रीव विलक्षण मार खातो, कोलमडतो. मुर्च्छित होऊन कोसळतो. विजयोन्मादाने धुंद झालेला कुंभकर्ण गुर्मीत मुर्च्छित सुग्रीवाला उचलतो. माघारा फिरतो. वानर प्रचंड जयघोष करतात.

सुग्रीवाची सुटका कशी करायची ? सुग्रीवाची सोडवणूक करणे हनुमंताला तिकसं जड नसत. देशकाल, प्रसंग ओळखणारा हनुमान परिणामांचा अचूक अंदाज घेतो.

सुग्रीवाची सुटका केली तर राजाला ते लाजीरवाणं होईल. त्याच्या पौरूषत्वाला तडा जाईल. वास्तविक राजा सुग्रीव स्वतःची सोडवणूक करून घ्यायला समर्थ आहे. तो कांहीच हालचाल करीत नाही. त्याअर्थी अजुनही तो मुर्च्छित आहे. सावध होताच तो सुखरूप माघारा फिरेल, तोवर वाट पाहिली पाहिजे. तसाच बांका पेचप्रसंग ओढवला तर कुंभकर्णाला लोळवून मी वानरराजाची मुक्तता करीन.

अयं मुहुर्तात्सुग्रीवो ल्बघसंज्ञो महाहेवे।
आत्मनो वानराणां च यत्पथ्यं तत् करिष्यति।
मया तु मौक्षितस्याम्य सुग्रीवस्य महात्मनः।
अप्रीतिश्च यवेत् कष्टा किर्तिनाशश्च शाश्वतः।
त्वस्मान्मुहुर्तं काङ्क्षि क्षल्ये विक्रमं मोक्षितस्य तु॥

बिभीषण शरण येतो. त्याला जवळ करायचे का ? श्रीराम वानराग्रणीशी मसलत करतात. सुग्रीव, अगंद, जांबवान सर्व आघाडीवरचे वानरवीर विरोध करतात. श्रीरामाची नजर हनुमंतावर खिळते. धुरीण हनुमान आपले निःसंदिग्ध मत सांगतो. 'हेराकडून बिभीषणाची कसोटी पारखणे अंगलट येईल. अपराध्यासारखे नाना प्रश्न विचारल्यास तो दुखावला जाईल. त्याचा निष्कलंक पुण्यपावन चेहराच तो निष्कपट असल्याचा सांगतो. श्रीरामाच्या अद्भुत पराक्रमावर त्याची श्रद्धा आहे. रावणाच्या दुराचाराला तो विटला आहे. त्याला जवळ करावे. आश्रय द्यावा.'

एतावत्तु पुरस्कृत्य विद्यते तस्य संग्रहः ।

आणि श्रीरामाने बिभीषणाला जवळ केलें.

धर्म संस्कृतीचा नंदादीप असलेल्या बिभीषणाची कामगिरी बिनतोड आहे. आणिबाणीच्या पेचप्रसंगातून त्याने वाट काढली आहे. इष्टनिर्दिष्ट कार्यात त्याचा वाटा मोठा आहे.

माणसं पळवून आणणाऱ्या पापी दुराचारी, उधळखोर रावणाला तो सुरूवातीपासूनच विरोध करतो. अनेक प्रसंगी, लंकाधीशाच्या दुष्कृत्यांचा कडक निषेध करतो. सर्व मंत्री, मुत्सद्दी, सेनापती रावणास साथ देत असतानाही तो एकटाच त्याच्यावर जबरदस्त टीकेचे प्रहार करतो

इंद्रजित, काकाचा, बिभीषणाचा मत्सर करतो तो केवळ सत्वशील, निष्कपटी, आडव्यात न शिरणारा, पापभीरू धर्मात्मा आहे म्हणूनच.

सत्वेन वीर्येण पराक्रमेण शौर्येण धैर्येण च तेजमा च ।
एकः कुलेऽस्मिन पुरूषे विमुक्तो बिभीषणस्तात ( कनिष्ट ए. षः ।।

बिभीषण त्याला ठणकावतो, तू पोरकट आहेस, बालबुद्धीचा बथ्थड आहेस. अननुभवी, मुर्ख आहेस. मसलतीकरता तुला कोणी बोलावल ? का बोलावल ? एकमात्र तो रोखठोक सांगतो.

सीतां च रामाच निवेद्य देवीं वसेम राजन्निह वीतशोकाः।

रावण त्याच्यावर जबरदस्त ताशेरे झाडतो. वाङ्मयात रावणाचे शब्द सुभाषित बनले आहेत.

वसेत् सह सपत्नेन क्रुद्धेनाशी विषेण वा ।।
न तु मित्रप्रवादेन संवसेच्छत्रुसेविना ।।
( १६–२१ )

" वैऱ्याशेजारी रहाव. भडकलेल्या सर्पाशी क्रिडा करावी. पण शहाण्याने शत्रूशी संगनमत करणाऱ्या स्वकीयाशी जवळीक करू नये. त्याच्यावर विश्वास ठेवू नये."

रावणाच्या अनन्वित पापकर्माचा उवग आलेला विभीषण त्वरेने श्रीरामाकडे येतो. वानराग्रणीशी मसलत करून श्रीराम विभीषणाला आसरा देतो. तो म्हणतो,

" शरणागताला आसरा देणे हे माझे व्रीद आहे प्रत्यक्ष रावण आला तरी देखील मी आश्रय देईन "

विभीषणा वा सुग्रीव यदि वा रावण स्वयम् ।

बिभीषणाला आश्रय दिल्यावर राम सर्वसाक्षीने अभिवचन देतो.

अहं हत्वा दशग्रीवं सप्रहस्तं सहानुजम् ।
राजानं त्वां करिष्यामि सत्यमेतद् वीमिते ।।
( १९–१९ )

मी प्रतिज्ञा करतो, प्रहस्त आणि सर्व मंत्री यांच्यासह रावणवध करून तुला राज्याभिषेक केल्याविना मी अयोध्येत पाऊल ठेवणार नाही.

विभीषणाच्या जीवनातील समरभूमीवरच्या एका अतीव मनोहर प्रसंगाचे चित्रण करताना वालमीकीची प्रतिमा विलक्षण उंचावली आहे. त्यातील निष्कपटता, सहजसुंदर, प्रसन्न भाव कल्पकतेची उत्तुंगता वाचकाना स्तिमित करते.

अंतराळात अदृष्य राहून इंद्रजितानी नागशरतल्यावर राम–लक्ष्मणाला खिळवून टाकले. दोघांचा वध झाला असेच सारे वानराग्रणी समजतात, व्याकुळतात, विलक्षण विलाप करतात. विभीषण मायी विद्येचा ज्ञाता होता ' इंद्रजिताचे कारस्थान तो हेरतो. नागबाण राम-लक्ष्मणाचे प्राण हरण करू शकत नाही हे त्याला ठाऊक असतं.

वानराग्रणी आर्त विलाप करतात. सुग्रीव विलक्षण विलाप करतो. विभीषण त्याचे सांत्वन करतो.

सत्यधर्माभिरक्तानां नास्ति मृत्युकृतं भयम् ।

" शोक करू नकोस, जयपराजयाचे पारडे कधी इकडे तर कधी तिकडे झुकते. आपला पक्ष धर्माचा आहे. पराजयाचा विटाळ आपल्याला व्हायचा नाही. "

लवकरच मन वेधून घेणारी एक घटना घडते. श्रीराम सावध होतो. नागशरतळ्यावरचा जखमी लक्ष्मण नजरेस पडताच तो विलाप करतो. " सुग्रीवा, तू वानरसेनेसह माघारा जा. लक्ष्मणा बरोबर माझीही इतिश्री होईल. मी इथेच देहत्याग करीन. '

रामाच्या आर्त आक्रंदनाने विभीषण शहारला. त्याच्या जीवाचे पाणी झाले. माझ्या मनिषांच्या ठिकऱ्या उडाल्या. रावण जिंकला. मी हरलो. रामलक्ष्मणाचा वध करण्याची अधर्मी रावणाची डरकाळी कशी खरी झाली ?

जीवनेद्य विपन्नोऽस्मि नष्टराज्यमनोरथः ।
प्राप्तप्रतिज्ञश्च रिपुःसकामो रावणः कृतः ।।

रंग बदलला. शोकार्त विभीषणाचे सुग्रीव सांत्वन करतो. त्याचे अश्रू पुसून आलिंगन देतो.

गरुडाधिष्ठीतविताकभौ राघवलक्ष्मणौ ।
त्यक्त्वा मोहं वधिष्यते सगणं रावणं रणे ।।

रामलक्ष्मण जिवंत आहेत. लवकरच ते रावणाचा मुडदा पाडतील व्याकुळ होवू नकोस. तूच लंकेचा राजा होशील.

आणि एकाएकी तो स्वतःच विलक्षण व्याकुळून म्हणतो. " राम-लक्ष्मणास किष्किंधेला सुखरूप घेऊन जा. मी रावणाच्या ठिकऱ्या उडवीन. सीतेची मुक्तता करीन. तिला घेऊनच माघारी फिरेन. "

सर्वच्या सर्व वानरवीर शंकाकुशंकानी व्याकुळले आहेत. कविप्रतिभेने ही घटना फारच बहारीने रंगविली आहे.

आणखी एका भीषण पेचप्रसंगाची निरगाठ बिभीषणाच्या चातुर्याने सोडवली आहे. इंद्रजित हनुमंत आणि वानराग्रणींच्या देखत मायावी सीतेचं मस्तक तोडतो. नाग-शरतळावरच्या श्रीरामाला ही वार्ता कळताच त्याच्या माथ्यावर वज्राघात होतो. विषादाने घेरलेले वानराग्रणी तडफडतात. रडतात. बिभीषण गौप्यस्फोट करतो.

वानरान् मोहयित्वा तु प्रतियातः स राक्षसः ।

श्रीराम आणि वानरवीरांना संजीवनी देतो. युद्धावरती तो हिरीरीने लढला. रावणरथाचे घोडे त्याने ठार केले. अजिंक्य आणि अदृश्य होण्याकरिता अभिचार सहायज्ञकर्मात गुंतलेल्या इंद्रजिताच्या रहस्याचा स्फोट करतो. वानरवीरासह यज्ञस्थली चढाई करतो. वानरांच्या प्रतिकाराकरिता इंद्रजिताला मधूनच उठावे लागते, यज्ञ अपूरा राहतो. आणि म्हणूनच प्रखर झुंज देणारा लक्ष्मण त्याचा वध करायला समर्थ होतो.

बिभीषणाची ही कामगिरी बिनतोड आहे.

इंद्रजित-लक्ष्मणाची लढत विलक्षण भडकली. दोघेही अटीतटीने झुंजतात. लक्ष्मणाच्या पराजयाची चिन्हं दिसताच बिभीषण सरसावतो. आणि मग रक्ताची ओढ त्याला बेचैन करते. त्याच्या डोळ्यात अश्रू तराळतात. धनुष्य लटपटते. तो धर्मसंकटात सापडतो.

हन्तुकामस्य मे बाष्पं चक्षुश्चैव निरुध्यति ।
तमेवैष महाबाहुः लक्ष्मणः शमयिष्यति ।।
(९०-१८)

तो म्हणतो, "श्रीरामाकरिता अंतकरणातल्या रक्तसंबंधाला मूठमाती दिलीच पाहिजे. आणि स्वकीयांचं बलिदान केलंच पाहिजे. माझ्या पुतण्याला मी ठार करीन. पण माझ्या नेत्रात अश्रू का ? मला स्पष्ट दिसत नाही. लक्ष्मणा तूच याचा वध कर रे."

रावण वधानंतर बिभीषण आर्त आक्रंदन करतो आणि मग लवकरच त्याला दुराचारी रावणाची कुकर्मे आठवतात. तो संतापाने म्हणतो, "या पाप्याची उत्तरक्रिया मी करणार नाही."

धीरोदात्त सत्वशील श्रीराम त्याचं सांत्वन करतात. रावण थोर राजा होता. प्रचंड पराक्रमी होता. अपराजित वीर होता. त्याचं वीरमरणही थोर होतं. शास्त्रविधीप्रमाणे उत्तरक्रिया कर.

बिभीषणावर अनेकांनी विलक्षण आग पाखडली आहे. टीकेचे बाण सोडले आहेत.

बिभीषण कृतघ्न होता. विश्वासघातकी होता. देशबुडव्या होता.

वास्तविक बिभीषण हा सुविचारी सदाचारी आहे. धर्मसंस्कृतीचा मूर्तिमंत नंदादीप आहे. सरळ पुनीत मार्गाने जाणाऱ्या बिभीषणाचा मार्ग सात्विकतेचा आहे. उदात्त चांगुलपणाचा अर्क आहे. दुष्टनिर्दालन आणि सुजन प्रतिपालन करणाऱ्या महा पराक्रमी पुरुषोत्तम रामाच्या भव्योदात्त जीवनाची त्याला कल्पना आहे. रावणाच्या उधळलेल्या बेलगाम उन्मत्त अनन्वित कुकर्मांना तो विटला आहे. बेछूट दुराचाराचा मूर्तिमंत पुतळा असलेल्या रावणाची प्रत्येक पापकृती मानवी संस्कृतीला अधःपाताच्या गर्तेत लोटत असल्याची त्याला जाणीव आहे.

कुकर्मी रावणाचा फार तर बिभीषणाने त्याग करावा. लंकेबाहेर त्याला कुठेही राहता आलं असतं. पण तो शत्रूला का मिळाला ? इंद्रजिताने नेमका हाच आक्षेप घेतला आहे.

इह त्वं जातसंवद्धःसाक्षाद् भ्राता पितुर्मम ।
कथं द्रुह्यसि पुत्रस्य पितृव्यो मम राक्षस ।
न जातित्वं न सौहार्दं न जातिस्तव दुर्मते ।
प्रमाणं न च सोदर्यं न धर्मो धर्मदूषण ।
शोच्यस्त्वमसि दुर्बुद्धे निन्दनीयश्च साधुभिः ।

( ८७-११ ते १३ )

अजानन्निव धव्छीलं किं राक्षस विकत्थसे

" दुष्ट पाप्या, तुला कुलाचा अभिमान नाही. लेश नाही धर्मावरच तू शस्त्र उगारलंस. नरकाची उपासना केलीस. "

बिभीषणाने पुतण्याला सडेतोड उत्तर दिले.

राक्षसेन्द्र सुतासाधो पारुष्यं त्यज गौरवात् ।। १८ ।।
कुले यद्यप्यहं जातो रक्षसां क्रूरकर्मणाम् ।
गुणोऽयम् प्रथमो नृणां तन्मे शीलमराक्षसम् ।। १९ ।।
धर्मात्प्रच्युतशीलं हि पुरुषम् पापनिश्चयम् ।
त्यक्त्वा सुखमवाप्नोति हस्तादाशीविषं यथा ।। २ ।।
हिंसा परस्वहरणे परदाराभिमर्शनम ।
त्याज्यमाहुर्दुखात्मानं. वेश्म प्रज्वलितं यथा ।। २२ ।।
परस्वानांच हरणं परदाराभिमर्शनम्
सुहृदामतिशंका च त्रयो दोषाः क्षयावहाः ।। २३ ।।
महर्षीणां वधो घोरः सर्वदेवैश्च विग्रहः ।।
अभिमानश्च रोषश्च वैरत्वं प्रतिकूलता ।। ९४ ।।
एते दोषा मम भ्रातुर्जीवितैश्वर्यनाशनाः ।।
गुणान्प्रच्छादयामासुः पर्वतानिव तोयदाः ।। २५ ।।
दोषैरेतैः परित्यक्तो मया भ्राता पिता तव ।। २६ ।।

( स ८७ – १८ ते २६ )

खाणे पिणे, आणि संतती निर्माण करणे, पशूही करतात. मानवी जीवनाला अर्थ आहे. उदात्त हेतू आहे. भव्योदात्त उद्दिष्टाकरता, सर्वस्वाचा होम करणे हेच मानवाचे इतिकर्तव्य.

दोन्ही पक्ष धर्मनिष्ठ असतील अथवा अधर्मी असतील तरच दोघांपासून अलिप्त राहता येईल. 'रामरावण युद्ध हा धर्मअधर्मांचा संघर्ष आहे. पशुता आणि मानवतेचा झगडा आहे. दोन्हीपासून मनुष्यास दूर राहता येणार नाही. धर्म अथवा अधर्म कुठल्याची तरी कास धरावीच लागते. या दोन्हीपासून पूर्णपणे अलिप्त राहण्याचा कुणाला अधिकार नाही.

बिभीषणाने वैऱ्याला रहस्ये का सांगितली? मर्मान्ते का सांगितली? जय प्राप्त करून देणारा बिनतोड सल्ला का दिला? युद्धात स्वकीयाविरुद्ध स्वतः का लढला?

श्रीरामाच्या लोकोत्तर चारित्र्याची, तो पुरुषोत्तम असल्याची त्याला पुरेपूर खात्री होती. दुराचारी रावणाच्या स्वैराचाराचा उबग आलेल्या बिभीषणाने त्या महापुरुषासमोर शरणागती पत्करली. सर्वस्व समर्पिले. रामपक्ष सत्पक्षाचा होता. धर्माचा होता. त्याकरता सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून देणे त्याचे कर्तव्य होते. सत्प्रवृत्ती कोळपते. त्या मानवी संस्कृतीला आग लावणाऱ्या अधर्मी रावणाच्या विनाशकावर त्याने सर्वस्वावर तिलांजली सोडली हे का पाप आहे ? का मानवी अध:पात ?

बिभीषणाने स्वत: राज्याभिषेक का करवून घेतला ?

लंकेतील योध्यांचा भीषण संहार झाला होता. उरली होती ती बालके, विकलांग वृद्ध विधवा आणि अनाथ, लंका उध्वस्त झाली होती. राजवंशापैकी एकमात्र बिभीषण काय तो उरला होता. लंकेचं राज्य स्वीकारण्यात त्याची आसुरी महत्वाकांक्षा नव्हती. दाणादाण उडालेल्या लंकेला चतुर सद्गुणी धर्मनिष्ठ राजा हवा होता. केवळ कर्तव्य म्हणूनच धीरोदात्त बिभीषणाने लंकेचा राजमुकुट स्वीकारला. राष्ट्रद्रोह केल्याचा आक्षेपकांचा आरोप अस्थानी आहे. मातृभूमी विजेत्या शत्रूला देऊन त्याच्या गुलामगिरीचं जू आपल्या मानेवर बांधून घेण्याकरता सरसावला नाही. पुरुषोत्तम श्रीरामाला लंकेची अभिलाषा नाही. सुतळीच्या तोडीचीही इच्छा नाही. लंकेवर हुकूमत गाजवण्याची, मांडलीक बनवण्याची मनिषा नाही. राजसिंहासनावर सत्वशील गुणसमृद्ध, धर्मनिष्ठ उज्वल चारित्र्याचा राजवंशातला पुरुषच तो राजसिंहासनावर बसवू इच्छित होता.

रामकालाच्या मोजमापानुसार प्रागैतिहासिक काली तरी बिभीषण मानवी संस्कृतीचा दीप होताच. आणि आजचे मोजमाप लावले तरी देखील त्याच्या अनन्यसाधारण थोरवीला पुसटता डागही लावता यायचा नाही. तो महापुरुष होता. धर्मसंस्कृतीचा ज्वलंत हिमालयासारखा उत्तुंग आदर्श त्याच्या रूपाने लोकसमाजासमोर चिरंतन खडा आहे. भव्योदात्त चारित्र्यवान बिभीषणाने लोकमानसात अनन्यसाधारण स्थान मिळवले आहे. भारतीय संस्कृती बिभीषणास चिरंजीव भक्त मानते.

लक्ष्मण महापराक्रमी आहे. अद्भुत बुद्धिमत्ता असलेला सौमित्र तीव्रकोपी आहे. मितभाषी आहे. गगनासारखं त्याचं मन विशाल आहे. श्रीरामाचा तो अनन्यदास आहे. त्याच्या अनन्य रामनिष्ठेचा अत्युत्कट निष्ठेचा " कैंकर्य लक्ष्मीचा " युद्ध काण्डातला अत्युत्कट पैलू मन वेधून घेतो.

श्रीराम त्याला युवराज्यपद देतात. लक्ष्मण नकार देतो. श्रीराम शिकस्त करतात. लक्ष्मण तसूभरही ढळत नाही. भरतही आवर्जून कळवळून विनवण्या करतो. गळ घालतो. मेरुसारखा महानिश्चयी लक्ष्मण अविचल असतो. रामदास्याला पुसटता ओरखडा देखील लागण्याचा त्याला सहन होत नाही. श्रीरामाचा निरुपाय होतो. भरताला हात टेकावे लागतात. अखेरीस भरतालाच श्रीराम युवराज करतात.

सर्वात्मना पर्यनुनीयमानो यदा न सौमित्रिरुपैत्रि योगम् ।
नियुज्यमानोऽपि च यौवराज्ये ततो भ्यषिञ्चद् भरतं महात्मा ।।

( सर्ग १९-९३ )

लक्ष्मणाची जशी श्रीरामावर अत्युत्कट प्रीती आहे. तशीच श्रीरामाची त्याच्यावर आहे. नव्हेतर अधिकच आहे. श्रीरामाचं सीतेवर स्वप्राणापेक्षाही जास्त प्रेम आहे. आणि सीतेपेक्षाही लक्ष्मणावर अधिक ममता आहे.

श्रीरामाच्या अत्युत्कट भव्योदात्त प्रीतीचं अतीव भावमधुर, मनोहर चित्र युद्धकांडातल्या दोन सर्गात आहे. ( सर्ग ४९, १०९ )

इंद्रजिताच्या नागशरतळयावर राम-लक्ष्मण मुर्च्छीत पडले होते. श्रीराम आधी सावध झाले. लक्ष्मणावर त्यांची नजर खिळली. रुधिराने सुरूवात झालेल्या त्याच्या देहाच्या तसू तसूत बाण घुसले होते. श्रीराम स्वतःच्या वेदना विसरले. विलाप करू लागले.

किं नु मे सीतया कार्यं किं कार्यं जीवितेन वा ।
शयानं योऽद्य पश्यामि भ्रातरं युधि निर्जितम् ।।

लक्ष्मण नसेल तर सीतेची मुक्तता करून तरी काय उपयोग.

शक्या सीतासमा नारी मर्त्यलोके विचिन्वता ।
न लक्ष्मण-समो भ्राता सचिवः ? सांपरायिकः ।।

(४९-६)

लक्ष्मण नसेल तर मी वानरांदेखत प्राणत्याग करीन.

परित्यक्ष्याम्यहं प्राणान् वानराणां तु पश्यताम् ।

(४९-७)

आणखी एक अत्युत्कट प्रसंग–

रावणाच्या दिव्य शक्तीने लक्ष्मण कोसळला. मृतवत् पडला. राम आक्रंदन करतो.

यथैव मां वनं यान्तमनुयातो महाद्युतिः ।
अहमप्यनुयास्यामि तथैवनं यमालयम् ।

विजनवासातील करुण हालअपेष्टा आणि आपत्तीत माझी पाठराखणी करणाऱ्या लक्ष्मणाच्या पावलावर पाऊल ठेवीत मी यमसदनी जाईन.

देशे देशे कलत्राणि देशे देशे च बान्धवाः ।
तं तु देशं न पश्यामि यत्र भ्राता सहोदरः ।।

भार्या मिळेल. आप्तस्वकीय आढळतील पण लक्ष्मणासारखा भाऊ शोधूनही कुठेच मिळायचा नाही.

इहैव मरणं श्रेयो न तु बन्धुनिवर्हणम् ।

विलाप करणारा राम म्हणतो.

"किं मया दुष्कृतं कर्म कृतमन्यत्र जन्मनि ।

(१०२-१७)

जन्मान्तरीचं माझं पातक आडवं येत आहे.

हनुमंताने हिमालयावरच्या आणलेल्या औषधींनी लक्ष्मणाला नवजीवन दिले. हर्षनिर्भर रामाने त्याला गाढ आलिंगन दिले.

न हि मे जिवितेनार्थः सीतया चापि लक्ष्मण ।
को हि मे विजयेनार्थस्त्वयि पञ्चत्वमागते ।

(१०२-४८)

अजिक्य इंद्रजिताचा वध करून रुधिराने सुरवात झालेल्या लक्ष्मणाला बिभीषण आणि हनुमंताने आधार दिला. त्याच्या शरीराच्या तसू तसूत बाण घुसले होते. त्याला जागचे हलणेही कठीण होते. मुखातून शब्द फुटत नव्हता.

इंद्रजितवध झाल्याचे तो श्रीरामाला कसंबसं सांगतो. श्रीरामाच्या हर्षास उधाण येते. विजयी, विनयी लक्ष्मणाला कुठं ठेवू असं त्यास होवून जातं. त्याच्या अत्युत्कट लक्ष्मणप्रीतीने कळस गाठला आहे. वाल्मीकींची, अतिमनोहर, प्रसन्न वाणी, ही घटना रंगविताना विलक्षण मोहोरली आहे.

स तं शिरस्युपाघ्राय लक्ष्मणं लक्ष्मिवर्धनम् ।
लज्जमानं बलात्स्नेहादङ्कमारोप्य वीर्यवान् ॥
उपवेश्य तमुत्सङ्गे परिष्वज्यावपीडितम् ।
भ्रातरं लक्ष्मणं स्निग्धं पुनः पुनरुदैक्षत ॥
मूर्ध्नि चैनमुपाघ्राय भूयः संस्पृश्य च त्वरन् ।
उवाच लक्ष्मणं वाक्यमाश्वास्य पुरुषर्षभः ॥
अद्याहं विजयी शत्रौ, हते तस्मिन् दुरात्मनि ।
रावणस्य नृशंसस्य, दिष्टया वीर त्वया रणे ॥
छिन्नो हि दक्षिणो बाहुः स हि तस्य व्यपाश्रयः ।

सर्ग ९२/९-११, १४ बळ १५

श्रीरामाने त्याच्या मस्तकाचं अवघ्राण केलं. त्याच्या अंगांगावरून रघुनंदनाची भावस्निग्ध अमृतदृष्टी फिरत होती. हर्षोत्कट धुंदीत त्याने लक्ष्मणाचे तोंड कधी इकडे तर कधी तिकडे फिरविले. मांडीवर घेतले. अत्युत्कट जिव्हाळयाने अंगावरून हात फिरविला. तो उद्‌गारला, ' लक्ष्मणा, तुझी कामगिरी बिनतोड आहे. रावणाचा उजवा हातच तोडलास, अर्धेअधिक काम तडीस गेले आहे. 'आपण जिंकलो. '

या अतीव मनोहर प्रसंगाचं चित्र रेखाटलं तर –

लक्ष्मणाची श्रीरामनिष्ठा हिमालयासारखी उत्तुंग आहे. अविचल आहे. श्रीरामाची कर्मनिष्ठा, तशी, लक्ष्मणाची रामनिष्ठा.

इंद्रजित मायावी सीतेचा वध करतो. दुष्ट रावणपुत्राने सीतेचे मस्तक उडविण्याच्या वार्तेने श्रीरामावर वज्राघात होतो. वानर शोकाग्रस्त होतात. त्यांना काहीही सुचेनासे होते. व्याकुळलेला श्रीराम विलाप करतो. " आता सारेच संपले. इथं राहून तरी काय करायचे ? माघारी जाऊ " लक्ष्मण चवताळतो. त्याच्या मुखातून तप्त लाव्हारस बाहेर पडतो.

कैकयीच्या वरप्रसंगी मी तुला सांगितलं तसंच घडलं ना ? कर्मबिर्म झूट आहे. धर्मच रक्षणकर्ता असता तर धर्माचं काटेकोर पालन करणाऱ्यावर आपत्तीचं आभाळ कोसळलं नसतं. अधर्म कधीच विजयी झाला नसता. सीतेचा वध ऐकायला तुझा धर्म का धावला नाही ?

शुभे वर्त्मनि तिष्ठन्तं त्वामार्यं विजितेन्द्रियम् ।।
अनर्थेभ्यो न शक्नोति त्रातुं धर्मो निरर्थकः ।।
यस्यार्थाः स च विक्रान्तो यस्यार्थाः स च बुद्धिमान् ।
यस्यार्थाः स महाभागो यस्यार्थाः स गुणाधिकः ।।

तो पुढे म्हणतो.

त्वयि प्रव्राजिते वीर, गुरोश्च वचने स्थिते ।
रक्षसापहृता भार्या प्राणैः प्रियतरा तव ।।

सर्ग ८३–१४, ३६, ४१,

" पित्याची आज्ञा पाळलीस. आणि प्राणप्रिय पत्नीस गमावून बसलास अब्रूच्या चिधड्या केल्यास. "

त्याचे सर्वस्व श्रीराम आहेत. श्रीरामाच्या तन मनाला यत्किंचितही धक्का लागलेला त्याला सहन होत नाही. नातीगोती, सुहृद स्वकीय, स्वप्राण सारे, सारे, तो श्रीरामावरून ओवाळून टाकायला तयार आहे.

आपत्तीची कुऱ्हाड पडली, महान अरिष्ट ओढवलं, तरी देखील श्रीराम धर्मापासून कर्तव्यकर्मापासून तसूभरही, ढळत नाही. मेरुसारखा तो अविचल. असतो.

लक्ष्मण, त्या अत्युच्च, भव्योदात्त पातळीला येऊ शकत नाही.

भरताचे भव्योदात्त अत्युत्कट पुण्यपावन दर्शन अयोध्याकांडानंतर घडतं ते श्रीरामाने विजनवासानंतर अयोध्येत पाऊल ठेवल्यावरच ! रामवनवासाचा चौदा वर्षांचा प्रदीर्घकाळ उग्र व्रताचरण करणारा, अग्रगण्य तपस्वी ब्रह्मर्षींनीही मान तुकवावी, असा भरत असीम पुण्य तेजाने सर्वांना भारून टाकतो.

श्रीराम वनात गेले, त्या दिवसापासून भरताने थोरल्या भावाचे वाक्य गिरविले. अरण्यात राहावे, तसा तो वैभवशाली अयोध्येत रहात होता. श्रीरामासारख्या त्यानेही जटा धारण केल्या. वल्कले धारण केली. मिष्टान्नास स्पर्श केला नाही. कंदमुळे फळे हाच त्याचा आहार! कुबेरनगरीसारख्या समृद्ध

अयोध्येत तो न राहता कोसावरच्या नंदीग्रामी त्याने आश्रम बांधला. उग्र तपस्वी मुनीसारखे भरताने अविरत, अखंड चौदा वर्षे कठोर व्रतपालन केले.

श्रीरामाच्या पावनपादुका त्याने अयोध्येच्या राजसिंहासनावर प्रतिष्ठापिल्या. त्या पादुकात भारताचे राम होते. तो त्यांचा सेवक होता. रामराज्याची धुरा सांभाळणारा दास, श्रीराम प्रतिनिधी.

नंदीग्रामाहून शासनव्यवस्था पाहाणाऱ्या, स्वर्ग जिंकणाऱ्या, भरताने 'मुलगा आईचे वळण गिरवितो' ही म्हण उलथून पाडली

ज्वलज्ज्हाल निष्ठेच्या भरताचे झाले की रामनेत्र पाणवतात. त्यांच्या जीवाचे पाणी पाणी होते

रावणाने अखेरचा श्वास घेतला. श्रीरामाने लंका जिंकली. विभीषणाला वचनाप्रमाणे राज्याभिषेक केला. श्रीराम–जानकी–स्वागताची लंकेत भरगच्च, जय्यत तयारी असते.

नवा लंकाधीश बिभीषण, श्रीरामाला आवर्जून विनवितो, 'निदान एखादा दिवस लंकेत रहा. माझे आतिथ्य स्वीकारा. अयोध्येहून इतक्या दूर लंकेला मला राजा केलेत. आता तसेच का परतणार? माझ्या समाधानाकरिता तरी –

पूजितोऽहं, त्वया, सौम्य, साचिव्येन परंतप।
सर्वात्मना च चेष्टाभि: सौहृदेनोत्तमेन च।

सर्ग १२४–१७–१८

श्रीराम उत्तरतात, 'तू मला सर्वस्व दिलंस तू माझं केव्हांच स्वागत केलं आहेस, मला आणखी काय हवे?

न खल्वेतन्न कुर्यां ते वचनं राक्षसेश्वर।

सर्ग १२४–१८

तुझं निमंत्रण मी अवश्य स्वीकारलं असतं. मला अविकृत निर्घृण, कठोर मानू नकोस. मला थांबता येत नाही.

तं तु मे भ्रातरं द्रष्टुं भरतं त्वरते मन: ।
मां निवर्तयितुं योऽसौ चित्रकूटमुपागत: ॥

१२४–१९

वैभवशाली राजमंदिरातून भ्राता माझ्या मागे चित्रकूटावर धावत आला. अयोध्येचे राज्य स्वीकारण्यास मी त्याला नकार दिला.

शिरसा याचतो यस्य वचनं न कृतं मया ॥
१२४-२०

विभीषणाला नकार देण्याचे कारण श्रीराम सांगतात

तं विना कैकयीपुत्रं भरतं धर्मचारिणम् ।
न मे स्नानं बहुमतं वस्त्राण्याभरणानि च ।
(स. १२४-६)

सदाचारी, निष्कलंक, पुण्यपावन धर्मनिष्ठ भरताविना मी अभ्यंगस्नान, करणार नाही. उंची वस्त्रे, अलंकाराचा विटाळ देहाला होऊ देणार नाही.

श्रीराम आगमनाची अमृतवार्ता, भरताला कळविण्याकरिता, हनुमान नंदीग्रामी येतो. धीरोदात्त, परमपावन भारताच्या पुण्य तेजापुढे हनुमंत वाकला. गंगाजलालाही पवित्र करणाऱ्या, विशुद्ध, पुण्यपावन, चारित्र्य, गुणसमृद्ध भरताचे-हृदयस्पर्शी वर्णन करणारी वाल्मीकींची प्रतिमा खळाळून वाहते.

क्रोशमात्रे त्वयोध्यायाः चीरकृष्णाजिनाम्बरम् ।
ददर्श भरतं दीनं कृशमाश्रमवासिनम् ।
जटिलं मलदिग्धांगं भ्रातृव्यसनकर्षितम् ।
समुन्नत जटाभारं वल्कलाजिनवाससम् ।
पादुके ते पुरस्कृत्य प्रशासन्तं वसुन्धराम् ।
चातुर्वर्णस्य लोकस्य भर्तारं सर्वतो भयात् ॥

वैभवशाली अयोध्येलगत कोसावरच्या नंदीग्रामी आश्रमात, जटा धारण केलेला, वल्कले नेसलेला, शान्त उदात्त भरत, राजसिंहासनाधिष्ठित रामपादुकांच्या पायाशी कृष्णाजिनावर बसला होता. धर्मरक्षण करणाऱ्या पावन भ्रातृदर्शनाने हनुमंत 'मोहरला.'

श्रीरामाच्या आगमनाची अमृतवार्ता कानावर पडताच हर्षोत्कटतेने, भरत मूर्छित झाला, कांही क्षणातच तो सावध झाला.

त्याच्या हर्षाने सीमा गाठली होती. अमृतवाणी आणणाऱ्या हनुमंताला काय द्यावे त्याला सुचेनासे झाले.

रामस्वागताची त्याने जय्यत तयारी केली. कुलगुरू पुरोहित आणि मेनेसह तो श्रीरामाच्या स्वागताकरिता सिद्ध होता. त्याने श्रीरामपादुका माथ्यावर धारण केल्या.

श्रीराम दिसताच, त्याने राम चरणाला मिठी मारली. हर्षाश्रूंनी अभिषेक केला.

अयोध्येचे राज्य परत करायला अधीर झालेल्या भरताने रामपादुका त्याच्या पायात स्वतःच्या हाताने घातल्या.

पादुके ते तु रामस्य, गृहित्वा, भरतः स्वयम् ।
चरणाभ्यां नरेंद्रस्य, योजयामास, धर्मवित् ।।

सर्ग १३०, । ५२-५३

हर्षोत्फुल्ल भरत म्हणतो,

अब्रवीच्च तदा–रामं भरतः सः कृताञ्जलिः ।
एतत्ते रक्षितं राजन् राज्यं निर्यातितं मया ।।

१३०–५३–५४

'माझ्यावर सोपवलेली आणि आजवर सांभाळलेली संपूर्ण राज्याची ठेव, सुरक्षित परत करीत आहे.

अद्य जन्म कृतार्थं मे, संवृत्तश्च, मनोरथः ।।

१३०–५४

माझे दीर्घकाळचे मनोरथ सफल झाले. मी कृतार्थ झालो ! धन्य झालो !

यस्त्वां पश्यामि राजानमयोध्यां पुनरागतम् ।

१३०–५५

चौदा वर्षांपूर्वीच मी तुज विनविले पण तू माघारी परतला नाहीस. भाग्याने हा प्रदीर्घकाळ संपला आहे. तू आलास. रामभेट पुन्हा होत आहे. आता स्वर्गसुखही मातीमोल आहे. देवांनाही हेवा वाटावा. असं माझं भाग्य थोर आहे.

अवेक्षतां भवान् कोशं कोष्ठागारं पुरं बलम् ।

१३०–५५

आपला कोश, भांडागार, सैन्य, ऐश्वर्य,

भवतस्तेजसा सर्वं कृतं दशगुणं मया ।

१३०–५६

तुझ्या असीम लोकोत्तर प्रभावाने पुण्याईने, या तुझ्या पावन पादुकांनी, माझ्यात चैतन्य ओतण्याने ही सर्व दहापटीने अधिक झाली आहेत,

रोम न रोम मोहोरलेल्या भरताच्या नेत्रातून हर्षाश्रू ओघळत आहेत.

सभोवती उभे असलेले, हर्षनिर्भर सुग्रीव, बिभीषण, वानराग्रणी हर्षोत्कट धुंदीत, राम–भरत भेट, सुखसंवादाचे अमृत प्राशन करीत होते. त्यांच्या चित्तवृत्ती तृप्तावल्या.

थोरल्या भावाच्या भेटीकरिता तगमगणारा, बेचैन व्रतस्थ भाऊ, राज्य परत करायला विलक्षण अधीर झाला आहे. दुष्ट निर्दालन करून माघारी फिरलेला दुसरा भाऊ, राज्याची ठेव स्वीकारीत आहे.

परमपवित्र उत्तुंग हिमालयासारखे चारित्र्य असलेल्या भावाच्या पुण्यतेजाचे, हर्षोत्फुल्ल चांदणे आसमंतात पडले आहे. सारेच पावन झाले आहेत. सर्वांच्या अंतःकरणात भाव भावनांचे कल्लोळ उसळले आहेत. नेत्राचे बांध फोडून ते उफाळून बाहेर पडले आहेत.

तथा ब्रुवाणं भरतं दृष्ट्वा तं भ्रातृवत्सलम् ।
मुमुचुर्वानरा बाष्पं राक्षसश्च बिभीषणः ।।
१३०-५६-५७

वानर असो की राक्षस असो, सर्वांचे नेत्र, अद्‌भुत पुण्यदर्शनाने सर्वांच्या चित्तवृत्ती मोहोरल्या. दोघा भावांच्या अद्वितीय भव्योत्कट अतीव प्रसन्न, निष्कपट प्रीतीच्या पुण्यमय दर्शनाने सारेच पावन झाले.

वाल्मीकीचे अवतार मानल्या गेलेल्या क्रांतदर्शी, संत महाकवी तुलसीदासांनी भरताचा हिमालयासारखा भव्योत्कट आदर्शच खडा केला आहे. अयोध्येचे ऐश्वर्य दसपट करणाऱ्या नंदीग्रामच्या आश्रमात श्रीरामपादुका लगत असलेल्या, धीरगंभीर प्रतापी, भरताच्या भव्योदात्त शासनाचे, तुलसीदासांनी अतीव मनोहर वर्णन केले आहे.

अवधराज सुरराज मिलाई
दशरथधन सुनि घनद सजाई ।।
तेही पुर बसत भरत विनु रामा ।
चंचरिक जिमि चंपक बागा
रमाविलास राम अनुरागी ।
तजत वमन जिमि जन बडभागी ।

भरताच्या सर्वोत्कृष्ट शासनाची देवराज इंद्र स्तुती करू लागला. दशरथाचे ऐश्वर्य कुबेरालाही लाजवणारे होते. चंपकवनातल्या भ्रमरासारखा भरत

अनासक्त वृत्तीने रहात होता. रामचरणाची कास धरणारे लक्ष्मी विलासाचा व मनाप्रमाणे त्याग करणारे महाभाग धन्य होत.

लक्ष्मण राम सिए कानन वसही ।
भरत भवन नसि तप तनु रूसही ॥
दोड दिसी समुईन करत सब लोगू ।
सठा विधी भरत सराइन जोगू ।
सुसि इह नेम साधु सकुचाही ।
देखि दसा मुनिराज लजाही ॥

विजनवासातोल, रामलक्ष्मणापेक्षाही भरताचे तप उग्र होते. तो अधिक थोर आहे. अशी लोक मुक्त कंठाने स्तुती करीत महानिश्चयी विचार पावन भरतासमोर तपस्वीही मान तुकवित असत.

प्रभु तरूतल, कपि डाठ पट । ते किए आपसमान ।

झाडाखाली राम. आणि वर चंचल उन्मत्त उमॅट, माकडे, त्यांनाही श्रीरानप्रभुने आपलेसे केले. अंतरे राजी राखण्याकरिता श्रीराम अगदी क्षुल्लक, एवढया तेवढया, बाबीनाही किती जपतात, याचो सुंदर साक्ष, नंदीग्रामला श्मश्रु, मंगलस्नानादी उपचार प्रसंगी मिळते.

वनवासात, व्रतस्थ असलेल्या श्रीरामाचे श्मश्रु मंगलादि उपचार करायला सारे आतुरले होते. कुशल, मुरब्बी नापित आले. मंगलस्नानाची वस्त्रे जय्यत सिद्धता झाली. श्रीराम थांबले. आधी सर्वांची स्नाने उरकून घेण्याची त्यांनी सूचना दिली. सुग्रीव, विभीषण, वानराग्रणी, लक्ष्मण, शत्रुघ्न, भरत वगैरे अग्रगण्यांची श्मश्रु अभ्यंगस्नानादि उपचार झाल्यानंतर; श्रीरामाने श्मश्रु केली. मंगल स्नान केले.

पूर्व तु भरते स्नाते लक्ष्मणे च महाबले
सुग्रीवे वानरेन्द्रे च राक्षसेन्द्रे विभीषणे
विशोधित जटः स्नातश्चित्रमाल्यानुलेपनः ॥
महार्ह वसनो रामस्तस्थौ तत्र श्रिया ज्वलन् ।
प्रतिकर्म च रामस्य कारयामास वीर्यवान् ।
लक्ष्मणस्य च लक्ष्मीवानिक्ष्वाकु कुल वर्धन: ॥

प्रतिकर्मच सीतायाः सर्वा दशरथस्त्रियः।
आत्मनैव तदा चक्रुर्मनस्विन्यो मनोहरम्॥
(१३११४ ते १७)

मुरब्बी नापितांनी सर्वांची श्मश्रु केली. भरत, शत्रुघ्न, लक्ष्मण बिभीषणाचे मंगलस्नान झाले. नंतर श्रीरामानी श्मश्रु. मंगलस्नान उरकले. सुगंध दरवळून टाकणारी, दिव्य उटी लावली. उंची वस्त्रे परिधान केली. तत्वशील शत्रुघ्नाने, कुबेराघरी असावेत असे स्वर्गीय रत्नसुवर्णाचे अलंकार रामलक्ष्मणास घातले.

युद्धकांडातील श्रीरामाचे कर्तृत्व अतिप्रभावी आहे. कोटी कोटी वानरसेनेचं, अद्भुत नेतृत्व, महत्प्रयाससाध्य पेचप्रसंगी निरगाठी सहज सोडविण्याची त्याची असामान्य बुद्धि, कौशल्य, त्रिभुवनात बिनतोड आहे. समरभूमीवरचा पराक्रम, साहस, धुरंधरता अतुल आहे.

श्रीरामाच्या सानिध्यात आलेला प्रत्येकजण, त्याचे शत्रु देखील त्याच्या भव्योदात्त, उत्तुंग, व्यक्तीमत्वाने, भारावले आहेत. अंतराळात प्रचंड भरारी मारणाऱ्या गरूडासमोर, जमीनीवर खुरडणारा पक्षी, तसे प्रथम श्रेणीच्या अग्रगण्यांना, स्वत्व, खुजं वाटू लागलं. श्रीरामाचं दास्य स्वीकारताना, त्याचीच स्तुतीगाथा गाण्यात धन्यता वाटू लागली आहे.

रावण वध झाला. महायुद्धाची इतिश्री झाली. जिच्याकरता कोटी कोटी वीर लंकातटावर धडकले, जिच्याकरता भीषण महायुद्ध भडकले, जिच्याकरता अद्भुत प्रचंड राक्षस संहार झाला, जिच्याकरता लंका उध्वस्त झाली. जिच्याकरता श्रीरामाने अतुल त्याग केला, जिच्यावर प्राणापेक्षा अधिक प्रीति केली. जिच्या विरहाग्नीने होरपळलेल्या, त्याला स्वप्राणही नकोसे झाले, त्या सीतेस आणण्याचा आदेश दिला.

बिभीषणाला तो म्हणाला, 'मंगल स्नान केलेल्या, उंची वस्त्रे, अलंकारानी विभूषित झालेल्या सीतेस घेऊन ये'

श्रीरामाचा निरोप समजताच सीता स्तिमित होते.

'मी जशी आहे, इथे होते, तशीच पतीदेवास भेटेन.'

श्रीरामाची आज्ञा आहे, तशीच पाळावयास हवी.'

सुस्नान झालेल्या, उंची अलंकारांनी नटलेल्या, सीतेची शृंगारलेली पालखी येते. राम भार्येस पहायला अधीर झालेल्या वानरांची प्रचंड गर्दी उसळते. बिभीषण मेनकाकरवी त्याना दूर सारतो छडीमार करून दूर करतो. गडबड उडते

हलकल्लोळ माजतो. श्रीराम संतापतो, ' वानरांना दूर करू नका. माझे आहेत ते. त्याना सीता पाहू द्या. चारित्र्य आणि सदाचारच कुलस्त्रीचे रक्षण करतात, सीता चालत येईल. '

हनुमान, आणि जांबवान, सुग्रीव आणि अंगद, विभीषण आणि लक्ष्मण सारेच विस्मयाने हतबुद्ध होतात

पालखीतून उतरून सीता पायीच चालत येते.

श्रीरामावर तिची नजर खिळते पतीच्या नेत्रात जीवनसहचारिणीच्या भेटीची अनिवार ओढ दिसत नाही. अंत:करणाचा ओलावा भासत नाही. हर्षोत्कटता आढळत नाही.

श्रीराम गंभीर असतो. त्याचे नेत्र निष्ठुर असतात. चेहरा उग्र असतो.

स बद्ध्वा भ्रुकुटीं वक्त्रे तिर्यक्प्रेक्षित लोचनः ।

(११८-१२)

अपराध्याने, न्यायाधिशासमोर उभं रहावं तसं तिला वाटतं.

श्रीराम बोलतात, ' ईश्वाकुंचो दिगंत कीर्ती उज्वल राखण्याकरिता दुराचारी रावण आणि अनन्वित राक्षसांचा, संहार करून माझ्या उपमर्दाचे उट्टे काढले.'

आणि मग अग्नीच्या धगधगणाऱ्या ठिणग्या बाहेर पडतात.

' तुझ्या करता मी हे सारे केलं नाही. '

सीता चमकते भयंकर राम वाग्बाण तिच्या अंत:करणाचे लचके तोडतात.

प्राप्त चारित्र सन्देहा मम प्रतिमुखे स्थिता ।

(११८-१७)

" तू कलंकित आहेस, अमंगल आहेस, अपवित्र आहेस. "

तद्गच्छ, ह्यभ्यनुज्ञाता ।

हवे तेथे जा

एता दश दिशो भद्रे

तुला दाही दिशा मोकळ्या आहेत.

कार्यमस्ति न मे त्वया ।।

मला तुझी गरज नाही.

( ११८-१८ )

कः पुमान् हि कुले जातः स्त्रियं परगृहोषिताम् ।
तेजस्वी पुनरादद्यात् सुहृल्लेख्येन चेतसा ।।

कुठला मानधन कुलशील संपन्न महापुरुष वर्षभर परगृही राहिलेल्या पत्नीचा स्वीकार करील ?

रावणाङ्क परिभ्रष्टां दृष्टां दुष्टेन चक्षुषा ।
कथं त्वां पुनरादद्यां कुलं व्यपदिशन् महत् ।।

सूर्य कुळातला रघुवंशाचा सम्राट दशरथाचा राम स्वैराचारी रावण स्पर्शाने कलंकित झालेल्या तुझा स्वीकार कसा करील ?

तदर्थं निर्जिता मे त्वं यशः प्रत्याहृतं मया ।

स्वपौरुषानेच मी तुझी मुक्तता केली. माझ्या धवल कीर्तीवरचा डाग धुवून टाकला.

'नास्ति मे त्वय्यऽभिष्वङ्गो । श्रीराम पुढे म्हणतो ' यथेष्टं गम्यतामितः माझा अखेरचा निरोप घे. तुला रुचेल तेथे जा. ( ११८–२१ )

' इति प्रव्याहृतं भद्रे मयैतत्कृत बुद्धिना ।

मी पूर्ण विचार करून निर्णय घेतला आहे. माझा निश्चय पक्का आहे.

न हि त्वां रावणो दृष्ट्वा दिव्यरूपां मनोरमाम्
मर्षयेत चिरं सीते स्वगृहे परिवर्तिनीम् ।।

बेछूट अनियंत्रित, उधळलेला, सर्वसत्ताधीश राक्षसराज रावण, तुझ्यासारखी भूलोकाची सर्वश्रेष्ठ लावण्यवती, स्वर्गीय रूपसुंदरी स्वगृही असताना स्वस्थ कसा राहील ?"

श्रीरामाच्या प्रखर वाग्बाणानी प्रत्येकाचं अंतःकरण सोलून निघालं. प्रत्येकाच्या जीवाचं पाणी पाणी झालं. केवळ सीतेचं नव्हे, लक्ष्मणाचं नव्हे, बिभीषणाचं नव्हे, हनुमान, सुग्रीवाचे नव्हे तर सर्वंच्या सर्व वानरवीरांची विलक्षण तगमग झाली. वानर, युद्धाच्या खाईतून जगलेले राक्षस, सारे कानाव प्राण ओतून रामाचा शब्द झेलत होते. त्यांच्या स्तिमित नजरा त्याच्यावर खिळल्या होत्या. विस्मयातिशयाने हतबद्ध झालेल्या वानरांचे नेत्र श्रीरामाच्या क्रूर निर्घृण वाग्बाणांनी, त्यांचे नेत्र स्त्रवत होते.

सर्व आपआपल्या जागी उभे होते.

शोकसंतप्त, दु:खार्त सीता उच्चारते,

थोर, चारित्र्यवान, धीरोदात्त महापुरुष, सत्वशील, विशुद्ध साध्वी भार्येशी असले अभद्र बोलणार नाही.

यद्यहं गात्रसंस्पर्शं गतास्मि विवशा प्रभो।
काम कारो न मे तत्र दैवं तत्रापराध्यति ।।

(११९-८)

सत्यव्रती कोळपलेल्या बेलगाम रावणाने जबरीने मला स्पर्श केला. आणि तरी देखील आपण माझ्यावर आग पाखडता? क्षुद्र स्त्रीस अपराधी ठरविणाऱ्या यःकश्चीत पामरासारखे वागता?"

सीतेच्या मुखाच्या ज्वालामुखीतून तप्त लाव्हारसाचे थेंब बाहेर पडतात.

न तथास्मि महाबाहो यथा त्वमवगच्छसि।
प्रत्ययं गच्छ मे येन चारित्रेणैव ते शपे ।।

(११९-६)

ती खडसावते

पृथक्स्त्रीणां प्रचारेण जातिं तां परिशंकसे।
परित्यजेमां शंका तु यदि ते हं परीक्षिता ।।

श्रीराम तसूभरही ढळत नाही. अविचल असतो.

लक्ष्मणास ती म्हणते

चितां मे करु सौमित्रे व्यसनस्यास्य भेषजम् ।

(११९-१८)

अग्निदेवच मला आसरा देईल.

वानरांच्या नेत्रातून अश्रू गळत होते. त्यांच्या अंत:करणाला शतशः इंगळ्या डसत होत्या. रामाचं करणं कुणालाच पसंत नव्हतं. तो करतो त्याचं कारण कुणी सांगू शकत नव्हतं. त्याच्या कृतीचं समर्थन स्वतःच्या अंतःकरणी देखील कुणी करू शकत नव्हतं. आणि तरीसुद्धा विरोधाचा चकार शब्द उमटला

नाही. एकही आवाज ऐकू आला नाही. निषेध करणारा एकही हात उचलला गेला नाही.

त्याचं असं अद्भुत असामान्य वजन होते. तो जे बोलेल तो कायदा, सांगेल ती आज्ञा. ती तंतोतंत पाळली पाहिजे. प्राणपणाने पाळली पाहिजे.

आणि अखेरीस राम होता कोण ? तो कांही भारताचा सम्राट नव्हता. सत्ताधीश नव्हता. कुणी थोर तपःशक्तीसंपन्न महर्षी नव्हता. आणि असं असताना देखील कुणीच अवाक्षरही पुटपुटला नाही. निषेध करायला धजावला नाही.

लक्ष्मण आणि बिभीषण, अंगद आणि सुग्रीव, हनुमान आणि जांबवान सारे निश्चल, निःस्पन्द होते.

न हि रामम् तदा द्रष्टुं वाष्यश कत् सुहृत् ।
कश्चित्कालान्तकय मोपमम् अनुनेतुमथो वक्तुं ॥
( ११९–२२ )

श्रीरामाकडे नजर वळवायची कुणाची टाप नव्हती. किती थोर असला पाहिजे हा महापुरुष.

श्रीराम पुरुषोत्तम होता. धर्माचा मूर्तिमंत आविष्कार होता. अनेक दारुण दुर्धर आपत्तीत सभोवतीच्या सुहृदांनी त्याला खाली खेचण्याची पराकाष्ठा केली परंतु श्रीरामाने कुणालाच जुमानलं नाही. कुणाचाच मुलाहिजा ठेवला नाही. भव्योदात्त, उत्तुंग, अत्युच्च पातळीवरूनच त्याने पाऊल उचललं आहे.

लोक त्याच्या भव्योदात्त कृतींने स्तिमित झाले आहेत. सत्तेचा त्याग, राज्यत्याग या सामान्य गोष्टी होत्या. पण युद्धकांडातील अत्युच्च कळस वाढवणारी घटना, बिभीषण शरण येतो तेव्हाची आहे. श्रीरामाचा आत्मविश्वास असीम आहे. त्याने वानराग्रणींशी मसलत केली. हनुमंताचा अपवाद वगळला तर, त्याचा भाऊ लक्ष्मण, सुग्रीव, जांबवान, अंगद वगैरे सर्वांनीच बिभीषणाला निसं:दिग्ध नकार दिला.

सुग्रीव म्हणतो.

इद्रशं व्यसनं प्राप्तं भ्रातरं यः परियतेन ।
कौ नमाम स भवेतस्य यमेष न परित्यनेत् ॥
( १८ – ५ ६ )

आपत्तीत भावाना सोडणाऱ्या विश्वासघातक्यावर कोण विसंबेल ? कांही जण तर त्याला ठार करायला आतुरले होते. केवळ रामाच्या शब्दाचीच काय ती वाट होती. श्रीराम एकटाच, सर्वथा एकटाच सर्वांचा सल्ला बाजूला सारून कुणालाही न जुमानता निर्णय घोषीत करतो.

सकृदेव प्रपन्नाथ तवास्मीति च याचते ।
अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतदव्रतं मम ।।

( सर्ग १८ – ३३ )

केवढा हा जबरदस्त आत्मविश्वास, इनकंच नव्हे तर लंका तीरावर पोहोचण्यापूर्वी बिभीषणाला सर्वांच्या साक्षीनं राज्याभिषेक करून टाकला.

एवमुक्तस्तु सौमित्रिरभ्यषिञ्चद्विभीषणम् ।
मध्ये वानरमुख्यानां राजानं राजशासनात् ।

रावणाला पराभूत केलं. त्याची आयुधं मोडली. विरथ, निःशस्त्र रावणाला ठार करणं सहजसुलभ होत. असीम अर्थानं आत्मविश्वास असलेला राम म्हणतो.

कृतं त्वया कर्म महत् सुभीमं हतप्रवीरश्च कृतस्त्वयाहम् ।
तस्मात् परिश्रांत इति व्यवस्यन्न त्वां शरैर्मृत्युवशं नयामि ।
गच्छानुजानामिरणार्दितस्त्वं प्रविश्य रात्रिचरराज लंकाम् ।
आश्वास्य निर्याहि रथी च धन्वी तदा बलं द्रक्ष्यसि मे रथस्थः ।

( सर्ग ५९ – १४२–१४३· )

रावणवध झाला. बिभीषण विलाप करतो. राजा रावणाची उत्तरक्रिया करायची असते. शंकाकुशंकांनी तो व्याकुळतो. संशयपिशाच्चाने घेरला जातो. रावण माझा भाऊ होता. माझा राजा होता. माझा रक्षणकर्ता होता. पण तो दुष्ट होता. अन्यायी जुलमी बेछूट सत्ताधीश होता. मी त्याची उत्तरक्रिया करणार नाही.

नानमुर्खानी संस्कर्तु परदारामिर्शाम् ।

रावणाचं प्रेत सागरात फेकून द्या आणि प्रकरणावर पडदा पाडला असता पण–

पण तो राम होता, महापुरुष होता. पुरुषोत्तम होता.

विभीषणाला तो म्हणतो वीरमरण पत्करणाऱ्या थोर भावाची उत्तरक्रिया कर.

मरणान्तानि वैराणि, निर्वृत्तं नः प्रयोजनम्
क्रियतामस्य संस्कारो ममाप्येष यथा तव ।।

" तो जसा तुझा भाऊ तसा माझा देखील. मी सुद्धा त्याला भाऊच मानतो. तू जर संस्कार करणार नसशील, मी स्वतः करीन.

यमाप्येष चया तव । भाष्यकार याचा अर्थ मृत्युनंतर मी त्याला माझा भाऊ मानतो, असा करतात. तो योग्य आहे. त्यात अतिशयोक्तिपणाची पुसटशी छटा नाही.

श्रीराम आदर्श शत्रूदेखील आहे. शुकसारण या रावणाच्या मातब्बर कुशल हेरांना श्रीराम केवळ क्षमाच करत नाही तर संपूर्ण सेनानिरीक्षण करायला मुभा देतात. विभीपणाला त्याच्याबरोबर पाठवायला हवं. ती माहिती देण्याची सूचना देतात.

नागपाश बंधनाच्या आपत्तीत गरुड राम साहाय्याला येतो.

तो म्हणतो–

सखे राघव धर्मज्ञ, रिपुणां अपि वत्सल ।

हिमालयासारख्या उत्तुंग भव्योदात्त गंगाजलालाही पवित्र करणाऱ्या पुण्य पावन विशुद्ध, ज्वलज्जहाल आदर्श पुरुषोत्तमासमोर सारं विश्व वाकलं तर त्यात नवल काय ?

त्यांच्या शब्दाशब्दाला वेदाचं महत्व प्राप्त झालं असेल. त्याची चरण धुली मस्तकी धारण करण्यातच तत्कालीन सत्वशील, अग्रगण्य सत्पुरुषांस धन्यता वाटली असेल ! !

* *

# उत्तरकांड

निरीक्ष्य माद्य गच्छ त्वमृतुकालातिवर्तिनीम् ।
दृष्टपूर्वं न ते रूपं पादौ दृष्टौ तवानघे ।।
कथमत्रहि पश्यामि रामेण रहितां वने ।
इत्युक्त्वा तां नमस्कृत्य पुनर्नावमुपारुहत् ।।
VII 48 : 19, 2, 12

भावनोद्रेकात भारून टाकणारं मंत्रमुग्ध करणारं वाल्मीकी रामायणाच्या अखेरचं उत्तरकांड सर्ग १११ श्लोकांचं प्रक्षिप्त्व सर्ग तेरा आहेत. काही प्रतीत आहेत. काहीत नाहीत. त्यावर भाष्यकारांच्या टीका नाहीत. काहीही न वगळता सगळेच प्रक्षिप्त सर्ग घेतले आहेत.

उत्तरकांडात, रामलक्ष्मण जानकीचं कैलासासारख्या, उत्तुंग, भव्योदात्त जीवनगाथेतील, तेजोमय ज्वलज्जहाल, पैलूचं वाल्मीकींची प्रसन्न प्रतिभा, अतीव मनोहर सुभग, दर्शन घडविते.

राक्षसाधिपती रावण उधळलेला तानाशाह आहे. अफाट शक्तीने ताठरला आहे. त्रैलोक्य स्वसामर्थ्याने दडपून टाकण्याच्या संतानी लालसेने तो अति उग्र तप करतो. प्रजापती ब्रम्हदेवाच्या संतोषाकरिता राजा दशग्रीव प्रत्येक वर्षाच्या अखेरीस एकेक यात्रकाची मस्तकाचे बलिदान करतो. नऊ मस्तके समर्पित होतात. दहावे मस्तक छाटणार तोच सृष्टिकर्ता ब्रम्हदेव प्रगट होतात.

'वर माग'.

'कराल कालाची माझ्यावर सत्ता चालू नये. मला चिरंजीव करा' अविनाशी करा'.

'नियतीची मर्यादा तोडता यायची नाही, दुसरा वर' 'देव संपूर्ण यक्ष नाग दैत्य दानव, किन्नर गंधर्व पन्नग आदींना अवध्य असावे' सुपर्ण, नाग यक्षाना दैत्य दानव राक्षसांना अवध्यो हं प्रजाध्यक्ष देवानाच शाश्वत अहंकाराने ताठरलेला घमेंडी राक्षसराज, मानवाला क्षुद्र कीटकापेक्षा अधिक किंमत देत नाही.

फडतुस, मानव आसमंतातही फिरकायला धजायचा नाही अशी त्याची पक्की धारणा आहे.

न हि चिंता ममान्येशु प्राणिष्वमर पूजित
तृणभूता हि ते मन्ये प्राणिनो मानुषादयः '

( १०:२० )

देवानी अचूक मर्मस्थान हेरले. अजिक्य अनियंत्रित बेछूट रावणाचा मानवाकडूनच वध करविला.

कामिनीच्या आसुरी अभिलाषेने घेरल्यामुळेच रावणावर आपत्तीचे आभाळ कोसळले; सर्वनाश झाला. मोहविवश रावणाचे अभ्यंतर कामिनीच्या मोहाने पेटले आहे. संधी सापडेल त्यावेळी तो रूपसुंदरींना पळवून त्यांच्या रक्षणकर्त्याचा वध करतो. कुलांगना रतिपुतळी वळली नाही तर क्रूरपणे बलात्कार करतो. या त्याच्या बेछूट अनन्वित कुकर्मानि अनंत वैरी त्याने करून ठेवले होते.

यस्मादेष परक्यासु रमते राक्षसाधमः ।
तस्माद्वै स्त्रीकृतेनैव प्राप्स्यते दुर्मतिर्वधम् ।।
सतीभिर्वरनारीभिरेवं वाक्येऽभ्युदीरिते ।
नेदुर्दुन्दुभयः स्वस्थाः पुष्पवृष्टिः पपात च '।

VII २४:२०:२२

रावणाच्या जुलूमाला बळी पडलेल्या दु:खार्त देवांगना स्वर्गांगना अप्सरांच्या जहाल शापाग्नीने तो केव्हाच होरपळून निघाला आहे.

रावणाची इतिश्री करणारी शापवाणी आसमंतात घुमली आणि अंतराळात देवदुंदुभि निनादल्या

रावणापेक्षाही वाली अधिक बलशाली आहे. स्वशक्तीने त्रैलोक्य दडपून टाकण्याच्या आसुरी लालसेने घेरलेला रावण किष्किंधेला येतो. वानरराज संध्यावदन करत दक्षिणसागरतीरावर गेल्याचे सुग्रीव अंगद, मंत्री, त्याला सांगतात. उधळलेला आततायी रावण लगोलग दक्षिणसागर तीरावर पाऊल ठेवतो. वाली संध्यावदन करत असतो. रावणाचा कावा तो ओळखतो. संध्या उरकून तो विनायास त्याला काखेत दाबतो आणि त्याच्यासह पूर्व पश्चिम आणि

उत्तर सागरावर जातो. शांतमनाने संध्या उरकतो. तसाच रावणासह किष्किंधेला येतो.

वानरराज वालीच्या अद्‌भूत लोकोत्तर शक्तीने रावण हतबुद्ध झाला.

अहो बलमहो वीर्यमहो गाम्भीर्यमेव च ।
येनाहं पशुवद्‌गृह्य भ्रामितश्चतुरोऽर्णवान् ।।
त्रयाणामेवभूतानाम् गतिरेषा प्लवङ्गम् ।
मनोनिलसुपर्णानां तव चात्र न संशयः ॥

VII ३४: ३७, ३९

रावणाचा आणि वालीचा चिरंतन मित्रभावाचा संधी झाला, अग्निसाक्षीने दोघांनी शपथ घेतली.

त्वया सह चिरं सख्यं सुस्निग्धं पावकाग्रतः ।
दाराः पुत्राः पुरं राष्ट्रं भोगाच्छदनभोजनम् ।।

VII ३४: ४०, ४१

वालीच्या आलिशान प्रसादात रावण शाही थाटामाटाने राहतो.

स तत्र मासमुषितः सुग्रीव इव रावणः ।

३४:४४

वालीला धाकटा भाऊ सुग्रीव तसाच रावण असतो. दोघात आपपर भाव नाही दोघेही एक आहेत.

महापापी कुकर्मी रावणाविरुद्ध वालीला उभे करणे शक्य नसते.

दुष्ट रावणाच्या हाकेला त्याने अंतर दिले नसते. अग्निसाक्षीने झालेल्या मित्रभावानुसार त्याच्या पाठीशी उभा राहिला असता. श्रीरामाने वालीची इतिश्री केली सुग्रीवाला सखा केले.

महारुद्र वज्र हनुमंताची शक्ती अतुल आहे, देवांची छाती दडपून जावी असे प्रभंजन मारुतीचे सामर्थ्य आहे.

ससूत्रवृत्त्यर्थपदं महार्थं ससंग्रहं साध्यति वै कपीन्द्रः।
न ह्यस्य कश्चित्सदृशोऽस्ति शास्त्रे वैशारदे छन्दगतौ
तथैव ॥४५॥
सर्वासु विद्यासु तपोविधाने प्रस्पर्धते यो हि गुरुं सुराणाम्।
प्रवीविविक्षोरिव सागरस्य लोकान्दिधक्षोरिव पावकस्य ॥४६॥

३६: ४५: ४६

राज्याभिषेकानंतर राजा राम वानरवीरांना निरोप देतो. त्यावेळी रामभक्त हनुमान रामप्रभूची प्रार्थना करतो.

स्नेहो मे परमो राजंस्त्वयि तिष्ठति नित्यदा।
भक्तिश्च नियता वीर भावो नान्यत्र गच्छतु ॥
यावद्रामकथा वीर चरिष्यति महीतले।
तावच्छरीरे वत्स्यन्ति प्राणा मम न संशयः ॥

४०: १५, १६

'रामचरणाशी माझी वृत्ती अखंड खिळून राहावी. अत्युत्कट रामभक्तीत तिळाएवढं अंतर पडू नये. श्रीरामाविना दुसरा विचाराचा अंतःकरणाला दुरून देखील वास येऊ नये. भूलोकी रामकथा प्रकाशते आहे, वाहाते आहे तोवर मी रामचरित्रामृताचे रसपान करीन. मला अनन्य रामभक्तीचे वरदान द्या'.

श्रीरामाने वर दिला.

एवमेतत् कपिश्रेष्ठ भविता नात्र संशयः।
चरिष्यति कथा यावदेषा लोके च मामिका ॥
तावत्ते भविता कीर्तिःशरीरेऽप्यसवस्तथा।
लोका हि यावत्स्थास्यन्ति तावत्स्थास्यति मे कथा ॥

४०-२१-२२

हनुमंताच्या अनन्यसाधारण ऋणांनी भारावलेला भावविवश राम म्हणतो,–

एकैकस्योपकारस्य प्राणान् दास्यामि ते कपे।
शेषस्येहोपकाराणां भवाम ऋणिनो वयम् ॥

४०-२२

'हनुमंता तुझ्या अनंत ऋणाचे मोजमाप करता यायचं नाही. माझे प्राणही त्याची परतफेड करू शकत नाही. प्राण पाचच आहेत. तुझं ऋण अपरिमित आहे.'

मदङ्गे जीर्णतां यातु यत्त्वयोपकृतं कपे.
नरः प्रत्युपकाराणामापत्स्वायाति पात्रताम् '

४०:२३

रामप्रभूकरिता सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात सोडून देणाऱ्या तनमनाचा कण न कण आणि क्षण न क्षण वेचणारा रामदूत रामभक्त हनुमंताच्या सेवेची परतफेड का करायची ? तो का प्रत्युपकारार्थी आहे ?

चिरंतन अखंड भक्तिरसामृताचे रसपान करण्याची एकमेव मनिषा असलेला प्रभंजन रामदूत हनुमान रामकृपेने मृत्यूंजय झाला आहे. हनुमान चिरंजीव आहे. बिभीषण चिरंजीव आहे आणि वानराग्रणी मेंद, द्विविद, जांबूवंत, चिरंजीव आहे.

जाम्ववंतं तथोक्त्वा तु वृद्धं ब्रम्हसुतं तथा
मैन्दंच द्विविदं चैव पञ्च जाम्बवता सह
यावत्कलिश्च संप्राप्तस्तावज्जीवत सर्वदा

१०८/३७ – ३८

रामप्रभूचं वरदान आहे [साठी १०९] याच्यावर मृत्यूची सत्ता चालायची नाही.

राज्याभिषेकानंतर राम जानकीचा काल अनन्वित सुखात जात होता. सीतेच्या सर्व मनिषा पूर्ण होत होत्या. सीतादेवी जणू ढगावर तरंगत होती. जीवापाड प्रेम करणाऱ्या पतीच्या सहवासात जानकी जीवनातील सुखाचे काठोकाठ भरलेले उसळते प्याले प्राशन करीत होती.

अयोध्याच्या अशोकवनातील हर्षोत्कट धुंदीचे अतीव मनोहर चित्र वाल्मीकींनी चितारले आहे.

'एवं रामो मुदा युक्तः सीतां सुरसुतोपमाम् ।
रमयामास वैदेही महन्यहनि देववत् ।।

४२ : २४

रामसीतेच्या अत्युत्कट प्रीतीचं कोमल जाणीवांचं सुभग चित्रण मन वेधून घेते.

अब्रवीच्च वरारोहां सीतांसुरसुतोपमाम् ।
अपत्यलाभो वैदेही त्वयि मे समुपस्थितः ।।
किमिच्छसि वरारोहे कामः किं क्रियतां तव ।। '

४२ : ३० : ३१

इक्ष्वाकुवंश अंकुरला. गुपीत आता फार काळ छपायचं नाही. तुला हवे नको पाहणे माझं कर्तव्य आहे. तुझी मनीषा सांग. अयोध्येचा राजा राणीची दुराराध्य, दुःसाध्य, इच्छादेखील पुरवील. हर्षोन्मादाने फुललेली सीता हलक्या आवाजात उत्तरते.

तपोवनानि पुण्यानि द्रष्टुमिच्छामि राघव ।
अप्येकरात्रं काकुत्स्थ निवसेयं तपोवने ।।
तथेति च प्रतिज्ञातं रामेणा क्लिष्ट कर्मणा ।

४२; ३२ : ३५

एक दिवस तपोवनातील पुण्यपावन मुनिआश्रमात काढावा. निश्चिंत मनाने मुनिपत्न्यांच्यासह फळे मूळे खावी. त्यांच्या सहवासात राहावे.

बिचारी सीता ! भीषण भवितव्यतेचं बीज, नियतीचं क्रूर चेष्टीत तिने पेरले. दुष्ट चक्रालाच हात घातला.

हलक्या कानाचे, मनाचे, पौरजन कुजबूजतात. हळूहळू कुजबूज वाढत जाते. दुराचारी रावणाच्या बंदिशाळेत बारा महिने राहिलेल्या सीतेविषयी राजा रामरायावर चिखलफेक होते.

आमच्या बायकाही आता महाराणी मातेचं वळण गिरवतील. वाकडे पाऊल टाकणाऱ्या त्यांना निमूटपणे रामरायाप्रमाणे आम्हास घरात घ्यावे लागेल

अस्माकमपि दारेषु सहनीयं भविष्यति ।
यथा हि कुरुते राजा प्रजा तमनुवर्तते ।।

४३-१९

श्रीरामाच्या अन्त:करणाला पुसटता संशयाचा वास देखील येत नाही. माझं मन नि:शंक आहे. सीतेने अग्निदिव्य केले. देवांना सीतेच्या निष्कलंकतेची ग्वाही दिली. साक्षात् महेन्द्राने परमविशुद्ध पुण्यपावन सीतेचा स्वीकार करण्याची आज्ञा दिली.

लंकाद्वीपे महेन्द्रेण मम हस्ते निवेशिता ।
अंतरात्मा च मे वेत्ति सीतां शुद्धां यशस्विनीम् ।।

४५:१०

थोर पतिव्रता सीतेच्या उज्वल पावित्र्याची ग्वाही माझं अंत:करण देत आहे. माझी पूर्ण खात्री आहे.

राजा रामाच्या, इक्ष्वाकूच्या धवल कीर्तीला लोकापवादाचा जननिंदेचा काळीमा लागू पहात होता.

मेरूसारख्या महानिश्चयी रामाने, सीतात्याग करून जनापवाद साफ धूवून टाकण्याचा निर्णय घेतला.

तिघा भावांना तो म्हणतो,

कीर्त्यर्थं तु समारम्भः सर्वेषां सुमहात्मनाम् ।
अप्यहं जीवितं जह्यां युष्मान् वा पुरुषर्षभाः ।।

४५-१४

उज्वल कीर्तीकरिता मी सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून देईन. प्राण त्याग करीन. ‘ युष्मान् वा पुरुषर्षभाः ’ तुम्हा सर्वांचाहि वध करीन.

‘ अपकीर्तीचा दुरून देखील वास आला तर जीव देईन ’.

‘ अपवादभयाद्भीतः ’ किं पुनर्जनकात्मजाम् । १४६

४५-१४

श्रीराम सामान्य मानव नाही. राजा रामाच्या अद्‌भुत तेजोमय व्यक्तिमत्वाचे पैलू राजा दशरथ, लक्ष्मण, अथवा भरतासहि ओळखता आले नाहीत, प्रजाजन अथवा अन्य कुणासहि त्याची पुरती ओळख नाही. सीता आणि फार तर सुमित्रा दोघींना त्यांची पारख झाली आहे. इक्ष्वाकूंच्या सिंहासनाच्या इभ्रतीकरता कुठलंही दिव्य करायला श्रीराम सिद्ध आहे. त्याकरता केलेल्या त्यागाला मोजमाप नाही अशी त्याची धारणा आहे.

राजा रामाचं दुर्भाग्य की त्याचं अंतर्मन कुणालाच आकळत नाही. तेजोमय व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडत नाहीत. अखिल विश्वाविरुद्ध तो एकाएकी उभा ठाकला. अखिल विश्व त्यात दावू शकत नाही.

दुस्साध्य, भीषण, भयानक, कठोर असला तरी सीता त्याग त्याने तडीस नेला.

धर्मरक्षणाकरता श्रीराम सर्वस्व त्यागाच्या होमकुंडात झोकून देतो.

धर्माकरता राजा राम स्वप्राणाचे बलीदान करायला सिद्ध आहे. भावनांची आहुति द्यायला तयार आहे. त्याकरिता तो प्राणापेक्षाही अतिप्रिय भावांचा त्याग करतो, पुण्यपवित्र निष्कलंक जीवनसहचरीचा त्याग करणे असं कोणतेच दिव्य नाही, की जे श्रीराम करणार नाही.

जमीनीवर खुरडणाऱ्या पाखरास गरूडझेपेचं कसे आकलन होईल? सामान्यांच्या बुद्धीस न पेलणारा हा अचाट पल्ला आहे. असं अद्‌भुत अतर्क्य दिव्य रामच करू जाणे. हेच श्रीरामाचे सामर्थ्य.

रामाच्या आदेशानुसार लक्ष्मण गंगातीरावर सीतेला एकाकी सोडतो. विलक्षण आक्रंदन करतो. स्तिमित सीता विचारते, 'का रडतोस?'

लक्ष्मण विदारक सत्यकथन करतो. तिला धक्का बसतो. तिच्या माथ्यावर घणाचा घाव बसतो. क्षणार्धात निर्भय सीता स्वतःला सावरते. धीरोदात्त सीतेला अंतःकरण सहस्त्रशः विदीर्ण करणाऱ्या क्षणीही महाराणी पदाचे विस्मरण होत नाही.

दुःख भोगायला माझा जन्म आहे. पत्थराने रडावे अशी आपत्ती सहायला मला घडवले आहे.

'मी निष्कलंक आहे. देवदेवता अग्नीनारायणाने तशी ग्वाही दिली आहे. तरीदेखील माझ्या अब्रूवर धूळफेक व्हावी ना? माझंच पूर्वपाप आड येत आहे.'

'लक्ष्मणा, ऋषिपत्नींना तोंड कसं दाखवू? त्यांना काय सांगू? गंगेत मी देह विसर्जन केला असता, आता क्षणभरही जगायची इच्छा नाही. जगण्यासारखं काहीच उरलं नाही. पण काय करू रे? राजा रामाचा वंश उदरी अंकुरला आहे. देहत्याग करून त्याला खुरडून का टाकू? महापाप का करू?

लक्ष्मणा, माझ्या वतीने सासवांना वंदन कर. राजाला प्रणाम कर. त्यांच्या चरणावर माथा ठेव. माझा निरोप सांग. राजा राम राजधर्मात मुरला आहे. राजधर्मांची अंगोपांगं त्यांने आत्मसात केली आहेत. धर्माचरणाकरता राजा राम हवे ते दिव्य करील. सर्वस्वावर पाणी सोडील. मी निष्कलंक आहे. तशी मनोमन ग्वाही राजाचे अंत:करण देत आहे. केवळ जनापवादाला मूठमाती देण्याकरिता रामाने माझा त्याग केला आहे. भावाप्रमाणे प्रजेवर अत्युत्कट प्रीति कर. कीर्ति उज्वल राखा. दिगंत यशोधवल कीर्तिदुंदुभिने निनादून सोड. राजाच्या सुखातच माझे सुख आहे. तू प्रजेकरता ‘दिव्य केलंस तसं किंबहुना अधिकच दिव्य मी तुझ्याकरता करत आहे. पती हेच माझं दैवत प्राण आहे. त्याच्याकरता प्राणाचा होम करायची संधी लाभणं फार फार भाग्याचं आहे.

‘लक्ष्मणा, माझ्याकडे क्षणभर पहा रे! माझ्या उदरातील रामवंशाचा तू साक्षीदार आहेस’.

निरीक्ष्य माद्य गच्छ त्वमृतुकालातिवर्तिनीम्

४८ : १९

लक्ष्मण हतबुद्ध झाला. दगडासारखा निश्चल, नि:स्पंद झाला. तो म्हणतो–

दृष्टपूर्वं न ते रूपं पादौ दृष्टौ तवानघे।
कथमत्र हि पश्यामि रामेण रहितां वने।
इत्युक्त्वा तां नमस्कृत्य पुनर्नावमुपारुहत् ॥

४८ : २१ २२

तुझ्या चरणाविना मी कधी तुला पाहिले नाही. आणि आता मला बघायला सांगतेस. श्रीराम येथे नसताना? ज्याने पूर्वी संशय घेतला आणि आताही कदाचित ’–

कोण हा भीषण दुर्धरप्रसंग! पत्थरही रडतील, भूमी दुभंगेल, आकाश थरारेल. मानवाचं भाग्य आहे. तोच साहू जाणे.

आणि अखेरचा छाती फाडून टाकणारे, विदारक भयंकर दृष्य अनुभवाला धक्का देणारा भूलोकात आपण नाहीच अशी पक्की धारणा करून देणारा भीषण प्रसंग.

अश्वमेध यज्ञातील रामसभेत विशुद्ध चारित्र्याची, निष्कलंक चारित्र्याची ग्वाही देण्याकरिता सर्वांच्या साक्षीने शपथ घ्यायला वाल्मीकीसह सीता आलेली असते. सभेत थोर ऋषीमुनी आहेत. मंत्री अमात्य आहेत: अग्रगण्य पौरजन आहेत. वल्कले परिधान केलेली, पत्थरानेही रडावे, अशा भीषण प्रसंगाला तोंड देणारी पुण्यपावन कांतीने आणि दिव्य दैवी निश्चय, आणि आत्मविश्वासाने सभेत पावित्र्य दाखवून टाकणारी सीता म्हणते—

यद्यहं राघवादन्यं मनसापि न चिन्तये।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति।
मनसा कर्मणा वाचा यथा रामं समर्चये।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति।
यथैतत् सत्यमुक्तं मे वेद्मि रामात् परं न च।
तथा मे माधवी देवी विवरं दातुमर्हति ।।

९७ : १५, १६, १७

'पतीवेगळं मला जीवन नसेल, पतीतच माझं स्वत्व पतीदेवांत संपूर्ण विलीन झालं असेल तर, भूमाते, मला कुशीत घे!'

अतीव सुंदर स्वर्गीय सिंहासनावर अधिष्ठित दिव्य तेजोमय भूदेवी त्यावेळी अवचित वर आली. डोळयाचे पाते लवण्याच्या आत मैथिलीला घेऊन गेली.

नियतीचा अद्भुत प्रहार झाला. परिस्थीतीच अशी उद्भवली की लक्ष्मणाला स्वतःचा होम करून त्यातून वाट काढावी लागली. राम आणि ज्वलज्जहाल मुनी राजप्रासादात एकांतात बोलत होते. त्यांचे बोलणे ऐकणाराला वधदंडाचे शासन करण्याची मुनिश्रेष्ठांची अट राघवाने मान्य केली होती. लक्ष्मणाला त्याने आज्ञा दिली. 'कुणाच्या कानावर पडता कामा नये, तू देखील येऊ नकोस. अपराध्याचा वध करण्याचे ऋषिश्रेष्ठांना मी वचन दिले आहे.'

राजा रामाच्या आज्ञेनुसार स्वत: लक्ष्मण राजद्वाराशी खडा पहारा देत होता.

भाषण जवळ जवळ संपत आले होते. मुनिश्रेष्ठांनी राजा रामाचा निरोप घेतला. क्षण दोन क्षणात ते दिसेनासे झाले असते.

नियती क्रूर आहे. त्याच क्षणी अवचित वळवाच्या सरीसारखे अखंड भुकेलेले भडकलेल्या माथ्याचे कोपी दुर्वास टपकले.

' राजा रामाला भेटायचं आहे '.

' थोडं थांबावं लागेल '.

' मला सवड नाही '.

' मुनिश्रेष्ठांशी खाजगी बोलणं सुरू आहे. क्षणा दोन क्षणातच '-

' याच क्षणी माझी भेट व्हायला हवी. '

' क्षणभर— '

' अडवलंस तर तुझे भस्म करीन. राजा रामाची सर्व ईक्ष्वाकूंची; संपूर्ण अयोध्येची राखरांगोळी करीन, नावनिशाणी देखील उरू देणार नाही. '

तपःशक्तिशाली भडकलेल्या दुर्वासांनी तसं केलंही असतं.

विलक्षण पेचप्रसंग उद्भवला. यातून वाट कशी काढावयाची ?

' माझं बलिदान करून सर्वनाशाच्या गर्तेतून अयोध्येचा, रामाचा ईक्ष्वाकूंचा बचाव करीन.

एकस्य मरणं मेस्तु माभूत सर्वविनाशनम् ।।

१०५–९

तो सरळ आत गेला. वास्तविक सर्व संपले होते. ऋषी लगबगीने निरोप घेऊन जात होते. कदाचित् एखादा शब्द त्याच्या कानावर आला असेल. कदाचित त्याने पाहिले असेल.

ऋषि श्रेष्ठ दुर्वास दाराशी खडे असल्याचे कळताच स्वतः राजा राम लगबगीने गेला. मुनिश्रेष्ठास वंदन केले. अगत्याने त्यांना आत आणले. सिंहासनावर बसवले व त्यांचे पूजन केले.

रामप्रभूने दुर्वासांचे उत्कृष्ठ आतिथ्य केले. त्यांना संतुष्ट केले. दुर्वास मुनी जाताच तो लक्ष्मणाकडे वळला. राजाचे डोळेच बोलत होते. लक्ष्मणाने निर्भयपणे सुचवले ' मी अपराधी आहे. मला शासन कर. ठार कर '.

राज्याचा बचाव करण्याकरता प्राणांचा होम करायला सिद्ध झालेला निर्भिलाष निष्कलंक लक्ष्मणाचा वध का करायचा ?

श्रीराम संतुष्ट झाला.

मंत्री कुलगुरु वसिष्ठ, मुनि, मंत्र्यांसमोर त्याने विलक्षण समस्या मांडली.

धीरोदात्त वसिष्ठांनी निसंदिग्ध रोखठोक शब्दात निर्णय दिला.

राजाचा शब्द पडता कामा नये. अपराध्याला मृत्यूदंडच द्यायला हवा.

' नियतीचं हे एक क्रूर चेष्टित आहे. '

ते पुढे म्हणतात,

' अशा विलक्षण पेचप्रसंगातून वाट काढण्याचा आणखी एक मार्ग आहे.'

' कोणता '

' लक्ष्मणाचा त्याग करणे. त्याला हद्दपार करणे. त्याग हाच मृत्यू आहे.'

तच्छ्रुत्वा मंत्रिण: सर्वे सोपाध्याया: समासत ।
वसिष्ठस्तु महातेजा वाक्यमेतदुवाच ह ' ॥
दृष्टमेतन्महावाहो क्षयं ते रोमहर्षणम् । लक्ष्मणेन वियोगश्च
तव राम महाशय: । त्यजैनं वलवान् कालो मा
प्रतिज्ञां वृथा कृथा: । विनष्टायां प्रतिज्ञायां धर्मोऽपि
च लयं व्रजेत् । ततो धर्मे विनष्टे तु त्रैलोक्यं सचराचरम् ।
सदेवर्षिगणं सर्वं विनश्येत्तु न संशय: । स त्वं पुरुष
शार्दूल त्रैलोक्यस्याभिपालनात् । लक्ष्मणेन विना चाद्य
जगत् स्वस्थं कुरुष्व ह ॥

१०६ / ७-८-९-१०-११

' राजा सिंहासन सर्वापेक्षा थोर आहे. सिंहासनाची इभ्रत श्रेष्ठ आहे. सिंहासनाला पुसटता कलंकदेखील लागता कामा नये.

अनीति, अन्याय, पक्षपाताचा दुरून देखील वास येता कामा नये. राजा सिंहासनाच्या इभ्रतीपेक्षा कुठलंही बलिदान मोठं नाही. '

अघटिताने स्तिमित झालेल्या मंत्रिमंडळाने साधकबाधक विचार केला. वसिष्ठ आणि मंत्र्यांनी विशुद्ध अकलंकित गुणसमृद्ध महात्यागी लक्ष्मणाचा अतिउज्वल चारित्र्याचा विचार केला. श्रीरामाची त्याच्यावरची अत्युत्कट प्रीति लक्षात घेतली.

लक्ष्मण वियोगाग्नीच्या धगधगत्या ज्वाला अहर्निश राजा रामाला होरपळून काढतील याची त्यांना पुरेपूर कल्पना होती. धीरोदात्त लक्ष्मणांच्या निष्कलंकतेची निरपराधित्वाची ग्वाही देतील याची त्यांना खात्री आहे. आणि तरी देखील त्यानी एकमताने लक्ष्मणाविरुद्ध निर्णय घेतला.

तेजोमय वसिष्ठांनी तो निर्णय राजास ऐकवला.

"नियती अशी अद्‌भूत परिस्थिति निर्माण करते की त्यातून सुटकाच नाही. सर्वशक्तिमानाचा हा सर्व खेळ आहे. तोच सूत्रधार."

अखंड सावधान असलेल्या डोळ्यात तेल घालून जपणाऱ्या कसलाही प्रमाद केव्हाही घडू न देण्याची अखंड दक्षता घेणाऱ्या गुणसमृद्ध धीरोदात्त महापुरुषालाही नियती उलटपालट करून सोडते, धर्म पाळू इच्छिणाऱ्याला त्या धर्माविरुद्ध शस्त्र उपसावे लागते. रामाची आज्ञा प्राणपणाने पाळू इच्छिणाऱ्याला, लक्ष्मणाला ती मोडण्याचा बाका प्रसंग येतो.

नियतीच्या चमत्कारासमोर, अघटितासमोर मान तुकवावी लागते. हिमालयापेक्षाही उत्तुंग, तेजोमय आदर्श खडा करणाऱ्या महापुरुषाच्या ललाटीच अशा अत्यद्‌भुत दिव्य कसोटया असतात.

मरणापेक्षाही दारुण रामविरहाच्या यमयातना साहण्यापेक्षा, काळाचा जबडा लक्ष्मणाला सुखकर वाटतो. तो तडक निघतो. घराकडे त्याची पावले वळत नाहीत. कुणाचेच त्याला स्मरण होत नाही. तो सरळ शरयूवर जातो. आणि पावन शरयूला पावन देह समर्पून अधिकच पावन करतो.

ॐ ॐ

सुमाली दानवाधीशाने देवांची दाणादाण उडवली. धुव्वा उडवला. भयग्रस्त देवांच्या पाठीशी विष्णु उभे ठाकले. त्यांनी दानवांना नामोहरम केले. देवशत्रू जीव घेऊन पळत सुटले. रसातळात दडून बसले.

राक्षसांची ओस पडलेली लंका कुबेराने वसवली. देवपक्षानी नगर उन्नतीच्या शिखराला नेलं. इंद्राच्या अमरावतीसारखी सुवर्ण लंका विलोभनीय होती.

शत्रूचा उत्कर्ष होत होता. दानव तळमळत होते. विष्णूच्या असीम सामर्थ्यावर विसंबून असलेल्या देवांशी समरभूमीवर मुकाबला करणे शक्य नव्हते

शत्रूला काटशह कसा द्यायचा ? कावेबाज राजकारणी दानवांनी षडयंत्र रचले. लंकेवर पुनः स्वामित्व प्रस्थापित करण्याकरता डाव रचला.

कुबेराचा तपोशक्तिशाली पिता विश्रवा ऋषीशी सलगी करायची, नाते जोडायचे.

रूपसुंदर कन्या त्यांना समर्पण करायची. दानवाधीश सुमाली मुलीला वळवतो.

" सा त्वं मुनिवर श्रेष्ठ प्रजापतिकुलोद्भवम् ।
भज विश्रवसं पुत्रि पौलस्त्यं वरय स्वयम् " ॥

सा तु तद्वचनं श्रुत्वा कन्या पितृगौरवात्।
तत्र गत्वा च सा तस्थौ विश्रवा यत्र तप्यते।

९–१४

पित्याकरता, दानवांच्या उत्कर्षाकरता केकसी रुकार देते.

चातुर्याने ती मुनिआश्रमात प्रवेश करते. विवाहाचे अभिवचन घेते त्यांचा विवाह होतो.

केकसीला तीन मुलगे ! रावण, कुंभकर्ण आणि बिभीषण असे तिघे मुलगे आणि शूर्पणखा कन्या अशी चार अपत्ये असतात.

माता पुत्राना चेतवते. मुलगे तप करतात. शक्ति संपादन करतात. अद्भूत वरप्रसाद पदरात पाडून घेतात.

माता रावणाला भडकावते. अनन्वित रावण थोरल्या सावत्र भाऊ कुबेराला हुसकावून लावतो. लंकेचा स्वामी होतो. राक्षस डोके वर उचलतात. रावणनगरी राक्षसांनी गजवजते.

उन्मत घमेंडी राक्षसराज रावण स्वसामर्थ्याने त्रैलोक्य दडपून टाकण्याच्या मोहीमेवर निघतो.

अयोध्याधीश राजा राम अनियंत्रित सत्ताधीश नाही. हुकुमशहा नाही. राजावर धर्माचे नियंत्रण आहे. पुरोहीत, अमात्यांचा अंकुश आहे. मंत्रिमंडळाचा अटकाव आहे. प्रजाप्रतिनिधींची मर्यादा आहे. केवळ राजाच्या मर्जीवर राज्यकारभार चालत नाही. धर्मरक्षण, प्रजारक्षण, संवर्धन हेच राजाचे कर्तव्य. मानवी जीवनमूल्यांवर आघात करणाऱ्यास साफ करण्याकरताच त्याना शस्त्र उपसण्याचे स्वातंत्र्य आहे. रामराज्यात प्रजा स्वातंत्र्य आहे. विचारस्वातंत्र्य आहे. प्रजाजन प्रसंगी प्रत्यक्ष राजकाजात भाग घेतात. प्रजेचा निर्णय कधीच डावलला जात नाही.

अयोध्याधीश रामास राज्यतृष्णा नाही. सत्तेचं स्वतःत केंद्रीकरण करण्याची लालसा नाही. रामाने दिग्विजय केला तो केवळ धर्मरक्षणाकरताच केला. जीवन मूल्यांच्या बचावा करताच केला. अनन्वित बेलगाम उधळलेल्या अधार्मिकांना, विरोधकांना साफ केले. पण त्यांची राज्ये गिळंकृत केली नाहीत. राजवंशाकडेच राज्याची धुरा दिली.

राजांजवळ सूत्रे सोपविली. त्यांना स्वातंत्र्य दिले. राजा राम त्यांच्या कारभारात कधीही ढवळाढवळ करीत नव्हता, केली नाही, त्याना गुलाम बनविले नाही. मित्रराष्ट्राचा दर्जा दिला. राजवंश तगवला.

शरणागतास अभय हेच श्रीरामाचे व्रत होते.

अभयंसर्वं भूतेभ्यो, ददाम्येतत् व्रतं मम्।

राजा रामाने अभयदान व्रताचे निर्भयपणे काटेकोर पालन केले. व्रत तडीस नेले.

भारताने स्वातंत्र्य गमावले. अनेक वेळा गमावले पण रामायण जगवले. रोम रोमात मुरवले. म्हणूनच पुन: पुन: स्वातंत्र्य मिळविले.

वाल्मीकींच्या महाकाव्याच्या मानससरोवरात राजहंसाप्रमाणे मुक्त विहार करा. रामकथामृताचे काठोकाठ भरलेले उसळते प्याले हर्षोत्कट धुंदीत पुरेपूर प्राशन करा. महत्प्रयासानेही साध्य होण्यास कठीण असलेला लक्ष्मी आणि सरस्वतीचा वरदहस्त असलेल्या रामायणात मनसोक्त अवगाहन करून उत्साह प्राप्त करून घ्या. एखाद्या कोरीव लेण्याप्रमाणे मनोमानसावर वाल्मीकींच्या अपार वाणीचे संस्कार घडवून घ्या. असे घडवा की साक्षात् यमासहि ते पुसून टाकता येणार नाहीत.

रोमारोमात राम संचारू द्या. नसानसात रामकथामृताचा स्त्रोत वाहू द्या. रामाचे लक्ष्य गिरवण्याची शिकस्त करा. लक्ष्मणाशी सलगी करा. भरताला अंतर देऊ नका. शत्रुघ्नाला जवळ करा. हनुमंताशी सख्य करा.

रामजानकीच्या हातात जीवनाची सूत्रे द्या. निःशंकपणे स्वहृदयाचे स्वामित्व बहाल करा धन्य व्हा. कृतार्थ व्हा.'

रामायण वाचल्याविना मरू नका. मुळातून वाचा. संस्कृत येत नसेल तर रूपांतर वाचा. अनुवाद वाचा. वाचता येत नसेल तर ऐका. रामकथा वाचल्या ऐकल्याविना अखेरचा श्वास घेऊ नका.

* *

# शुद्धि-पत्र

| पान | श्लोक संख्या. | ओळ संख्या. | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १ | १ | १ | सुपुत्रा भिवन्द्य । |
| १ | १ | २ | कैकयी नन्दनेडय । |
| १ | १ | ३ | वानराधीश वन्द्य । |
| १ | २ | ४ | सुखान्त स्वयंधोप रामं । |
| ५ | १ | १ | तदादास्य रामस्य चकार कीर्तिमान । |
| ५ | १ | २ | श्लोक शतैर्य शद्वा, यशस्करं । काव्यमुदार दर्शन: ।। |
| ५ | २ | १ | वागनृता काचिदत्र भमिष्य ति । |
| ५ | २ | ३ | यावत्स्थादयन्ति, सरिताश्च महितले । |
| ६ | १ | १ | कृत्वा तु तन्मदा प्राज्ञ: समविष्य । |
| ६ | १ | २ | कोन्वेतन्त्रमुग्जीथा |
| ६ | २ | २ | अंगृहीतां तत: |
| ८ | १ | १ | कांचिदत्र भविष्यति । |
| ८ | २ | १ | यावत्स्थास्यन्ति सरितश्च । |
| ८ | ३ | २ | तावदब्दर्वधश्चत्व निवत्स्यसि ।। |
| ९ | १ | १ | कौसल्यार्य नराधीप । |
| ९ | १ | २ | अर्धादर्ध ददोचापि । |
| ९ | २ | १ | कैकय्यें चाव शिष्टार्थं । |
| ९ | ३ | १ | पुनदेव महामति: । |
| ९ | ३ | २ | भार्याणां पायसं पृथक् ।। |
| ११ | २ | १ | बाल्यान्प्रभृति सुस्निग्धी ।। |
| १२ | १ | १ | पृथिव्यां ये च – |
| १२ | १ | २ | ब्राह्मणान्क्षत्रियान्वैश्यान् शूद्रांश्चैव. |
| १२ | २ | १ | तेषामपि विशेषेण, यथाक्रमम् ।। |
| १२ | २ | २ | ये स्य: सम्पूजिता: सर्वे वसुभिर्भोजनेन |
| १२ | ३ | १ | प्रशातं पुरवरंच तत् ।। |
| १३ | १ | १ | लोकांस्त्रीनुच्छ्रितान् द्वेष्टि दुर्मति: । |
| १३ | १ | २ | त्रिदशराजनम् |
| १४ | १ | २ | लक्ष्मि संपन्नो–इवापर: । |

| पान | श्लोक संख्या. | ओळ संख्या. | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| १४७ | १ | ३ | भग्ना वालीच क्षुभितो ऽम्बुधि: । |
| १४८ | १ | १ | सर्वस्व भुतस्तु परिष्वङ्गे । |
| १४९ | १ | ३ | न युक्त मविधा वनम् । |
| १५० | २ | १ | लब्ध संज्ञो महाहवे । |
| १५० | २ | ३ | मदा तु मोक्षितस्यास्य । |
| १५० | २ | ४ | अप्रीतिश्च भवेत् |
| १५० | २ | ५ | मुहुर्त कांङक्षष्ये विक्रमं |
| १५१ | १ | १ | एतावन्तुं पुरस्कृत्य । |
| १५१ | २ | २ | बिभीषणस्तान कनिष्ट एषः । |
| १५२ | ३ | २ | त्वां करिष्यामि सत्यमेतद् शृणोतु मे· |
| १५३ | ३ | १ | गरूडाधिष्टिता वेतावुभौ राघवलक्षणौ |
| १५५ | १ | ३ | न ज्ञातित्वं |
| १५५ | १ | ४ | न. च सौंदर्यं |
| १५६ | १ | ७ | त्याज्य माहुर्दुरात्मानं । |
| १६४ | २ | २ | एत्तते, सकल राज्यं न्यासं निर्यातितं मक्ष |
| १६९ | ३ | १ | यदर्थे निर्जिता |
| १७१ | २ | १ | भ्रातरं य: वरित्यजेत् । |
| १७१ | २ | २ | कोनाम स भवेत तस्य यमेष न परित्यमेत |
| १७२ | १ | १ | सकृदेव प्रपनाथ |
| १७२ | ३ | २ | इति व्यवस्याम् न त्वाम् |
| १७२ | ३ | ३ | प्रयाहि जानामि— |
| १७५ | २ | २ | प्राप्स्यति दुर्मतिः |
| १७७ | २ | १ | प्रस्पर्धते यं हि गुरूं सुराणाम् । |
| १७७ | ३ | ४ | यावत्स्थास्यन्ति तावत्स्थास्यन्ति मे कथा |

वरील शुद्धी-पत्र, श्री गुरुदेव रानडे यांचे एक अनुग्रही श्री. र. दांडेकर, ज्यानी आपले संस्कृत अध्ययन अखंड चालू ठेवले, त्यानी गुरुसे म्हणून गीता प्रेसच्या वाल्मिकी रामायणाच्या आधारे तयार केले. त्यांची गुरु-सेवा अत्यंत स्तुत्य आहे.

**प्रकाशक**

* * *

# अॅकेडमी ऑफ् कंपेरेटिव्ह फिलॉसफी अँड रिलिजन

## हिंदवाडी बेळगांव

### संस्थेकडे मिळणारी पुस्तके :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कर्मयोग | डॉ. ह. रा. दिवेकर | २–०० |
| २) | श्रीगुरुदेव रानडे | प्रा. भा. र. मोडक व सौ. वसुधा मोडक | ३–०० |
| ३) | श्री ज्ञानेश्वर चरित्र | रामचंद्र नारायण सराफ | ८–०० |
| ४) | गुरुदेव रानडे व त्यांची पारमार्थिक शिकवण | ग. वि. तथा काकासाहेब तुळपुळे | १५–०० |
| ५) | श्री. ज्ञानेश्वरांचे आत्मदर्शन अर्थात कार्य आणि तत्त्वज्ञान | रा. ना. सराफ | ४०–०० |
| ६) | समर्थ रामदास जीवन व तत्त्वज्ञान | | ३०–०० |
| ७) | श्री राम चरित मानस | अनुवाद; प्रज्ञानानंद सरस्वती | ४०–०० |
| ८) | वालमीकी रामायण | प. पू. डॉ. काटे महाराज | २०–०० |

एकाचवेळी रु. १०० ची पुस्तके खरेदी केल्यास शेकडा २५ टक्के कमिशन देवू व पुस्तके आमच्या टपाल खर्चाने पाठवू.